# MARAT'HA TRANSLATION OF BERQUIN'S CHILDREN'S FRIEND.

VOL: 1.

---

# बाळमित्र

सदाशिव काशीनाथ छत्रे

यांणीं

इंग्रेजीवरून मराठी भाषेंत केला

मुंबईचे शिक्षा मंडळीचे

छापखान्यांत छापिला

भाग १

---

सन इसवी

१८२८

शक शालिवाहन

१७५०

NATIONAL LIBRARY
No. Imp. 4568
DATE 13/11/09
CALCUTTA
Mar 843.5 B989

College of Fort William

Rare

NATIONAL LIBRARY
Rare Book Section.

Mar

843.5
B989

B

किताब कालिज फ़ोर्टविलियम

IMPERIAL LIBRARY

## अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| धाकटा भाउ | १ | आवडी आणि मोरु | २०१ |
| वर्षांतील तीन काळ | ९ | कोकरुं | २०५ |
| लक्ष्मण | १३ | द्राशीखुद | २११ |
| चिमणी | १९ | खोत | २१२ |
| धाकटा किनऱ्या | ४० | बापांची समजी | २२८ |
| मैना | ६१ | धाकटी मुलगी कुळविणीने ठकविली | २६१ |
| मुलेंजी स्वतंत्र व्हायास इच्छितात | ७० | म्हातारा भिकारी | २८६ |
| कांटेझाडें | ८० | ससाणा मस्करत | २९२ |
| निंबाजी | ८५ | थोराचें हृदय | ३१४ |
| दागिने टिपणारी पोरी | ९० | जुनाचा कर | ३३७ |
| सखी आणि मनी | १२१ | परशुराम कृष्णी | ३४१ |
| धाकटा जगु | १४९ | हट्टी मुलगी | ३५१ |
| गवंडी व मजूर | १७० | आज्ञाभंग | ३५५ |
| तरवार | १७४ | अनिक | ३५८ |

# प्रस्तावना.

जे मुलांचे शिक्षारूप ग्रंथाविषयीं परिश्रम करितात, त्यांस यद्यपि इतर ग्रंथकर्त्यासारिखे कीर्तीचा लाभ होत नाहीं, तथापि वास्तविक पाहातां असें वाटतें कीं असल्ये कवींचे ग्रंथ मोठमोठे काव्याहून अधीक उपयोगी व अधीक उपकारक आहेत. लाहान मुलास मर्यादा व सद्गुण लावणें; त्यांस कुमार्गापासून संरक्षणें; त्यांस ज्ञानाचें रवाजें देणें; आणि त्यांची बुद्धी विचारक्षम करणें; याविषयीं उद्योग करणें महा पंडितांसही योग्य होय. अल्पमती आहेत ते मुलांची प्रवृत्ती, निवृत्ती, त्यांचें खेळणें, रुसणें, त्यांचे हर्षविषाद पाहून तें अज्ञान, आपल्ये मनांस आणायास योग्य नाहीं ह्मणोन, ह्मणोत; परंतु ज्यांची लोकहितावर दृष्टी आहे, जे दीर्घ दृष्टीनें जाणतात कीं, एका मनुष्याचे सत्कर्म दुष्कर्मानें सगळ्या सृष्टीचा फेरफार होत असतो, ते मुलांचे ठायींहि सद्गुण दुर्गुण पाहून, त्यांचे विचाराविषयीं अनास्था करीत नाहींत. ज्याहाणारे होते त्याणीं शिकंदर बादशाह मूल होता, तेव्हांच त्याचे दुःशील व्यापकता पाहिली; पुढें त्याणें सर्व पृथ्वीचीं राज्यें उलटपालट केलीं, शरीरतर सर्वांचें नेव्हडेंच.

पण

# प्रस्तावना

पण त्यांतल्या राहाणाराची योग्यता भिन्न भिन्न आहे, ती बहुतकरून लाहानपणापासून यन्ये वाईट शिक्षेप्रमाणें परिणामास पावत्ये; ह्मणून मनुष्याचें भावी स्वरूप उत्तम शिक्षेवर आहे. यासाठीं जो मनुष्य मुलांचे शिक्षेविषयीं आपल्या गुणाचा उपयोग करितो, त्याचा परिश्रम किती स्तुत्य ह्मणावा!

ह्या ग्रंथकर्त्यानें दोन गोष्टी मनांत आणून ग्रंथ केला आहे; एकतर मुलांचें रंजन; दुसरें, त्यांस सद्गुण सहज लागावे. प्रति गोष्टींत, सदाचरण, कृतज्ञता, यांची प्रशंसा आहे. यांत मोठ्या मोठ्या अघटित घडणाऱ्या गोष्टी सांगीतल्या नाहींत; ज्या मुलांचे नित्य परिचयांतल्या, त्याच सांगीतल्या आहेत. त्यांस जे सद्गुण लागावे ह्मणून योजिले आहेत ते त्यांचे सामर्थ्याबाहेर नाहींत; गोष्टी सांगीतल्या आहेत, त्या त्यांचे सारिखे मुलांच्या, त्यांचे खेळगड्यांच्या, त्यांचे आईबापांच्या, त्यांचे बहिण भावंडांच्या; चाकर, आणि ज्यांस नित्य प्रसंग असतो त्यांचा; आणि पशु, जे त्यांचे नित्य पाहाण्यांतले त्यांचा; भाषाहि बालबोध योजिली आहे. हर्षविषादांची कारणें जीं जीं दाखविलीं आहेत, त्यांमुळें, जे त्यांचे मनांत विचार उत्पन्न होतात, ते स्पष्ट केले आहेत; त्यांचे अन्यायांचे जे वाईट परिणाम तेच त्यांचे बुद्धीस आणोन, त्यांचीं पारिपत्यें ह्मणोन स्थापिलें आहे; आणि सदाचरणानें जें मनास समाधान उत-

# प्रस्तावन.

त्न होतें तेथ त्यांचें सत्कर्माचें फळ सांगीतलें आहे. ऐथं जें जें सांगीतलें आहे, तेणेंकरून, त्यांणीं, सदाचरण हें सर्व सुखाचें साधन ह्मणून त्यावर प्रीति करावी; आणि दुराचरण हें सर्व दुःखाचें, आणि पश्चात्तापाचें उत्पत्तिस्थान ह्मणून, तें वर्जावें.

हा ग्रंथ मुली मुलगे या उभयतांसही उपयोगी आहे; आणि हा दोहोंस उपयोगी पडावा ह्मणून दोहोंचे प्रसंग एकत्र आणून गोष्टी योजिल्या आहेत. प्रतिगोष्टींत भिन्न भिन्न प्रकार दाखविले आहेत; अनेक सद्गुण दुर्गुणांची प्रशंसा, किंवा निंदा, गोष्टींचे प्रसंगानें आणिली आहे. बहुतेक गोष्टींचे मुलांच्या ठायीं अनुभवही घडून पाहिले आहेत. कोठें कोठें नाटकें योजिलीं आहेत, तेणेंकरून त्यांस हावभावयुक्त निर्भिडतेनें नीधांत बोलतां यावें, लज्जेनें तोंड मुरडतात तें मुरडूं नये. यांत आईबापांसही मिश्रित केलीं आहेत, तेणेंकरून, मुलांचे आनंद भोगायास त्यांसही सवड दिली आहे.

हा ग्रंथ मुलांस पढविल्यानें त्यांस लाहानपणापासून अनायासानें, बोलायाचा अभ्यास होईल; त्यांचा शब्दसंग्रह वाढेल; त्यांस अनेक व्यवहार, अनेक रीति, नीति समजतील; बुद्धी सदसद्विचारक्षम होईल; त्यांचें हृदय कोमल होईल. मातापितरांचाठायीं त्यांचा प्रेमा वाढेल; बहिण भावांडांच्याठायीं त्यांची प्रीति वाढेल;

ईश्वरी

# प्रस्तावना.

ईश्वरी भक्ति वाढेल; पुढें मोठमोठाल्या विद्या शिकायास सुगम होतील. समस्त त्या हातींजे ग्रंथ पडतात ते त्यांचे बुद्धींत भरायास अवघड आहेत. या ग्रंथापासून, जसा उपदेश मनांत भरेल, तसें अन्यग्रंथापासून होणार नाहीं; ते समजूतीस खोल, अभिरुचीस रुक्ष, उपदेशास तीक्ष्ण, मुलांचे चित्तांत ग्रंथाविषीं तसी प्रीति उत्पन्न करणार नाहींत. या ग्रंथीं तसें नाहीं; एथें त्यांची भाषा, त्यांचे खेळ, त्यांचे उद्योग, त्यांचीं अपेक्षितें, सांगीतल्यामुळें, त्यास वाचतां वाचतां आवड उत्पन्न होऊन, इकडे त्यांस नकळत सहज त्यांगसे गुण लागावे. म्हणोन यास बाळमित्र नाव योग्य आहे.

या ग्रंथाचा कर्ता बरकिन म्हणून कोणी महाविद्वान् फराशिस यांचे देशीं होऊन गेला. ज्याचे उपकार सर्व विलायतेंत आठवितात; ज्याचे वाणीनें आनंदित, जो रस उठला तो उभा राहतो; ज्याचे वर्णन यथातथ्य. बाळपणांतील मानसिक विकार, कन्या वैचित्र्य, इत्यादिक धर्मांचें यथास्थित स्वरूप वर्णनाविषयीं जो प्रशंसनीय; ज्याचा लेख अचेतनास चेतना आणितो; कोणताहि विषय ज्याणें आदरिल्यामुळें श्रवणयोग्य होतो.

हा बाळमित्र ग्रंथ पूर्वीं फराशिशी भाषेंत होता; त्यांतून इंग्रेजींत आला, त्यावरून मराठींत आणिला आहे. फराशिशी व इंग्रेजी भाषा यांचा विचार करितां; त्या भाषा आज शेंकडों वर्षें सुधारत आल्या आहेत.

ज्यांत

# प्रस्तावन.

जांत सर्व विषयांवर ग्रंथ आहेत; जांत सर्व मनांतील अभिप्राय शब्दें करून बोलतां येतात, इतके शब्द आहेत; जा महान् महान् बुद्धिमानांनीं परिचित आहेत, तर असेल्या भाषांत जो रस झाला आहे, तो रस मराठी भाषेंत कसा होईल ? जा भाषेस आज दिवसपर्यंत व्याकर्ण, कोश, कोणीं केलेंच नाहींत; जींत विद्वान लोकांचें चित्त रमलेंच नाहीं. जींत शब्दसंग्रह थोडा; जीची बोलायाची शैली प्रौढ नव्हे; यावर आणिखी माझें भाषांतर हि यथामति आहे; ह्मणोन सर्वांनीं कृपाकरून, यांतील दोषांकडे लक्ष न देतां गुणमात्र घेऊन माझी सेवा स्वीकारावी; ही माझी प्रार्थना आहे.

---

## धाकटा भाऊ

एके रूप्रभातीं, बागांत जाऊन फुलें मिळवावीं, आणि आई जागी झाली नाहीं तव, त्यांचा माळा करून तीस द्याव्या, म्हणून बेणू उठली आहे, आणि माडीवरून खालीं यावयास सिद्ध झाली आहे, तव, तिचा बाप गोविंदशर्मा, तिच्या खोलींत आला, आणि तिला कडेवर घेऊन, हंसत म्हणतो " बेटा, तूं माझे बरोबर लवकर चल, मी तुला कांहीं मौज दाखवितों, ती पाहून तुला फार हर्ष होईल." वेणूनें मोठ्ये उत्कंठेनें पुसलें " बाबा, ती काय ती मला सांगशील ?

बाप म्हणतो " मुली, देवानें तुला गेले रात्रीं, धाकटा भाऊ दिला आहे" ती म्हणाली " धाकटा भाऊ! कोठें आहे तो मला पाहूं दे; मला त्याजकडे लवकर ने." मग बापानें तिला तिची आई बाळंत झाली होती, त्या खोलीचें दार उघडून आंत नेलें; तेथें बाजेजवळ एक परकी बायको होती, तिला वेणूनें पूर्वीं कधीं घरांत पाहिलें नव्हतें, ती त्या उपजलेल्या लेंकरास बाळवंत्यांत गुंडाळीत आहे, तें पाहून वेणूनें बापास नानापरीचे प्रश्न केले, त्यांचीं उत्तरें तीस देऊन, बापास वाटलें कीं, आपण तिचें कोड पुरविलें; तेव्हां ती आणिखीही त्यास पुसों लागली " बाबा, ही म्हातारी

ह्मातारी कोण आहे? पाहा, ति कशी माझे धाकट्या भवास बांधित्ये आहे! त्याला ती दुखवील ह्मणून तुला भें वाटत नाहीं बाबा?

गोविंद. तूं भिऊं नको मुली, ही ह्मातारी भली आहे; हिला मी बाळाची जतन करायाकरितां बोलाविली आहे.

वेणू– पण बाबा, हें बाळ माझें बयेचें, तिणें याला आजून पाहिलें आहे कीं नाहीं?.

गंगाबाई– (पलंगाच्या पडदा सारून ह्मणत्ये) होय मुली, मी त्याला पाहिलें आहे. मला सांग बरें, त्याला पाहून तुला हर्ष झाला कीं नाहीं?

वेणू– होय बये, मला मोठा हर्ष झाला; तूं मला चिमणासा चांगला संवगडी खेळायास दिलास; त्याचें तोंड पाहा कसें ठक आहे तें! आणि तांबडेंच, जसें कोणी ह्मणेल, तो कोठून धावत आला आहे! बाबा, मी त्यासंगती खेळूं?.

गोविंद. तें कसें होईल बेटा? त्याचानें उभें राहावत नाहीं; तूं पाहा, त्याचे पाय किती सुकुमार आहेत ते.

वेणू– अरेरे! पाय चिमकुले आहेत खरे! आतां मी समजल्यें, यास मज बरोबर धांवायास आजून फार दिवस पाहिजेत.

गोविंद. तें सगळें ह्याचे वेळीं होईल; पहिल्यानें तो चालूं शिकेल, मग तुह्मीं दोघें बागांत उड्या माराल, आणि खेळाल.

वेणू

## बाळमित्र.

वेणू - खरेंच काय ? अरे बाळा, मी तुला काहीं देत्यें, ह्मणजे तूं माझी माया करिशील. हें माझ्या जवळ चित्र आहे, घे हें तुला खेळावयास– हें काय बाबा ? हा लबाड घेत नाहीं ! त्याणें मुठी बळकट मिटून धरिल्या आहेत.

गोविंद० हात कसे करावे, हें त्याला आजून ठाऊक नाहीं; त्यास तें कळायास काहीं महिने पाहिजेत.

वेणू - असें आहे ? आहारे माझ्या धाकट्या. मी तुला माझीं सगळीं खेळणीं देईन; सांग आतां तूं खुशाल्लास ? मला उत्तर कर. बाबा, तो हंसतो. मला वेणू ह्मण वेणू ! काय, तूं बोलत नाहीस ? .

गोविंद० तो बोले तों आजून दोन वर्षें पाहिजेत, पण वेण्ये, तूं टकळी करून आईस कंटाळा आणिशील हो.

वेणू - पाहा बाबा, त्याणें मुद्रा अगदीं फिरविली, तो रडतो आहे; मला वाटतें कीं, त्यास भूक लागली आहे. रे माझे लाहानग्या, उगी तूं उगी ! मी तुला काहीं चांगलें खायास आणित्यें.

गोविंद० माझे लाडक्ये, त्याचे खाण्याचे खटपटींत तूं पडों नको; आजून त्यास दांत आले नाहींत; तो खाईल कसें ? .

वेणू - त्याचानें खावबत नाहीं ? तर तो वांचेल कसा ? त्याणें काय उपाशीं मरावें ? .

गंगाबाई – नाहीं मुली, त्या करितां देवानें माझे मामूंत दूध केलें आहे. तो आतां अशक्त आहे, पण कांहीं दिवस गेल्यावर तूं नाळशील, तो भुईवर कसा लोळूं लागेल तो·

वेणू – तें मी कधीं पाहीन! पण आई पाहा तूं त्याचें डोकें काय चांगलेगुळगुळीत दिसतें; त्यास हात लावायास मला भय वाटतें·

गोविंद० तूं हात लाव ह्मावातर, पण हळूच लाव हो·

वेणू – होयहोय! फार हळू लावल्यें! आहाहा! किती तरी मऊ आहे हें! जसा कापसाचा गोळा·

गोविंद० मुली, लाहान मुलींचीं डोकीं अशीच असताहेत·

वेणू – बाबा, जर तो पडला, तर डोकें फुटून, तुकडे तुकडे होतील नाहीं बरें?·

गंगाबाई – ह्यांत काय भ्रांत? पण आह्मीं यास जपून धरीत जाऊं, ह्मणजे तो पडणार नाहीं·

गोविंद० मुली, तुला ठाऊक आहे, पांच वर्षां मागें, तूं अशीच लाहान होतीस तीं?·

वेणू – यांचे इतकी लाहान! नाहीं बाबा, तूं माझी थट्टा करितोस·

गोविंद० थट्टा नाहीं मुली, मी हें खरेंच सांगतों·

वेणू – तर, मला आठवत नाहीं तें?·

गोविंद० तें खरेंच, पण हा हिंदोळा, मी दारीं कधीं टांगला, त्याची तुला आठवण आहे ?

वेणू – कां ? तो सदां आहे तसाच आहे.

गोविंद० तसें कसें होईल मुली! तूं या लाहानचे बाळा एवढी होतीस तेव्हां, हा हिंदोळा टांगला आहे.

वेणू – खरेंच काय! तर तें माझा लक्षांत कसें राहिलें नाहीं ?

गोविंद० लाहानगीं बाळें असतात त्यांस, जवळ काय होतें, तें समजत नसतें. हा तुझा लाहान भाऊ, तुझा एवदा होईल तेव्हां, तूं त्यास आजचा गोष्टी पुस, किं "मी त्या दिवसीं, तुला नाव घ्यायास शिकवीत होत्यें, त्याची तुला आठवण आहे?" मग तुला समजेल, त्याला आठवतें कीं नाहीं तें.

वेणू – काय? आणि मीही असेंच, आईचें थान पीत होत्यें ?

गोविंद० होय, यांत काय संशय? तुज करितां काय काय श्रम पडले आहेत मुली! तूं अशी अशक्त होतीस, किं तुला कांहीं खाववत नसे; आह्मीं प्रतीक्षणीं भिऊं, कीं तूं आतां मरशील. तुझी आई ह्मणे "अगे माझे बापडे, तुझे प्राण घाबरे होतील" असें ह्मणून तिणें तुला मोठे श्रमानें, थोड थोडें थानचें दूध प्यायास शिकविलें.

वेणू – आहागे माझे बये, तर मला प्रथम खायास, तूं शिकविलेस नाहीं

नाहीं?

गोविंद ० होय माझे लेंकरा, तुझे आईनें तुला थान प्यावयास शिकवि-लें, तेव्हां तूं तुष्ट आणि पुष्ट झालीस. असे श्रम तिणें तुजकरितां दोन वर्षे पर्यंत रात्र दिवस केले. कोणे समयीं, भागवल्यामुळें तुझे आ-ईस, अंमळ नीज लागली असतां, तूं रडून तिला उपद्रव करावास. मग तिणें गलबलून उठून, तुझा पाळण्या पाशीं यावें "बय्ये बय्ये, बे-टा. उगी राहा; तुला भूक लागली असेल, माझे बचे" मग तिणें तुला थानाशीं धरावें.

वेणू - आणि बाबा, माझें हिं डोकें याचा डोक्या सारिखें तेव्हां मऊ होतें?

गोविंद ० असेंच होतें माझे लाडक्ये.

वेणू - काय! माझें हें डोकें! जें आतां इतकें कठीण आहे हें! ओ हो! तसें असतें तर केव्हांच फुटून गेलें असतें --

गोविंद ० तें खरें मुली, पण आह्मीं तुला फार संभाळिली आहे. किती दिवस पर्यंत तुझे आईनें सर्व स्त्रवें एकीकडे टाकिलीं, आ-णि तूं दृष्टिवेगळी होशील ह्मणून, कोठें जाणें सोडिलें. जेव्हां जेव्हां तिला, कामा मुळें तुला सोडून जायाचें पडे, तेव्हां, ती तुझी मोठी काळजी करी. दाईचे स्वाधीन तुला करावें, आणि तिला ह्मणावें,

"झोंपताउ

"सेंबताउ, मी इला तुझे स्वाधीन करित्यें; तूं पोटचे लेंकराप्रमाणें इला सांभाळ बरें." आणि तुझी चांगली जतन करावी ह्मणोन, तिणें दाईस वेंळोवेळीं देणगी द्यावी. –

वेणू – आहागे माझे भल्ये आई. पण बाबा, मला धांवतां येत नव्हतें, अशी मी कधीं होत्यें? जी मी, आज अर्धकोश धांवेन, ह्मटलें असतां धांवेन. पाहा, मी तीन चार पावलानीं खोली पार होत्यें; हें काय कोणी मला शिकविलें होतें?

गोविंद० तुझे आईनें, आणि म्या, तें तुला शिकविलें. तूं पडली असतां, डोक्यास लागूं नये ह्मणोन, आह्मी मखमालीचा पटा करून, तुझा डोकीस बांधावा; मग तुला मऊ दोरी धरचून, चालवावें. कोणत्ये वेळेस, आह्मीं बागांत चारीवर, एकासमोर एकानें बसावें; तुला मध्यें निराधार उभी करून "मजकडे ये" असें ह्मणून, एकदां मी, एकदां तुझे आईनें, हात पुढें ओढवावे; ते समयीं, तूं किंचिन्मात्र कलली, कीं आमचा जीव घाबरा व्हावा. कधीं आह्मीं, तुजकडून पांगुळगाडीस हात धरवावे, आणि चालवावें. अशा अशा युक्तीनीं, आह्मीं तुला चालायास शिकविलें आहे.

वेणू – मजविषयीं तुह्मास इतके श्रम पडले आहेत, हें मला ठाऊक नव्हतें. तर मला बोलायासही, तुह्मींच शिकविलें असेल?

गोविंद

गोविंद० त्यासहि आह्मीच कारण; मी तुला मांडीवर घेउन, बाबा, आई, हे शब्द तुला क्षण क्षणीं ऐकवीं; जंव तूं ते मला उलटून ह्मणून दाखवीस. आज जोजो शब्द तूं बोलत्ये आहेस, तो तो, आह्मी तुला शिकविला आहे; आणि, तुला वाचावयासही आह्मीच शिकविलें; त्याची तर तुला आठवण असेलच.

वेणू - होय, तें मला चांगलें आठवतें. तूं मला पाटीवर अक्षरें काढून देस; आणि शिकवीस, तसें मी शिकल्यें ह्मणजे, तूं मला खारीक खाऊ देईस; तो घेऊन मला फार हर्ष होई.

गोविंद० जर आह्मी, तुज करितां इतका श्रम केला नसता, आणि जर तुजवरच टेविलें असतें, तर तुझी अवस्था काय होती बरें?

वेणू - तर मला मरून आज फार दिवस झाले असते. आहा माझे चांगल्ये आई! आणि आहारे माझे चांगल्ये बाबा! तुमची उतराई मी कशी होईन?

गोविंद० इतकें करीत असतांहि, तूं एकादे वेळेस, बापास कंटाळा आणिल्येस, आणि आईचें ऐकत नाहींस.

वेणू - माझा जीव आहे पर्यंत, आतां मी असें कधीं करणार नाहीं. तुह्मी मजकरितां, इतके श्रम घेतले, हें मला ठाउक नव्हतें बाबा.

गोविंद० आतां तुझे भावा करितां, आह्मी किती श्रम भोगूं, तें पा-

ह्मत जा.ह्मणजे त्यावरून तुला वाटेल, किं मज करितांही, यांस असेच श्रम पडले असतील ·

असें भाषण झालें तेणेंकरून, वेणूचे मनांत सगळ्या गोष्टी पक्क्या ठसल्या · आपल्ये धाकटे भावा करितां, आईस श्रम किती पडतो; तो अंमळ बरा नसला ह्मणजे, तीस काय वेदना होत्ये ! त्याने पोटांत अन्न जावें ह्मणोन, ती किति कष्ट पावत्ये ! तो रडतो तेव्हां तेव्हां, तिला किति गहींवर येतो ! आईस विसांवा द्यावया करितां, किति ममतेनें आपला बाप मुलाला संभाळितो ! आणि दोघेहि त्यास चालायास, किंवा बोलायास शिकविण्या विषयीं किति परिश्रम घेतात ! हें सर्व पाहून, ती आपल्ये मनांत ह्मणे " माझे आई बापानीं, मजकरितांहि असेच श्रम घेतले असतील " मग तिची त्यांजवर ममता फारच जडली; आई बापाची मी सर्व प्रकारें उपकारी, असें तिचे मनांत बाणलें · नंतर तिणें कधीं त्यांची आज्ञा मोडिली नाहीं; आणि त्यांना तिळप्राय दुःख होई असें कधीं जाणून केलें नाहीं ·

---

## वर्षाचे तीन मुख्य काळ ·

बाळा, नुकताच शेकून आणि ओल्ये गव्हांचा ओंब्या खाऊन, आलेला होता, आणि ह्मणतो " आहाहा ! असा सदां हिंवाळाच अस्ता न-

र बरें होतें; याचें सुख काय सांगूं; यांत, नद्यांचें पाणी किति स्वच्छ आणि किति मिष्ट! उर्णा वस्त्रें किति सुख देतात! भेलांत भूक, अन्नास रुची, आणि निद्रा तरी काय गाढ येत्ये · तें ऐकून गोविंदशेट त्याचा बाप, त्यास ह्मणाला "बरें तर, ह्मणतोस असेंच, माझे स्मरणवहींत लिहून ठेव" बाळानें तसें केलें · पुढें हिंवाळा निघोन गेला, आणि उन्हाळा आला; तेव्हां संपूर्ण वृक्ष पालवी फुटोन फल पुष्पयुक्त झाले आहेत; वायू मंद सुगंध शीतल वाहात आहे; लोक, चंदनाचा उटया घेउन गळयांत पुष्पांचा माळा घालून, फिरताहेत, नाना प्रकारचे शीतळ उपचार करिताहेत; बागामध्यें कारंजी उडताहेत, त्यांचे तुषार अंगास लागून, अत्यंत सुख करिताहेत; तसेंच, पिकलेलीं फळें, आंबे, फणस, जांब, अंजीर, द्राक्षें इत्यादिक जिव्हेस अमृता सारिखी रुची देताहेत · तें सर्व सुख पाहून बाळ, ह्मणतो " आहाहा! असाच सदां उन्हाळा असता, तर बरें होतें" गोविंदशेट ह्मणाला " मुला, ह्मणतोस असेंच माझे स्मरणवहीवर लिहून ठेव" बाळानें तसें केलें · नंतर पावसाळा आला; त्या समयीं, जिकडे तिकडे हिरवींचार गवतें, व नाना प्रकारचीं झाडें, उगवलीं आहेत; नद्यांचे प्रवाह चालिले आहेत; शाकभाजा पुष्कळ झालेल्या आहेत; जिकडे तिकडे पाणी जमलें आहे, त्यांतून

कागदांचीं

## तीनकाळ

कागदांचीं तारवें करून, मुलें पोंहविताहेत: डोईवर छत्र्या, सखलादीच्या टोप्या घेऊन पावसांतून लोक चालिले आहेत: पुढें शेतें पिकलीं, त्यांत नाना प्रकारचीं धान्यें झालीं आहेत. तें पाहून बाळ म्हणाला; "बाबा, काय चमत्कार हा! हा पावसाळा, सदा असाच असता तर बरें होतें!" बाप म्हणला, मुला, "हें त्या वहींत लिहून ठेव" बाळानें तसें केलें. पुढें कांहिकों दिवशीं हिंवाळा येणार तों, बाळा बापास म्हणतो; "हा हिंवाळा न येता आणि पावसाळाच राहाता, तर बरें होतें" बाप म्हणाला "असें होईल तर तुला संतोष होईल मुला"?

बाळा – फारच संतोष होईल बाबा.

बापानें ती स्मरणवही काढून बाळास दाखविली, आणि म्हणाला, हें एथें काय लिहिलेलें आहे, तें वाचबाळा.

बाळा – (वाचतो) आहा! असा हिंवाळा, सदां असता तर बरें होतें.

गोविंद० बरें, आतां पुढें चार पानें उलटून पाहूंया. हें वाच.

बाळा – (वाचतो) आहाहा! हा असा उन्हाळा सदां असता, तर बरें होतें.

गोविंद० (आणिखी चार पानें उलटून पुसतो) बाळा, हें अक्ष-

र कोणाचें तें वळखिलेंस ?

बाळा – हें माझें अक्षर.

गोविंद ० तें काय लिहिलें आहेस तें वाच.

बाळा – (वाचतो) हा पावसाळा असाच वर्षभर असेल तर चांगला.

गोविंद ० हें मला विचित्र दिसतें; हिवाळ्यांत तूं ह्मणालास, सदा हिवाळा असेल तर बरें; तोच तूं उन्हाळ्यांत ह्मणतोस उन्हाळा चांगला; आणि पावसाळ्यांत ह्मणतोस, पावसाळा चांगला; आतां यावरून काय समजावें ?

बाळा – कि सर्वहि काळ चांगले आहेत.

गोविंद ० होय मुला. त्या त्या काळीं, त्या त्या काळच्या अनेक प्रकारच्या समृद्धि उत्पन्न होताहेत; आणि प्राणीमात्रास अनेक प्रकारचीं सुखें होताहेत. हें विश्व कसें चालवावें, हें ईश्वरास चांगलें ठाऊक आहे. याच्या विचार करायास आपली बुद्धी किति ? जर तूं ह्मटलेंस तसें होतें, तर यापुढें आपल्यास हिंवाळा आणि उन्हाळा नाहींसा होता, सदा सर्वकाळ पाउस पडून जिकडे तिकडे जळमय होतें; लोक घरांत अडकून राहाते; धान्यें कुजून जातीं; दुष्काळ पडून लोकांचा संहार होता. इतका नाश होउन तुझा स्वार्थ किती

होता

होता ह्मणशील तर, तुला आणिखी कितिक दिवस पर्यंत, कागदाचीं तारवें पाण्यांत खेळवायास सांपडतीं. ह्मणोन, देवानें ही गोष्ट केव्हढी चांगली केली आहे पाहा बरें! किं काळांची वांटणी आपल्ये हातीं ठेविली आहे. या गोष्टी, आह्मां जीवांच्या हातीं असत्या तर, कोठेंही सुख नाहींसें होउन अनर्थ होता. —

## लक्ष्मण.

एक अति दरिद्री संताजी नाचाचा मोलकरी होता. त्याला लाहान लाहान साहा मुलें होतीं. त्यांचें पोषण कसें होईल ह्मणोन त्यास एके समयीं मोठी काळजी पडली; आणि त्यांत दुसरें असें झालें होतें किं, त्यावर्षी पीक चांगलें आलें नव्हतें ह्मणोन आदल्ये वर्षापेक्षां दाणा दुप्पट माहाग झाला. संताजी रात्र दिवस खपे तऱ्ही मुलांस जाडी भरडी ही भाकर पोटभर घालाया पुरते पैसे त्याला मिळत नसत. असा तो पराकाष्ठेच्या क्लेशांत पडला. एके दिवशीं त्याणें, आपले सगळ्या मु-

लांस जवळ बोलाविलें, आणि डोळ्यांत आसवें आणून ह्मण तो,"अरे माझ्या जिवलगानो, यंदा माहागाई फार आहे; मी एवढा खपतों तरि तुमचें पोट भराया पुरता दाणा मला मिळत नाहीं:अशी माझी अवस्था आहे. तुह्मी पाहा, किं सगळे दिवसाची माझी मजूरी, इतक्या एका भाकरी साठीं खर्च होत्ये, ह्मणोन मला जें मिळतें, तितक्यांत तुह्मीं निर्वाह केला पाहिजे दुसरा उपाय नाहीं. तितक्यानें तुमचें पोट, भरणार नाहीं खरें पण प्राणतर वांचतील." इतकें बोलून तो उगा राहिला. त्या बापड्याचानें पुढें बोलवलें नाहीं. तो वर देवाकडे डोळे करून रडूं लागला. तें पाहून मुलें ही रडूं लागलीं; आणि आपापल्या मनांत ह्मणूं लागलीं;"हे देवा, हे ईश्वरा, आह्मीं गरीब, आह्मीं लाहान, आह्मीं भाग्यहीन, आहों. आह्मांवर करुणा कर. आमच्या बाबास सहाय हो. आह्मास उपाशीं मरूं देउं नको."

संताजीनें मगल्या भाकरीचे सारिखे सात तुकडे केले. त्यांतला अगदि लाहान आपण घेऊन बाकीचे मुलांस वांटून दिले. त्यांत, एक लक्ष्मण ह्मणून मुलगा होता, त्याणें आपला भाग घेतला नाहीं. तो ह्मणाला;"बाबा मला नको; आज माझानें खाववत नाहीं. मला बरें वाटत नाहीं; माझा वांटा तूं

खा; नाहींतर माझे भावंडांस वांटून दे." संताजी, लक्ष्मणास पोटाशीं धरून, विचारितो, "बाळा, तुला काय होतें? तो ह्मणाला, "बाबा, मला बरें वाटत नाहीं; फार बरें वाटत नाहीं. मी निजायास जातों." संताजीनें मुलास नेऊन खाटेवर निजविलें. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं, संताजी मोठा कष्टी होऊन तसाच वैद्याचे घरीं गेला; आणि त्याचे पांयां पडून ह्मणाला;" वैद्यबावा, माझा मूल घरीं दुखण्यांत पडला आहे. मज दीनावर दया करून, त्याला पाहाल. आणि औषध द्याल तर, मी तुमचा उपकार जन्मवर विसरणार नाहीं. तो वैद्य मोठा सज्जन होता. आपणास संताजीकडून कांहीं मिळायाचें नाहीं; हें त्यास पक्कें ठाऊक होतें. तो त्याचे घरीं गेला; आणि खाटे जवळ जाऊन त्याणें लक्ष्मणाची नाडी पाहिली. तों रोगाचें लक्षण काहींच दिसलें नाहीं, परंतु अशक्त फार झाला आहे इतकें मात्र दिसोन आलें. नंतर कांही औषधाची याद लिहितो आहे, इतक्यांत लक्ष्मण ह्मणतो, वैद्यबाबा मी तुमचे पायां पडतों, मज करितां कांहीं औषध आणवूं नका; मी तें साफ घेणार नाहीं.

वैद्य – कां बरें घेणार नाहींस?

लक्ष्मण – तें मला विचारूं नको; माझानें सांगवत नाहीं.

वैद्य

वैद्य – तें सांगायास तुला काय अडचण आहे ? तूं तरी मला मला हट्टी पोरगा दिसतोस.

लक्ष्मण – वैद्य बावा, मी हट्टामुळें नाहीं सांगत असें नव्हे.

वैद्य – बरें तर, मी तुला आग्रह करित नाहीं; तुझ्या बापास विचारितों, तो मला वाटतें कीं इतकें गुप्त ठेवणार नाहीं.

लक्ष्मण – नको नको वैद्यराज, देवा करितां ही गोष्ट बाबाला कळवूं नका.

वैद्य – तुला तुला काय ह्मणावें! असो, पण जर तूं मला सांगत नाहींस तर मला ही गोष्ट तुझे बापास जाणविणें प्राप्त आहे.

लक्ष्मण – अरे देवा! नको बाबा नको! त्यापेक्षां आतां मीच तुह्माला सांगेन तें बरें. पण दया करून माझ्या भावांला आणि बहिणींला आधीं बाहेर घालावा.

वैद्यानें दुसऱ्या मुलांस बाहेर घालविल्यावर लक्ष्मण त्यास ह्मणतो; "वैद्य बावा, या दुष्काळांत माझे बापास मोठे श्रमानें एक भाकरी पुरते पैसे मिळतात. तिचा एकेक तुकडा एकेकाच्या वांट्यास येतो, आणि अगदींच लाहान तो बाबा आपण घेतो. माझे भाऊ आणि बहिणी भुकेनें व्याकुळ पाहून मला भारि वाईट वाटतें. सर्वांत मी वडिल, सर्वांपेक्षां मला अधिक शक्ती

आहे

आहे; त्याअर्थी मला वाटतें कीं माझा वांटा भावां बहिणींनी खावा. मी खात नाहीं याचें कारण हें आहे यासाठीं मी दुखणें घेतलें आहे, आणि माझानें खावबत नाहीं असें सांगतों. परंतु मी फिरून तुमच्या पायां पडतों, ही गोष्ट बाबाला सांगूं नका." तें ऐकतांच गहिंवर येऊन वैद्याच्या डोळ्यांस पाणी आलें, आणि ह्मणतो, पण बाळा, तूं भुकेनें व्याकूळ होत नसशील ?

लक्ष्मण – असें कसें होईल, मला भूकेपासून व्यथा होत्ये. पण त्यांची भूक पाहून जशी मला व्यथा होत्ये, तशी माझा भुकेनें होत नाहीं.

वैद्य – पण जर तूं काहींच खाल्लें नाहींस, तर लौकर मरशील.

लक्ष्मण – हें तर मी जाणून आहें. पण मी संतोषानें मरणार. माझा बापाला तितकें एक पोटतरि कमी होईल; मी मरून देवाजवळ जाईन, आणि प्रार्थना करीन कीं ईश्वरा, माझा भावांला आणि बहिणीला अन्नावांचून मारूं नको.

त्या मुलग्याचे असे शाहाणे बोल ऐकून वैद्यास बहुत विस्मय झाला; त्यास अंतःकरणांत करुणा येऊन त्याणें लक्ष्मणास दोहों हातीं उचलून उराशीं धरिलें; आणि ह्मणतो, "भिऊं नको माझा सख्या, तू मरणार नाहींस. सर्वांचा बापजो ईश्वर तो तुझें आणि तुझा कुटुंबाचें संरक्षण करील. मला त्या ईश्वरानेंच एथें आणि-

लें

लें असें समज. तर मी आतां घरीं जाऊन लवकरच येतों." असें बोलोन वैद्य आपले घरीं धांवत गेला, आणि चाकराचे डोईवर नानाप्रकारचीं अन्नें देउन लागलाच परत आला. त्याणें संताजीस आणि त्याचे मुलांस पंक्तीनें बसवून त्यांस पोटभर जेवायास घातलें. त्या गरीब मुलांचा यथेष्ट जेवतांना उत्साह पाहून, तो धार्मिक वैद्य फार फार समाधान पावला. जातेवेळीं लक्ष्मणास ह्मणतो, "मुला तूं कांहीं काळजी करूं नको; मी तुह्मास लागेल तें पुरवीत जाईन" ती प्रतिज्ञा त्याणें मोठे आवडीनें पाळिली. तो नित्य त्यांस शिजिवलें अन्न पाठवून देई. त्या गावी दुसरे किती एक त्या वैद्या सारिखे धार्मिक पुरुष होते त्यांस ती गोष्ट समजली, तेव्हां तेहि त्या मुलांचा समाचार घेऊं लागले. कोणी अन्न, कोणी पैसा, कोणी वस्त्रें, असें त्यांस देत. याप्रमाणें थोडकेच दिवसांत तें लाहान मुलांचें कुटुंब दरिद्रांतून मुक्त झालें.

याप्रमाणें आपले बापा करितां आणि आपले लाहान भावां साठीं, त्या उदार मुलानें जें आचरण केलें तें त्या देशाच्या राजानें ऐकिलें; तेव्हां तो मोठा विस्मित झाला, आणि संताजीला आपणा जवळ बोलावून ह्मणाला, "तुझा मूल मोठा साधु आहे. मी त्याला लेंकाप्रमाणें पाळीन. मी भांडारी यास सांगून ठेविलें

आहे

आहे; तो तुला दर वर्षीं पांचशें रुपये देईल. लक्ष्मण आणि दुसरे तुझे मुलगे आहेत त्यांणी इच्छेस येईल तो धंदा शिकावा; त्यांस मी आपले खर्चानें शिकवीन; आणि ते जर चांगल्या मार्गानें चालले, तर मी त्यांस भाग्यास चढवीन".

संताजी मोठा हर्षित होऊन घरीं आला. आणि दंडा सारिखा भुईवर पडोन आपणास इतका योग्य पुत्र दिला ह्मणून देवाचा स्तव करूं लागला.

---

## चिमणी.

गोदावरी बाई ह्मणून एक ब्राह्मणी भली आणि मायाळू बायको होती. तिची वडील मुलगी गंगा ह्मणून होती; तिणें एके दिवशीं कांहीं अन्याय केला, ह्मणून आईनें तीस ममतेनेंच धमकाविलें. ते आईचे मायाळू शब्द ऐकून आणि आपला अन्याय स्मरून गंगा रडूं लागली. तें पाहून तिची लाहान बहीण चिमणी तीन वर्षांची होती तिणे हळूच माघारून येऊन एका हातानें परकराचा पदर घेऊन आपल्या बहिणीचे आसवें पुशिलीं, आणि दुसरे हातानें आपल्ये तोंडांतला खडेसाखरेचा तुकडा तिणें तिचे तोंडांत घातला.

बाळमित्र.

मला असें वाटतें कीं कोणी चांगल्या चितार्‍यानें या विषयीं चित्र काढलें असतां काय वेधक होईल !

---

## धाकटा किनऱ्या.
### नाटक एक अंकी.
### पात्रें.

| | |
|---|---|
| मालोजी | |
| चांगू | मालोजीचा मुलगा |
| सगुणी | मालोजीची मुलगी |
| गोविंदा | मालोजीचा भाचा |
| यमुना, चिमणी | सगुणीच्या सवंगड्या रंगरावाच्या मुलग्या |
| दौलतसिंग | धाकटा किनऱ्या |
| भिव्या | पोरगा |

### स्थळ
### मालोजीचें घर.

Mar/ 843·5/ 13989
Imp. 4568
dt. 13/11/09
IMPERIAL RARE BOOK LIBRARY

प्रवेश

# धाकटा किनऱ्या.

## प्रवेश १

### चांगू आणि गोविंदा.

चांगू — (गोविंदास) ऐकिलेंस गड्या भाऊ, तुला माझे एक काम केलें पाहिजे.

गोविंदा — बरें पाहूं तर खरें काय काम आहे तें. तुझी सदां काहीं ना काहीं वेठ असत्येच.

चांगू — याचें कारण, कीं तूं मजपेक्षां बुद्धिवान् आहेस. गड्या आज मला गुरूनें पंचतंत्रातली गोष्ट संस्कृताची प्राकृत करूं सांगीतली आहे. तें काम तूं चांगलें जाणतोस.

गोविंदा — काय? ती तूं आजून पुरती केली नाहींस?

चांगू — पुरती कोठून होईल; तिचा आरंभच करायास आजून कोणास फावलें आहे?

गोविंदा — काय? सकाळचे प्रहर दिवसापासून संध्याकाळच्या प्रहर दिवसपर्यंत तुला वेळ सांपडला नाहीं?

चांगू — तूं पाहा बरें. मला फावेल कसें तें. मी आठ घटका दिव-

सास

सास तोंड धुवोन मोकळा होतो; पुढें चांगली भूक लागली पाहिजे ह्मणोन मला दाहा घटिका पर्यंत बागांत इकडून तिकडे धांवावें लागतें· नंतर चार घटिका जेवणाखालीं मोडतात· जेवलें आणि लागलेंच उद्योगास बसलें तर बाबाचा वैद्य सांगतो कीं रोग होतो, ह्मणोन पोटभरून जेवलों तें जिरवायास कांहीं वेळ मला निजलें पाहिजे व कांहीं फिरलें पाहिजे; त्यापासोन नुकता कोठें मोकळा होतों आहें·

गोविंदा – बरें, आतांतर व्यायाम पुष्कळ झाला· आतापासून संध्याकाळ पर्यंत कां करिनासतर ?

च्यांगू – आतां मला गायास बसलें पाहिजे, तें तुझा लक्षांत आहेच·

गोविंदा – पण गवयी आजून कोठें आला आहे ? तो येई पर्यंत त्यावर बसलास तर काय होतें ?

च्यांगू – तों पर्यंत मला त्याची वाट पाहात बसलें पाहिजे: ज्या वेळीं जें काम करायाचें त्यांत दुसरें तिसरें घेतलें ह्मणजे माझी प्रकृत गोंधळत्ये बाबा·

गोविंदा – बरें तर गाणें होऊन काहीं दिवस राहील. कर... झालास तर रात्रीस निजस पर्यंत वेळ आहे·

च्यांगू – मला एक क्षणभरहि अवकाश सांपडणार नाहीं

माझी

## धाकटा किनऱ्या·

माझी बहिण सख्यांस बोलावणें करून त्यांची वाट पाहात बसली आहे·

गोविंदा – त्याशीं तुशीं काय संबंध? त्या आल्या तर तुझे ब-हिणीकडे येतील·

चांगू – खरें, पण त्यांसांगातीं खेळायास मला बहिणीनें बोलाविलें आहे·

गोविंदा – बरें तर, त्या गेल्यावर मग तुला कसची अडचण आहे?

चांगू – वाहवारे वः मग दिव्या उजेडीं काम करा आणि डो·ळ्यांस उपद्रव करून घ्या· चांगली गोष्ट सांगतोस! आणि तसें केलें तरी, सकाळला गोष्ट तयार झाली पाहिजे ती कशी होत्ये·

गोविंदा – बरें, नाहीं झाली तर माझें काय गेलें?

चांगू – तर काय, बाबानें आणि गुरूनें मला रागें भरावें असें तुझ्या मनांत आहे?

गोविंदा – मला फुसलावायाचें तुला बरें ठाऊक आहे रे चांगू· पाहूं बरें कोठें आहे ती गोष्ट·–

चांगू – माडीवर माझे खोलींत आहे· मी जाऊन आणितों·

नाहींतर, तूंच कां माझे बरोबर वर येसना ?

गोविंदा – तूं पुढें जा. मी मागून हाच आलों. तीं तुझी बहीण न-जकडे काहीं बोलायास येत्ये आहे.

चांगू – पण तूं यांतली गोष्ट तिला काहीं सांगों नको हो. समजलास.

---

## प्रवेश २

### सगुणी आणि गोविंदा.

सगुणी – काय भाऊ, दादाचें तुझें काय चाललें होतें. मला वाटतें कीं सदांप्रमाणें त्याणें तुझी काहींतरि कुचेष्टा केली असावी.

गोविंदा – सदांप्रमाणें कुचेष्टा तर नाहीं. पण सदांप्रमाणें कांहीं प्रार्थना आहे, किं मी उद्यांसाठीं त्याचें वाटचें काहिं काम करून ठेवावें.

सगुणी – आणि काय ? हा त्याचा आळशीपणा बाबाला कळवायास नको ?

## थाकटा किनऱ्या.

गोविंदा – तें मीतर कळविणार नाहीं. का किं तुला ठाऊकच आहे कीं, तुझी आई वारल्यापासून माझ्या मामाची प्रकृती अशी जर्जर झाली आहे किं, अंमळ त्याचें मन खवळलें तर तो दुखण्यांत पडतो. आणखी दुसरेंहि, मी त्याचें अन्न खातों, कदाचित्, त्यास असें वाटेल किं हा माझे मुलावरून माझी ममता काढून आपल्येकडे वळवायास पाहातो.

सगुणी – बरें तर माझी गांठ पडली ह्मणजे मीच दादाला छेडीन. पण मी काय बोलायाला आल्यें आहें तें समजलास ? रंगराबाच्या मुली आपल्येकडे येणार आहेत, त्यांचा आदरसत्कारास त्वां मला साह्य झालें पाहिजे.

गोविंदा – बरें ताई, माझानें होईल तें मी करायास सिद्ध आहें.

सगुणी – अगाई ! त्या त्या आल्या, चला माडीवर जाऊं.

---

## प्रवेश ३

गोविंदा, सगुणी, यमुना, चिमणी.

सगुणी – या माझा सख्यांनो ( त्या परस्पर भेटतात; गोविंदास नमतात

नमतात तोहि त्यांस नमतो )

चिमणी - आपली भेटहोउन वर्ष लोटलेंसें वाटतें बाई!

यमुना - खरेंच, पुष्कळ दिवस झाले.

सगुणी - मला वाटतें कीं एक सगळा महिना झाला असावा.

( गोविंदा बसायास सतरंजी टाकितो )

चिमणी - तूं कशाला एवढी मेहेनत घेतोस?

गोविंदा - मला जें उचित, तें मला केलें पाहिजे.

सगुणी - माझी निभ्रांत आहे; भाऊ हर्षानें करितो. माझा दादा-च्या आगांत इतका विनय असता तर मग काय पाहिजे होतें.

---

## प्रवेश ४

गोविंदा, सगुणी, यमुना, चिमणी, चांगू.

चांगू - (मुलींचें काहींच आगत स्वागत न करितां) हें तूं फार चांगलें केलेंस गोविंदा! आपण एथें खेळायास बसलास, आणि मला तिकडे वाट पाहायास लाविलेंस!

गोविंदा - मला वाटलें होतें कीं तूं पहिल्यानें मुलींचा सत्कार

करिशील

करिशील, ती आधीं माझीच पुजा केलीस.

ऱ्यांगू – (चमकून) ओहो! मुलीनों, मी प्रार्थना करितों कि तुम-
.च्या सत्कार केला नाहीं, ह्मणोन राग आणूं नका. मी आतां तुम-
चा सेवेंत येतों.

यमुनी – तूं आमचा सेवेविषयीं काळजी वाहूं नको. आपलें
काम कर.

ऱ्यांगू – (गोविंदास एकीकडे नेतो, आणि मुलींच्यें लक्ष गोष्टीक-
डे पाहून हळूच खिशांतून संस्कृत कागद काढून देतो) हें घे,
समजलास; आणि यांचें प्राकृत लवकर करून दे.

गोविंदा – साहा ओळी! वाव्हारे! भारि मेहेनत! तुला लाज
वाटत नाहींरे?

ऱ्यांगू – चुप. बोलूं नको, त्या ऐकतील.

गोविंदा – मुलीनो, आज्ञा घालतर मी क्षणभर जाऊन येतों.

ऱ्खिमणी – लवकर ये, आह्मीं वाट पाहात आहों.

सगुणी – तूं जातोस तर भाऊ ती मिठाई आणि काहीं मुरंबा
भिव्यांस वर आणूं सांग.

---

# बाळमित्र.

## प्रवेश ५

चांगू, सगुणी, यमुनी, चिमणी.

चांगू – (सवंजीवर बसून लोडाशीं टेकून हात पाय पसरून हाण -तो) मी आपला एथेंच बसतों.

सगुणी – मला वाटतें कीं त्यां आमचे आधीं, आल्यास पुसल्यावांचून बसू नयेस. हें गृहस्थाचीचें लक्षण नव्हे.

चांगू – कोणास, तुला पुसावें ?

सगुणी – मी एथें एकटीच नाहीं.

चिमणी – आतां मी समजल्यें, तुझा दादाचा लक्षांत आह्मींहीं कांहींच नव्हों.

यमुना – त्याला असें वाटतें कीं, मी एथें असलों ह्मणजे तेवढ्यानेंच या धन्य झाल्या. –

चांगू – हः हः हः! मला पक्कें ठाउक आहे बायांनों, कीं मजवांचून तुमचें चालेल; पण तुह्मांवांचून माझें चालणार नाहीं.

सगुणी – बरें बाबा, इतकें तरि सत्कारासारिखें बोललास.

चांगू

# धाकटा किनऱ्या

चांगू – पण मी खरेंच सांगतों ताई, तूं समजूं नको कीं मी एथें तु-
झ्याकरितां बसलों आहें.

सगुणी – याची तर मला निभ्रांत आहे. मी ह्मणजे काय पदार्थ!
काहींच नव्हें पण असल्ये शाहाण्ये भावाची मी बहीण, इतकें म-
नांत आणून खुशाल आहें. (इतक्यांत भिक्यो येतो, आणि पेढे
बरफी तबकांत मांडून जातो)

चांगू – आतां ही मिठाई मींच वांटिली असतां बरें, नव्हे?

सगुणी – नकोनको बाबा, तें मी करिन. तूं असल्या कामांत आ-
डाणीआहेस. तूं जर काहीं करणारच, तर मुलीं पुढें वाट्या ठेव.

यमुना – मला बाई इतके पेढे नकोत.

सगुणी – पाहिजेत तितकेच घे.

(सगुणी निजपुढें बरफी करित्ये. चांगू तिच्या हातचे तबका
स झोंबतो)

सगुणी – (चांगूस) तुला आगोदरच मी तीन मोठाले तुक-
डे दिले, नव्हे?

चांगू – ते मला पुरले नाहींत ताई. अगे, गोड पदार्थावर मा-
झी भारि भक्ति (तो एकामागें एक दोन तीन चार तुकडे घेतो सगु-
णी तबक ओढित्ये)

सगुणी

सगुणी – दादा तुला लाज नाहीं रे वाटत ? तूंच सगळी घेतलीस तर मग आम्हीं काय करावें बरें ?

चांगू – बरफीची बरणी कोठें आहे ती तुला ठाऊक नाहीं काय? तेथून आणखी आण म्हणजे झालें.

सगुणी – (दुसरे मुलींस) ताईस श्रम दिल्या वांचून आमचे दादास चैन पडत नाहीं.

चांगू – पुरें आतां. तूं अंमळ आंत जाशील तर या मुलींचो सेवा मी एकटाच करीन.

यमुना – ऐकिलेंसना सगुणा, आतां तुझा दादास कोणी दांडगा म्हणेल ?

सगुणी – (वाट्यांत मुरंबा वाढित्ये, आणि चांगूस म्हणत्ये) दादा ही वाटी यमनीस दे (चांगू हातांत वाटी घेतो आणि यमनीस देतानां तिचे साडीवर उपडी करितो. तें पाहून त्या दोघी चमकून उठतात)

सगुणी – हें पाहिलेंतना याचें चरित्र. (हळूच, चांगूस) मी शपथ करीन, तूं हें दाटून दुष्टाईनें केलेंस.

यमुना – अरे देवा ! माझी नवी साडी, इला चिकट लागलें आतां माझी बये मला काय म्हणेल ? आणि तिला मी काय सांगू ?

चिमणी

## धाकटा किनऱ्या .

चिमणी – अगाई ! ही आज पहिल्यानेंच नेसली होती . लौकर लौकर लोटीत पाणी घेऊन ये .

सगुणी – नको नको, त्यापेक्षां सकच्या चिरगुटानें पुसाची तें चांगलें . हा घे कोरा फडका, पुस याणें बरें तर मलाहि वाटतें कीं धुवाची तेंच चांगलें . ( सगुणी पाणी आणित्ये चिमणी आपली यमनीपाशीं जातात . एकजण तिची साडी धरित्ये आणि एकजण वर पाणी घालित्ये . तितक्यांत त्यांची दृष्ट चोरून भाडयांतला सगळा मुरंबा घेऊन चांगू लोडाशीं स्वस्थ बसतो आणि खुशालीनें खातो ) .

चिमणी – पुरे पुरे धुतलें; आतां वाळवूंया .

यमुना – इतकें तरि माझ्या देवानें चांगलें झालें किं, रस निऱ्यांवरच पडला .

चांगू – ( आपणाशीं, कुशीस वळून ) हा काहीं माझा अन्याय नाहीं .

सगुणी – ऐसे वाळलें, आतां मला वाटतें कीं कोणाचे समजण्यांत येणार नाहीं .

चिमणी – बरें झालें डाग गेला, नाहीं तर आज घात झाला असता .

यमुना – चांगोबा झालें तें झालें; पण आतां आपण फिरोन मा

झी

झी सेवा करायाची श्रमांत पडूं नये·

सगुणा – गडेनो, आपण मातक्यानें बसूं· (सगुणा सुरंबा वाढाया-करितां भांडें हातीं घेत्ये; तें रिकामें पाहून चांगूवर रागानें डोळे व-टारून ह्मणत्ये·)

अशी अमर्यादा कोठें पाहिली नाहीं बाबानों. आपण स-र्वीं घाबरीं झालों आहों, त्यावेळेस हा असें करील हें माझ्या लक्षांत नव्हतें· असो, अंमळ थांबा मी दुसरा मुरंबा आणवित्यें·

चिमणी – पुरे बाई आतां, मला आणिखी नको·

यमुना – माझी साडी नासली, त्याणें माझें मन खट्टू झालें बाई·

चांगू – पण इछा असून आग्रहाची वाट पाहू नका· बाजारांत जें ह्मटलें तें मिळतें· खुटेल तें ताई आणवील, चिंता करूं नका·

यमुना – सगुणा, तुझा दादा एथें येणार हें तुला ठाऊक नव्हतें गो?

सगुणी – नाहीं बाई, पण न बोलावितां जो आला त्याणें, दुसरा आ-पणास देई पर्यंत तरि वाट पाहावी; दांडगाईनें घेऊं नये·

चिमणी – आतां त्यास बोलून दुखवूं नको; मला काहीं त्याचा खेद नाहीं·

सगुणा – बरें तर, आतां आपण काय करावें ? हां ! तो आपला ग-डी गोविंदा येतो आहे· तो काहीं तरी चांगला खेळ काढील·

चांगू

धाकटा किनऱ्या ·

चांगू — (वेंकावल्या दाखवून आणि त्यां सारिखा स्वर काढून) अ! आपला गडी गोविंदा येतो आहे ! बायानो पण तुमच्या आगोदर माझें त्याशीं काहीं बोलायाचें आहे· (चांगू गोविंदाकडे जातो·मुली आपल्यांत गोष्टी करितात)

---

## प्रवेश ६

सगुणी, यमुना, चिमणी, गोविंदा, चांगू ·

चांगू —(हळूच फुसफुसून गोविंदास) कायरे तें झालें ?

गोविंदा — (हळूच) होय, हें घे; आणि तुझा आळसाची तुला काहीं तर लाज वाटूं दे (मोठ्यानें मुलींस) बायानो तुह्मी काय खेळणार तें काहीं ठरलें ?

यमुना — ठर ण्यासाठीं तुझी वाट पाहात होतों ·

गोविंदा — मी एक चिमणासा किनऱ्या खालीं बसविला आहे· तो तुमच्या सेवेंत सिद्ध आहे· सांगाल तर वर बोलावितों· काहिं गाणें वाजिवणें करील·

सगुणी — चिमणा किनऱ्या! कोठें आहे तो? कोठें आहे तो? लव-कर बोलाव.

यमुना — सवगड्यांस कसें रमवावें हें गोविंद भाऊ चांगलें जाण-तो.

गोविंदा — या करमणुकींत धर्महि घडेल; कांकिं त्या जवळ किन-री वांचून दुसरें कांहींच नाहीं.

चांगू — पण त्याला पैका कोण देईल गोविंदाजी? (मुलीकडे पाहू-न) हा बोलतो चालतो जसा जगतशेटीचा नातू; पण जवळ फुट-की कवडी तीहि नाहीं.

सगुणी — असा कोणाचा उपहास करितां तुला हलकेपणा नाहीं हि-मत दादा.

गोविंदा — बोलूं देगे ताई, मला त्याचा राग येत नाहीं. गरीबी हा का-हीं दोष नाहीं. मी चिमण्या किनऱ्या सारिखा आहें. तो गरीब अस-न कसा चांगला मुलगा आहे! माझ्या जवळ एक पावला आहे तो मी त्यास देईन. ते वदल्यावर त्याणें सांजपर्यंत गाण्याचा वाजवायाचा करार केला आहे.

चिमणी — आपण सगळी मिळून त्यास वर्गणी देऊं.

यमुना — आपण त्याची पटी करूं.

धाकटा किनऱ्या.

गोविंदा – मी त्याला बोलावूं ? तो खालीं दरवाजावर बसला आहे.

सगुणी – होय भाऊ, लवकर बोलाव. (गोविंदा जातो, इतक्यांत भि-व्यां तबकांत एक कालिंगड घेऊन येतो.)

---

प्रवेश ७

यमुना, चिमणी, सगुणी, चांगू.

चांगू – (भिव्याच्या हातून तबक ओढायास जातो. सगुणी त्यास घेऊं देत नाहीं.) ताई मी वांटाया करितों ह्मणून घेतों.

सगुणी – मी तुझी मेहनत वांचविली. तुझा वांटचें तें मी करि-तें. कोण जाणे, तूं तें असें आवडीनें वांटशील कीं जशी बर्फी वांटिलीस (ती त्याचा फाका करित्ये आणि मुलीस देत्ये.)

चांगू – (इतक्यांत त्यांतल्या दोन तीन फाका घेऊन) आतां तूं ह्या बाकीचा फाका कोणास देणार ?

सगुणी – आपला गोविंदा खालीं गेला आहे, त्याला काहीं नको-त काय ?

यमुना — मी त्याला माझा वांटा देईन.

चिमणी — मीहि माझा देईन.

चांगू — (वाईट वाटून) काय त्याचें दैव आहे पाहा.

सगुणी — काय! एक कलिंगडाचा तुकडा त्याला मिळतो तें तुला साहात नाहीं!

---

## प्रवेश ८

यमुना चिमणी सगुणी चांगू आणि
गोविंदा (सारंग्यास हातीं धरून आणितो आहे)

गोविंदा — माझा चिमणा किनऱ्या तो हा; मी तुह्मास भेटवितों हो.

यमुना }
चिमणी } — मुलगा तर फार भला दिसतो.

सगुणी — तुझें नाव काय बाळा.

किनऱ्या — (हात जोडून) जी गुलामकूं दौलतसिंग कहते हैं.

सगुणी

## धाकटा किनऱ्या

सगुणी – तूं कोठच्या राहाणारा ?

दौलतसिंग – जी, मैंतो हिंदुस्थानका रहनेवाला हों·

यमु० – तुला आपला देश सोडायाचें काय कारण झालें ?

दौलतसिंग – जी बाईसाहेब, येह बात तो जरा लंबी है· लेकिन आपकी मर्जी होगी तो, नोंकर थोडेमें कहेगा·

यमु० – होऊंदे·

दौल० – मेरा बापतो कासीका रहनेवाला: मेरी मा मरगयी, उ-दसें ओ बोहोत दुःखी हो गया है· उसकूं साथ लेकर में पेटके मा-रे भटकता फिरताहुं, ने किनरी बजाकर पेट भरताहुं·

सगु० – तुझें कांहीं कसब दाखिव पाहुं·

दौल० – मे मोटा किशबी नहीं हों, तोबि आपके आगें चाकरी क-रकें देखाऊंगा, गुना माफ होना·

गोविं० – जसं तुला येत असेल तसें होऊंदे· आह्मी त्यांत समा-धान पाऊं· तूं बेसूर गाइलेंसतरि आह्मांस कबूल आहे·

(किनऱ्या किनरी लावितो कूं कूं कूं कूं ओं· यमुना गोविंदास कालिंगडाच्या तुकडा देत्ये, तो हातांत घेउन किनऱ्याकडे लक्ष देतो·)

किनऱ्या किनरी लावून गाणें गातो·

इसतन धनकी कोन बडाई, देखत नयनमे मट्टि मिलाई ध्रु·

हाड जले जेसी लकडेकि मोली बाल जले जेसी घासकि पोली १

आपनें खातर मेहेल बनाया आपहि जाकर जंगल सोया २

कहत कबीरा सुन मेरे भैया आप मुवे पिछे डुबगइ दुनिया ३

गोवि० – आहाहा ! काय गोड गाइलें ! बापड्या तूं फार विप-तींत आहेसना ?

दौल० – हों खरा, पण अबीतो मेरी किनरी मेरेतें पेटकूं देती हे· आजारी पडोंगा तब भगवान हे· नें मरूंगा तब धरत्री माई मेरेकूं थोडीशी जग्गा देगी· और मुझे क्या चहिये·

गोविं० – पण बिचाऱ्या, तूं आतां उपाशीं असशील नव्हे ? ही माझी बर्फी आणि कालिंगडाचा तुकडा घे आणि खा·–

दौल० – नहि मेरे खावंद; ओ तुमज खाओ· मेरेकूं जरा रोटीका तुकडा देओ सो बस होगा·

गोवि० – नाहिं, हें तूं घेच; आणिखी तुला भाकरीचा तुकडाहि देतों ( तो घरांतून भाकर आणून त्यास देतो )

दौल० – मेरे उपर आपनें बहुत एहेशान किया· लेकिन मे यहां खानेवाला नहिं· घरमें मेरा बुड्ढा पिता हे ओ ओर मे मिलकर

साथ

धाकटा किनऱ्या.

साथ खायेंगे. उनने सारे जनममे बर्फी नहिं चखी होगी.

सगु० — तुझे ह्मातान्या करितां हा माझा भाग मी तुला देत्यें.

च्चिम०- आणि हा माझाहि घ.

यमु० — माझा पण घे.

दौल० — नहिं, नहिं, बाई साहेब. तुह्मारी बरफी तुमनें रखना हम लोककूं मीठा खानेकी आदत नहिं है. (त्या फारच आग्रह करितात तव्हां तो बरफी घेऊन एके बाजूस ठेवितो)

चांगू —(थट्टेनें) तो खरें ह्मणतो, त्याणें त्याच्या गोड गळा बिगडेल.

सगु० — तूं कांरे उगीच मध्यें बोलतोस? तुझी बर्फी तर कोणी मागत नाहीं.

चां० मागून फळ काय? मी ती केव्हांच गट्ट केली.

गोविं० — (किनऱ्यास) मुला थोडिशी बरफी तोडांत कां टाकिनास?

दौल० — ओहो! नें नें. आपनें एत्ती मेहेरबानी करके मेरेकूं दियी है, तो मेरेकूं रजा हाना मै रुमालमें लपटके जातीबरवत घरकूं ले जाऊंगा. (तो एक मळका रुमाल काढतो)

सगु० — थांब अंमळ मी तुला त्याहून धुपट फडका देत्यें. तंव पर्यंत

थोडिकीशी

थोडिकीशी भाकर खाऊन हुशार हो. – (ती फडका आणून दे-
त्ये)

दौल० – नहिं मेरी माई. मे येहां गावनेकों आयाहों. खानेकों नहिं
आया.

यसु० – मी गोविंदा संगतीं नाचत्यें. तूं गत वाजविशील ?

दौल० – तुम चाहो ए बजाऊंगा.

यसु० – चांगू ये, आपण सगळींच नाचूं.

चां० – अँहँ, आज माझे गडद्या पाय कळताहेत.

(तीं नाचतात चांगू बाहेर जाते)

सगु० – गेलीतर पिडा गेली.

चिम० – आतां आपण कांहीं पैसे जमवुं.

यसु० – होय मी सिद्ध आहें, ही पैचवली.

सगु० – ही माझी चवली.

गोविं० – पहिल्यानें मी माझी दैणगी देईन.

( तो दौलतसिंगास पावली देतो )

दौल० – इतना मैं नहिं लेऊंगा. मेरी पोल. ऐ जानकी है.

गोविं० – तुला नको ह्मणों नको, आह्मीं खुशालीनें देतों आहों तें घे.

दौल० – भगवान् तुमकों सोगणा देगा.

सगुणी

धाकटा किनऱ्या.

सगु० – हें घे तुझे बापासाठीं जुनें आंगवस्त्र.

दौल० – भगवान् तुह्मारा कल्याण करो (तो बर्फीचे तुकडे बाजूस ठेविले होते ते पाहातो आणि खेदी होउन ह्मणतो) अरे एकेमे कोण लेगया.

सगु० – काय लबाड वरि चांगू! मला वाटतें याची बर्फी त्यानेंच नेली असावी.

दौल० – बाईसाहेब, लेगया तो कछु फिकर नहिं मे पिताजीके वास्ते जरा दिलगीर हुवा.

गोवि० – जर चांगू तुझा भाऊ नसता तर, आज त्याचा कशी फजीती केली असती तें समजतें. असो मी यास आणिखी एक पावली कोठून तरि उसणी आणून देतों, ह्मणजे तो आपल्ये बापाकरितां त्याची बरफी घेईल.

सगु० – तो खर्च मी तुजवर पाडिन नाहीं. मीच देतें. (किनऱ्यास) हीं घे मुला एक पावली. (रुक्मणी आणि यमुना आपल्या पिशव्या चांचपतात)

रुक्म० – हे घे आणखी चार पैसे.

यमु० – हे घे माझे जवळ दोन आहेत.

दौल० – नहिं नहिं ये बहुत हुवे. तुम मेरेपर जुलुम करतेहो.

गोविंदा.

गोविं० — काय करूं बाबा माझे पाशीं दुसरे पैसे नाहींत. तुझे सारिखा मी एथें दुसऱ्याच्या धर्मावर पोट भरतों.

दौल० — (गोविंदास) तुमनें हमकूं इदर नहिं ल्याया होता तो अछा होता. तुम मेरेपर एती लगट करते हो, के मेरेसें ना नहिं कहि जाती.

गोविं० — तूं खंती होऊं नको. आतां जा, आणि दुसरे कोठून हि कांहिं मेळिव.

दौल० — (जातांना सर्वांस) तुमारी अला बला लेताहुं. भगवान् तुह्मारी तन दुरुस्ती राखो; और तुमकों बहोत दौलत देओ.

---

## प्रवेश ९

सगुणी, चिमणी, यमुना, गोविंदा.

सगु० — पाहिलेंतना आज चांगलें का[illegible]जिरवाणें काम केलें तें!

यमु० — मी जर त्याची बहिण असतें तर त्याला कसें तें समजलें

# धाकटा किनऱ्या.

मजलें असते.

च्चिम॰ — आपण धर्म करित होतों. त्या अनंदास त्याणें आपल्यास धिरस केलें.

यमु॰ — असो. किनऱ्याचें तितक्यांत काम बरेंच होईल.

गोविं॰ — तें खरें तुमचें देव बरें करो. पण किनऱ्याचें काम झालें ह्मणून चांगूचा अपराध उणा होत नाहीं (कोणी दार उघडिलें?) हा गुरः तुमचा किनऱ्या आला. कां बाबा? काय झालें?

दौल॰ — (रडत) रे भगवान्, रे भगवान्, मेरी खराबी हुवी.

(ती सगळीं त्या भोंवतीं मिळतात)

सगु॰ — तुला काय झालें बाबा?

दौल॰ — मेरा सब कुछ गया. देखो देखो मेरी किनरी तोड डारी. मेरे पैसे लूट लिये. और मेरे पाससें सब ले गया.—

गोविं॰ — तुझी किनरी कोणी फोडिली? तुझे पैसे कोणी नेले?

दौल॰ — उनेई, जो मेरी बरफी ले गया.

सगु॰ — काय? माझा दादानें! असें कसें होईल?

गोविं॰ — काय? चांगूनें?

च्चिम॰ — असें होणार नाहीं.

यमु॰ — अरे दुष्टा!

दौल ० – उन्लेइ, उन्लेइ ए काम किया ·मे दरवाजे बाहेर निकलता हुं इतनेमें ओ आया. ओने मेरेकूं पुछनें लगा के तूं अपनी [illegible] नहिं पाया होगा तो मे तुझंत देऊंगा · मे बोला, मेरे पास · ओ बोला, उनलोंकोके पास इतने पैसे काहांके ? मेरेकु दिखलाव क्या दियासो · मे बावरा, ओ वरकी लगया बहुचात. पैसे मिले यह आनंदसें, भूल गया; और पैसे केते हते, ओ मेने गिनबी नहि थे. सो मैंने किनरी जमीनपर धरके रुमाल काढा, और बोला. देख येहि पाले में गांठ छोडताहूं. इतनेमें उन्ने रुमालकूं हात डाला, तब उसकी लुच्चाई मेरे नजरमे आई · फेर रुमालकूं एक तर्फ ओ खेचने लगा और एक तर्फ में. इतनेमें उन्ने आपने दो पगसें मेरी किनरी दाबी. सो फुटगई · मे घबराहोके रुमाल छोडदिया ने किनरी पकडनेकूं गया, एतनेमें ओ रुमाल लेके दौरा · मेरी किनरी टूटगई, पैसे गये, रुमालबी गया · अब मेरा पिता मेरेकूं क्या कहेगा ! अरेमेरे पिताजी ! अबतूं भूखे मरेगा रे ! हायरे हाय !

सगु ० – भाऊ, माझे जवळ आतां दमडीच्याहि कवडया राहिल्या नाहींत.

चिम ० – ह्या घे काहीं नासन्या · माझेपाशी इतक्याच होत्या ·

दौल ० – मेरी खावंदन, मेहरेपर बहुत एहशान हुवा; पन उससे किनरी वेचाती नहीं मिलेगी · हायरे मेरे बाबा ! वो उनकेपास पंधर बरस

धाकटा किनऱ्या.

लगथी

यमु० — या दोन दभडयाचे, या वेगळ मजपाशीं कांहीं राहिलें नाहीं.

सगु० — (आपल्या पेटीकडे धांवत्ये) हें घे माझें अंगुस्तन. हें सोन्याचें आहे. जा आणि बीक माझे जवळ दुसरें हस्तिदंती आहे त्याजवर माझें काम चालेल.

गोवि० — ताई नकोगो तें अंगुस्तन देऊं. ते तुला असोंदे. बावरें मुला, मी तुझें साहित्य करितों (तो करांगळींतली आंगठी काढितो, आणि त्याला देतो) माझे जवळ दुसरी मुलाम्याची आंगठी आहे. तिजवरसी चाल करीन. इचे मुला पाच रुपये येतील ही माझी आहे ह्मणोन द्यावयास मला कोणाचें भय नाहीं आबाजीने माझे वाढदिवशीं ही मला दिली होती. (तिकडून सगुणा अंगुस्तनाविषयीं आग्रह करित्ये. इकडून गोविंदा आंगठी घ्यायाविषयीं प्रार्थितो, तो दोलतसिंग घेत नाहीं)

दोल० — नहीं, मे उसमेंसें एकभी नहीं लेऊंगा. मेरा बाबा कहेगा के तूं चोरीकरकर लाया.

सगु० — माझें अंगुस्तन तें घेच

गोवि० — तूं माझी आंगठी घेत नाहीसना? तरसी तुजवर रागे भ-

रेन

रेन. वे मी ह्मणतों वे.—

दौल०— रे भगवान्, तुमेरे आभूखण मे केसा लेऊं (मोठे जुल-
मानें घेतो).

गोवि०— त्याविषयीं तूं कांहीं चिंता करूं नको. भगवान् मला
आणिखी देईल. पाहून दुप्पट देईल. तुला तुझें बापाचें पोट भर-
लें पाहिजे, मला बापच नाहीं, ह्मणून तुला हे फार उपयोगी पडेल.

सगु०— जा, जा, आतां सांभाळून जाहो.

दौल०— इतना अंगुस्तनतोबि पिछे ले, ओ मेरिमां.

सगु०— नाहीं आतां तें माझें नाहीं.

निम०— (किनऱ्यास) कधीं तूं आमचे दारावरून आलास तर म-
जकडे ये, मी तुला कांहीं देईन.

यमु०— आमचें घर आदित्यवार पेठेंत दौलतरावाचे वरापाशीं
आहे. तेथें कोणालाही पुसलें तर रंगरावशेटीचें घर दाखवील.

दौल०— बडे लोकके घरमें जानेकी हम सरिखेकूं बहोत मुशाकील
है. कधी मै गया होगा तो कोई बखत दो धक्के मारकर दरवाजे बाह-
र निकाल दिया होगा.—

सगु०— आतां पुरें हें. तुझा बा तुझी वाट पाहात असेल आणि
आमचाहि बा घरीं परत यावयाची वेळ झाली.

दौलतसिंग.

धाकटाकिनऱ्या ·

दौल० — क्या बाईसाहेब ? तुमरा बाबा ? जलदी घरकूं आवेगा ?

सगु० — होय, पण तूं आतां एथून लवकर जा. नाहींतर जाणे तुझा रुमाल नेला तो येईल आणि तुला पुनः मारील · —

दौल० — पन तुमेरी निशा हे के मेरे वासते तुमकूं गाली नहीं मिलेगी ?

गोविं० — नाहीं नाहीं, जा तूं भिऊ नको · राम राम, ये आतां ·

दौल० — (जातांना) आहाहा ! काय भली मुलें ·

---

## प्रवेश १०

सगुणी, चिमणी, यमुना, गोविंदा ·

चिम० — गोविंदा तुझी आंगठी गेली त्याचें मला फार वाईट वाटलें ·

यमु० — तूं आह्मास आज चांगल्या मार्गाची शिक्षा लावलीस ·

गोविं० — मला ए विषयींची शिक्षा सगुणीनें लाविली · चांगूचे नीच कर्माचा माझे चित्तास खेद झाला · येरवीं एकादें धर्मकृ-

त्य करायास मला मोठा उत्साह वाटतो. आतां माझे मुलाम्याचे आंगठीकडे पाहून मी किति समाधान पावेन!

---

## प्रवेश ११

मालोजी, सगुणी, यमुना, रुक्मिणी, गोविंदा, दौलतसिंग.

(तीं मुलें जवळ जवळ झालीं आहेत. सगुणा आणि गोविंदा चोरून दौलतसिंगाकडे पाहाताहेत आणि एकमेकाचे कानीं लागताहेत.)

मालो० — (यमुनेस आणि रुक्मिणीस) स्कुरवी असा मुलींनो माझे सगुणाकेडे येऊन तुह्मी तिला मान दिलात तेणेंकरून मी तुमचा उपकारी आहे. आतां हा किनऱ्या काय सांगतो आहे, हें मी तुमचे समक्ष ऐकणार तर ये विषयीं मला तुमची सल्ला असावी. हा जिन्यांत माझी वाट पाहात उभा होता, मी येतांच मला ह्मणाला कि तुह्मी आणि मी समक्ष असतां आपणास कांहीं बोलावयाचें आहे. (दौलतसिंगास) ये मुला तूं काय ह्मणतोस?

दौलतसिंग

धाकटा किनऱ्या.

दोल०— (सगुणा आणि गोविंदा यास) तुमनें किरपा करकें मेरे पर गुस्त नहीं होना, येमें तुमसें मंग लेताहों. मेरेकूं बोलनाज जरूर हुवा; क्योंके तुमने जो मेरे पाससे लेवाया, ओ में तुमेरे बाबाके सलाबिना रखा; बो दुरस्त नहींहै. ने खूब जाणताहों, के छोकरे लोकके पास, आपसकी ऐसी कछु जिनस रहती नहीहै.

मालो०— हा, हें काय ह्मणतो आहे?

दोल०— नोकर बोलताहे के, ए छोटे माहाराजनें मेरेकूं हाक मारी के, आकर ए बीबीलोकके सामनें किनरी बजाना. इनके साथ दुसरेबी एक छोटे माहाराजथे; खूब स्र्रते, लेकिन बडे लुचे.

मालो०— काय! माझा मुलगा?

दोल०— महाराज मेरेतें माफ करना. ओ सकुन मेरे मूसें आ-गया. पिछे में आया, नें जो मेरेकूं आताथा सो हजर किया. ये सखी लोकोनें मेरेकूं कछु बर्फी, एक रुमाल, ओर मुठी भरकें पैसे दिये. केतनेथे सो मेरेकूं मालुम नहीं.

मालो०— मग?

दोल०— ओ बर्फी मे मेरे अंधे बाबाकूं लेजानेवालाथा, सो ओर दं-डीला महाराज, चोर ले गया, उशकी परवा मे नहिं किर्या होत, लेकिन

लेकिन बरफी लेकर बाहेर भागा,ने रस्तेपर छुपकर बैठा.

मै बडे खुसीसें बाहेर निकलकर जाने लगा तद ओ औ-चेता मेरेपास आया; ओर उने जोरावरीसें मेरे पाससें रुमाल ओर सब पेसे छीन लिये. ओर मेरी किनरी फोड डारी. ये देखो. (रडतो) मेरी सब दौलत. जिससें मेरा और मेरे बाबाका पेट भरता था. -

मालो० - असी गोष्ट कशी होईल ? असें दुष्ट, अधम कर्म ! माझे मुलाचे हातोन ?

न्विम० - तो जिकडे तिकडे असेंच करितो. सगुणास पुसाना.

मालो० - जा मुला, रडूं नको, मी तुझें भरून देईन. पण गोष्ट सगळी इतकीच ना ?

दौल० - (मराठी बोलायास लागतो) नाहीं महाराज माझा थोडा सून. में तिकरे अशा दुख पावला तें वरतमान या छोकरे साहेबापाशीं सांगायासाठीं आला - त्याचेपशीं माझा तोटा साधाया पुरते पेसे नहिं हथे. तवां या बाईशाहेबानी मला आपले सोन्याचे अंगुथान दिलें, आणि या भाऊशाहेबाने सोन्याची अंगुठी, ओ मेरेसें, अरे ! मे चूकला, टोडाशीं हिंदुस्थानी आवत्ये ! तवां तेमी कशी घेऊन जाउं ?

माजा

धाकटा किनऱ्या ·

माजा बाप मला सांगेल के ओ चोरी करकर मे आणला· तवां मला मोटा विचार पडला, अवडयामंदी मुजला समजला के तुमेरी सवारी घरी लवकरच येल, तवां इकडेच उभा रेहिला के ते जिनसा तुमचे सवाधीन कराबी. ए घेते· पण मला किनरी नहीं· – हायहायरे मेरी किनरी ! ओं मेरे बाबा !

मालो० – आज काय आनंदाची गोष्ट तूं मला सांगीतलीस ! आतां मी तुला किं माझे उदार मुलानो तुझ्याला अधीक वाखाणू ? तूं मुर्खांचे मांठ दळिद्रानें पीडिलेला, त्यांत आणिखी तुझें सर्वस्व गेलें असें असतांहि, आपल्ये पासून अन्याय कर्म घडूं नये ह्मणोन तुझी वासना ! मुला तुला शाबास आहे· तूं धन्य आहेस·

दोल० – हॉ ! क्योंरा काम नहिं करना. उसमें इतना फायदा हैना ? ओ सचे है, बूरे काममें मिलाया उसकूं बरकत कबु नहीं होती· मेरी मय्या ने बाबा मुजकुं येहि कहते आये हैं; के बेटा जान गया तो खूब, पर बूरा काम मत कर· इसमे भगवान् राजी· अबी महाराजने मुजकुं किनरीकी मेहेरबानी करना. दूसरा मेरेकुं कछु चहिये नहिं· सांजसकाधी मे इदर उदर फिरकर रोटी मिळाऊंगा·

मालो० – या प्रमाणें मला दिसतें किं तुझा बाप आणि तूं कोणी मोटे साधू आहा· चिंता करूं नको, ईश्वर तुझें माझे हातीं कल्याण

करील

फरील. – तूं आत्याकडे राहा. प्रथम काही दिवस गोविंदाजवळ ऐस. नंतर माझ्याने तुझें जें बरें होयवेल तें करीन.

दौल. – क्या! ये छोटे साहेबके खिजमतमे? क्या आणंदकी बात है! (गोविंदास नमतो) पण, नहिं; (खेद पाऊन) मेरेसें मेरे बावाकूं अकीला नहि रख्या जाएगा. मेरेबिना ओ बचेगा कैसा? क्या, मे मीठा मीठा खाउं ने ओ भुखे मरेगा? मे नरम बिछानेपर सोउं ने उसकुं चटाइबी नहि मिलेगी. जिसरो मे पैदा हुवाहुं जिने मेरेतें बधाया, जिने मेरे वाश्ते आपकी सब कमाई खर्ची, जो मेरे सुखसे सुखी ने मेरे दुखसें जो दुखी, उसकुं आज बुढेपनमें में डार देउं? मे जब छोटाने नाकुवल था, तद जिने मेरा गू मूत उठाया; मनमे कछु वीट लाया नही, उसकी सेवा डारके आजमे महाराज तुमरेपास सुख भोगनेकुं कैसा रहुं. मेरेकुं लोक क्या कहेंगे; भगवान् क्या कहेगा; मेरा मनही क्या कहेगा. ने एसा करके मेरेकुं सुख कैसा होवेगा? नहिं नहिं, ये बात कधी होनेकि नहिं.

माळी. – गुणाचा मुला, तुझा बाप कोण, कोठला आहे?

दौल. – मेरा बाबा हिंदुस्थानका रहनेवाला, अबी बूढाने अंधा हुवा है. आगे ओ बडा गायनेवाला था. उसकूं मे किनरी बजाके

पोसताहुं

धाकटा किनऱ्या ·

पोसता हुं · ओ थोडासा खाता हे, ने मेबी बोहोत खाना नहिं · जरासी रोटी ने कछु तरकारी ये हमारा खाना, उतना हमकूं भगवान् रोजके रोज देताहे · कलकी चिंता हम रखते नहिं . ओ भगवान् पर सोपतेहें·

मालो ० — बरें तर मी तुझे बापाचीहि सोय करितों. त्याला धर्मशाळेंत अणून ठेवितों, तेथें दुसरे अशक्त ह्मातारे आहेत त्यां बरोबर याचेंहि सांगोपन होईल · तुला हावें तेव्हां तूं त्यास भेटायास जात जा·

(दोलतसिंग नें ऐकून दिशी पिटून अति हर्षानें घरभर धांवतो) ·

दोल ० — क्या धर्मात्मा येहे ! क्या मेरा बाबा ! नहिं; ये सूनकर ओ हरखसें मर जायेगा · मेरेसें अबी इदर रह्या नहिं जाताहे. अबीहि जाकर उसकूं लेकर आताहुं · (धाऊन बाहेर जातो सखी आणि गोविंदा याणीं मालोजीचा हात धरिला आहे · त्याचे डोळयांत प्रमानें आसवें आलीं आहेत तीं तीं पुसताहेत ·)

## प्रवेश १२

मालोजी, सगुणी, यमुना, चिमणी, आणि, गोविंदा ·

मालो ० — माझे लाडके मुलानो ! काय सूखाचा दिवस आजचा होता

होता, जर पोराचे द्वाड गुण याला विरजण नसते ! पण नाहिं; मला त्याचा खेद होऊं नये. ईश्वरें मला तुजमध्यें दुसरा लेंक दिला आहे, माझा गुणाचा गोविंदा पाहातना तूं पोटचा नाहींस खरा, पण तुझा थोरपणा पाहून माझे मनानें तुला पोटचाहून अधिक केला होय, तूंच माझा लेंक.-- चांगू कोठें आहे तो ? जा त्याला मजकडे असाच घेऊन ये. (गोविंदा बाहेर जातो)

सगु०-- त्याला मी चार घटका झाल्या कोठें पाहात नाहीं. किनऱ्या वाजवूं लागला तेंव्हांच्या तो त्याची बरफी घेऊन नाहिंसा झाला आहे.

गोविं०--(मागें येतो) तो जवळचे मिठाईवाल्याचे दुकानाकडे जातांना पाहिला. मी गोपाळ्याला पाठविला आहे, त्याला बलावाया-करितां.

माळो०-- मुलानो. माझे खोलींत जाऊन बसा. तो आला ह्मणजे मला उत्तर काय करितो तें पाहुंया. तुमचे साक्षीचें काम पडेल तेव्हां मी तुह्मास बाहेर हाक मारीन.

चिम० आणि यमु०-- तर आतां आपण निरोप घेऊं या.

माळो०-- नाहीं; माझे आवडत्यानो ! आज तुह्मी आमचे एथेंच रा-हा, मी तुमचे बाबास आणि बयेस सांगून पाठविलें, आतां दौलतसिंग

आणि

## धाकटा किनऱ्या.

आणि त्यांच्या बा, मला वाटतें किं एथें येतील, आपण त्यांस मेजवानी करूं; [illegible]नें मला आज मोठये दुःखाचा घाय लाविला, त्याची वेदना माझी तुमचे संगती वाचून उणी होणार नाहीं.

सगु०— (कानधा घेत्ये) मला वाटतें चोंगू येतो आहे. —

(मालोजी खोलीचें दार उघडतो. मुलें आंत जातात.)

---

# प्रवेश १२

## मालोजी.

मला फार दिवस भय होतेंच किं एकादे दिवशीं कांहीतरि पोराचें वाईट वर्तमान ऐकुं येईल, पण हा असा अधमपणा करील हें मला वाटलें नाहीं. असो अजुन वेळ आहे, उपाय केला असतां त्याचे दुर्गुण टाकिवतां येतील. हरहर! देवा, इतकेच निकरावर गोष्ट कांरे आणिलीस.

---

## प्रवेश १४

### मालोजी, चांगू.

चांगू — बाबा काय आज्ञा आहे ?

मालो० — तूं कोठें गेला होतास ? तुं घरीं नव्हतास काय ?

चांगू — गुरुजी बाहेर गेले होते. गोविंदा खालीं होता. मी वेळभर वरपटत होतों, तो एकट्याला कंटाळा आला.

मालो० — तर गोविंदा मुलींसंगाती खेळायास गेली, तसा तूं कां नाहीं गेलास ?

चांगू — मीहि गेलों होतों, पण त्या मशीं चांगल्या चालल्या नाहींत.

मालो० — हें मला आश्चर्य वाटतें.

चांगू — पहिल्यानें त्याणी बरफी खाल्ली, मला बलावलें नाहीं. नाहीतर नाहीं, पण माझा तिरस्कार केला. मुरंबा कालिंगड खाल्लें तेंहि मला दिलें नाहीं. नंतर गोविंदानें रस्त्यांतला एक हेंदरा किनऱ्याचा पोर आणिला, त्याला शेर दोनशेर त्याणी बर्फी दिली, पण मला एक तुकडाहि दिला नाहीं. ती नाचलीं बागडलीं पण आपल्ये मंडळींत घेतना; तेव्हां मी तेथें काय करावें ? ह्मणोन दरवाजाकडे लोकां-

चीं

धाकटा किनऱ्या ·

ची मोज पाहात उभा होतों · –

माल्. – दरवाजा जवळच होतास, दुसरा कोठें गेला नाहींस ? तर रस्त्याचे नाक्यावर तुझी आणि त्या किनरी वाले पोराशीं काय झालें ? मला वर्तमान लागलें किं, तूं त्याला मारलास, त्याची किनरी फोडिलीस आणि तो रडत गेला ·

चांगू – होय तें खरें बाबा; आणि दुसरा कोणी असता तर शिपाई आणून त्याला चोकींत नेता. ऐकावें, बाबा, मी त्याला बाहेर निघतानां पाहिला· तेव्हां माझे मनांत मी ह्मटलें किं, आपण या गरीबास कांहीं द्यावें, कां किं मला ठाउक होतें किं गोविंदापाशी कांहिं नाहीं. आणि एवढीशी बरफी याचे श्रमा प्रमाणें फार थोडी देणगी आहे. असा विचार करून मी आपल्ये पिशवीतून कांहिं पैसे काढिले, ते मी त्याला दिले, ते बांधायाकरितां त्याणें रुमाल काढिला· तो पाहातों तो माझे ताईचा, हा पाहा प्रत्यक्ष· मी त्याला सामोपचारानें सांगीतलें किं तो मला परत कर; तो मशीं शिव्या गाळीवर आला, रुमाल देईना· तेव्हां मला राग येऊन मी त्याची गचोंडी धरिली आणि माझी त्याची धकाबुकी होतांच, न समजून माझा पाय त्याचे किनरीवर पडला ·

मालो ० – (क्रोधास चढून) चूप राहा लुच्चा ! माझानें तुझें ऐकवत नाहीं·

नाहीं.

चांगू — ( त्याजवळ येऊन त्यांचा हात धरायास जातो ) कां बाबा! माझे जिवलगा बाबा, तुला एवढा राग कां आला ?

मालो०—( त्याचा हात झटकावतो ) जा दुष्टा. मला तोंड दाखवूं नको; तूं मला लाज आणिलीस. ( तो मुलांस खोलींतून बाहेर बोलावितो )

---

## प्रवेश १५

मालोजी सगुणी यमुना चिमणी चांगू आणि गोविंदा.

मालो०— माझे मुलांनो, इकडे या. जीं माझे ममतेस योग्य त्यांवाचून मी दुसऱ्याचें तोंड पाहाणार नाहीं. तूं चांग्या काळें कर, पुनः माझे दृष्टीस पडलास तर चिरीन. पण, थांब. पहिल्यानें तूं आपलें पारिपत्य माझे मुखानें ऐक मग जा. ( सगुणा आणि गोविंदा यास ) तुह्मावर काय हा बोलला, तें तुह्मी ऐकिलेंच असेल.

सगु०— होय बाबा. आणि जर आमच्या चोरपणा दाखवायाचें प्रयोजन

प्रयोजन नसतें, तर बाबा, तूं अधीक संतापशील ह्मणून, तुज-
पाशीं कांहीं सांगतोंना.--

चांगू -- बाबा तिचें तूं एक खरें मानूं नको ·

मालो ० -- (डोळे वटारून) उगीच ऐस ! तूं लबाड आहेस या वि-
शीं माझी अगोधरच खातरी आहे. चोरी, खून, हे लबाडीचे प-
रिणाम. त्यांतून चोरी तर त्वा केलीच. अमळ आंगात शक्ती आ-
ली ह्मणजे कोणाच्या जीवही घेशील; त्यांत आश्चर्य नाहीं. होउंदे,
सगुणा ·

सगु ० -- प्रथम तर आज दोन प्रहरापासून याणे कांहिं एक काम
केलें नाहीं. यास भाषांतर गोविंदानें करून दिलें ·

मालो ० -- हें खरें गोविंदा ?

गोविं ० -- माझानें नाहिं ह्मणवत नाहीं.

सगु ० -- नंतर याणें मुरंब्याचे रसाची वाटी यमुनाचे साडीवर
होळिली; आणि आह्मी तें धुवून काढायाचे खटपटींत असतां,
याणें मुरंब्याची बरणी रिकामी केली. आह्माला एक तुकडाहि
राहूं दिला नाहीं.-- नंतर बर्फीचें काय झालें तें (यमुना आणि
चिमणीकडे हात करित्ये) या सांगतील ·

मालो ० -- आतां पुरे. (चांगूकडे पाहातो) तुझी लुच्चाई सगळी

माझे

माझे ध्यानांत. जा आतां रात्रीच्या आपल्ये खोलींत जाऊन बैस; उद्यां सकाळीं मी तुला घराबाहेर हाकून देईन. त्यांत तूं ठिकाणी आलास तर बरें झालें; नाहींतर मग दुसरे पुष्कळ उपाय आहेत. तुझे सारिखीं द्वाड पोरें लोकांस उपद्रव करितील त्यांस ह्मणतोस काय उपाय नाहींत? गोविंदा, गोपाळ्यास सांग कि हा आपल्ये खोलींत असतो किं नाहीं, तें मला येऊन सांग. आणिखी सांग कीं तुमचा गुरु बाहेरून आला ह्मणजे त्याला मजकडे पाठीव.

सगु० आणि गोविं० — (चांगूसाठीं रदबदली करितात.) माझे बाबा! माझे मामा! आह्माकडे पाहून त्याला इतका अन्याय क्षमा कर.

मालो० — मी त्याविषयीं एक शब्द कोणाचाही ऐकणार नाहीं. जो गरीबानें आपल्ये कष्टानें जोडलेलें त्यावर बलात्कार करून घेतो, त्याचें पोट भरायाचें साधन फोडितो, आणि मातब्यानें आपण केलें तें नीट केलें ह्मणून प्रपादितो, असा प्राणी या सृष्टींत ठेऊं नये. मी ईश्वराचा मोठा उपकार मानितों किं आजुन तुह्मा सारिखी दोन रत्नें मजजवळ आहेत. यापुढें, मी तुमचे सुखानें सुखी असेन. त्या द्वाड पोराचें मला दर्शन नको. —

(सर्व निघून जातात)

## मैना

मैना घ्या हो मैनॉ. कोणाला मैना पाहिजेत ? अहा ! काय चांगल्या मैना आहेत ! असे बोलत एक मनुष्य यमनीचे दारावरून चालला होता. यमनी नें ऐकून दारीं गेली, आणि पाहाते तंच एक पाखरें विक्या, डोईवर मैनाचा पिंजरा घेऊन चालला आहे; त्याआंत उड्या मारिताहेत, या काठीवरून त्या काठीवर बसताहेत, आणि मधुर मधुर शब्द करिताहेत; तेणेंकरून यमनी मोहित होऊन, केव्हां त्यां जवळ जाईन अशा उत्कंठेनें धांवली, तें थोडक्यांत चुकलें, नाहींतर ती ओटीचा कांठावरून पडलीच असती. मुली, तुला मैना पाहिजेत ? असें पाखरें विक्यानें तिला पुसलें. ती ह्मणाली पाहिजेत, पण थांब अंमळ, मी बाबाला पुसोन आतून येत्यें. त्यानें बरें ह्मणून पिंजरा ओसरीवर ठविला. यमनी धांवत धांवत बापाकडे जाऊन ह्मणत्ये बाबा ! बाबा ! लवकर ये !

त्र्यंबक शेट — एवढी घाई कसची आहे यमन्ये ?

यमनी

यमनी— बाबा, ओरीवर एक पाखरेंविक्या आला आहे. त्या- जवळ मेना पुष्कळ आहेत, आणि फार चांगल्या आहेत

त्र्यंब० — मग, याचा तुला इतका हर्ष कसचा झाला ?

यम० — बाबा, जर तूं सांगशील तर, मी त्यांतली एक मेना वि- कत घेईन.

त्र्यंब० — विकत घ्यायास तुझाजवळ पैसे आहेत ?

यम० — हो, आहेत हे माझा पिशवींत.

त्र्यंब० — पण त्या पाखराला चारा कोण घालील ?

यम० — मी, बाबा मी, मी माझा हातीं चारीन. आणि तूं पाहाशी- ल कीं ती माझी ह्मणावयास फार खुशाल होईल.

त्र्यंब० — होय, पण मला तुझें भय वाटतें.

यम० — कसचें बाबा ?

त्र्यंब० — किं तूं तिला उपाशीं किंवा ताहानेनें एकादे दिवशी मा- रिशील.

यम० — मी, तिला उपाशीं किंवा ताहानेनें मारीन ? तें मी क- धीं होऊं देणार नाहीं. पहिल्यानें तिला खाऊं घातल्याशिवाय मी अन्नाला शिवणार हि नाहीं.

त्र्यंब० — मूली, तूं पाळ आहेस, एकादे दिवशीं तरि तुला विसर पडेल.

# मैना.

पडेल.

यमनीनें बापापाशीं असा मैनेस पाळायाच्या करार करून आणि त्याचा पदर धरून अशी कांहीं आळ घेतली, कीं शेवटीं त्याणें मैना घेऊन देतों असें ह्मटलें; आणि तिला घेऊन ओटीवर आला; आणि चांगल्या रंगाची एक सुंदर मैना निवडून काढिली. मग यमनीचा हर्ष ब्रह्मांडांत मायीना! तिणें पारखेरें विक्यास पैसे द्यावयाकरितां आपली पिशवी झटकन बापाकडे केली. त्यांतील पैसे पारखेरें विक्यास देउन त्र्यंबकशेटीनें आपल्या जवळचे पक्षांचा एक चांगला तारांचा पिंजरा आणविला, जाला, खालीं रवण होते, आणि जांत, पाणी घालायाचें बिलोरी भांडें होतें. मग यमनी मैनेस पिंजऱ्यांत घालून सगळ्या घरभर फिरोन, आईस, बहिणीस, आणि चाकरांस हाका मारमारून, दाखवूं लागली. कोणीहि इष्ट मित्र मुलें तिला भेटायास येत, त्यांकडे तिची पहिली गोष्ट मैनेची. आणि सांगे किं, माझे मैनेसारिखा पक्षी त्रैलोक्यांत नाहीं. तिचे पाखांचा रंग काय! पिसें किति मऊ! बोल काय गोड! चल मी तीं तुला दाखवित्यें. तिचें नांव मी छबेली ठविलें आहे. ती मैना यमनीपाशीं फार सुख पावली. यमनी पाहांटेस उठली ह्मणजे तिचें पहिलें काम हें किं, मैने-

स ताजे दाणे आणि निर्मळ पाणी द्यावें; मग यमनीनें तोंड धुवावें. पोळी तुकडा घरांत झाला असेल तो पहिल्यानें मेनेकडेस यावा काहीं गोड गोड तिणें मेनेसाठीं करून बरणींत घालून ठेविलें असें. तिचे पिंजऱ्यावर नित्य हिरवा पाला लावा, किं तिला उन्हाचा उपद्रव होऊं न पावे. छबेली हि ते तिचे उपकार जाणे. ती लवकरच यमनीस ओळखूं लागली. यमनीचे पाय वाजले म्हणजे तिणें पाख उघडावे, शब्द करावे. यमनी मुके घेऊन तिचा अर्धा जीव करी. आठ दिवस झाले नाहींत तंव ती मेना गायास शिकली आणि मधुरस्वरें गाऊं लागली. एकादे वेळेस तिणें टीपेचा सूर जो लांबवावा, तेव्हां असें वाटावें किं हिचा श्वास आटून ही मरेल. मोठे स्वरानें गावें, तेवेळीं सगळ्या घरचे मनुष्यांचा आत्मा प्रसन्न व्हावा. यमनी तिचे शब्द ऐकत चार चार घटिका तिच्या पिंजऱ्याजवळ बसे. कोणे वेळेस तिला पाहात असतां यमनीनें हातांतलें काम विसरावें. यमनी तिला नित्य प्रहर प्रहर गायास शिकवी. असें तिला त्या पाखराचें वेड लागलें. असें चालले असतां एके दिवशीं बापानें तिला चित्रांची वही दिली. ती चित्रें फार सुंदर होतीं, त्यांकडे तिचें चित्त वेधलें. मग ती त्यांस नित्य पाहात बसे. तेव्हांपासून तिचा मेनेकडे अंमळ विसर पड

त

त चालला. मग तीस मैना साद घाली, तों तिणें ऐकूं नये. एकेसमयीं मैनेस हिरव्या शेंगा किंवा भाकर, जी नित्य मिळत असे ती आठ दिवसांत मिळाली नाहीं. तीं यमनीनें शिकविलेलीं गोड गोड रागिणीवर गाणीं ह्मणे, परंतु व्यर्थ. यमनीचा वाढदिवस आला तेव्हां बापानें तीस एक बाहुली दिली, ती मिळाल्यापासूनतर यमनी मैनेस अगदींच विसरली. त्या बाहुलीचें नांव तिणें आवडी ठेविलें. तिला नेसवण्याखालीं, शृंगार करण्याखालीं तिच्या संगती बोलण्याखालीं, आणि तिला हातीं घेउन इकडे तिकडे नाचिवण्याखालीं, सकाळपासून संध्याकाळपर्यंत सगळा यमनीचा वेळ जाई. मग कोठें संध्याकाळीं इचलेसें खाणें मैनेस मिळे. कोणे दिवशीं तिला अगदींच उपास पडे. एके दिवसीं त्र्यंबकशेटीची दृष्टि पिंजऱ्याकडे गेली, आणि पाहातो तों मैना आंत उपडी पडली आहे; तिचीं पिसें विखुरलीं आहेत; मान पाय आखडून गोळा झाला आहे किंचित् धुकधुकी मात्र राहिली होती. श्वास घ्यावयासहि शक्ति नव्हती. तें पाहून तो ह्मणतो, "यमन्ये, अगं या तुझे मैनेस काय झालें?" तें ऐकून तिचें तोंड खरकन उतरलें. ती ह्मणाली, नाहीं बाबा, कसें झालें तें कोण जाणे, मला इच्या अगदींच विसर पडला. असें ह्मणून ती घाबरून कांपत कांपत दाण्याचा करंडा आ-

णायास

ण्यास घरांत धांवत गेली. त्र्यंबकशेटीनें पिंजरा खालीं काढला, आणि पाहातो तों दाण्याच्या खणांत व पाण्याचा पेल्यांत कांहीं नाहीं. मग ह्मणतो "अरेरे! यांत धान्याचा एक दाणा हि नाहिं! व या ल्यांत पाण्याचा एक थेंबहि नाहीं! हायरे बिचाऱ्या पक्ष्या! अरे तूं निर्दयाच्या हातीं कसारे पडलास! मला हें असें जर पुढचें समजतें, तर मी तुला विकतच घेतला नसता." घरांतील माणसें त्या पिंजऱ्याजवळ येऊन ह्मणूं लागलीं. आहा! गरीब बिचारी मैना! गरीबरे ख्या! मग त्र्यंबकशेटीनें कांहीं दाणे घातले, आणि निर्मळ पाणी प्याल्यांत ओंतलें. त्याला त्या मैनेस सावध करायास मोठा प्रयास पडला. यमनी तोंड लपवून तेथून निघाली, ती आपल्या खोलींत जाऊन रडत बसली. तिणें रडून रडून आंसवानी ओंचे सगळे ओले केले. दुसरे दिवशीं त्र्यंबकशेटीनें विचार केला कि, ही मैना आपल्या शेजाऱ्याचा मुलगा मोरु आहे त्यास बकशीस द्यावी; तो यमनीपेक्षां शंभर वांटयानीं तिचें पाळण पोषण चांगलें करील असा आहे. तें ऐकून यमनी मोठा अनर्थ मांडिला; मोठ मोटयानें हेला काढून रडूं लागर आणि दुःखाचे उद्गार टाकून ह्मणत्ये, अरे माझा पांखरा! माझे छबिले मैने! बाबा मी तुझ्या पायां पडत्यें! एकवेळ मला

क्षमा

# मैना

क्षमा करा; आणि ही मैना मजपाशीं असों द्या. आजपासून
मी जीवंत आहें पर्यंत कधीं हिला विसरणार नाहीं. त्र्यंबक
शेटीस तिची दया आली, आणि त्याणें पुनः ती मैना तीस
दिली; आणि तीस फार रागें भरून सांगीतलें किं, पुढें असें
झाल्यास क्षमा होणार नाहीं. कां किं तूं विचार कर किं, या
बिचाऱ्या पांखरास आपण बंदिशाळेंत टाकल्यावर, याणें
आपल्या पोटास दाणा कसा मिळवावा. तुला, भूक लागेल ते-
व्हां खायास मागतां येतें, पण छबेलीस भूक लागली तें आ-
पल्ये भाषेनें तिणें लोकांस कसें समजवावें. जर आतां कधीं
तूं इस उपाशीं किंवा तान्हेली ठेविलीस तर मी— ते शब्द ऐ-
कून यमनीचा डोळ्यांस पाण्याचें भरतें आलें. तिणें बापास वें-
ग मारिली; पण खेदानें तिला एक शब्द बोलवला नाहिं. मग
यमनी पुनः छबेलीशीं खेळूं लागली. पुढें एक महिना गत-
ल्यावर, त्र्यंबकशेट बायकोस घेऊन कांहीं कामाकरितां दुसरे
गावीं जाऊं लागला; तेवेळीं यमनीस ह्मणाला, "यमन्ये, छबेली-
स संभाळहो." तीं उभयतां गाडींत बसून निघालीं नाहींत तंव, य-
मनी धांवत पिंजऱ्याजवळ गेली, आणि तिणें मैनेस दाणा पा-
ण्याची बेगमी केली. कांहीं घटिकांनीं तिला कर्मेनासें झालें

तेव्हां

तेव्हां ती सोबतिणीस बलावून त्यां बरोबर बाहेर फिरायास गेली. संध्याकाळीं आपा लिपा खेळली. नंतर तिणें फुगडी घातली. असें करितां मोठी रात्र झाली तेव्हां तिचा खेळ संपला नंतर ती थकली, आणि निजायास गेली. दुसरे दिवशीं ती उजडतां उठली; तिचें ध्यान मन सगळें खेळाकडे ह्मणोन ती तशीच शेजारघरीं वाराणसी आणि बची यांकडे गेली. इकडे छबेलीस उपास पडला. असा दुसरा दिवसहि तिचा खेळतानां गेला. छबेलीची आठवणहि तीस झाली नाहीं. तिसरे दिवशींहि तसेंच झालें. चौथ्या दिवशीं त्र्यंबकशेट गावांहून परत आला. तो त्या दिवसीं परत येणार हें यमनीच्या लक्षांत राहिलें नव्हतें. त्र्यंबकशेटीनें येतांच यमनीचा मुका घेऊन आधीं छबेलीचें वर्तमान पुसलें. यमनी अंमळ घाबरून ह्मणाली, ती बरी आहे बाबा. आणि तेव्हांच पाणी घेउन ती पिंजऱ्याकडे धांवली; पाहात्ये तों आंत मैना चोंच वासून, पांख पसरून उलथी पडली आहे. तिचें प्रेत पाहून यमनीनें मोठ्यानें किंकाळी फोडिली. तें ऐकून घरांतील सर्व मनुष्यें धांवलीं. तेव्हां त्याची ती दशा पाहून त्र्यंबकशेट ह्मणाला, आहा रे पक्ष्या! काय दुःखाचें हें मरण तुला आलें! आतां वेळेस मीच तुझी

मोन सुरगाळून गेलों असतों तर त्यापेक्षां ती व्यथा तुला असह्य होती. हाय हाय! भुकेनें आणि ताहानेनें व्याकूळ होउन किति दुःखानें तुझा प्राण गेला असेल! असो, तूं दैवांचा; कि अस्ले निर्दय पोरीचे हातून तरि सुटलास. ते समयीं यमनीस असें झालें कि देमाय धरणी ठाय: जर त्यावेळेस धरणी फाटती तर यमनी आंत उडी टाकित्ती.

त्र्यंबक शेटीनें त्या मैनेचे पोटांत पेंढा भरून तीस कडीपाटास टांगून ठेविलें. तिजकडे यमनीच्यानें पाहावेना. जेव्हां जेव्हां तिजवर तिची दृष्ट पडे, तेव्हां तेव्हां तिचे डोळे आंसवांनी भरून येत. ती बापास नित्य विनवी कि, बाबा, ती मेना माझे दृष्टि वेगळी काढ. तो म्हणे नाहीं. नंतर किती दिवस तिची प्रार्थना ऐकून त्याणें तो पक्षी तेथून काढिला. मग जेव्हां केव्हां यमनी काहीं सांगीतलें काम जपून करीत नसे, तेव्हां त्र्यंबक शेटानें ती मैना पुनः तेथें टांगावी; आणि सर्वांनीं म्हणावें, आहागे बिचाऱ्ये छबेल्ये! या यमनीनें तुला कसेंगे हाल करून मारिलें! म्हणजे यमनीस मोठा पश्चात्ताप होउन तिणें आई बापांचे आज्ञेंत चालावें.

---

# मुलें जीं स्वतंत्र व्हायास इछितात.

## कासु.

आहा बाबा! मला वाटतें कीं मीं मोठा असतों तर बरें होतें! मोठा तुझे इतका.

आबाजी– माझे लाडक्या, तुला असें कां वाटतें?

कासु – एवढ्यासाठीं, किं मग मला कोणाचे आज्ञेंत राहावें नलगे, माझे मनास येईल तें करीन.

आबा०– मला वाटतें किं मग तूं मोठे चमत्कार करिशील

कासु – यांत काय संशय? तसें झाल्यास दाखिवलें असतें.

आबा०– आणि जाई, तुला पण स्वतंत्र व्हावेंसें वाटतें गे?

जाई – होय बाबा, मलाहि तसेंच वाटतें

कासु – आहा! जर आह्मी दोघें स्वतंत्र झालों तर मग काय पहिजे!

आबा०– बरें तर मुलानो, हें तुमचें कोड मी पुरवीन. उद्यां सकाळपासून तुह्मास मोकळीक देतों, किं जें तुमचे मनांस येईल

तें

मुलें जी स्वतंत्र व्हायास इच्छितात.

ते करा.

का॰मु — बाबा तूं थट्टा करितोस.

आ॰बा॰ — नाहीं, मी खरेंच ह्मणतों. उद्यां तुमची आई, मी, किंवा दुसरीं कोणी घरांतील मनुष्यें, तुह्मास कांहीं आडकाठी करणार नाहींत.

का॰मु — आहाहा! तसें झालें असतां आह्मी किती सुखी होऊं!

आ॰बा॰ — मुलांनो तितकेंच नव्हे, मी ती मोकळीक उद्यांचेंच दिवसा पुरती देतों असें नाहीं; जंव तुह्मी होऊन माझे पाठीस लागाल कीं, नको बाबा, आतां तुझा अधिकार तूं फिरून घे, तंवपर्यंत देईन.

कामु — आहा! असें झालें तर मग आह्मी फार दिवस स्वछंद वागूं.

आ॰बा॰ — बरें तर, तुह्मी आपलीं आपणास संभाळती झालीत हें पाहून, मला संतोष वाटला; तर आतां उद्यांपासून तुह्मांकडीं मनुष्यें व्हायास सिद्ध व्हावें. आणि मनास येईल तें करा.

असें बोलणें होऊन तीं मुलें निजायास गेलीं. दुसरा दिवस उगवला तंव, तीं उजडतां उठावीं तीं प्रहर दिवस येई प-

ऐत आंथरुणावरच होतीं. अधीक वेळ निजतात त्यांचें आंग जड होतें, कांहीं सुचत नाहीं, तसें कामूस आणि जाईस इ.ळं. शेवटीं कोणी हाक न मारितां, तीं आपले आपण खाबरीं व दरीं झालेलीं उठिलीं. मग त्यांचे मनांत आलें किं आपण सगळा दिवस हावें तें करूं तेणेंकरून त्यांचे जीवास अंमळ संतोष वाटला. मग कामू जाईस ह्मणतो, ताई, आपलीं जेवणें झाल्यावर आपण पहिल्यानें आज काय करावें बरें ?

जाई – का ? खेळावें.

कामु – काय खेळावें ?

जाई – आपण गंजिफानीं खेळूं.

कामु – तो खेळ हिडिस, मला आवडत नाहीं गड्ये.

जाई – बरें तर, आपा लिपा खेळूं.

कामु – काय ! आपण दोघेंच ?

जाई – तर विटी दांडू, नाहीं तर सुपाऱ्यांनीं.

कामु – मला असले खेळ आवडत नाहींत.

जाई – बरें तर तुझे आवडीचे कोणते असतील ते सांग.

कामु – गड्ये, आपण काठीचा घोडा करून खेळूं.

जाई – आहारे ! लाहान मुलींस तो खेळ काय शोभेल !

मुलें जीं स्वतंत्र व्हाग्यास इच्छितात.

कामु — तो नाहीतर घोडा खेळूं. तूं घोडा हो, आणि मी हाकणार होतों.

जाई — होय तर! चाबूक मारायाला! ते दिवसांची मला अजून आठवण आहे.

कामु — तें मी काय दाटून करितों गे? तूं उडत चालत नाहींस ह्मणून मारायाचें पडतें.

जाई — होय, पण मला लागतें. ह्मणून मी तसला खेळ खेळत नाहीं.

कामु — नाहिं,नाहीं; नाहींना तूं खेळस? बरंतर, ससा कुत्रा खेळशील? मी पारधी होतों आणि तूं ससा हो. चल, धावूं लाग, मी पाठीस लागतों.

जाई — छत्! मला तुझी पारध नको ती. माझे पाठीस लागून तूं मला घाबरें करणार.

कामु — तुला माझा कोणताही खेळ आवडत नाहीं; तर मी तुझी कधीं खेळणार नाहीं; ऐकिलेंस?

जाई — मीही तुझी कधीं खेळणार नाहीं; हें पण ऐकिलेंस?

असें बोलून तीं दोघें दोहों कोंपऱ्यांस रुसून उभीं राहिलीं. तीं तशींच तेथें फार वेळ होतीं; एकमेकांशीं बोलतना; किं एकमे-

काकडे

काकडे पाहातना; तों इतक्यांत दाहा घटका दिवस आला. मग दोन प्रहर लवकरच भरतील ह्मणोन कामू, बहिणीजवळ येऊन ह्मणतो, बरेंतर, तुला जें आवडतें तेंच मी करीन. चला आपण सपान्यांनी खेळूं: एकेक डावास बारा बारा सपान्यांचा पण.

जाई – पण मजकडे रुपान्या नाहींत. तूं मला पन्नास रुपान्या देणें आहेस, त्या माझा पहिल्यानें दे, ह्मणजे खेळायास येत्यें.

कामु – होय पण, त्या मी कालचे दिवसीं देणें होतों; आजचा नव्हत.

जाई – असें! तर त्या देण्यापासून तूं सुटलास का?

कामु – जे स्वतंत्र आहेत ते कोणाचें कांहीं लागत नाहींत.

जाई – बरेंतर, ही तुझी ठकविद्या मी बाबास सांगेन.

कामु – पण आतां मजवर बाबाची सत्ता नाहीं.

जाई – असें आहेतर मी तुझी खेळत नाहीं.

कामु – तुझी इच्छा.

मातक्यानें तीं एकमेकावर चडफडोन दोघें दोहों कोनांस लीं. कांहीं वेळ जाऊन कामु शेउळ घालूं लागला; जाई गाउं लागली; तो कुरकुरूं लागला; ती श्वास टाकूं लागली. एक तास पुनः गेला, आणि दोन प्रहर होत आले. पुढें कामूनें रागानें आपली छडी

मुलें जीं स्वतंत्र व्हायास इच्छितात.

खिडकीतून बाहेर झोंकिली. जाईनें आपली बाहुली कोनांत आद-ळली. तीं एकमेकांकडे पाहात पण काय बोलावें तें सुचेना. शेव-टीं जाई बोलली; चल कामू, मी तुझा घोडा होतें.

कामु- आतां ठीक. बरें घोड्याला लगाम पाहिजे ती. मजकडे लांब दोरी आहे; ही पाहा, ही तूं आपल्ये तोंडांत घाल.

जाई – मी ती तोंडांत नाहिं घालणार. माझे कमरेस बांध नाहीत-र भुजेस.

कामु- हें तूं वेड्यासारिखें काय बोलत्येसगे? घोड्यास तोंडावांचून दुसरे कोठें का कोणी लगाम देतें?

जाई – पण मी कांहीं खरा घोडा नव्हें.

कामु- तर्हि पण, आपणास घोडा असें मानून तुला तसें केलें पाहि-जे.

जाई – त्याचें कांहीं कारण दिसत नाहीं.

कामु जो मी अष्टौप्रहर घोडशाळेंत असतों, त्या मजपेक्षां काय तूं या कामांत अधीक समजत्येस?

ई – तूं कितीदिवसपर्यंत ती धुळींत मळविली आहेस, ती मी तों-डांत नाहींच घालणार.

कामु – तर मी ती तुला दुसरे कोठें घालूं देणार नाहीं. त्यापेक्षां मी तुझीं

खेळूं

खेळूं नये हें चांगलें.

जाई– जसें तुला बरें दिसेल तसें.

आतां तीं तिसऱ्यानें रुसलीं, तीं अशीं कीं मागल्यापेक्षां अधीक एकमेकांवर दांत ओठ खाऊं लागलीं. मग कामू छडी फेंकली होती ती आणायास गेला, तों छडी कोणी मोडून टाकिली. जाईनें भुईवरून बाहुली हातीं घेतली; तिचीं चिरगुटें फिटलीं आहेत. मग कामू निसास टाकूं लागला. जाई रडूं लागली. इतक्यांत जेवणाची वेळ झाली. आबाजी त्यांस पुसायास गेला कीं, हवें असलें तर पान वाढितों. तो दोघांसही तशीं पाहून ह्मणाला, मुलानों तुह्मास आज झालें तरी काय? तीं ह्मणालीं कांहीं नाहीं बाबा, आणि डोळे पुशीत त्याच्या मागें जेवण घरांत गेलीं. त्या दिवसीं जेवायास नाना प्रकारचीं पक्वान्नें केलीं होतीं. तीं जेवायास बसलीं तेवेळीं त्यांस बाप ह्मणतो; मुलानो, तुह्मीं हीं पक्वान्नें फार खाऊं नका; यांपासून तुह्माला उपद्रव होईल; पण तुह्मीं स्वतः आह्मां त्यापेक्षां तुमच्या इच्छेस येईल तें खा प्या. असें बापाचे तोंडांतून घतांच, एकानें मोठमोठे लाडवांचे तुकडे करून गट्ट केले. दुसऱ्यानें चटण्या साभारीं यांची धण घेतली. तें पाहून आई बापाचे कानाशीं लागून ह्मणत्ये, अहो, आतां हीं मुलें दुखण्यांत पडतील।

बाप

## मुलें जीं स्वतंत्र व्हायास इच्छितात.

बाप ह्मणाला, पडतील तर खरीं, परंतु पडूं देः तेसें होईल तरच त्यांची खोड मोडेल, आणि त्यांस समजेल किं, स्वतंत्रपणापासून, मुलांस असें भोगायाचें पडतें; ह्मणोन मी त्यांस अडथळा करीत नाहीं. दादल्याच्या कल पाहून आईहि उगीच राहिली. मग तीं मुलें ओ येई तों जेवलीं; जेऊन थोडा वेळ गेला तंव, कामु जाईस ह्मणतो, चल माझा बरोबर. असें ह्मणोन तिला तो वाडींत घेऊन गेला. आबाजी हळूच त्यांला नकळतां मागून जाऊन आडोश्यीं उभा राहिला. त्या वाडींत मोटें एक पाण्याचें टांकें होतें, त्याच्या कांठाशीं चिमणीशि एक नाव होती; कामूस तींत बसावेंसें वाटलें, जाईनें त्यास वारिलें, ह्मणाली किं, आपण आंत बसूं नये, बाबा रागें भरेल. बसूं नये कां? आपण स्वतंत्र आहों हें तूं विसरलीस वाटतें? जाई ह्मणाली, होयरे होय खरें! मग ती भावाच्या हात धरून नौकेंत बसली. आबाजी अंमळ त्यांचे जवळ जवळ आला, पण त्यांचे दृष्टीस पडला नाहीं. त्याणें मनांत आणिलें किं टांकें उथळ आहेः जरी ही आंत पडलीं, तरी काढायास अवघड पडणार नाहीं; ह्मणून तो उगाच मौज पाहात उभा राहिला. नौका कांठाशीं बांधलेली होती ती सोडून मधलेकडे ढकलून न्यावी असें त्याणी मनांत आणिलें, परंतु ती दोरीनें बळकट

बांधली

बांधली होती, ती सोडितां येईना; तेव्हां कामू ह्मणतो बरें तर; आपल्यास आंत बसून फिरणें साधत नाहीं तर नाहीं; पण झोकवत तरी पाहूंया. असें ह्मणून तो या आंगी त्या आंगी तीस झोकें देत आहे; तो कल जाऊन पाण्यांत पडूं लागला, त्यास जाई हातीं धरून सांवरायास गेली, तंव दोघेंही पाण्यांत पडलीं. तें पाहून आबाजी वाऱ्याचे वेगानें धांवला, आणि पाण्यांत शिरून त्याणें उभयतांस काढिलें. तीं अवधाकानें अर्धमेलीं झालीं, त्यांस घरीं आणून शेकलीं सांवरलीं तीं, अधाशीपणानें खाल्लें होतें तेणेंकरून त्यांचे पोटांत कळा उठूं लागल्या; मस्तक दुखूं लागलें; मूर्छा आली; कांप सुटला; श्वास गुदमरला. अशा अशा विपत्तींत ह्यांचा बाकीचा दिवस गेला. तीं रडतां कुथतां थकलीं. त्यांस रात्रीस थोडी कांहीं झोप आली न आली. प्रातःकाळीं आबाजी त्यांस पुसतो, मुलांनों, तुमचा काय समाचार आहे? तीं ओंड शब्दानें ह्मणालीं, समाचार बहुत वाईट आहे बाबा. रात्रीं आह्मास स्वस्थ झोंप आली नाहीं आमचें मस्तक पोट आजून दुखतें आहे. तो ह्मणाला बापड्यांनों, मची मला कळकळ वाटते. असो पण आतां पुनः आजचे दिवस तुह्मीं आपल्या स्वतंत्रपणाचें काय करणार आहां, तें मला सांगाल? आजही स्वतंत्रता तुह्माकडे सच आहे, ही आठवण आहेना?

तीं ह्मणाली आतां स्वतंत्रता पुरे बाबा. तो ह्मणाला असें कां! माझा मित्रानो ह्मणतां? कालचे दिवशीं तुह्मीच ह्मणाल्यां होतींतना, किं दुसऱ्याचा आज्ञेंत वागणें हें बहुत खोटें आहे? कामु ह्मणाला, आमचे मूर्खत्वाचें आह्मास चांगलें पारिपत्य झालें. जाई ह्मणाली, आह्मी या गोष्टीची फार दिवस आठवण ठेवूं बाबा.

आबा० — तर अतःपर तुह्मीं स्वतंत्रता इछित नाहीं?

कामु — नाहीं बाबा नाहीं. तूं सांगशील तसें करावें, यांत चांगले आहे.

जाई — त्यांत आमचें बरें होईल.

आबा० — याचा पुरता विचार करा. कां किं जर मी माझा अधिकार पुनः घेतला, तर तुह्मांस सांगतों किं, मी पहिल्यानें जें सांगेन तें तुह्मास वाईट वाटलें तरी करावें लागेल.

कामु — कांहीं चिंता नाहीं बाबा. तुला जें बरें दिसेल तें आह्मी करायास सिद्ध आहों.

आबा० — बरेंतर मजजवळ ही हिरवी बुकी आहे, हिला सोनामुखी ह्मणतात. हिचा स्वाद वाईट आहे, पण जास अजीर्ण होतें, त्यासहि बहुत गुणकारी आहे. आतां जर तुह्मी माझें ऐकणार, तर ही बुकी यास्तणीं घ्या. माझें कसें ऐकता तें पाहूं बरें.

कामु

कामू - घेतों बाबा घेतों.

जाई - तीजरी विखा सारखी कडू असली तरी मी घेईन.

आबाजीनें त्यांला तें औषध दिलें. त्याणीं, आरोधर करीत असत तशीं वेडीं वांकडीं तोंडें न करितां, तें घेऊं आदरिलें. तें अधीक संतोषानें कोण घेतो या विषयीं त्यांचा पण चालला. त्या औषधानें गुण लवकरच आला, आणि ती बरीं झालीं. त्यानंतर त्यापासून कधीं अन्याय होई तेव्हां, पारिपत्याचा धाक दाखविणें झालें तर, त्यांचीं आई बापें त्यांस ह्मणत किं आह्मीं तुह्मांस स्वतंत्र करूं. त्या शब्दानें त्यास असें भय होई किं, तुह्मांस बंदिशाळेंत टाकूं असें ह्मटल्यानें तसें भय होत नसे. –

## कांटे झाडें

कोणी एक ओगलजी नावाचा गृहस्थ काश्मीर देशीं राहत होता, तो वैशाख मासीं, एके दिवसीं सायकाळीं, आपला मुलगा आन्त्या यास संगातीं घेऊन, एके लाहान्ये डोंगरावर बसला आहे

हे, आणि तेथून समोर दृष्टीस पडताहेत ते रमणीय पदार्थ त्यास दाखवितो आहे. तेव्हां सूर्य अस्तास जात होता, तेव्हां त्यांस असी कल्पना झाली कि, तो सर्व विश्वास सोनेरी रंगाचें वस्त्र पांघुरवून चालला आहे काय! किंवा हे डोंगर सोन्याचेच आहेत काय! अशा अशा कल्पना करित ते सुख घेत बसले असतां, तित क्यांत तिकडून एक धनगर, आपला कळप चारणीवरून घराकडे वळवून चालला होता, त्याणें सुस्वर गायन केलें, तें त्या बापलेंकाचे कानीं पडून ते तिकडेच पाहूं लागले. तो चालला होता त्या वाटेंत दोहों बाजूनें काटें झाडें होतीं, ह्मणोन जें मेंढरू त्यां झाडांच्या आंगून जाई त्याची कांहींतरी लोंकर त्यावर अडके; तें पाहून आन्त्यास संताप आला; आणि ह्मणतो बाबा, त्या गरीबा मेंढरांची लोंकर ती झाडें कशीं चोरिताहेत तें पाहिलेंसना? अशीं दुष्ट झाडें देवानें कशास उत्पन्न केलीं? तर सर्व मनुष्यें एकमत होऊन यांचा सृष्टीतून निःपात कां करीत नाहींत? मला वाटतें कि, पुनः एकवेळ तीं मेंढरें तिकडून गेलीं अस्तां, त्यां गरिबांचे आंगावरील पांघरूण सगळें नाहींसें होईल. तर मी अतःपर असें होऊं देणार नाहीं. उद्यां दिवस उजडतां कोयता घेउन येतों, आणि त्या सर्वा झाडांच्या फडशा उडवितों. बाबा तूंही माझे बरोबर कुऱ्हाड घेउन ये, ह्मण-

जे

जे जेवणवेळ झाली नाहीं तों सगळा उद्योग उरकून टाकूं.

**ओगलजी** — मुला, मला तुझे मसलतीचा अंमळ विचार केला पाहिजे; तो होईपर्यंत तूं त्यांजवर उगीच रागें भरूं नको. तूं विचार कर किं, आश्विन मासीं आपण माणसेंच काय करित असतो?

**आन्या** — काय करीत असतों बाबा?

**ओग०** — तूं पाहिलें नाहींस का, किं धणगर लोक मोठमोठाल्या कात्री घेउन मेंढ्यांची सगळी लोंकर काढून घेतात. त्यांचे आंगावर थोडकी देखील ठेवीत नाहींत?

**आन्या** — तें खरें, पण बाबा, ते ती चिरगुटें करायास ओपितात; आणि या झाडांस तसें कांहीं प्रयोजन नसतां, हीं उगीच दुष्टाईनें असें करितात.

**ओग०** — या लोंकरीचा त्यां झाडांस काय उपयोग आहे, हें तुला अजून ठाउक नाहीं; आणि त्यांस उपयोग असो किंवा नसो, पण मला तूं सांग किं, आपल्यास पाहिजे एवढ्यासाठींच आपण दुसऱ्याचें घ्यावें हें योग्य किं काय?

**आन्या** — पण बाबा, तूंच मला सांगितलेंस किं, आश्विनाकडे याची लोंकर आपोआप गळून पडत असते. तरती उगीच इकडे तिकडे

# कांटेझाड

कडे गळून फुकटावारी जाईल त्यापेक्षां कामीं लागली तर चांगलें किं नाहीं ?

ओग० – तूं खरें ह्मटलेंस. ईश्वरें या पर्शस लोंकरीचें पांघरूण दिलें आहे. त्यापासून तें आपण माणसें घेतों; नाहींतर आपल्यास थंडीचा उपद्रव फार सोसायाचा पडता.–

आन्या – पण झाडांला कांहीं पांघुरणाचें काम नाहीं. ह्मणोन हीं लबाड आहेत; तर आपण योजिलें आहे तें केल्यावांचून यांस सोडूं नये. उद्यां मी हीं सगळीं कापून टाकणार; तूं माझा बरोबर येतोस?

ओग० – खरोखर येईन. पण आतां तर घरीं जाऊं चला. उद्यांचें उद्यां.

तीं चोरटीं झाडें आपण एकला तोडून टाकीन अशे कल्पनेनें आन्याचे आंगांत आवेश चढला. मग त्याला रात्रभर नीज आली नाहीं. दुसरें दिवसीं पराक्रम करायाचा तो त्याचा ध्यानांत खेळत होता. सूप्रभात पाखरें शब्द करूं लागलीं नाहींत तंच, आन्यानें आपण सिद्ध होउन ओगलर्जास उठविलें; तो उठून तयार झाला; मनांत किं कांटे झाडांचें व्हावें तें होउ; परंतु प्रातःकाळाची शोभा मुलाचे दृ-

टीस

# बाळमित्र

ष्टीस पडेल. मग ते हातांत आचवें घेउन चालते झाले. आन्या ही सेनें पुढें पुढें चालूं लागला. त्याला मिळवून घ्यायास बापास फार श्रम पडे. ते जंव त्यां झाडां जवळ जवळ आले, तंव सहस्रावधी थाकडीं थाकडीं पाखरें झाडांकडे येताहेत, जाताहेत, आणि भोंवतीं भोंवतीं फिरताहेत, असें त्यांणीं पाहिलें. भोंगळजी बोलला मुला, हळू हळू! आतां आपण अंमळ झाडें कापायाची गोष्ट बोलूं नये; आणि या बिचारे पक्ष्यांस उपद्रव करूं नये. पहिल्यानें आपण कालचे जागीं बसून पाहूंया, किं हीं पाखरें एथे कां जमलीं आहेत. ते डोंगरीवर जाउन बसले; आणि पाहूं लागले तों, कालचे दिवसीं झाडांस लोंकर अडकली होती ती ते पक्षी घेउन नेताहेत. काळे, निळे, पिवळे, हिरवे, चमत्कारीक चमत्कारीक रंगाचे, सुंदर, सुस्वर शब्द करणारे, असे पक्षी आले आहेत. आणि त्याणी लोंकरीची मोठी लूट मांडिली आहे. तेवेळीं आन्या आश्चर्यानें चकीत झाला, आणि बापास विचारितो, बाबा, हे पक्षी या लोंकरेचें काय करित असतील बरें? तो ह्मणाला मुला, तुला समजलें किं भगवंतास मुंगीची देखिल चिंता आहे. तो ज्या प्राण्यास जें पाहिजे तें अनेक युक्तींनी पोंचवितो; आणि सर्वांचें संरक्षण करून सुखी ठेवितो. ह्यांत पाहा केव्हडा चमत्कार! हे पक्षी

पिलां

## कांटे झाडें

पिलां करितां कोटी करितात, त्यांस मऊ आंथरुण पाहिजे तें त्यास यां झाडांपासून प्राप्त होतें. ते लांकर नेऊन ती कोट्यांत आंथरून आपल्या लाहान लाहान पिल्यांसहवर्तमान सुख पावतात. असलीं हीं भलीं, उदार, कांटे झाडें, जांवर तूं काल उगीच रागें भरलास, तीं इतकीं उपयोगी आहेत; पाहिलेंस ना? हीं संपन्नापाशीं अधिक आहे तें घेउन गरीबांचें उणें पूर्ण करितात. तर आतां येतो सना आपण तीं कापूं? आन्या ओशाळून ह्मणतो, ईश्वर मजपासून तसें न करवू. ओगलजी ह्मणतो, तूं खरें ह्मटलेंस खुला. हीं आपली जोड अशा परोपकारास लावितात, त्या अर्थी यांचें सदा कल्याण असो, आणि हीं निरूपद्रव राहोत. —

---

## निंबाजी

पूर्वी देवनगरामध्यें एक वेडा राहात होता, त्याचें नांव निंबाजी. तो एकावर एक पांच साहा टोप्या डोईस घालून बाहेर निघे; व कमरेस चार पांच चिरगुटें बांधी, व दोन तीन फाटकीं

कांबळीं

कोबळी खोद्यावर घेई. त्याचे बुद्धीस चळ झाला होता, परंतु त्यापासून कोणास उपद्रव नसे. त्याला फारच कंटाळा आणिला तरमात्र त्याणें पिसाळावें. तो रस्त्यांत चाले त्यावेळेस किती एक द्वाड पोरें त्याच्या पाठीस लागत; आणि ह्मणत, निंबाजी अरे निंबाजी, तूं हीं टोप्या कोबळी किति पैशांस देशीलरे? तो बोलला नाहीं ह्मणजे त्याची हुर्यो हुर्यो करित. त्यांत कितीएक दुष्ट मुलें असत, तीं त्यावर दगडहि टाकीत. निंबाजी बहुतकरून तें सर्वसाही, एकादेवेळेस पिसाळे, आणि धूळ धोंडे मुठी भरून पोरांवर मारी. एकेदिवशीं तो दयारामशेटसावकार याच्या दारावरून चालला आहे, आणि पोरें पाठीमागें लागून गोंगाट करिताहेत, तें ऐकून दयारामशेठ खिडकींतून पाहातो तों, आपला मुलगा हरीहि त्या मंडळींत आहे: तें पाहून खिडकी लावून तो उगाच आंत गेला. जेवणाच्या वेळीं त्याणें हरीस पुसलें, मुला, तो कोण होतारे, ज्याचे मागें लागून तुह्मी कुई कुई करीत होतेत.

हरी – बाबा तो वेडा निंबाजी, तुला ठाऊक नाहीं ?

दयाराम – गरीब बिचारा! तो कशानें वेडा झाला असेल बरें?

हरी – लोक ह्मणतात कि, त्याचें मोठें वतन होतें, त्याच्या बाद फार दिवस पडला होता, त्यांत तो हारला, तेव्हांपासून त्याचे बुद्धीस

चळ

न्चळ झाला आहे.

दया० — मुला, त्याचें जेंव्हां सर्वस्व हरण झालें, तेवेळीं तो जर तुला ह्मणता किं, अगा माझा हरी, माझें दैव फुटलें. फार दिवस स्वस्थपणानें जें वतन मी भोगीत होतों, त्यास मी आजन्च मुकलों. माझें सर्व घरदार वादाचे भरीस पडलें. मला आतां गावांत राहायास ठिकाण नाहीं. गावांबाहेरहि नाहीं. काय करूं, माझे पाशीं एक दमडीहि राहिली नाहीं. असें जर तुला ह्मणता, तर त्यावेळीं तुझानें त्याची थट्टा करवती ?

हरी — भगवान् असें मजपासून न करवू. असा कोण दुष्ट आहे किं दुसरा विपत्तीत पडला असतां त्यास हंसेल. मी तर असल्याचें साहित्य करीन.

दया० — तर काय, तो तेव्हांपेक्षा आज तुला सुखीसा दिसला ? ज्याचें सर्वस्व जाऊनं आणि बुद्धिहि गेली !

हरी — बाबा, आज तर त्याची अधीक करुणा यावी.

दया० — तर, जो शुद्धीवर असतां, तुझ्या दयेस पात्र होता, त्याची अशी दशा झाल्यावर तूं त्यास आज छळिलास कसा ? आणि त्यावर धोंडे कसे फेंकिलेस ?

हरी — बाबा, मी चुकलों, माझा अन्याय क्षमा करा.

दया० – तुला पश्चात्ताप झाला त्या अर्थी मी क्षमा केली; परंतु माझ्याच क्षमेनें होत नाहीं. दुसऱ्ये कोणाची क्षमा मागीतली पाहिजे.

हरी – मी समजलों; तुझा अभिप्राय किं निंबाजी पाशीं क्षमा मागावी ?

दया० – निंबाजी पाशीं का ?

हरी – यासाठीं किं मी त्याचा अपराध केला.

दया० – तें खरें. निंबाजी जर शुद्धीवर असतात तर त्याची क्षमा तुला पाहिजे होती; परंतु क्षमा ह्मणजे काय तें आज त्याला समजत नाहीं; त्या अर्थी त्याकडे क्षमा मागून व्यर्थ आहे. पण मुला तुला वाटतें खरें, किं ज्याचा आपण अपराध केला असेल त्यापाशीं क्षमा मागावी ?

हरी – तें तूंच मला शिकविलें आहेस बाबा.

दया० – दीनावर दया करावी, असी कोणाची आज्ञा ती तुला ठाऊक आहे ?

हरी – होय. अशीही देवाची आज्ञा आहे.

दया० – तर, तूं ती मोडिलीस ह्मणून देव रागें भरला नसेल ?

हरी – भरला असेल बाबा. ह्मणून मी आज रात्रीं त्याची प्रार्थना

ना करीन आणि क्षमा मागेन.

हरीनें रात्रीं तसें केलें. देवापाशीं आपला अपराध सांगून पश्चात्तापानें क्षमा मागीतली— त्यावर कितीएक दिवसपर्यंत तो निंबाजीच्या वाटेस गेला नाहीं; आणि दुसऱ्ये मुलांसही निवारी; असें असतांहि, एके दिवशीं निंबाजीच्या मागें पोरें लागलीं होतीं त्यांत तो मिसळला. तो कांहीं त्यास छळावें या बुद्धीनें गेला नाहीं, पण दुसरीं पोरें, त्याच्या कायकाय खोड्या करितात, ती मौज पाहाव्या करितां गेला. मग पोरांबरोबर हाहि, निंबाजी निंबाजी ! हुर्यो ! हुर्यो ! ह्मणून ओरडूं लागला; असें करितां करितां सर्वांच्या पुढारपणा याकडेस आला— शेवटीं, गलबा फारच झाला तेव्हेळीं पिसाळून, निंबाजीनें पोरांवर दगड टाकिले; तेव्हेळीं एक मोटा धोंडा हरीच्या गालास चाटून कानास लागला, तो तुटायाचाच, पण थोडक्यांत चुकलें. मग हरी घरीं आला, कान रक्तबंबाळ झाला आहे, आणि धाये धाये रडतो आहे, त्यास बाप ह्मणतो, देवानें तुला टीक शासन केलें.

हरी— बाबा, पण दुसऱ्यां मुलानीं माझ्यापेक्षां अधीक त्याच्या खोड्या केल्या, असें असतां, देवानें त्यांस शासन थोडें कां करावें, आणि मलाच अधिक कां ?

दया०

दया० — त्याचें कारण ऐक. मुलां दुसऱ्या मुलांपेक्षां तुला चांगलें समजलें होतें कि हें पाप होय; असें समजूनही, तूं तें केलेंस; ह्मणोन, त्यांपेक्षां तुझा अन्याय मोठा. याकरितां जो मूल देवाची किंवा आपल्या वडिलांची आघज्ञा करून त्यांचा आज्ञा मोडितो त्यास अधीक पारिपत्य होतें, हें योग्यच होय —

## दाणे टिपणारी पोरी.

### नाटक एक अंकी.

#### पात्रें

| | |
|---|---|
| भिंवराव. | जमीदार. |
| मिरोबा. | त्याचा मुलगा. |
| हिराबाई. | त्याची मुलगी. |
| जनाबाई. | |
| यमनी. | तिची मुलगी. |
| हरजी. | जमीदाराचा चाकर. |

स्थळ एक शेत नुकतेंच कापलेलें आहे, त्यांत पुष्कळ सजगु-

त्याचे

ऱ्याचे भारे पडले आहेत. त्या शेताच्या एके बाजूस भिंवरावा-च्या वाडा आहे; दुसरे बाजूस कित्येक झोंपड्या व दुसरी गांव-दर्ये गांवांची रचना आहे.

---

## प्रवेश १

### यमनी.

यमनी – (दुसरे शेतांतून भरून आणलेली सजगुऱ्यांची टोपली हातांत घेउन, भिंवरावाचे शेतांत एका भाऱ्याजवळ बसली आहे) चला, बरेंच काम झालें. आहा! आज माझे आईस काय आनंद होईल! (टोपलीकडे पाहून समाधान पावल्ये) त्या हातांतल्या कापणीकर बाबानें मला एकदांच टोपली भरून कणसें दिलीं, तो किती भला ह्मणून सांगू! आहाहा! मी दिवसभर जरी इकडे तिकडे हिंडल्यें तरी याचें अर्धेंहि मला मिळतेंना. ईश्वर त्याचें बरें करो! आतां मला वाटतें किं आपण या शेतांतलीं कांहीं कणसें टिपावीं. (ती टोपलींतलीं कणसें दोहों हातीं घे-

पित्यें

घित्ये) हां, अमळ दडपली तर, यांत एक दोन ओंजळी दुसरीं मावतील. काहीं पदरांतहि घेतां येतील. (ती उठत्ये, पदराचीं दोन टोंकें एके हातानें धरून एके हातीं जमा केलेलीं कणसें, त्यांत घालित्ये. इतक्यांत दुरून गोंगाट ऐकून ह्मणत्ये) अरे कर्मा! तो कोण माझ्या आंगावर येतो आहे? येउ बिचारा, मी कोणाच्या अन्याय केला नाहीं.

---

## प्रवेश २

### यमनी आणि हरजी.

हरजी — (तिचा हात धरून) आगे चोरट्ये पोरी, मी तुला भली चोरीवर धरली!

यमनी — काय तुह्मी ह्मणतां महाराज? मी चोर नव्हें, साव आहें.

हर० — साव आहेस! तूं साव नव्हस (तो तिच्ये हातांतून टोपली हिसकून घेतो) तर या टोपलींत हें काय आहे?

यमनी

## दाणे टिपणारी पोरी

यम ० — सजगुऱ्यांचीं कणसें पाहाना ?

हर ० — तरहीं कणसें या तुझा टोपलीत उत्पन्न झालीं काय ?

यम ० — आहा ! असें जर होतें तर मग मला शेतांत इतकी मेहनत घेऊन जमा करायाचें काम नव्हतें ·

हर ० — तरहीं चोरीचीं असें अर्थात झालें ?

यम ० — महाराज, असें ह्मणूं नका. मी उपाशीं मेल्यें आणि माझी आईहि उपाशीं मेली तरि, ह्मणतां ही गोष्ट आमच्या हातून घडणार नाहीं ·

हर ० — मी दिव्य करीन. कींहीं आपाप तुझे टोपलींत येऊन पडलीं नाहींत; पडलीं काय ?

यम ० — अरे देवा ! आपण शपत घेऊन मला भिववितां; पण माझें ऐकाल तरखरें. मी त्यॉ समोरच्या शेतांत टिपायास गेल्यें होत्यें, तेथें एक भला ह्मातारा बाबा होता, त्याणें मला टिपतांना पाहिलें; आणि तो ह्मणाला गरीब बिचारी पोर ! पाहा ती काय श्रम घेत्ये आहे ! मी तिला कांहीं धर्म करीन; तेव्हां, जवळ सजगुऱ्याचे भारे पडलेले होते त्यांतून दोन ओंजळी कणसें तोडून त्याणें माझा टोपलींत टाकिलीं. आणि तो ह्मणाला, जो दीनास देतो, त्यास ईश्वर पुष्कळ देईल ·

हर०- होय होय, तें मी समजलों. आमच्या शेतांतून कणसें तोडिलीं स तीं तुला पलीकडच्या शेतांत ह्मातारा होता त्याणें दिलीं नाहींत? आं?

यम०- असें नाहीं, तर तुह्मी जाऊन स्वतां त्याला पुसा.

हर०- मी जाऊन स्वतां त्याला पुसूं! होय! वाट पाहा, मी तुला एथें धरिली इतकें मला पुरे.

यम०- पण मी सांगत्यें, किं मी तुमचा एकाहि भाग्यास [illegible]बलेख नाहीं. हीं थोडीशी कणसें माझ्या ओंटीतलीं, हीं मात्र एथें [illegible]पलीं आहेत, कां जर, मला वाटलें कीं असें केलें असतां त्यांत कांहीं अन्याय होत नाहीं. असें असतां, जर तुह्मास वाटत असेल किं, तसें मी करूं नये, तर तीं परत द्यायास सिद्ध आहें. घ्या हीं तुमचीं तुह्मीं.

हर०- नाहीं, नाहीं, आतां तसें होणार नाहीं. हीं टोपलींतल्यांत घाल, आणि ही टोपली जेथें जाईल तेथें चल. ये माझे बरोबर आतां, चौकीवर.

यम०- (भ्याली) काय गा हें! असें काय ह्मणतो माझा दादा.

हर०- होय, आतां माझा दादा, आं. मी तुला जाऊं दिली तर तूं याहून हि मला चांगला ह्मणशील, नाहीं बरें? मी सांगतों तूं निमूट चौकींत चाल, चाल लवकर.

यमनी

यम० - अहो बाबा! अहो, देवा करितां असें करूं नका! तुह्मास दाखविलें त्याहून अधिक मी एथून घेतलें नाहीं; खरूखर सांगत्यें. मी सगळा दिवस घरी गल्यें नाहीं तर माझी आई मला काय बरें ह्मणेल? आणि मी चौकींत पडल्यें असें ऐकेल तर मग ती प्राणच टाकील.

हर० - तर काय मोटा घात होईल! ती मेली तर गांवची पिडा गेली.

यम० - (रडूं लागत्ये) तुह्मास जर ठावें असतें किं, ती, किती चांगली आई आहे, आणि आह्मी किती दुर्बळ आहों, तर तुह्मास करुणाच येती.

हर० - मी येथें लोंकांवर करुणा करायासाठीं राहिलों नाहीं. माझा धन्याचा जे अन्याय करितील, त्यांस पकडून चौकींत घालायासाठीं राहिलों आहें.

यम० - पण, जर माझे सारिख्यानें अन्यायच केला नाहीं तर—

हर० - एक सगळी टोपलीभर दाणा चोरून, आणिखी दुसरा, आपला भलेपणा सांगत्ये? काय नवल पाहा! चल चल, चालूं लाग, माझा बरोबर.

यम० - अहो बाबा! मजवर करुणा करा! पाहिजे तर माझी

सगळी टोपली घ्या. येतलीत तर एवढ्या दाण्यांनी तुम्हा कांहीं मातबर होणार नाहीं. पण मला जाउं द्या; मी तुमच्या पायां पडत्यें. माझ्या आईकडे दृष्ट देउन तरी मला सोडा. माझे आई-ची काय ती मीच एक आहें.

हर० — मी तुला सोडिली तर तुझे आईकरितां सोडणार नाहीं. ती मेलीतर माझें काय गेलें. पण पोरी तुझें रडं पाहून दया येत्ये. आतां तूं जा. टोपलीची आशा धरूं नको. न्यायाचे दिवशीं न्यायाधीश तुला थोडेंबहुत दंडील तितका दंडमात्र दे; नाहीं तर तूं चवकीत जाशील, अथवा तो तुझाला गांवाबाहेर हाकून देईल.

---

## प्रवेश ३

### यमनी.

यमनी — (एकटी.) भुईवर बसत्ये आणि एके भान्यावर डोकें टेकून कितीएक पळेंपर्यंत आंतले आंत रडत्ये. नंतर उठून चोहोंकडे पा-

हात्ये

दाणे टिपणारी पोरी.

हातंय ) आहा! तो गेलाच! द्वाड मेला. माझीं कणसें, टोपली, सर्व कांहीं घेउन गेला; आणिखीहि माझ्या आईस आणि मला काय करील तें काय समजे? (अंमळ विसांवा घेउन ) आहाहा! ते पक्षी कितितरि दैववान्! त्यांस कांहीं दाणेतरि घेउं देतात, आणि मी ——पण कोण जाणें, एथें कोणी मेला द्वाड त्यांवर बंदूक घेउन टपत नसेल हें कशावरून. मी त्या पाखरांस भेडवून उडवित्यें, मग मी जाईन; नाहींतर या भाऱ्यावर डोकें टेंकलें ह्मणून एकादी शिक्षा करूं लागतील—— काय करूं. (कोणी येताहेत पाहून ) तीं दोन मुलें येताहेत; तीं कोण असावीं बरें?

---

## प्रवेश ४

मिरोबा, हिराबाई, यमनी (डोळे पुसत्ये आहे )

**मिरोबा** — अगे, तूंच काय आमचीं कणसें चोरिलीस? आणि तुलाच काय आमचे चाकरानें धरिली? (यमनी उसासा टाकित्ये

टाकिल्ये, तिच्यानें उत्तर देववत नाहीं )

हिराबाई — ( निजकडे न्याहाळून पाहात्ये, आणि भावास एकीकडे सारिल्ये ) ही मूल मला भली दिसत्ये मिरु. पाहा ( कशी रडत्ये आहे ! तिला अधिक छळूं नको, मोठें दुःख होईल; आणि आपण इतके थोडेशे कणसांसाठीं असें करूं नये. ( ती तिजवळ येत्ये ) उगि मुली उगी, तूं कां रडत्येस ?

यम० — मजवर खोटी आळ घालितात. तुह्माला वाटतें असेल कीं मी अन्याय केला.

मिरो० — तर काय तूं अन्याय केला नाहींस ?

यम० — नाहीं, हें तुह्मी खरेंच माना. मी त्या शेतांत दाणे टिपायास गेल्यें होत्यें, तेथें एके ह्यातारबावानें माझे टोपलींत कणसें घातलीं, मग मी या शेतांत आल्यें, कीं भुईवर पडलीं असतील त्यांतून थोडींशीं टिपावीं, तों तुमच्या चाकरानें मला भाऱ्याजवळ उभी पाहून मजवर आळ घेतला, तो माझी टोपली घेऊन गेला; आणि त्याणें मलाहि चौकींत नेलें असतें, पण मी रडून त्याच्या काकुलती केल्या, ह्मणोन सुटल्यें.

हिरा० — अरेरे ! त्याणें मजदेखतां तुला छळायाची होती, ह्मणजे कसें आहे तें त्यास समजलें असतें ! आमचा बाबा भला

आहे

# दाणे टिपणारी पोरी.

आहे. गरीबास दुःख देउं देत नाहीं. तो एथें असता तर तुला त्यानें तेव्हांच जाउं दिली असती.

मिरो० - आणि अजून तरि तो तुझी टोपली तुला परत करवील. मी खरेंच सांगतें.

यम० - (आनंद पावून) तुला हें खचित वाटतें; माझें लाहानग्ये धण्या ?

हिरा० - मिरु आणि मी जाउन त्याची प्रार्थना करितों; तूं स्वस्थ (?)स देण्याची गोष्ट त्यास सांगीतली ह्मणजे त्यास आनंद होतो. तुझी टोपली तर, त्याला सांगीतल्यावांचून आह्मी आणून देउं.

यम० - आहा माझे बये ! काय तुह्मी दैववान ! तुह्मास कोणाची गरज न लागतां तुह्मी उलटें दुसऱ्याचें साहाय्य करितां.

मिरो० - तर तूं काय फार गरीब आहेस मुली ?

यम० - एथें येउन इतका श्रम घेउन जें भाकरी करितां दाणे टिपतें; तें गरीबच असेल बाबा.

हिरा० - काय तूं भाकरी करितां दाणे टिपत्येस ? मी समजल्यें किं भोंव्या शेकून खायाकरितां. कोणे वेळेस जवळ कोणी नसलें

ह्मणजे

ह्मणजे आह्मी तसें करित असतों.

यम० – अग आई! तसें नव्हे. माझी आई ह्मणाली, कणसें सडून दाणे काढूं, ते दळून त्याचें पीठ करूं, भाकरि करितां.

हिरा० – त्यांचे ते दाणे किती दिवसांचे होते? आणि तुमची किती बेगमी होणार होती?

यम० – एका दोन दिवसां पुरते तर निघाले असते ते खाउन दोन दिवस गेले, मग पुढें परमेश्वर आहे.

मिरो० – बरें तर, मी एक तुला पावली देतों, ह्मणजे तुह्मी एक दिवस अधिक काढाल. ही कोरी ह्मणून मोजेनें मज जवळ मी ठेविली होती. हा घे.

यम० – आहा! इतके पैसे! माझानें हे घेववत नाहींत.

हिरा० – (हंसत्ये) इतके पैसे! घे ते, तूं कां भित्येस? माझी पिशवी मज जवळ असती तर मीही तुला पुष्कळ दिले असते.

मिरो० – (हातांत पावली धरून तिजकडे करितो आहे) चल घे मुली! (यमनी अमळ लाजून त्याकडून पावली घेत्ये, आणि त्याला आशिर्वाद देत्ये) इतक्यानें झालें नाहीं. मी आतां कारभाऱ्याकडे धांवत जातों, आणि त्याकडून घेउन तुझी टोपली तुला देतों. जर त्याणें दिली नाहीं तर मग त्यास ——

यमनी

# दाणे टिपणारी पोरी.

यम० — अगा बाबा ! तुह्मी मजकरितां इतके खटपटींत पडूं नका. तुह्मी ह्मणतां किं मी तुला साहाय होईन, इतकें मला पुष्कळ हे

हिरा० — तूं राहात्येस कोठें तें मला सांगशील ?

यम० — गावांच्या तोंडींच.

मिरो० — तर आह्मीं अगोदर तुला कधीं पाहिली नाहीती. कापणीचे दिवसीं आह्मी, बाबा बरोबर वर्षास एथें येत असतों.

यम० — गावांत येउन आह्मास सुकतेच आठ दिवस झाले आहेत. आह्मी, एसाउ ह्मातारीचे घरीं असतों. ती माझे आईवर फार ममता करित्ये.

हिरा० — काय, एसाउ ह्मातारीकडे तुह्मी असतां ?

मिरो० — आह्मी तिला वळखितों. आमच्या बाबा, तिला कधीं मधीं बागांत येण्याकरितां बोलावीत असतो.

हिरा० — तूं मला आपल्ये आईपाशीं घेउन चलशील ?

यम० — तुमचे सारिखीं थोर मनुष्यें आह्मां गरीबांचे घरीं ! मग तर आमचें काय भाग्य !

हिरा० — नाहीं, नाहीं. आमच्या बाबा आह्मांस इतकें मोठें मानूं देत नाहीं; तो ह्मणतो किं जसीं दुसरीं मनुष्यें तशींच आह्मी आहों.

पण

पण मी आल्यें असतां दुसरी तर तुह्माला कांहिं अडचण नाहीं?

यम० — कांहीं नाहीं. तुह्मी आलां असतां माझी कण्सें गेलीं आणि टोपली गेली, त्या विषयीं माझे बयेचें समाधान कराल. आणि त्या कारभाऱ्यानें भय घातलें आहे त्याचें. ——

मिरो० — त्याचें तूं कांहीं भय धरूं नको. माझी ताई तुझे आईकडे जात्ये आहे, आणि मी धांवत त्या मागें जातों. आणि मला वाटतें कि. —— तुह्मी या ठिकाणीं परत याल नाहीं-बरें?

यम० — जर तुमची मर्जी असली तर.

मिरो० — तूं परत आली नाहींस तंव तुझी टोपली एथें ठेविलीच आहे असें समज.

यम० — मी आईसहि एथें आणीन. ती तुला आशिर्वाद देईल.

हिरा० — चल लवकर मजबरोबर (ती यमनीचा हात धरून निजबरोबर तिचे आईकडे जात्ये)

---

## प्रवेश. ५

### मिरोबा ·

मिरोबा — (एकला) माझी बहीण आणि मी किती करवी अ हों ! किं आह्माला या मुली सारिखें दाण्याचीं कणसें मिळवु-न आणून पोट भरायाचें पडत नाहीं. मला या मुलीचे मुद्रेवरून-च दिसतें किं, ती कांहीं याहून चांगली अवस्था भोगायास उत्पन्न झाली आहे, यांत कांहीं संशय नाहीं. दुसऱ्या गांवच्या मुली हेंद-ऱ्या दिसतात तशी ही दिसत नाहीं. बाबा माझें निश्चय ऐकेल. आहा ! बरेंच झालें हरजीस बरोबर घेउन तोच येतो आहे. आ-णि टोपली हि येथे आहे ·

---

## प्रवेश ६

### मिरोबा, भिंवराव, आणि हरजी ·

मिरो — (बाबाकडे धांवत जातो) बाबा, बरें झालें तूं आला

स । ( हरजीच्चे हातास झोंबतो ) दे मला ती टोपली.

हर ० – हळु हळु, रावजी, माझा हात मोडाल.

भिंव ० – मिरू, तुला ही टोपली कशास पाहिजे ?

मिरो ० – ही एका गरीब मुलीची या द्वाडानें तिचें कणसां सुद्धां हिसकून घेतली आहे. आतां मी तुला तें सगळें सांगेन बाबा.

हर ० – असें काय ! कोणी नीटपणें चाकरी करितो आणि चोरास सामील होत नाहीं तो द्वाड झाला काय ! तर हा गमचा गली गोष्ट आहे ! मग देशमूख मला तैनात कशाला देतात?

भिंव ० – हरजी, मी तुला जेव्हां तेव्हां सांगतो किं निरुद्योगी, लुच्चे लोक, शेतावर येऊन उपद्रव करितील त्यांचें निवारण कर, भणंग भिकाऱ्यास पकड आणि चौकींत घाल असें सांगीतलें नाहीं. कोणी भलीं मनुष्यें दळिद्रानें पीडून माझे संपत्तींतून घास भर अन्न इछितात, किंवा इकडे तिकडे पडलेलीं कणसें टिपतात, त्यांस सर्वथा तुझा उपद्रव नसावा.

हर ० – आपण दाणा काढून आणल्यावर मग ह्यावें तितकें कां तीं टिपतना ; मी मना करीत नाहीं. पण आजून सगळा एक भारा तेथें असतां ——

मिरो ० – ( थट्टेनें ) दाणा घरीं आणून पुनः शेत नागरिल्यावर

असें

कां ह्मणेनास ? तेंव्हां मग फार टिपायास सांपडेल खरें च!

– रावजी, या कारभारांत तुह्मी समजत नाहीं. तुह्मी उगीच असा. ती चोर नव्हे कशावरून ?

मिरो० – हरहर ! चोर ! चोर! तिणें मला सांगीतलें, किं मी एक कणीस एखून घेतलें नाहीं. एक ह्मातारा पलीकडचे शेतांत होता त्याणें माझी टोपली कणसांनी भरून दिली ·

हर ०– ही गोष्ट फार चांगली ! तिणें तुह्मास सांगीतलें ! ती केव्हडी प्रामाणीक ! पण समजलेत, मी तिला भाऱ्याजवळ धरिली आहे बरें ·

भिंव० – दाण्याचीं कणसें तोडित असता ?

हर० – तें मी नाहीं ह्मणणार. ती माझ्या आगोदर काय करित होती तें मला ठाउक नाहीं ? पण पाहा तुह्मी किती ह्मातान्यानें कणसें दिलीं ह्मणून ह्मणत्ये, ती गोष्ट खोटी नव्हे बरें ? गांबटेकर आणितो तिला इतका धर्म करील हें तुह्मी खरें मानतां ?

मिरो० – तर, मी ह्मणतो किं, तीं कणसें तिला ह्मातान्यानें दिलीं. तिणें असें मला निश्चया सांगीतलें. आणि असी भली मुलगी, लबाडी बोलणार नाहीं, ही माझी खात्री आहे ·

हर० – रावसाहेब, खरेंच सांगा बरें ? आपण आजपर्यंत कधीं

लबाडी

लबाडी बोललो आहों कीं नाहीं ? असें असतां आह्मी भलेच ह्मणतों.

मिरो० — बाबा, तुह्मी ऐकताना, हा हरजी मला कसें दाबून बोलतो आहे तें ? (हरजीस रागानें) मी लबाडी केली असती तर म-ग मी द्वाड मुलगा खरा. पण मी कधीं केली नाहीं आणि आ-ज त्या लाहाने मुलीनेंही केली नाहीं. तर आतां यांत लबाड कोणतें उघड दिसतें.

भिंव० — मिरू, असल हक्क. तुझें भाषण ऐकून माझी खात्री झा-ली. कोणी चोरींत अढळला नाहीं तोंपर्यंत आपण आपल्येकडू-न त्यास साव ह्मणोन मानावा. परंतु दुसरा कोणी त्यास चोर ह्मणून मानीत असेल त्यावर रागास येउं नये. यत्न चालेल तंव नम्रतेनें त्याची खात्री करून द्यावी; आणि तो वास्तवीकप-णें त्याचें स्वरूप ओळखे असें करावें.

हर० — तसें नव्हे रावसाहेब, त्याहून मला हें चांगलें दिसतें कीं, प्रथम सर्वांस लुच्चे असें मानावें, मग जितका भला ह्मणोन प्र-त्ययास आला तो मात्र भला ! रस्त्यावर बैल पाहिला असतां मी त्यास मारका ह्मणोन समजून पलीकडून जातों. तो उपद्र-वीक असो किं नसो, आपण चौकस असावें; त्यांत तोटा नाहीं.

## दाणे टिपणारी पोरी ·

संशय नाहीं तो मार्ग चांगला ·

० – चांगली गोष्ट । तुझे सारिखेंच सगळे मानूं लागले तर मग समागम कोणाशीं करावा ? आणि मी तसें करितों त- र तुशीं मशीं गांठ कशी पडती ? मग तुझे सारिख्या लाता- च्यांचें चालावें ह्मणून मी तुला या गावांवर विश्वासाची चाक- री कां देतों ? तुला शिपायगिरीच्या चाकरीवरून सरकारानें दूर केला होता आणि त्याचें पत्र तुजपाशीं नव्हतें, तितक्यावर- च तुला लुच्चा मानून मी कोतवालाच्या स्वाधीन केला नस- ता ?

हर० – तें खरें आणि हेंहिं खरें, किं मी चोर नव्हे ·

भिंव० – होयरे. मी तुला भला असा अनुभविला ह्मणूनच आजू- न माझे चाकरीत टिकला आहेस. पण प्रथम जेव्हां मी तुला ठेवि- ला तेव्हां तुझें तोंड पाहून आणि वचनावरच ठेविलाना? किं तेवे- ळीं मला दुसरें कांहीं प्रमाण होतें ?

भिरो० – बाबा, जर तूं तोंडावरून आणि शब्दावरून परीक्षा करि- शील, तर सुलीचें खरें मानिशील, इतके हरजीचें मानणार नाहीं- स ·

हर० – आं, रावजी। असें काय । तर माझे तोंडाकडे पाहून

बाबाची

बाबाची खात्री होत्ये आहे, असी तिज विषयीं होईल तर मी हें तुमचें सगळें खरें मानीन.

मिरो० — हः हः, काय हा जांबुवंत चांगला दिसतो !

भिंव० — छत्. मिरू, असें ह्मणोंनये बरें. पण हरजी तूं त्या मुलीस वळखतोस ?

हर० — होय रावसाहेब. कांहीं वळखतों कांहिं नाहीं. आज दाहा दिवस तिला मी तिचे आईबरोबर फिरतांना पाहातों. पण तीं एथें कशीं आलीं; आणि कां आलीं, हें तुह्मास गांवचे लोकसनीस आहेत ते नीटपणें सांगतील. मला जर स्वछ पुसाल तर यांस गांवांत घेउन भिकार वाटविलें, हें कांहीं चांगलें केलें नाहीं.

मिरो० — बरें तर त्याविषयीं जो खर्च पडेल तो मी करीन. होय मी करीन जा.

हर० — रावजी तुह्मापाशीं स्वपराक्रमाचें कांहीं आहे ?

मिरो० — मजपाशीं नाहीं. पण माझे बाबापाशीं तर पुष्कळ आहे ?

हर० — रावसाहेब, मी खरेंच सांगतों. या मायलेंकी विषयीं सगळा गांव कुरकुरतो आहे. आणि जर अंमलदारांस असें अव-

दान

दाणे टिपणारी पोरी ·

मारूं दिलें (आंगठा तर्जनीवर चोळून पैक्याची खूण तो) कां कीं माझी खात्री आहे चोकसनिसांनी हो ——

मिरो० – बाबा पाहा तुम्ही ! हा चोकसनिसासहि वाईट ह्मण- तो, मी त्यांस हें कळवीन ·

भिंव० – हुश्श मुला. (हरजीस) हरजी, माझा मतें तुझी अ- शी संशयित प्रकृति चांगली नव्हे. तर आतां मलाहि तुज - विषयीं संशय घेणें प्राप्त आहे, कारण कीं तीस तूं आपल्या शेतांत भाऱ्याजवळ पाहिलीस ह्मणून अटकविलीत कीं ति- णें टोपली तेथें भरिली; आणि त्या गरिबांस गावांत वस्ति- स येऊं दिलीं त्यावरून कमाविसदारानें लांच घेतला असें ह्मणतोस. बरें तर, आतां मीहि ह्मणतों कीं तिजपासून पैसे किंवा तमाखू तुला मिळाला नाहीं ह्मणून तूं तिची टोपली अ- टकाविलीस, नाहींतर तिला तूं जाऊं देतास ·

हर० – रावसाहेब, आपणास वाटतें कीं ——

भिंव० – तुला लोकांविषयीं जसें वाटतें तसें लोकांस तुज- विषयीं कां वाटूं नये ?

हर० – बरें तर बाबा, आतां आपण कांहींच बोलूं नये. सगळे भिकार येऊन तुमचें, शेत, वाडी, गांव लुटून कां ने ईनात.

इनात ? माझें काय गेलें. पण आतां मी ही टोपली ह-त्यापाशीं नेउन देउं ?

मिरो० – नको नको बाबा, इतकी मजवर दया करा.

भिंव० – हरजी, तुला, ती त्या ह्मातारीचा घरीं नेउन तिचे मुलीपाशीं क्षमा मागायाची पडेल.

हर० – क्षमा, रावसाहेब क्षमा ! तुह्मी हि असें ह्मणावें ! का-य मी जाउं आणि क्षमा मागूं ? कशाकरितां ? मी तिचा अन्या-य केला असें मला वाटत नाहीं.

मिरो० – एवढ्यासाठीं, किं हकनाहक तूं तिला मेहनतेंत घात-लीस, आणि तिजवर चोरीचा आळ घेतलास, ह्मणून तुला क्ष-मा मागणें प्राप्त आहे; समजलास ?

हर० – आणि टोपली ही दिली नाहीं, आणि क्षमा हि मागी-तली नाहीं, तर काय झालें ?

भिंव० – मी जर तुला हकनाहक छळिला, तर मला, तुजपा-शीं हि क्षमा मागीतली पाहिजे. आतां तुला जर लाज वाटत असली तर मी स्वतः टोपली नेतों, आणि तुझा वतीची क्षमा मागतों.

हर० – तर मिरूरावजी, इतकें काम तुह्मीच करा ?

मिरो०

दाणे टिपणारी पोरी.

१-हो ! मी सिद्ध आहें. पण बाबा, आपली ताई, तिचे आ-
ची समजाविशी करायाकरितां, ती बरोबर गेली आहे, ती
तिला घेउन लवकर परत येणार आहे, मी तिची अंमळ वाट
पाहातों.

हर०- असें आहे, तर एथें माझें काम नाहीं (तो पुटपुटत चा-
लला होता) आतां या गावीं इतकें भिकार होईल किं, आम्हा-
स लवकरच भीक मागत जायाचें पडेल.

---

## प्रवेश ७

भिंवराव आणि मोरीबा.

मिरो०- बाबा तो काय बोलला तें ऐकिलेंसना ?
भिंव०- होय लाडक्या, पण मी त्याचें कांहींच मनास आ-
णित नाहीं.
मिरो०- पण असा वाईट माणुस तूं कां ठेविला आहेस ?

भिंव॰- तो वाईट नाहीं मुला, तो आपल्ये हितास आ-
च जपतो, त्यामुळें कोणेसमयीं असा बहकतो. एरवी
मोठे सच्चरटीचा मनुष्य आहे. आणि एक निष्ठ चाकर.

मिरो॰- पण तो वांकडा चालतो आहे तर?

भिंव॰- तूं ऐकिलें नाहींस, तो ह्मणाला किं तिचा अन्याय
केला असें मला वाटत नाहीं. तर त्याचा अन्याय इतकाच,
किं तो हुकुमाप्रमाणें करायास जातो. मनुष्य पाहून व गो-
ष्टीचें तारतम्य पाहून काम करावें हें त्यास समजत नाहीं.

मिरो॰- मी समजलों नाहीं. मला हें नीट समजाविशील?

भिंव॰- होय मुला. तें असें किं त्याला जेव्हां मी ठेविला, तेव्हां
सांगीतलें होतें, किं गावांतून लुच्चे, लबाड, हाकून काढ, त्यां-
ला कोतवालाकडे नेउन शिक्षा करिव. ह्मणजे, भिकाऱ्याचे
वेषानें चोरीवर जे पोट भरितात, आणि गावांत येउन माझ्या
कुळांस जे ठकवितात, त्यांविषयीं हा हुकुम दिला होता.

मिरो॰- हां हां! आतां मी समजलों. तो खरे भिकाऱ्यासहि
चोरांत मोजितो. कोणास ह्यातारपणामुळें, दुखण्यामुळें,
किंवा दुर्दैवामुळें, भीक मागणें प्राप्त होतें, तें तो लक्षांत आ-
णित नाहीं.

## दाणे टिपणारी पोरी.

– खरें बाळा. एकच गोष्ट प्रयोजनवशात् तशी ..नली ह्मणजे वेगळीच दिसत्ये. आतां पाहा मीच तुला ह्मणतों; किं तूं हरजीशीं भांडताना चांगला विचार केला नाहींस; त्या मुलीची आई लबाड नव्हे, अथवा त्या मुलीनें तुला लटकें सांगीतलें नाहीं, आणि आपले भान्यांतून कणसें चोरिलीं नाहीं. हें तुझानें कशावरून सांगवेल ?

मिरो० – नाहीं बाबा. तसें होणार नाहीं.

भिंव० – कां होणार नाहीं ? तीं कोण आहेत, आणि एथें काय योजून आलीं आहेत तें तुला पक्केपणीं ठाउक आहे ?

मिरो० – बाबा, जर तूं तिची ती आकृती, तिचे ते अश्रुपात, तिची ती गरीबी, पाहातास; आणि तिचें तें भाषण जर ऐकतास, तर तुझी खात्री होती. याहून दुसरें अधीक काय जाणिलें पाहिजे ? तीं योग्य आहेत किं नाहीं, हे पक्कें समजेपर्यंत त्यास काय उपाशीं मरूं द्यावीं ?

भिंव० – शाबास मुला, शाबास. गरीबावर अशीच दृष्टी ठेवित जा, ह्मणजे भगवान् तुजवर कृपा करील, तुजसारिखा गुणाचा मुलगा देउन जशी त्याणें मजवर कृपा केली आहे. कठोरतेपेक्षां दयाळुपणा चांगला: निष्ठुर मनुष्य आनीतींत शि

रतो

रतो. जेथें, कोणी आपली कृपा इच्छितो, आणि ती स
पल्याचानें करवत नाहीं अशी गोष्ट होत्ये, तेथें त्याचें
आपला नाहीं.

मिरो०— पण बाबा. हरजी सारिख्ये मनुष्याचा स्वाधीन अधिकार करावा हें मला ठीक दिसत नाहीं. तो एक दे दिवसीं अनर्थ करायाचा.

भिंव०— तूं ह्मणतोस तें खरें. पण मी त्याकडेसच सगळी सत्ता दिली नाहीं. त्यापासून झालाच तर लाहानसा उपद्रव होईल. कदाचित् झाला तर त्याचा परिहार करितां येईल. त्याचे डोईवर आपला कोठीवाला आहे, तो चांगलेसमजुतीचा आणि भला मनुष्य आहे, तो न्याय अन्याय पाहून चांगलें तेंच करील. त्याणेंच मला त्या बायलेकींचें वर्तमान कळविलें, किं त्या भल्या आहेत, आणि त्या लाहान्ये गिरिजाबाचे घरीं असतात हें हि.

मिरो०— पण बाबा, हरजीनें त्यावेळींच जर त्या मुलीस मारिलें असतें तर कसें होतें?

भिंव०— इतकें त्याचानें करवत नाहीं. मी त्याला निक्षुण ताकीद केली आहे किं, तुला कोणी कसाहि अन्याय करितांना आढळलें, तरी त्याच्या आंगावर हात टाकूं नको; त्यास कोठी-

वाल्या

दाणे टिपणारी पोरी ·

।पाशीं घेउन जा ·

०— तों बाबा त्या लाहानग्ये मुलीस घेउन माझी ताई आली ·

---

## प्रवेश ८

भिंवराव मिरोबा, हिराबाई, यमनी ·

मिरो०— (टोपली घेउन यमनीकडे धांवतो) ही बे मुली. ही घे तुझी टोपली. त्यांतले तुझे एके कणसासही कोणी हात लावला नाहींबरें ?

यम०— (अगे माझे टोपल्ये ! अरे माझे लाहानगे धन्या, मी तुझी किति उपकारी झाल्यें ! (भिंवरावास पाहून) हे कोण गृहस्थ आहेत ?

हिरा०— (बापाकडे धावोन त्याच्या कडेवर चढत्ये) यमन्ये पाहा हा आमच्या बाबा ·

मिरो०— मी तुला खरें खुरेंच सांगतों यमन्ये, आमच्या बाबा

चांगला

चांगला आहे. तूं कांहीं भिउं नको. ये मी तुझी त्याच्या करितों (यमनी पुढें आल्ये) तुला दुखविलें ह्मणोन बा॰. रजीची चांगली शिक्षा केली, ऐकिलेंस ?

**यमनी –** (सभय भिंवराबाजवळ जाल्ये आणि त्यास नमल्ये) महाराज, मी इतकी सलगी करित्यें ह्मणून क्षमा असावी. आपलीं मुलें किती थोर ह्मणून सांगूं ———

**भिंव॰–** (एकीकडे वळून हळूच) मिरोबा ह्मणत होता तें खरेंच. इचा तोंडाकडे पाहातां ही लबाड असा संशय कोण्णास येईल ? इची रम्यमुद्रा, भाषणाची हातवटी, हीं इचे थोरपणास सांगतात.

**यम॰–** (मिरोबास आणि हिराबाईस हलक्ये शब्दांनी) मीं तुमचा बाबास रागवर आणिला नाहीं ?

**भिंव॰–** (तें ऐकून) नाहीं माझे लाडके ! माझे मुलानीं तुझा सत्कार केला, त्यांत कांहीं अधीक केलें नाहीं. तूं त्यास योग्यच आहेस.

**हिरा॰–** खरें बाबा, ही तशीच आहे. पण जर तूं इची आईस पाहिली असतीस तर ! ———

**भिंव॰ –** तुझी आई कोण आहे मुली ? या गावांत तुह्मी कोठू

दानशालां ? आणि तुह्मी पोट कसें भरितां ?

कमी — पोट कसें भरितों हें मी काय सांगूं ! कधीं मिळतें क- धीं उपाशी असतों. आह्मी सगळा दिवस कधीं सगळी रात्र- ही, सूत कांतितों, शिवतों, आणि पोट भरितों. गिरिजाउनें आपले घरीं आह्मास राहायास जागा दिली आहे. त्यांणीं पला शेतांत कणसें टिपायास आजच पाठविली होती; तें पहिले खेपेसच असें झालें.

गिरो० — (यमुनेचे कानांत) आज तुझें भाग्य चांगलें. ता- ई बाबाची आज्ञा घेउन ठेवणार आहे: मग तुला टिपल्यावांचू- नच दाणे मिळतील.

भिंव० — पण तुह्मी अगोदर कोठें होतींत ?

यम० — एथून थोडके कोशांवर रेणुकापुरी होतों तेथें फार माहागाई ह्मणून गिरिजाउनें माझे आईस सांगीतलें, कि तू येथें ये: मी तुला जागा देईन.

भिंव० — (एकीकडे होउन) गरीब लोक जेव्हां एकमेकांस अ- से साह्य होतात तेव्हां मग मालदारानीं किति साह्य व्हावें ? (यमुनीस) मुली तुझा बाप जीवंत आहे ? तो काय धंदा क- रितो ?

मिरो० — मी पैज मारितों, कि तो मोलकरी नसावा

हिरा० — आणि इचे आईस पाहिल्यावरून मीहि म. ठीका.

यम० — (अंमळ गडबडून) माझा बाप ? मला बाप नाहीं. खरखुरेंच मी पाहिला नाहीं. मी उपजायाच्या आगोदरच तो वारला. आहा! जर तो आज जीवंत असता तर ——

भिंव० — तो कोण होता हें तूं जाणत्येस ? आणि त्याचें नाव काय तें सांग ?

यम० — माझी आई तुह्मास तें नीट सांगेल.

भिंव० — ती मशीं बोलेल ?

हिरा० — हो; ती आतां एथें येईल. मी अंमळ मागाहून येत्यें, असें ती आह्मास ह्मणाली.

भिंव० — मुली तुला शिक्षा कोणाची ?

यम० — तें सगळें माझे आईनें केलें. मला वाचायास, आणि लिहायास, तिणें शिकविलें; आतां ती मला देवाच्या भजनमार्ग शिकवीत असत्ये. आणि चित्रें काढायासहि शिकवित असत्ये.

भिंव० — चित्रें काढायास ! तर आतां माझी खात्री झाली किं हीं काणी मोठें कुटुंबातलीं दरिद्रानें अशी दशेस आलीं आहेत.

दारोदिपणारीपोरी ·

— आहा ! ती ती, यत्ये आहे ·

— हीच ती ?

भिंव ० — (एकीकडे) यांचें वर्तमान समजायास मी मोठा उत्कंठीत आहे. या मुलीच्या आकृतीवरून मला इचे बापाचें भान होतें पण पक्कें आठवत नाहीं ·

---

## प्रवेश ९

भिंवराव, जिउबाई, मिरोबा, हिराबाई, यमनी ·

यम ० — (आईस भेटायास धांवत्ये. आई भिंवरावास पाहून गडबडत्ये) ये बये ये, भिउंनको. हे त्या दोघां मुलांचे बाप. जाणीं आपणावर फार लोभ केला. आणि जशीं यांचीं मुलें तसेच हेहि दयावान आहेत. (जिउबाई हळुहळु पुढें येत्ये, हिराबाई पुढें जाउन आवडीनें तिचा हात धरून तिला बापाकडे आणित्ये) ·

हिरा० — माझे बापास सगळे वर्तमान ठाउक झालें; नवें सांगावें नलगे.

जिउ० — माहाराज माझी यमनी थोर असेंतर आपल्ये लक्षांत आलें नाहीं?

भिंव० — बाई, तुमचे मुलीस आणि तुह्मास पाहूनच तुमचा भलेपणा साह्य होतो.

मिरो० — तिचें नाव यमनी? हें नांवच सांगतें कि ही दाणे वेचून पोट भरायाकरितां झाली नाहीं

जिउ० — काय करावें, दरिद्रावस्था फार कठिण आहे, पण अंवपर्यंत आमच्या हातून वाईट कर्म घडलें नाहीं तंवपर्यंत आह्मी ———

भिंव० — गरीबीची लाज कोणी धरूंनये: सद्गुण आहेत तेथें ही ती आदळल्ये. बाई आतां मी सलगी करून विचारितों, क्षमा करा; तुमचें नांव काय?

हिरा० — इचें नांव जिउबाई पोंवारीण.

जिउ० — आतां मी तुह्मापासून माझी खरी हकीकत मी लिपवित नाहीं. मी असे दिवस काढिल्यें त्यांचें माझा उपाय नाही असें रावसाहेबांच्या मनांत यावें ह्मणून सांगत्यें.

माझ्या

दाणे टिपणारी पोरी.

माझ्या मनांत आहे कि त्यांच्या लोंकांकडून होऊं नये. (मुलांकडे पाहात्ये), गरीबांच्या लाजेमुळें नव्हे. पण जर माझें नांव प्रगट झालें तर मग हलके जातींतले लोक जे कोणी नीच असतील ते, माझा छळ करून संतोष पावतील; का कि कोणे समयीं मोठे मनुष्यापासून त्यांचे गरीबपणाचा तसाच तिरस्कार झाला असतो.

मिरो०- बरें तर मी ऐकत नाहीं.

हिरा०- मी कोणाशीं चकारशब्द बोलणार नाहीं. मी खरेंच सांगत्यें कि तुम्ही कोणी असा, पण यमनीस मी माझी भेत्रीण करीन.

भिंव०- बाई, सांगतो हे खरेंच माना. माझ्या मनांत तुमचें कल्याण करावें असें पक्कें लागलें आहे, ह्मणोन मी इतकें खोदून पुसतों.

जिऊ०- मी गरीब परंतु मोठे कुळींत उत्पन्न झाल्ये आहें. वर्षे आठ झालीं माझे बापानें मला सयाजी पोंवार सेनाखासखेल यांस दिलें.

भिंव०- सयाजी पोंवार! सयाजी!

जिऊ०- आमचें लग्न झाल्यावर मग आह्मी रतनपुरास

आलों

आलों. तेथें पोंवाराचें वतन होतें.

भिंव० – होय तोच! तोच! या मुलीच्या चेहेऱ्यावरून तरउघड दिसतें कीं तोच.

जिवु० – तें कसें रावजी?

भिंव० – पुढें बोला बाई.

जिवु० – मी आतां थोडक्यांतच सांगत्यें. आह्मी संसार सुखाचा आणि परस्पराचे प्रीतीचा अनुभव नुकताच घेत आहों इतक्यांत, अरे कर्मा! कठिण ** मुळें त्यांचा प्रकृत बिगडली. आणि माझें दैव फुटलें तें असें झालें.(ती रडत्ये)

हिरा० – (यमनीस) बापडये, तूं लवकरच गे पोरकी झालीस.

यम० – अरे देवा! उपजायाचे अगोदरच.

जिवु० – घरकरी वारले तेव्हां ही मूल माझे पोटांत. माझा निर्दय दिरानी मला पोटीं मुलगा नाहीं पाहून घरांतलें सर्व आटोपलें. मग त्याला त्याणी उचलून दिलें तें घेणें प्राप्त झालें.

भिंव० – यावरून तुह्मास फार थोडें दिलें असेलसें दिसतें.

जिवु० – त्याजवर आह्मी थोडीं वर्षे रतनपुरांत काढिलीं; नंतर सर्व विकून नाव छपवून राजापुरास आलों, तेथें एसा

दाणे टिपणारी पोरी.

उची गांठ पडली तिणें या गावीं आणिलें.

हिरा० - रेती, आपली एसाउ ती, बाबा.

जिउ० - पूर्वी माझे हातून तिजवर कांहीं उपकार घडले होते, ते आठवून तिणें मला आपल्ये घरीं बोलाविलें. ती आमच्या फार समाचार घेत्ये. तिला दुसरें कोणी नाहीं. ती ह्मणत्ये तुह्मी मला मूठ माती द्या, आणि ही माझी झोंपडी आहे ही माझे मागे तुह्मीच घ्या. अशी माझी कथा आहे.

भिंव० - बरें बाई. आतां त्या एसाउस कृतज्ञते विषयीं मजपेक्षां अधीक मी होउं देणार नाहीं. आजच्या दिवसीं बाई मला फार आल्हाद झाला, किं तुमच्या भ्रतारानें मजवर जे उपकार केले आहेत, ते फेडायाचा योग देवानें आणिला.

जिउ० - तें कसें रावसाहेब! तुह्मी माझा घरधन्यास ओळखत होतेत?

भिरो० - या यमनीचे बापास?

हिरा० - अगे माझे यमन्ये. आतां मला वाटतें किं तुला आह्मीं आमचे घरीं ठेवूं. पण तुला काय झालें? तूं कां रडत्येस?

यमनी - नाहीं मला आनंदाश्रु आले.

भिंव०-तुमच्या भ्रतारानें तर माझा प्राण वांचविला आहे. आहाहा ! मी आज केवढा सुदैवी तरी; कि त्या पुरुषाचे बायकोची आणि मुलीची सेवा माझे हातून घडेल. मागें लढाईत मी त्यांचा हाताखालीं चाकरी करीत होतों. एके समयीं शत्रूशीं हातघाईस आलों होतों तेथें माझेवर एका बारगिरानें घोडा उठविला आणि मी तर भ्यानें अगदीं गळालों होतों; त्याक्षणीं जर पोंवार पुढें सरसावले नसते, तर मग मी आजला जीवंत कोठचा राहातों.

जिउ०- मीही त्यांचा शूरपणा ऐकत होतें.

भिंव०- त्यानंतर एके समयीं मी आपले पागे बरोबर कामगिरीवर असतां शत्रूंनी एकाएकीं आह्मावर छापा घालून धरून नेलें. आमचें सर्वस्व लुटिलें, मला जखमा लागल्या— हें वर्तमान पोंवारांस कळतांच्य, त्यांणी शत्रूकडचे सेनापती जाधवराव होते, त्यांस शिफारस पत्र पोहोंचवून माझें तारतम्य राखविलें. तेथें माझ्या जखमा बऱ्या होत तंव दोन वर्षे लागलीं. नंतर मी तेथून सुटोन घरीं आलों, आणि पोंवारांस भेटावें तंव, तावडतोबीनें आमची रवानगी हिंदुस्थानांत झाली, तेथें मी लग्न केलें; आणि साहा वर्षे राहून

स्वदेशीं

स्वदेशीं आलों आणि शोध घेतला तंव ऐकिलें किं, पोंबार कैलासवासी झालें. असल्ये पुरुषाचे बायका मुलांस आणि विपत्ती, हें माझा लक्षांत नाहीं — तींत आज मी तुह्मास पाहून माझें हृदय शतधा विदीर्ण झालें बाई.

जिउ० — हे ईश्वरा! तूं एथें मला आणून काय चमत्कार केलास हा!

मिरो० — (यमनीस) काय? तुझे बाबानें माझा बाबाचा प्राण राखिला?

हिरा० — आतां आह्मी कितितरी अधिक तुमची ममता करावी?

भिंव० — यमन्ये, बेटा ये इकडे, मी आहें तंव तूं आपला बाप जीवंत आहे असें समज हो. माझे मुलानों, तुमची आई बारली, तिचे जागीं तुह्मी या बाईस आई ह्मणा. बाई, तुह्मी यमनीस शिकविलेंत (यमनी त्याजवळ जात्ये आणि त्याचा हात धरित्ये) त्यावरून मला वाटतें किं तुह्मीं माझे मुलांस विद्याभ्यास करवायास योग्य आहां. मी तुमचा सांभाळ करीन. पुनः दरिद्राची पीडा तुह्मास होऊं देणार नाहीं (यमनी अजून त्याचा हात धरून आहे) होय मुली,

मी

मी तुला माझे सुलीप्रमाणें पाहीन. तूं आपल्ये उदार बापा-च्या प्रतिमा आहेस, ह्मणून माझें अत्यंत प्रीतीपात्र आहेस जसा तो मला गुरुस्थानी होता.

जिवु० — (उद्गार आला आहे) रावसाहेब, तुमचे उपकार उच्चारायास मला शब्द सांपडत नाहींत. माझे अंतर्यामीं जें होत आहे, तें हे माझे आनंदाश्रू सांगतील.

हिरा० — (तिला अलिंगिल्ये) माझे जिवलगे, माझे नवे आई! तर आतां तूं नित्य आल्हादजनक असशील नाहीं बरें? तूं पाहा आह्मी तुझे आज्ञेंत कशीं वर्तूं ती.

भिरो० — होय, आणि यमनीला दुसरी बहीण ह्मि झाली. आतां तिला दाणे दिपायास जायाचें काम नाहीं! अरे दुष्टा हरजी, आतां मी तुला बांकुल्या दाखवीन!

जिवु० — माझे लाडके लेंकरानों! तुह्मी मला किती आनंद करितां! आतां एकास तीन मुलें तुह्मीं मला झालां, तर तुमचें तारतम्य मी माझे जिवापासून करीन (भिंवरावास) रावसाहेब, आज्ञा द्याल तर हें सुख समाधानाचें वर्तमान मी एसाउुस जाउुन सांगेन; हें ऐकून तिला हर्षवायू-च होईल.

भिंव०

## दाणे दिपणारी चोरी.

भिंव०– ठीक आहे बाई. इतक्यांत मी हि घरीं जाउन तुजा-
करितां एक खोली तयार करवितों.

हिरा०– बाबा, मी माझे नव्ये आई बरोबर आणि यमनी ब-
रोबर जाउं ?

मिरो०– आणि मीही जाउं बाबा. मला यां बरोबर जावेसें वा-
टतें.

भिंव०– खरेवें जा माझा लेंकरानों. आणि मग जिउबाई-
स आणि यमनीस आपले घरीं घेउन या बरें. आणि एसा-
उसहि आज आपल्ये घरीं जेवायास आमंत्रण करा.

मिरो०– (यमनी टोपली घ्यायाला चालली होती तीस) नको,
नको, यमन्ये ती त्वां आतां उंचलू नये, तेथेंच राहूंदे.

यम०– रावजी, मी ही टोपली कोटिरुपयांसही कोणाला दे-
णार नाहीं. माझा आणि माझे आईचा जो आज भाग्योद-
य झाला त्यास मूळही आहे. नाहीं, माझे चिमण्ये जिवलगे
टोपल्ये, तुला डोकीवर घ्यायास मी लाजणार नाहीं

(ती मोटें बळकरून उचलत्ये).

हिरा०– इतकें तरी कर, किं आंतलीं कणसें काढ, ह्मणजे
ती हलकी होईल.

यम० — कां कादीन ? तीं कणसें माझीं आहेत. मला तीं त्या भल्या लातान्यानें दिलीं आहेत. याविषयीं तुमचा हारजी व्हावें तें कां ह्मणेंना; तीं मी एसाऊस भेट देईन.

भिंव० — तिला मी विसरणार नाहीं. आजपासून जन्मपर्यंत मी तिला नित्य अन्न देईन.

जिदु० — भगवान् तुमचें कल्याण करो, आणि तुमचीं पुलें तुह्मांसारिखीं धार्मिक होउन तुह्मास सर्वदा आनंद करोत.

( सर्व निघून जातात )

## सखी आणि मनी

वसंत ऋतूमध्यें, एके दिवशीं मोठे प्रातःकाली, एका श्रीमंत पाटिलाची मुलगी सखी, न्याहारीस चाकरपाला बरोबर घेउन आपले बापाचे वाडींत गेली होती. मनांत कीं, चार घटिका इकडून तिकडे फिरून न्याहारी खाल्ली असतां रुची अधिक देईल——— ती तेथें सर्व विषयांपासून आनंद पावली. पदार्थमात्रानें चढत्ये दिवसाच्या शोभेस अनुकूळ होउन तिचे सर्वेंद्रियास सुख केलें. मंद सुगंध शीतळ वायूचा स्पर्शानें त्वचेस; मधुर फळांचा रसानें रसनेस; पुष्पांचा सुगंधानें घ्राणास; पक्ष्यांचा मधुर शब्दानीं कर्णास. असी ती सखी तेथें सर्व विषयांपासून आनंद पावोन सात्विक भाव पावली आहे, इतक्यांत तेथें कोणाचीं पावलें वाजलीं. ते समयीं चकित होउन पाहात्ये तंव समोरून एक पोरगी हातांत कोरडी बाजरीची भाकर घेउन, मोठ्ये रुचीनें खात खात आपणाकडे येत्ये आहे, असें पाहिलें. तीही तेथें खेळायास म्हणून येत होती. तिची दृष्टि इकडे तिकडे पाहाण्यानें चंचळ

होती

होती ह्मणोन ती,जवळ आली तेव्हां तिणें सखीस पाहिलें. पाहातांच ती खालीं पाहात स्तब्ध राहिली. मग जशी हरिणी भय पावल्ये,तशी भिउन मागच्ये पायीं पळों लागली; तेवेळीं सखी ह्मणत्ये,थांब थांब मुली,अंमळ थांब, अगे पळत्येस कां ? तें ऐकून ती अधिकच धांवली. सखीनें तिचा मागें लागून मोटे कष्टानें तीस आंडवाटेनें धरिलें; आणि तीस ह्मणत्ये,तूं शेवटीं माझा हातीं सांपडलीसना ? आतां कोठें जाशील ? मी तुला बळकट धरिली आहे;तूं आतां सुटुं पावणार नाहींस. तेवेळीं ती पोरगी पळून जावें ह्मणून ओढाताण करूं लागली, तीस सखी ह्मणत्ये मुली,तूं असें करूं नयेस; मीं कांहिं तुला उपद्रव करित नाहीं. ते स्नेहार्द आणि कोमळ शब्द ऐकून पोरगीला धीर आला; मग ती सखीबरोबर जवळच्या बगल्यांत गेली. तेथें तिला आपलें जवळ बसवून सखी विचारित्ये.

मुली,तुझा बाप जीवंत आहे ?

मनी – होय बये.

सखी – तो काय धंदा करितो ?

मनी – पोटासाठीं कोणतेंहि काम करितो. आजचे दिवसीं तो

तुमचे

## सखी आणि मनी ·

तुमचे बागांत खपत आहे. त्याणें मला आपल्ये बरोबर आणिलें आहे.

सखी — हो ! तो जाडगा खंडू तुझा बाप ? पण तूं ही त्याह्यारी कसची करित्येस. मला पाहूंदे काय खात्येस तें (ती त्यांतली थोडिशी भाकर खाउन पाहात्ये) अगाई ! काय जाड आणि भरडी आहे ही ! माझे घशांत दोंचितच गेली. तुझा बाप तुला याहून चांगली कां देत नाहीं ?

मनी — त्याकडे तुमचे बाबा इतके पैसे नाहींत ह्मणून ·

सखी — पण तो मजूरी करून मिळवितो किं नाहीं ? तितक्यांत त्याच्यानें तुला ताजी भाकर देववेना ? या बरोबर कांहीं कोरड्यांचें तरी ——

मनी — होय जर त्याला मी एकलीच असत्यें तर, पण आह्मी पांच जणें आहों: सगळींच पुष्कळ खाणारीं. आणिखीही कोणास झबलें पाहिजे; कोणास आंगरखा; कोणास टोपी; त्याचा खर्च आहे. कोणे वेळेस माझा बाबास, काय करूं ? असें होतें. तो ह्मणतो सगळी मेहेनत करून व्यर्थ. माझानें यांस मोटें धाटेंहि अन्न वस्त्र पुरववत नाहीं -

सखी — तर तुह्मीं कधीं साकरपाला खाल्ला नसेल ·

मनी – भाकरपाला तें काय आहे ?

सखी – हा पाहा माझा हातांत प्रत्यक्ष.

मनी – अग आई, मी हा कधीं माझे जन्मांत पाहिला नव्हता.

सखी – थोडासा खाउन पाहा भिउं नको. हा पाहा मी खाल्लें.

मनी – (आनंदानें) ओहा बये! कायगे तरी चांगला आहे!

सखी – खरें च – बरें तुझें नाव काय मुली ?

मनी – (उठल्ये आणि तिला नमल्ये) तु[illegible]बदीक मनी.

सखी – बरेंतर, अंमळ येथें थांब. मी आपल्ये आईपाशीं तुज करितां कांहीं मागून आणल्यें – हीच आल्ये. पण तूं पळूं नकोहो ?

मनी – नाहींगे आई. आतां मी कां पळेन ?

सखी धांवत गेली, आणि तिणें आईपाशीं कांहीं त्या मुलीकरितां कोरड्याला मागीतलें. आई तिची धर्म वासना पाहून समाधान पावली. तिणें वाटींत कांहीं खीर आणि गव्हांची पोळी अशीं तिजकडे दिली. सखी तें घेउन धांवतच मनीपाशीं आली, आणि ह्मणाल्ये कां मुली तुला मी फार खोळंबविली नाहींना ? हें घे. आतां तुझी जाडी भाकर परती ठेव, ती मग तूं खावी तितकी खा.

# सखी आणि मनी

मनी - (खीर तोंडास लावून मिटक्या मारित्ये) अगाई. हें अमृता सारिखें गोड आहे! असें मी कधीं खाल्लें नव्हतें!

सखी - तुला आवडलें पाहून मला संतोष झाला. अर्थींच माझा निश्चय होता कीं तुला आवडेलच.

मनी - काय बये! तुह्मी हें असें नित्य खातां! आह्मी गरीबांनी असलें कधींहि चाखलें देखील नव्हतें.

सखी - ऐक तर; जेव्हां तेव्हां तूं मजकडे येत जा: मी तुला असें नित्य देत जाईन. पण गड्ये, तूं कशीगे निरोगी दिसत्येस! गे, तुला कधीं दुखणें येत नाहीं?

मनी - दुखणें? काय मला? नाहीं; कधीं नाहीं.

सखी - तुला कधीं पडसें होत नाहीं? अथवा तुझें डोकें जड होत नाहीं?

मनी - तो रोग कसागे असतो बये?

सखी - कोणी खोकूं लागलें आणि नाक शिंकरूं लागलें ह्मणजे समजावें कीं यास पडसें खोकला झाला आहे.

मनी - हां हां! तसें मला कधीं होत असलें. पण तो काय रोग आहे?

सखी - मग तूं काय करित्येस: खाटल्यांत पडून राहात असशील

सशील वाटतें ?

मनी – खाटल्यांत पडून ! होय, मग झालें ! मग माझी आई अनर्थ करील, किं मी आळशी झाल्यें ह्मणोन.

सखी – एरवीं तरी तुझानें काय काम व्हायाचें होतें ? तूं केवळ लाहान आहेस.

मनी – कां ? मला गाईकरितां गवत आणायाचें नसतें काय ? आणि जाळायाकरितां काटक्या ? शेत वेंच्याचें, दाणे टिपून आणायाचे; हें माझें काम. आहा बये, आमचानें काम केल्यावांचून रहावत नाहीं.

सखी – आणि तुझा बहिणी तुजसारिख्याच निरोगी आहेत ?

मनी – आह्मी सगल्या निरोगी आहों; आणि उद्योंसारिख्या उद्योगी.

सखी – बरें तर, मला याचा फार संतोष झाला. पहिल्यानें मला वाटलें होतें किं देव तुह्मा गरिबांचा समाच्यार घेत नसेल. पण तूं जेव्हां निरोगी आहेस, तेव्हां ईश्वर तुह्माला विसरला नाहीं हें मला पक्कें समजलें. मीहीं बरीच आहें; पण तुझे सारिखी बळकट नाहीं. पण मुली, तूं अण-

वानी

## सखी आणि मनी

वानी कां चालत्येस ? जोडा कां घालीत नाहींस ?

मनी – जर आह्मां सगळ्यांना आमचा बाबा जोडे देऊं लागेल तर तो खर्चाखालीं बुडेल.

सखी – तर तुझे पाय दुखवतील ह्मणून तुला चालतांना भय वाटत नाहीं ?

मनी – तें एकवेळही माझ्या मनांत आलें नाहीं. देवानें माझे पायांचे तळवे जोड्याप्रमाणें कठिण केले आहेत.

सखी – माझे जोडे देववते तर मी तुला देत्ये. पण तूं खायाचें कां टाकलेंस ?

मनी – गोष्टींतच वेळ निघून गेला. आतां मला गाईकरितां गवत मिळवून आणायास गेलें पाहिजे. दोन प्रहर दिवस आला. माझीं भावंडें घरीं न्याहारीकरितां वाट पाहात असतील.—

सखी – बरें तर, तूं हें घरीं घेउन जा.

मनी – बरें, हें मी घरीं नेउन माझे बहिणीस देईन.

सखी – ही तुझी गोष्ट मला फारच आवडली.

मनी – मला जी जी चांगली वस्त मिळत्ये त्यांतली मी त्यांनां देत असत्यें, अशी माझी चाल आहे; आणि त्याहि तसें

-च करितात.

घेत्यें तर मी आतां. (ती लवुन निघत्ये)

सखी - (लवत्ये) पण उद्यां यावेळस येथें यावयास वि-
सरूं नकों हो.

मनी - (खोळंबून) जर माझे आईनें मला कोठें पाठविलें
नाहीं तर मी अगत्य येईन.

परोपकाराचे सुखाच्या सखीनें हा पहिल्यानें-
च अनुभव घेतला. मग ती अंमळ वाडींत फिरून मनां-
त ह्मणत्ये, मी आज मनीस किति सुखी केली! ती मा-
झी किती उपकारी झाली असेल! तिची बहीणी खीर
खाउन काय खुशाल होतील! मी तिला जर परकर चो
ळी दिली तर तिला किति मोठा आनंद होईल! बयेनें
मला थोडे दिवसांवर परकर चोळी दिलेली आहे, ती फा-
र चांगली आहे: पण मला तिचा आतां कंटाळा आला
आहे. माझे पेटींत कांहीं जुनीं चिरगुटें असतील तीं
मी सगळीं सोधून काढीन. ती माझे इतकीच उंच आहे.
माझी चोळी तिचे आंगास ठीक येईल. आहा! माझा
जीव खुरखुरतो, किं मी तिला चांगलीं चिरगुटें नेसले

ली

## सखा आणि मनी.

ती कधीं पाहीन ?

दुसरे दिवसीं मनी फिरून वाडींत आली; ते वेळेस सखीनें तिला बर्फी दिली. असी ती मनी नित्य नित्य तेथे येई, आणि सखी तिला नित्य नित्य कांहीं नवा पदार्थ देई. तिजकडचे पैसे वेचल्यावर तिणें कांहीं आईपाशीं मागीतले; तें तिला आईनें मोठें आवडीनें दिलें. एके दिवसीं आईनें तीस उत्तर केलें, त्याचें तिला मोठें वाईट वाटलें. ती आईस ह्मणत होती किं मला पैसे दे; मनी अनवाणी चालत्ये, त्यास मी तीस जोडे घेउन देणार. आई ह्मणाली मी पैसे देत नाहीं. सखी ह्मणाली कां ? आई ह्मणाली याचें कारण तुला मी मग सांगेन; तू आपल्ये आवडतीवर इतकी धोताल होउं नको. तें सखीस वाईट वाटलें. त्या दिवसीं तिला जेवणही रूचेना. ती जेवीत असतां करंज्या वाढायास आणिल्या; त्या निमित्यानें आईनें मनीची गोष्ट काढिली.

मिमाई — मला वाटतें किं तुजपेक्षां त्या करंजा मनीस अधीक आवडतील.

सखी — होय आई. ह्या तिणें कधीं पाहिल्याहि नसतील. यांचे करवतीकांठ पाहून तिला आश्चर्य वाटेल. बये तू

सांगशील

सांगशील तर मी तिला ह्या घेउन जात्यें: ह्या दोनच घेउन जात्यें, जाउं ?

भिमा० - तें माझे मनास येत नाहीं.

सखी - कां बरें ? आई, तूं धर्मात्मा असून असें कां ह्मणत्येस ? सकाळीं मी जोड्याकरितां पैसे मागीतले तेहि तूं नाहीं ह्मटलेस. यावरून मनीनें तुला कांहीं दुखविली असेल असें वाटतें. वाडींत तिणें कांहीं आपला नाश केला काय? तसें असल्यास तिचे कानास मी खडा लावीन.

भिमा० - नाहीं, नाहीं, माझे लाडक्ये. मनीनें मला दुखविली नाहीं. पण तिजवर तूं अशी ममता करून तिला सुखी करणार किं दुःखी तें सांग बरें ?

सखी - सुखी करणार यांत संशय काय ? परमेश्वर करो आणि मला तिजविषयीं विपरीत वासना न होऊ.

भिमा० - मलाहि वाटतें किं तिणें सुखी असावें. पण सुली हें खरेंना, किं ती सुखी भाकर खाऊन न्यायारी करीत होती ?

सखी - खरेंगे, मी तुला खोटें कां सांगेन ?

भिमा० - आणि ती अद्यापि तसले भाकरीवर संतुष्ट आहे

हेना ?

सखी - अगाई हें काय सांगायाचें. मी जसा दहीं भात रुचीनें जेवित्यें, त्याहून अधीक रुचीनें ती आपली जाडी भाकर खात्ये.

भिमा० - यावरून मला वाटतें किं तिला भूकच चांगली लागत्ये. पण ती अनवाणी चालत्ये हें मला खरें वाटत नाहीं.

सखी - मी तिला सदां अनवाणी पाहात्यें. पाहिजे तर तूं माळ्यास पुसेनास, खरें किं नाही तें.

भिमा० - तर ती खड्यांतून, गवतांतून, जात असेल तेव्हां तिचे पायांस ठेंच्या लागून, कांटें रुतोन, रक्तें निघत नसतील ?

सखी - तें काहीं होत नाहीं. ती हरणी सारिखी इकडून तिकडे धांवत्ये; आणि ह्मणत्ये देवानें माझे पाय जोड्यासारिखे कठिण केले आहेत ही गोष्ट काय चांगली केली आहे

भिमा०- असेल, तूं कांहीं लबाडी बोलणार नाहींस; पण तूं ह्मणत्येस तसें असणें मला कठीण दिसतें. तुलाच

जर

जर रुक्षी भाकर दिली तर ती खातानां तूं वेडीं आणि वांकडीं तोंडें किती करिशील? एकादा तुकडा माझे समक्ष खातीस तर मी मौज तरी पाहात्यें.

सखी – तो माझे घांटींतच अडकेल

भिमा० – आणि तूं उघडे पांयांनीं कशी चालत्येस तें मला एकवेळ पाहायाचें होतें.

सखी – रागें न भरशील तर सांगत्यें. काल चे दिवशीं माझ्या मनांत तसें येउन वाडींत मी जोडे काढून अनवाणी चालूं लागल्ये. तें मला भारी कठिण पडलें. तशींच चालल्ये तंव ठेंच लागून पाय दुखवला; त्याची मला अशी कळ आली, किं काय सांगूं? मग तशीच हळूहळू मागें जाउन मी फिरून जोडे घातले, आणि नेम केला, किं आतां फिरून कधीं अनवाणी चालणार नाहीं. आणि गरीब बिचारी मनीशे! ती बाराही महिने अनवाणी चालत्ये.

भिमा० – पण हें कसें बरें, किं तिज सारिखी रुक्षी भाकर तुझानें खावबत नाहीं आणि तिज सारिखें तुझानें अनवाणी चालवत नाहीं?

सखी – सवई नाहीं ह्मणून मला वाटतें.

भिमाई

# सखी आणि मनी.

भिमा० – तर आतां एक. जर तूं तिला तुझ्यासारिखीं चांग-
लें चांगलें खायाची आणि जोडे घालून चालायाची सवई के-
लीस, तर मग तिला जाडी भाकर खाणें, आणि अनवाणी
चालणें कठीण पडेल. मग तुला वाटेल किं आपण तिचें ब-
रें केलें ?

सखी – पण मी तिला तें जन्मवर पुरवीन.

भिमा० – गोष्ट फार चांगली आहे; पण तुला जे पैसे मि-
ळतात तितक्यांत तूं तिला असी जन्मवर पोसशीलना ?

सखी – काय अवघड आहे ? आणि थोडकें थोडकें तूंहि
द्यावेंस.

भिमा० – आपण गरीबास धर्म करावा हें फार चांगलें आ-
हे; पण तो धर्म करायास तुला एकटी मनीच आहे काय ?

सखी – नाहीं, मला दुसरींहि गरीबें पुष्कळ अढळतात. दोन
पोरीं तर आपल्या घराजवळच आहेत; ज्यांना बाप नाहीं आ-
णि आईहि नाहीं.

भिमा० – आणि त्यांस दुसऱ्याच्या धर्माची फार गरज आहे
नव्हे ?

सखी – खरी गोष्ट.

भिमा०

भिमा० — तर; जर तूं पक्वानें आणि मिठाया सगळ्या मनी-सच देशील. आणि दुसरी उपाशी मरतात त्यां गरीबांच्या समाचार घेणार नाहींस; तर ती नीत नव्हे. असें जें कोणी करितें त्यास अव्यवस्थित म्हणतात.

सखी — कधीं मधीं मी त्यांसही देईन. पण मनी मला फार आवडते.

भिमा० — बरें पण, तिच्यें चालचीत असतां तूं मेलीस तर—

सखी — तर ती माझें नावें फार फार रडेल. यांत संशय काय ?

भिमा० — होय; तें मला ठाउक आहे. पण ती पुनः दरिद्रांत पडणार नाहीं काय ? आणि चांगलें खायाचे आणि नेसायाचे लालचीनें एकादें दुष्कर्म आचरणार नाहीं ? मग त्याच्या दोष कोणाचे माथीं ?

सखी — (अंमळ खिन्न होउन) तो दोष माझे माथीं येउं पाहातो बये. तर असें होतें किं मी तिला आजपासून कांहीं देउं नये; नव्हे ?

भिमा० — मी असें केवळ म्हणत नाहीं. तूं तिला कधीं मधीं गोड पदार्थ देत जा. तिला एकादें पांघरायाचें वस्त्रहि

दे-

दे.

सखी - होय, तें माझे मनांत आलेंच आहे. तूं सांगशील तर मी तिला माझी फडकी देईन.

भिमा० - खरेंच; तुझी बारीक फडकी तिचें फारच उपयोगी पडेल. तिचीं दुसरीं चिरगुटें खादीचीं, आणि फडकी मात्र— आहाहा! काय चांगली शोभेल!

सखी - खरें गड्या; मग तो तिच्या विजोड थाट पाहून जो तो तिजकडे बोट दाखवूं लागेल. तर आतां कसें करावें बरें?

भिमा० - मी तर असें करित्यें किं, कांहीं दिवसपर्यंत पैसे सांचवित्यें, आणि मनीलाजें अगत्य पाहिजेच, तें सर्व एके खेपेनें घेउन देत्यें. गरिबांचीं मुलें कापड वापरतात तसल्यास अधीक पैसे पडत नाहींत.

सखीनें आईच्या उपदेश ऐकून घेतला; मग पुढें ती मनीस खायाच्या पदार्थांपेक्षां तिचे उपयोगी असे पदार्थ अधिक देत चालली. कोणेवेळेस ती तिला कांबळी देई; कोणे वेळेस परकर. तिला शिकवायाकरितां गांवच्या पंतोजीस तिणें कांहीं द्यावें. ते उपकार स्मरून मनीचीही ममता सखीवर फार जडली. ती जेव्हां येई तेव्हां सखीस पुसे, मला

कांहीं

कांहीं काम सांगा? माझे हातून घडे असें कांहीं काम आहे? तिला सखीजेव्हां एकादें काम सांगे, तेव्हां मनी सखीस अधिक संतुष्ट करावें ह्मणोन तें मोटे आवडीनें करी. एके दिवसीं वाडीच्या दरवाजापाशीं येउन मनीनें सखीची वाट पाहिली. त्या दिवसीं सखी तेथें आली नाहीं. दुसरे दिवसीं पुनः तेथें गेली; त्या दिवसींहि आली नाहीं; असी चार पांच दिवसांत सखीची भेट नाहीं, ह्मणून ती फारच घाबरी झाली; आणि मनांत तर्क करित्ये, देवा, असें तर नसेल, किं सखीचा लोभ आज मजवरून उणा झाला? मी नसमजतांतिला कांहीं दुखविली तर नसेल? कायतें मला समजेल तर मी तिजपाशीं जाउन क्षमा मागेन. तिचा मैत्रीवाचून मी जीवंत राहाणार नाहीं. मग मनी सखीचे घरी गेली. तो भिमाईची कुळबीण घरांतून दारीं आली, तिला ती खोळंबवून पुसत्ये; आज सखुबाई कोठें आहेत? तिणें उत्तर केलें, सखुबाईची धडगत दिसत नाहीं बाई; ती आतां फार दिवस वांचायाची कठिण; मला बाई फार भय वाटतें, कोण जाणे. ती याक्षणींच असेल किं नसेल, याचा भरंवसा देववत नाहीं. तिला देवी आल्या आहेत, तें ऐकून, "अरे देवा! मी तिला मरूं देणार नाहीं," असें

ह्मणत

# सखी आणि मनी

ह्मणत मनीनें भिमाईचे खोलीकडे धांव घेतली. तेथें जाउन ह्मणत्ये " बाई, देवासाठीं, माझी सखुबाई कोठें आहे ती दाखवा. मला तिला पाहिलें पाहिजे!" भिमाईनें तिला वारलें असतें, पण ती खोलींत घुसलीच, तेथें तिचा उपाय नाहीं. सखीचे आंगांत ताप मोठा भरला होता: इकडून तिकडे वळायाचें सामर्थ्य राहिलें नव्हीतें. तिच्या सख्यांतून कोणी तिज जवळ उभें राहीना, तें पाहून तिला फारच दुःख झालें. सखीला पाहून मनीच्या डोळ्यांतून अश्रुधारा चालल्या: तिणें, तिचा हात धरून त्याचा मुका घेतला: आणि ह्मणत्ये "अगे माझे अन्नदात्ये ! मी तुला आज अशी पाहावी ! माझे गडये, तूं मरूं नको; मी तुझा पायां पडत्यें ! तूं गेलीस तर माझा समाचार कोणबरें घेईल? मी तुजपाशीं रात्रदिवस राहोन चवकी करीन: तुझी चाकरी करीन. हें तूं मला करूं देशील ना ?" सखीनें नेत्रानें आणि हात भोंवळून तिला सुचविलें; किं " तूं मज जवळ राहाशील तर मला फार समाधान वाटेल." मग भिमाईचा विचारानें मनी सखीची चाकरी करायास राहिली. तिणें फारच आवस्था पूर्वक तीची जतन केली. आपलें आंथरूण सखीचे खाटल्यालगत घातलें. खोलींतून एक क्षणभरही दूर झाली नाहीं. सखी अं

मळ

मळ कुंथली कि मनी "काय झालें ? काय पाहिजे ?" ह्मणून विचारायास जवळ तयारच आहे -- वैद्य सांगतील ती औषधें तिणें आपल्याहातीं तयार करून द्यावीं. पथ्यास घालावें. मधल्येवेळेस, कांहीं करंड्या, सांकड्या, करून, अथवा चित्रें काढून अथवा मंजूळ गाऊन, किंवा जें जें कल्पनेंत येईल तें तें करून मनीनें सखीस दुखण्याचा विसर पडून जशी करमणूक होईल तसें करावें. सखीचे डोळे आठ दिवस पर्यंत मिटलेले होते. ते दिवस तिला फारच अवघड गेले. तेवेळेस सखीस जो आवडे तो विषय मनीनें पुस्तक वाचून तिला ऐकवावा. गावांतल्या गोष्टी काहाण्या सांगाव्या. तिला वेळोवेळी धीर द्यावा आणि सांगावें " तूं भिऊ नको, जशी त्या मजवर दया केली, असी इश्वर तुजवर करील, आणि तुला लवकर अरोग्य करील बरें माझे अन्नदात्ये सखुबाई." हे शब्द बोलतांनां तिचे डोळ्यांतून अश्रुधारा चालत; तितक्यांत त्या पुसून ती सखीस ह्मणे," माझे सखूबाई, मी तुझा वेळ जायाला एकादें गाणें ह्मणूं ? सखी खुणेनें मात्र सांगे. मग मनीनें जितकीं गाणीं येत असतील तितकीं गावीं. याप्रमाणें सखीस करमणूक करून तिच्या वेळ ती स्करवाच्या घालवी. पुढें हळूहळू तिची प्रकृती स्वस्थ झाली. डोळे उघडों लागले.

ग्लानी

## सखी आणि मनी

ग्लानी गेली. फोड सुकले. खवलें पडलीं. भूक लागों ला-
गली. तोंडावरचे व्रण मात्र अंमळ ओले होते. असा तिला
दिवसानुदिवस उतार पाहून मनीस आनंद वाटला, किं "ही
आतां वांचल्ये पंथास लागली; नाहीं तर मला नाहींशी झाली
होती." मग सखीची ही तिजवर फारच ममता जडली. ती
वारंवार तीस म्हणे, किं त्वां मजवर जे उपकार केले आहेत,
त्यांचा मी कशी उतराई होईन ? तिणें आईस पुसलें किं, मनी-
स काय द्यावें ? आई म्हणाली तें मी देईन मुली, तुला समाधान
होई असेंच देईन. तिचे उपकार तुजवर आणि मजवरहि
मोठे झाले आहेत. मग भिमाईनें मनीकरितां परकर, चो-
ळ्या, फडक्या, साड्या, बाळुल्या, असें आणायास सांगीतलें.
सखी म्हणाली, मी तिला तें आपल्या हातीं देईन. मनीस याव-
याचीं खेळणी, चिरगुटें, आणिलीं तें दिवशीं घरचां सर्वांस
आनंद झाला. सखीचीं सोयरीं धायरीं सगळीं आलीं होतीं,
तीं सर्व सखीस पाहून खुशाल झालीं. सखीचे मनांत मो-
ठा हर्ष किं " मनीस बक्षीस द्यायास आणि तिचें उतराई
व्हायास देवानें मला सामर्थ्य दिलें आहे!" असा सर्वांस आ-
नंद होउन तीं वाडींत गेलीं, जेथें सखीची आणि मनीची सु

ळी

ळीं ओळख पडली होती. तेथें सखीनें मनीचा मोठा सन्मान करून तिला बाहुली दिली, आणि आपल्ये हातीं तिला वस्त्रें नेसविलीं. मनीही पायांपासून डोईपर्यंत तीं सुंदर वस्त्रें आपणास लेववलीं पाहुन फार संतोष पावली.

# धाकटा जगु

देवराव देशमुख एके दिवशीं आपल्ये वतनवाडीची चौकशी करून गांवाहून परत येत होते, ते येत असतां, त्यांणीं, एका स्मशानभूमीचे भिंती आंत कोणी विलाप करितानां ऐकिलें. ते थोर मनुष्य फार दयावान् होते. त्यांणीं विलाप करणाराचे साहायास जावें या बुद्धीनें घोड्याखालीं उतरोन भिंतीवर वळघ केली; आंत पाहातात तंव, कोणी मनुष्यास, तुकतेच पुरून गेले आहेत, त्यावर एक कुळवाड्याचें मुलगें पांचांवर्षांचें रडत बसलें आहे. देवराव त्याजवळ गेले आणि ह्मणतात, मुला, तूं एथें काय करितो आहेस ?

**मुलगें** — मी माझ्या आईस बोलाधितों आहें. लोकानीं तिला काल एथें निजविली ती अद्यापि उठत नाहीं.

**देवराव** — लेंकरा, ती मेली; ती आत्तां उठणार नाहीं.

**मु०** — होय ? ते असेंच ह्मणतात किं ती मेली; पण मेली ह्मणून तिला, मला भेटायास काय चिंता आहे ? परवां ती मला सोसाजवळ ठेवून गेली, तेव्हां तिणें मला सांगीतलें किं, मी तुला

न्यावयास

त्यावयास येईन; पण ती आली नाही. माझा बाबा देखील कोठें गेला. माझे धाकट्या भावासहि कोणी नेलें. आतां गांवचीं मुलें मला जवळ येउंदेत नाहींत.

**देव०** – जवळ येउंदेत नाहींत, कांबरें ?

**मुल०** – तें मला कळत नाहीं; पण मी त्यां कडे जायास लागतों, तेव्हां तीं मला घालवून देतात; आणि माझ्या आई बापास वाईट बोलतात; तें मला फार लागतें. अगे आई! अगे बये! ऊठ ऊठ, लवकर ऊठ!

देवराबांचे डोळे पाण्यानें भरून आले. ते मुलास म्हणतात रे, तुझा बाबा, आणि भाउ, कोठें गेले तें तुला ठाउक नाहींत ?

**मुल०** – माझा बाप कोठें आहे तें मला ठाउक नाहीं. माझा धाकटा भाऊ कालच दुसरे गावीं गेला; एक बाबा येउन त्याला घेउन गेला.

**देव०** – आणि रखा, तूं कोणा जवळ राहात असतोस ?

**मुल०** – शेजारिणी सोसाऊ जवळ. माझी आई बरी होई तेथपर्यंत मी तेथें राहायाचा होतों. तिणें मला लवकर येलें म्हणून सांगीतलें, आणि न येतां एथें निजोन राहिली.

सोसाउ

# धाकटा जगु

सासासुद्धि मला आवडत्ये; पण (त्यांच्याकडे हात दाखवितो) यांत माझी आई आहे ती मला माझे जीवाहून अधीक आवडत्ये. अगं आई! आईग! तूं आजून कां निजली आहेस? केव्हां ग उठशील?

**देव०** - मुला, तूं उगीच्च हाका मारितोस. ती आतां उठणार नाहीं.

**मुल०** - बरं तर, मीहि एथें तिचेजवळ निजतो. त्यांणी तिला नादीवर निजविली होती तेव्हां मी पाहिली. ती काल्या सारिखी थंड झाली होती! मी एथेंच पडेन आणि तिच्या कुशीस निजेन.

तो करुणारस ऐकोन देवरावांचे डोळ्यांतील पाणी खळेना. त्यांणीं ओणवून मुलास उचलून उराशी धरिलें. आणि मुका घेतला; त्यास विचारितात लेकरा, तुझे नाव काय? माझा दीनवाण्या मुला!

**मुल०** - मी चांगला मुलगा असलों ह्मणजे मला जगू ह्मणतात. आणि वाईट असलों ह्मणजे जग्या ह्मणतात.

देवराव आश्रु टाकिताहेत तथापि ते तें ऐकून हंसले; आणि मुलास ह्मणतात " मुला तूं मला त्या तुझे सासा-

डु जवळ नेशील"? मूल ह्मणाला " हों, चला;" मग तो मुलगा तसाच उठला, आणि त्याणें देवरावांपुढें धांवत धांवत चालून त्यांस सोसाऊचे दारापाशीं नेलें. ती ओटीवर बसली होती, तिजकडे बोट करून ह्मणतो. ही माझी दुसरी आई. असें ह्मणून तिचे मांडीवर जाउन बसला. देवरावांच्या अकस्मात् येणें पाहून सोसाऊ बिस्मीत झाली. नंतर देवराव, मुलानें केलें सर्व चरित्र सांगोन, तिला ह्मणतात "सोसाउ, याचीं आई बापें कोण आहेत, व त्यांची काय अवस्था आहे तें सांगशील?" सोसाऊ, होय महाराज ह्मणून, सांगत्ये "या मुलाचा बाप साळवी आहे, त्याचें घर हें माझे शेजारीं आहे. तो बहुत भला, निर्व्यसनी, उद्योगी, प्रमाणीक, तीस वर्षांचा आंत वयांत आहे. याची आई हि चांगली होती; शरीरानें निरोगी नव्हती, पण सुंदर आणि संसारकामांत मोठी दक्ष होती. त्या उभेतांचें लग्न होउन वर्षें सात झालीं, तेव्हां पासून मी पाहात्यें कि दोघांची परस्पर मोठी प्रीति. त्याचा धंदा जर चांगला चालला असतातर, मला वाटतें कि त्या दोघां सारिखीं सुखी या लोकीं थोडीच निघती. नवऱ्याचें नाव जानोजी, आणि बायकोचें मानाउ. मानाउचे बापा-

## धाकटा जगु.

कडलें कांहीं आलें होतें तें व कांहीं ज्ञानोजी जवळ होतें तें, एकत्र करून, त्याच्चीं भाडीं कुंडीं व साळ्व्याच्चे धंद्याच्चें सामान घेऊन तीं संसार करूं लागलीं; मग त्यांच्चे जवळ कांहीं राहिलें नाहीं, परंतु त्याणीं आपल्ले धंद्यावर कष्टकरून दोन वर्षे च्चांगलीं काटिलीं. पुढें मुलें होत च्चाललीं, तेव्हां त्यांस संकट पडूं लागलें, त्यांतहि दुष्पट मेहनत करून त्याणीं निर्वाह केला असता. पण, च्चिरगुटें विणून ठेवीत त्यांत, तोटे येऊं लागले. मग, मानाऊनें कापणीच्चे दिवसीं शेतांतून कांहीं दाणे मिळवून आणावे, तेव्हां त्यांस खावयास मिळावें. त्या मेहनतीनें मानाऊस दुखणें लागलें. तिला औषधास जवळ पैका नाहीं; त्याणें ज्ञानोजी फारच्च हैराण झाला. तेव्हां त्याणें गांध्याच्चें कर्ज केलें. पुढें मानाऊ असळ बरी झाली, तों ज्ञानोजीच्चा धंदा अगदींच्च बुडाला. गिऱ्हाईकानीं त्यास सोडिलें; तेव्हां घराच्चें भाडें व कर्ज झालें होतें, त्याच्चें व्याज देतां, त्यांच्ची टेंक पडली. मग त्यांस उपास पडूं लागले. त्यांतहि, जेव्हां त्यास अन्न मिळे, तेव्हां तें मुलांस वांटून तीं उभयतां देव-वान् असें मोजित. (हे शब्द एकून जगू कोनांत जाउन स्कासास टाकून रडूं लागला.) पुढें त्यावर साहामहिन्याचें घर

भाडें

भाडें चढलें. तेव्हां घरधनी फार निष्ठुर आहे, त्याणें जा-नोजीस धमकावून सांगीतलें किं, मी तुला बंदिशाळेंत घा-लीं. त्याची मोठी रदबदली केली, तेव्हां त्याणें, एक महि-न्याची मुदत दिली; आणि ह्मणाला किं, त्यापुढची मी शा-पथ वाहातों किं, घरचे हांडें भांडें विकून, बाकी राहील त्या करितां जानोजीस मी अटकेंत घालीन. तो घरधनी सा-वर आहे, पण त्याला दया अगदीं नाहीं. ती जानोजीची अव-स्था पाहून जो पाषाणहृदय असेल तोहि विरघळेल. मी शेजारीण, मला ती त्यांची विपत्ती पाहून दया येई, पण काय करूं? त्यांचें दुःख निवारायास मला सामर्थ्य नाहीं. एके वेळेस मी स्वतः घरधन्यापाशीं गेल्यें, आणि त्याची प्रार्थ-ना केली किं, त्यांचे दरिद्राकडे लक्ष दे; आणि सांगीतलें किं मजपाशीं आहे तितकें मी त्याचे देण्याबद्दल गाहाण दे-त्यें. असें असें बहुप्रकारें विनविलें, परंतु त्यास दया आ-ली नाहीं. त्याणें मला उत्तर केलें किं, तुझी किती पत आहे ते म-ला ठाऊक आहे: असें मी करीन तर मग चांगला रोजगार. (असें ह्मणत अस्तां सोसाऊचे डोळ्यांत पाणी चाललें) अ-शी त्याणें माझी इज्जत घेतली; तें मी सगळें त्या वेळेस पिऊन

गेल्यें

गेल्यें. मनांत ह्मटलें किं आत्तां जर मी कांहीं यास अधीक बोलल्यें, तर हा हट्टास पेटून जानोजीस अधीक उपद्रव करितो. काय करूं? जातीनें रांड मोमीण, आणि गरीब पडल्यें. आहा! आल्यां गरीबांसारिखी वासना जर मात्तबरांस असती तर, त्यांच्या हातून किती धर्मकृत्यें होतीं! मग मी मानाकूस बुद्धी सांगीतली, किं तूं शाहापुरास रामचंद्रशेटाचे घरीं. मागें प्रमाणीकपणें चाकरी केली आहेस, तर अशावेळेस त्याकडे जाऊन कांहीं पैसे उसणे माग. तिणें मला उत्तर केलें किं तें मी नवऱ्यास सांगल्यें, माझानें करवत नाहीं; कां किं शेटाचे मनांत येईल किं याणीं कांहीं उधळे चाळे केले, ह्मणून हीं अशे दशेस आलीं. आज तीन दिवसांवर, सदां प्रमाणें आपलीं दोन मुलें घेऊन ती मजकडे आली, आणि ह्मणाली किं "संध्याकाळ पर्यंत यांस सांभाळ, मी शेजारगावीं जाऊन येत्यें, आणि सूत काढायाकरितां कांहीं कापूस मिळाला तर पाहात्यें. माझा नवरा ह्मणाला, मी रामचंद्रशेटाकडेस जातों: त्यासाठीं तो सकाळींच बाहेर निघोन गेला आहे." ती प्रार्थना ऐकून मी मुलें स्वाधीन घेतलीं. मानाकू जाऊं लागली तेवेळीं, तिणें त्यांस उराशीं धरिलें; त्यांचे मुके घेतले; जशी कोणी ह्मणेल किं

शेवटचीच भेट घेत्ये आहे. तिचे डोळ्यांत आंसवें लोटलीं आहेत. आणि ती वडिल मुलास ह्मणाल्ये "; जग्गू, मी लवकरच येत्यें; मग मी तुला नेईन, रडू नको बरें !" ती मला ह्मणाली. " बाई, माझ्या मुलांचा सांभाळ तुह्मी फार करितां; मी तुमची मोठी उपकारी आहे." असें ह्मणून तिणें पुनः मुलांचे मुके घेतले. आणि गेली. कांहीं वेळ गेल्यावर तिचे घरांत मी कांहीं गडबड ऐकिली, पण मनांत आणिलें किं ती बाहेर गेली आहे, त्या पेक्षे मांजरानें कांहीं पाडिलें असेल. असें समजून मी त्याचा शोध केला नाहीं. सांज झाली, काळोख पडला; तरि, मुलें त्यांच्यास कोणी येईना. मग मी ह्मटलें आपण तरि त्यांचे घरीं जावें, आणि काय करिताहेत तें पाहावें. असें ह्मणून गेल्यें तों दार खिळिलेलें नव्हतें, तें ढकलुन आंत गेल्यें आणि पाहाल्यें तों, हरे भगवान् ! मानाऊचें मडें जिन्याचे दाराशीं पडलें आहे. तेवेळीं मी तटस्थ झाल्यें; काय करावें तें सुचेना. मग तिला सावध करावी ह्मणून मी नाना उपाय केले; पण मेलीच ती कशी उठत्ये. नंतर जाऊन वैद्यास बलावून आणिलें; त्याणें नाड पाहून माझी निराशा करून सरकारचीं माणसें आणिलीं; त्याणीं चौकशी करितां ठरले किं, ती सिरमिरी येऊन मरण

पावली

पावली. मग त्यांणीं, प्रेतास मूठ माती द्यावी ह्मणून हुकुम दिला;
आणि तिच्या दादला जानोजी याच्या शोध करा ह्मणून सांगीतलें.
मी सरकारांत सांगून दोघेंही मुलें माझे स्वाधीन घेतलीं. मनांत
आणिलें किं, मजजवळ कांहीं नाहीं हें भगवान् जाणतो आहे;
तोच यांचे पोटाची सोय काढील. नंतर पाहूं लागल्यें तंव, या मु-
लाचा धाकटा भाउ माझे जवळ राहायास अड करितो; इतक्यां-
त कालचे दिवसीं, मानाऊचे जुने यजमान रामचंद्रशेटहि ति-
ला भेटायास आले; त्याणीं दार लागलेलें पाहून मजकडे येऊ-
न पुसलें किं, जानोजी साळवी, व त्याची बायको कोठें गेलीं आ-
हेत? मी त्यांस आंत बलावून सर्व वृत्तांत सांगीतला; आणि
बोलिलें किं, जानोजी तुह्माकडे कांहीं साहित्य मागावें ह्मणो-
न गेला आहे. ते ह्मणाले तो मला भेटला नाहीं. मग त्याणीं
दोन्हीं मुलें पोटाशीं धरून त्यांचें लालन केलें. त्यांस जगूनें
पुसलें "बाबा, तुह्मी माझी आई फारवेळ निजली आहे ती-
स उठवाल?" तें ऐकून त्यांचें हृदय चिरून गेलें; आणि ते म-
ला ह्मणाले किं, हीं दोघेंहीं मुलें मी आपल्ये घरीं घेऊन जातों;
यांचा बाप परत आला, आणि त्यास यांस पोसायाचें सामर्थ्य
असलें, तर मी हीं त्याचे स्वाधीन करीन; तंवपर्यंत मी यांस
नेउन

न प्रथम विद्याभ्यासास लावितों. हें भाषण मला रुचलें ना-
कांकिं, पोटच्याप्रमाणें यां मुलांवर माझी ममता. मी त्या-
ह्मटलें किं, माझानें यांस सोडवत नाहीं; मला यांची फार म-
ा लागली आहे; आणि यांसही माझी लागली आहे.
ऐकोन ते ह्मणाले "बरें तर, एक तूं सांभाळ आणि एक म-
शीं दे. तूं ठेविशील त्याचाही मी सर्वप्रकारें समाचार घेत
ईन" असें बोलिले तेव्हां माझानें त्यास नाहीं ह्मणविलें ना-
त्याणीं जघूस पुसलें, कायरे, मज बरोबर चलतोस? ज-
ह्मणाला काय? माझे आईकडे मला नेत असलो तर चला,
येतों"— ते ह्मणाले "मुला, आईकडे नाहीं, तुला मी माझे चां-
ल्ये घरास नेतो, तुला चांगले चांगले खावयास देईन, आणि
ाझे चागल्या बागांत नेईन." तो ह्मणाला "नाहीं नाहीं, मी आप-
ा सोसाऊ पाशीच राहाणार. माझी आई आहे तेथें मी एथू-
नित्य जात जाईन. तुमचे चांगल्ये बागांत जाईन त्यापेक्षां,
ी आपल्ये चांगल्ये आईकडे जाईन तें चांगलें." असें हा
ुलगा बोलेला, आणि माझे खाटे पलीकडे रडायास गेला; तें पा-
न रामचंद्रशेटींनीं याची गोष्ट सोडिली. मग त्याणीं मला सां-
ितलें किं, लाहानग्ये मुलास न्यायाकरितां मी मनुष्य पाठवीन

कां

कांकिं, तो तुझे जवळ असला तर तुला अधीक श्रम पडेल. असें बोलून जातांना त्यांणीं मला कांहीं पैसे या मुलाकरितां दिले. याप्रमाणें याचें वर्तमान.

सांप्रत आणिखी एक दुःख मला असें झालें आहे कि, या मुलाचा बाप तर अजून येत नाहीं; आणि गावांत बोलतात कि; तो चोराचे मंडळीत शिरला आहे, आणि सानाऊनें त्याला जेंनेंच जीव दिला. या गावांत जिकडे तिकडे मुलांचे तोंडी देखील याच गोष्टी. आणि हा मुलगा मुलांचे मंडळीत गेला ह्मणजे ती यास हाकलून देतात आणि फिरून आलास तर मारू ह्मणून ह्मणतात. तेणेंकरून हा अगदीं वेडावला आहे, बाहेर पाऊल घालीत नाहीं. गेला तर आईस पुरली आहे तेथें मात्र जातो.

देवराव तें सर्व वर्तमान ऐकून बहुत कष्टी पावले. जग्र जाऊन सोसाऊचे आंगाशीं लगटला. तो तिजकडे काकळूतवाणें तोंड करून पाही आणि तिला आई आई ह्मणून ह्मणे तेसमयीं देवराव ह्मणाले सोसाऊ, तूं फार भली बायको आहेस; तूं उदार बुद्धीनें या अनाथ कुटुंबाचा चांगला समाचार घेतलास, ईश्वर तुला याचें फळ चांगलें देईल.

सोसा०

सोसाऊ — मी या गोष्टींत, मला जें योग्य त्याहून कांहीं अधीक केलें असें नाहीं. एकमेकास साहित्य करावें ह्मणून आपणास ईश्वरें या लोकीं पाठविलें आहे. मी आपल्ये मनांत नित्य असें आणित्यें कि, आसनीं, शयनीं, भोजनीं, गमनीं, जें मी सुख अनुभवित्यें त्या विशीं मी सर्वप्रकारें भगवंताची ऋणी आहें; तर आपणापासून होईल तितका परोपकार व्हावा; या सारिखें दुसरें कोणतेंहि त्या भगवंतास संतोष देणारें कर्म नाहीं. आहा! मजपासून याहून अधीक घडलें असतें तर किती बरें होतें! पण मी काय करूं? मजपाशीं ही एक झोंपडी आणि एक लाहानसा मळा आहे, त्यांत रवपल्यें त्याणें पोट मात्र भरतें. मी रांडावून आठ वर्षे झालीं, पण आजपर्यंत मी आबरूनें दिवस काढिले.. यापुढेंहि भगवान् माझा असाच परिणाम लावो ह्मणजे झालें.

देवराव — पण तूं हा मुलगा आपल्येपाशीं बाळगिला असतां, हा जाणता होई पर्यंत तुला याचे खर्चा वेऱ्या विषयीं मोठी अड्चण सोसायाची पडेल, नाहीं?

सोसा० — याचें उणें मी कधीं पडों देणार नाहीं. मी घांसभर उणें खाईन, पण याची पोटभर करीन.

देव० — यास पोटास घालशील, पण वस्त्रें कोठून पुरविशील ?

सोसा० — तें मी त्या देवावर टाकीन, जो भुईस तृणाचें वस्त्र पांघुरवितो, आणि झाडांस पानाचें. त्याणें मला सूत कांतायास आणि शिंवायास बोटें दिलीं आहेत, तीं याचे वस्त्राकरितां श्रम करितील. जो देवास भजेल, आणि सामर्थ्याप्रमाणें उद्योग करील, त्यास तोटा पडणार नाहीं.

देव० — तर या मुलास बाळगीन असा तुझा निश्चय आहे ?

सोसा० — असा माझा दृढ निश्चय आहे. या अनाथास वेगळा करून माझा प्राण वांचणार नाहीं.

देव० — मला वाटतें किं याची तूं कांहीं सोयरी असावीस ?

सोसा० — सोईरगत इतकीच किं, आह्मीं एका देवाचीं लेंकरें.

देव० — तर, मीही त्या देवाचें लेंकरूं. ह्मणून त्या अर्भकाचें बरें करण्याचें सर्व पुण्य तुला एकटीला घेऊं देणार नाहीं; कां किं ईश्वरें तुजपेक्षां मला पुष्कळ सामर्थ्य दिलें आहे. तर याचे विद्याभ्यासाची तरी सोय मी करीन. या मुलाची भक्ती आईकडे पाहून जसा हा माझे प्रीतीस पात्र आहे, अशीच तुझी भक्ति यावर पाहून तुजवरही मी संतुष्ट आहे. यासाठीं मी तुह्मां उभयतांस माझे घरीं नेतों, तूं आपलें झोपडें आणि मळा विकून माझे घरीं येऊन राहा. तेथें तुला अन्न, वस्त्र, व

जागा यांच्या, जीवंत आहेस पर्यंत तोटा पडणार नाहीं.

सोसा० — (त्याकडे ममतेनें पाहून) महाराज, आपणास राग ये ऊं नये. भगवान् तुमचें कल्याण करो! पण माझानें तुह्मी ह्मणता त्यास रुकार देववत नाहीं.

देव० — कां?

सोसा० — एक तर, जेथें मी फार दिवस काढिले त्या माझे जन्मभूमिकेची ममता मला सुटत नाहीं. आणिखी, श्रीमंताचे घरीं लोकांचे गडबडींत मला राहातां येणार नाहीं. एकटी राहायाचा अभ्यास, त्यामुळें तुमचे घरीं मनुष्यांचा सहवास मला अडचण करील. मला चांगलें खाणें, निरुद्योग राहाणें, यांची सवे नाहीं. काम नाहीं केलें तर किंवा खात्यें त्याहून चांगलें खाल्लें तर मी, तत्काळ दुखण्यांस पडेन. यासाठीं माहाराजांपाशीं मी मागून घेत्यें किं, मला या मुलासहवर्तमान माझे झोंपडींतच राहूं द्या. तुमचे मर्जीस आलें तर केव्हां केव्हां कांहीं पैसे पाठऊन द्या; ते याचे शिकण्याचे, व, हा जो धंदा करील त्याचे उपयोगीं पडतील. यास द्याल त्याचें शतगुणित तो कृपाळू ईश्वर तुह्मास देईल, आणि तुह्मास द्यावें असी, हा मूल आणि मी नित्य देवाकडे प्रार्थना करूं. म-

ला

ला मुलगें नाहीं, हा मला पोटच्याच्य ठिकाणीं आहे. जेव्हां मला आपल्येजवळ बोलवावें असें इश्वराचे इछेस येईल तेस मयीं माझे जवळ जें थोडें बहुत आहे तें याचेंच आहे.

देव० — बरें तर, तसें कां होईना. मी तुमचें बरें ह्मणून करणार, त्यापासून तुह्मी असुखी व्हाल तें मी इछित नाहीं. जगू तुजपाशीं असूंद, आणि तुह्मी दोघें सुखी असा. तू यापाशीं माझी गोष्ट सदा काढीत जा. त्यास सांगत जा कीं, मी त्यास बापाचे जागीं आहें; आणि जी करितां तो इतका दुःखी आहे, त्या आईचे ठिकाणीं यास तूं आहेस. तुह्मांस पोटास लागेल तें मी प्रति महिन्यास पाठवीत जाईन. मीहि स्वतां येऊन तुमच्या समाचार घेईन. असें समज कीं, माझें येणें जितकें या मुलाकरितां, इतकेंच तुजकरितां होईल.

सोसाऊनें वर देवाकडे डोळे करून देवरावाचें बरें मागीतलें. नंतर ती मुलास बोलिली "जगू, इकडे ये, आणि यांचे पायां पड, आणि आशिर्वाद माग. आजपासून तुला हे बापाचे ठिकाणीं आहेत." जगूनें तसें केलें, पण सोसाऊस पुशिलें कीं "हा माझा बाबा कसा होईल? याच्या नेसूंपंचा कोठें आहे?" देवरावानीं तो प्रश्न ऐकून कौतुक केलें आ-

णि.

णि जवळ रुपयांची पिशवी होती ती सोसाऊचे झोंपडींत रि-
कामी करून तिला ह्मणाले, "भल्ये सोसाउ, आतां मी निरो-
प घेतों!" मुलास ह्मणाले "माझे धाकट्ये मित्रा जगू, मी तु-
झा निरोप मागतों!" असें ह्मणून ते घोड्यावर बसले आणि
जगूच्या धाकटा भाऊ रामचंद्र शेटीनें नेला आहे त्याचे घराक-
डून गावी जावें ह्मणोन निघाले. रामचंद्र शेट घरींच होता,
त्याची त्यांची भेट होउन परस्पर आगत स्वागत झाल्यावर, दे-
वराबानीं आपले येण्याचें प्रयोजन रामचंद्रशेटीस सागून पु-
सलें, किं या अनाथ मुलाचे बापाच्या ठिकाणा कोठें लागला
आहे? त्याणें उत्तर केलें किं, नुकती अर्धघटिका झाली, त्याचें
पत्र मला आलें तें हें माझे हातीं आहे; यांत त्याणें आपल्ये बाय-
कोस पत्र लिहून बिडलें आहे, त्या बरोबर लाहानशी हुंडी हि पा-
ठविली आहे, तें तीस देऊन मी तिचें समाधान करावें ह्मणोन
मला विनंती आहे. ती वारली ह्मणोन तिचें पत्र मी उघडिलें,
तें हें कृपाकरून वाचावें.

धाकटा जगु

देवरावानीं सोडलेलें तें हातांत घेऊन वा-
चिलें येणें प्रमाणें -

"माझे प्राणप्रिय स्त्रिये"

"माझे निमित्तानें तूं फार दुःख पावत असशील हें म-
"नांत येऊन मला फार व्यथा होते. आतां माझें वर्तमान ऐक.
"मी रामचंद्रराव यांजकडे आश्वासन मिळालें तों, वाटलें या गोष्टी
"माझे मनांत आल्या, कीं मी अशा पैसे मागायास जाऊन काय
"फळ? त्यास इतकेंमात्र होईल कीं, एक कर्जकर्ता वारून दुसरा के-
"ला, या प्रकारानें कर्जाची चिंता आहे ती आहेच. जर मी आज
"तरुण आणि काम करण्यास शक्त आहें, तर पर जाऊन इतके पै-
"से दीनपणानें मागावे यांत शोभा आहे? मला तें आळशीपणा
"किंवा व्यसनीपणा नाहीं म्हणणार? रामचंद्ररावांनीं आमचें लग्न
"केलें खरें. आणि हें मला पुढें आणखी चांगलें होईल असें, पण
"जर त्यांचे मनांत वाकडें आलें, आणि त्यांनीं मला नाहीं म्हटलें.
"किंवा आमचें संकट परिहारायास त्यांस सामर्थ्य नसलें तर? बरें
"कधीं त्यांपासून घरच्या चालीनें मला पैसे मिळाले, तर ते मी वर्षांआ-
"त फेडीन असा नेम करावा त्याची आहे? आणि जर मी फेडले
"नाहीं तर, चोरामध्यें आणि मजमध्यें हरण करण्याविषयीं अंतर

काय

“काय ?” असा मी विचार केला आणि बोलूं लागलों कि, चांगल्ये
“ मार्गानें मी या संकटांतून मोकळा होईन,असा उपाय कोणता करा-
“ वा ? ते समयीं माझे डोळ्यांत वारंवार अश्रुपात आले, आणि मी
“ वर भगवंताकडे दृष्टि केली; तों अकस्मात् माझे मनांत आलें , आ-
“ णि मी आपल्याशीं बोलूं लागलों. “ अरे , तूं अजून तरुण आहे
“ स, आणि शरीरानें दृढ आहेस. थोडा वर्षें दरम्यानशीं गेलास
“ तर काय चिंता आहे ? तुला लिहितां वाचतां येतें, व हिशेब चां
“ गला ठेवितां येतो, दैववशात कांहें चांगला रोजगार लागल्यास
“ तूं आपल्ये बायको मुलांस सुखी करूं शकशील ; वैर , हें ना-
“ हीं झालें तर आपले कर्जदारि वारशील. विचार कर ,
“ किं तेथें तुझें दैव उघडलें तर एकादा मोठा लाभ होऊं शके.
“ असा एक घटकापर्यंत विचार करित होतों, इतक्यांत कोणी
“ लोक माझे मागून येतारित असें मी पाहिलें. ते मज जवळ
“ आले, तेव्हां त्याणीं मला पुसलें तूं कोण आहेस ? कोठे काय उद्देशा
“ नें, चालला आहेस ? आह्मांबरोबर लष्करांत येशील ?” या प्रश्न-
“ स आह्मांनी केली तेव्हां, त्याणीं, पुनः मला पन्नासरुपये इनाम देऊं
“ करून बोलाविलें. मी त्यांस सांगितलेंकिं ; इतक्यावर तरी मी लढा-
“ ई संपे पर्यंत चाकरी करीन.” ते म्हणाले “ बरें तर तुझें आम्ह्यें ठ-
रलें

"रलें. आतां चल तूं आह्मां बरोबर. पुढच्यें आह्मी तुझें सगळें नी-
"ट करूं." मग त्याणीं मला आपल्ये सरदारापाशीं नेलें. त्याणें मला
"कांहीं प्रश्न केले; त्यांचीं उत्तरें देऊन मी त्याचे खातरेस उतरलों ते-
"व्हां त्याणें मला तत्काळ पंनास रुपये दिले. माझे प्रिये, असा
"मी कर्जा वेगळा व्हावें ह्मणून चाकरींत गुंतला गेलों. मी ह्या प-
"न्नासही रुपयांची हुंडी तुजकडे पाठविली आहे. त्यांतील ए-
"क दमडी ठेविली नाहीं. तर हे घेऊन वीस रुपये कर्ज आहे तें
"पहिल्यानें फेड; बाकीच्यांचें तुझे मनास येईल तें कर. तूं नीटप-
"णें राहा. आपली शरीर प्रकृती सांभाळ. मुलांस चिरगुटें
"कर. त्यांस साळेंत पाठवीत जा. तूं जपून खर्च केलास तरी
"इतके पैसे फार दिवस पुरणार नाहींत हें मी जाणतों, पण धीर धर.
"माझा तैनात महिना पांच रुपये आहे. त्यांतलें कांहीं मागें पाडू-
"न कांहिंका महिन्यांनीं तुला आणिखी मी पाठवीन. लश्करा बरो-
"बर परत येईन तेव्हां धांवत आधीं मी तुझे भेटीस येईन. माझे सा-
"ध्वी स्त्रिये, तूं दुःख करूं नको. भगवंतावर विश्वास ठेव. तो ल-
"वकरच आपणास सुखी करील. मुलांस चांगला मार्ग लाव.
"त्यांना बाहेर उनाड मुलांकडें जाऊं देऊं नको. तूं स्वतां उद्योग करीत
"ऐस. मुलां सहवर्तमान देवास भजत जा. त्यांस सन्मार्ग शि

कीव

"कीव, जेणेकरून तीं भली होतील. तूं हें सर्व करायास योग्य आ-
"हेस, या विषयीं मला संदेह नाहीं. ईश्वरास भीत जा. त्याक-
"डे तूं मज विषयीं प्रार्थना कर, आणि मी तुज विषयीं करीन. प-
"त्राचें उत्तर लवकर पाठीव. तूं रामचंद्रशेट यांकडे पत्र आणून
"दे; ते मी असेन तेथें पाठवितील. दोघां मुलांस माझा आशिर्वा-
"द सांग, जयूस सांग किं, तूं चांगला चालशील तर मी येते सम-
"यीं कांहीं तुजकरितां आणीन. ईश्वर तुमचें कल्याण करो.
"मजवर तुझी आहे तशी प्रीति असो.

सहि जानोजी.

पत्र वाचतांना देवरावाचे डोळे भरून पाणी वाहूं लागलें. वाचणे झाल्यानंतर तो ह्मणाला, या पुरुषास चांगला भ्रतार चांगला बाप, आणि सज्जन पुरुष असें ह्मणावें. असे मनुष्यास सुखी केल्यांत वास्तविक समाधान आहे. तर आतां जानोजी याचें कर्ज मी फेडीन; आणि त्यास पुनः चांगल्ये रोजगारास लावीन. मुलें कर्ती होत तों पैसे आले आहेत हे तुह्मांजवळ असोंद्या, याचें व्याज मी प्रतिवर्षीं तुह्मास देईन; तें तुह्मी मुदलांत मिळवीत जा. तें ऐकून रामचंद्रशेटीचा गळा भरून आला, तेणेंकरून

त्याच्यानें

त्याच्यानें देवरावास उत्तर करवलें नाहीं. देवरावहि त्याचे स्तब्धतेचें कारण जाणून त्यास नमन करून निघाले. नंतर देवरावांनीं जानोजी विषयीं जें मनांत योजिलें होतें, तें सर्व सिद्धीस नेलें: जानोजीस लष्करांतून आणवून त्यास रोजगारास लाविला; आणि सर्वप्रकारें सुखी केला; तसा तो पूर्वीं कधीं नव्हता. त्याची तेव्हडी बायको जीवंत असती तर त्याच्या सुखास थोडा नव्हता. तो सोसाऊ संगातीं मानाऊचे गुणाच्या गोष्टी करी, आणि समाधान पावे. ती थोर बायको सोसाऊही, त्याशीं बहिणीप्रमाणें वागली, आणि मातेप्रमाणें तिणें त्याचे मुलांचें संरक्षण केलें. जगू नित्य स्मशानांत जाऊन आईचे जागेचें दर्शन घेई. देवरावानीं त्याविषयीं जो खर्च केला त्याचें त्याणें विद्याभ्यास करून यथास्थीत सार्थक केलें: त्यास योग्य पाहून देवरावाचे मनांत आले कीं, यास कांहीं मोठें काम सांगावें. जगूचे धाकटये भावाचाहि देवरावानीं तसाच समाचार घेतला. तोहि मुलगा चांगला गुणी निपजला. देवराव जेव्हां जेव्हां घोडयावर बसायास जात, तेव्हां तेव्हां, त्यांस या धर्मकृत्याचें स्मरण होऊन समाधान वाटे. जेव्हां जेव्हां त्यांस दुःख होई, तेव्हां तेव्हां ते, आपण सुखी केलेल्या माणसांकडे जाऊन पाहून श्रम परिहार करीत आणि घरास स्वस्थ होऊन येत.

---

गवंडी

## गवंडी व मजूर.

कोणे एके दिवसीं द्वारकानाथभट्ट, आपला मुलगा हरी यास घेऊन, बाजारचे रस्त्यानें चालिले होते, तेथें एक मोठी हवेली बांधीत होते, तें कौतुक पाहायास ते अंमळ उभे राहिले. तें काम दुसरे मजल्या पर्यंत चढलें होतें. हरीनें पाहिलें कीं, त्यास पराची केल्या आहेत; त्यावर शिड्या लावल्या आहेत; त्या शिड्यावरून एकावर एक अशीं माणसें आहेत, तीं अनुक्रमानें खालवर हात नाचवित्ताहेत. तें पाहून हरी बापास पुसतो," बाबा, हीं माणसें कसल्या खेळ खेळताहेत ? आपण अंमळ शिडी जवळ जाऊं यतां ?

मग त्यांणीं अंमळ जवळ जाऊन पाहिलें कीं एक मनुष्यानें राशींतून एक दगड उचलून शिडीचे तळ पायरी वरचे मनुष्याचे हातीं दिला; त्याणें तो घेऊन हात वर केले, तों तो त्याचे वरचानें घेतला; त्याणें हात वर करून तिसऱ्याचे हातीं दिला, त्याणें तसेंच करून चौथ्याचे हातीं दिला. असा एकाचे हातून दुसऱ्याचे हातीं जात जात तो दगड क्षणांत पराचीवर गेला; तेथें

## गवंडी व मजूर.

थें गवंडी होते त्यांणीं तो तत्काळ कामीं लाविला.

द्वारकानाथभट्ट हरीस ह्मणतो " मुला हें पाहून तुला असें वाटतें किं नाहीं ? किं इतकीं माणसें या घरावर कशास लाविलीं आहेत ? याहून असें केलें तर चांगलें, किं यां सर्वांस निरोप देऊन, हें घर ज्याचें त्याणें जातीनशीं बांधावें, आणि असेंच ज्याणें त्याणें करावें ?

खरी गोष्ट बाबा. असें होईल तर, आतां आहेत त्यापेक्षां घरेंहि पुष्कळ होतील.

द्वारकानाथभट्ट हरीस पुसतो," मुला, तूं काय ह्मटलेंस याचा चांगला विचार केलास ? असें एक घर बांधायास किती प्रकारचे कसबी, आणि किती प्रकारचे उदमी लागतात, तें तुला ठाऊक आहे ? जो एकटा घर बांधूं लागेल. त्यास तीं सर्व कसबें आलीं पाहिजेत; तीं पुरतीं यावयास सगळें आयुष्य पुरणार नाहीं. मग घरास आरंभ कोठला ? बरें, जरीं, घर बांधायापुरत्या सर्व विद्या यास थोडक्ये दिवसांत आल्या, तरी पाहा किं, त्याणें जातीनशीं प्रथम उनांत खपावें; पायाकरितां भुई खाणाची; नंतर दगडाची खाण करावी; तेथें सुरंग्या, बेलदार, व्हावें. चुनखडे मेळवावे. ते भाजायाकरितां लांकडें तोडून आणावीं; त्याचा

चुना

चुना झाला ह्मणजे कुटावा; नंतर गवंड्या व्हावें; पाया भरावा; लांकुड तोड्या होऊन लांकडें तोडून आणावीं; तीं सुतार होऊन घडावीं; अरकशी होऊन अर्कसावीं; तीं उभीं करावीं; आंबाडी पेरून त्याचे दोर करावे; दगडांतून लोखंड गाळावें; तें लोहार होऊन घडावें; सुतार गवंडी इत्यादिकांचे कामाकरितां हातेरें करावीं. पुढें तांब्याची गरज लागेल तेव्हां ती खाण उत्पन्न करायाकरितां देशांतरीं जावें. रंग मसाले पाहिजेत त्यासाठीं द्विपांतरीं जावयास नौका बांधावी; कोष्टी होऊन कापड विणावें; त्यांचीं अवजारें करावीं; दर्यावरदी होऊन नौका वाहावी. घर बांधीत असतां एकट्यानेंच मेज माप घ्यावें; शिड्या लावाव्या; परांची बांधाव्या. या प्रमाणें सगळीं कामें एकटाच करूं लागला तर तो किती दिवसांत घर पुरतें करील बरें ?

हरी — ओ होहो ! बाबा, मला वाटतें किं अशा प्रकारानें घर कधीं पुरतें होणार नाहीं.

द्वारकानाथ — खरें ना ? तर तूं सर्व व्यवहार असाच पाहा. जर मनुष्य ह्मणेल किं मला कोणाची गरज नाहीं; मला जें व्हावें तें मी एकटा करीन; मला कोणी सहाय होऊं नये; आणि मी कोणास होणार नाहीं; तर असें होईल किं त्याचा शक्ती लवकरच क्षीण

होतील

होतील, आणि जें काम घेईल तें अपुरतें टाकून द्यायाचें पडेल. मनुष्यें जर एकमेकास सहाय झालीं, तर कसेंही कठीण, कसें-हि अडचणीचें काम असलें, तरी थोडक्ये वेळांत पारपीडताहेत; तेंच जर एकटा करुं ह्मणेल तर, त्यास जन्मवरहि होणार नाही. असीच या लोकींचीं सगळीं सुखें: जो ह्मणेल किं माझा मी एकटाच भोगीन; तर त्याला तीं थोडीच प्राप्त होतील. आणि जर एकमेकांनी एकमेकास सुख दिलें तर सर्वांचे सुखांत एके कांचें सुख सहज आहे. आपण आपलीं आई बापें, भाऊ बंद, स्त्री पुत्र, इष्ट ओळखी, चाकर कुळबिणी, गांवकरी व सर्व लोक, यांस, आपल्ये शक्ती प्रमाणें सुख दिलें, तर ती सर्व मिळून आपल्यास सुख देतील; तितकें आपल्ये एकट्याचे प्रयत्नानें होणार नाहीं. मुला, तुला पुढें लोकिकांत यावयाचा प्रसंग आहे, ह्मणून या कामकच्यांचा दृष्टांत आपल्ये मनांत पक्का ठसवून ठेव; तेणेंकरुन तूं सुखी होशील. तूं पाहा; ते एकमेक एकमेकास श्रमाचें ओझें किती हलकें करिताहेत तें. आपण आणिखी कांहिंका दिवसानीं इकडे येऊं तेव्हां तूं हें घर पुरतें झालेलें पाहाशील. यासाठीं जर तूं इछितो आहेस किं मजकरितां लोकांनी श्रम घ्यावे; माझें बरें करावें; मला सहाय व्हावें; तर तुलाहि लोकांकरितां तसें करणें आवश्यक आहे.

# तरवार.

## नाटक एक अंकी.

### पात्रें

| | |
|---|---|
| संभाजीराव घोरपाडे. | |
| गणपतराव . | त्यांचा मुलगा |
| रेवाबाई | त्यांची मुलगी. |
| रावजी सावंत | गणपतरावाचे मित्र. |
| राणू सावंत. | गणपतरावाचे मित्र. |
| दामू पोवार | गणपतरावाचे मित्र. |
| दिनकर पोवार. | गणपतरावाचे मित्र. |
| केरोजी . | संभाजीरावाचा खिसमतगार |

स्थळ.

गणपतरावाची खोली.

---

# तरवार.

## प्रवेश १

### गणपतराव.

आहा ! आज माझा वाढ दिवस ! बरें झालें त्यांणीं मला सांगीतलें; नाहीं तर मला सई झाली नसती. आज मला बाबाकडून कांहीं भेट लाभेल. बरें पाहुं या तो काय मला देतो. केरोजी नुकताच कांहीं बगलेंत मारून इकडून गेला. अंमळ मी त्याचे गळीं पडलों असतों तर तो मला पाहूं देता कायनें. पण अं:! काय आहे तें आतां मजकडे येईल. हा माझा बाबा आला.

---

## प्रवेश २

### संभाजीराव. गणपतराव.

संभा० — (हातांत तरवार घेऊन) गणपतराव, तुह्मी इकडे आहां काय? आज तुमच्या वाढ दिवस ह्मणोन तुह्माला मी खुशाली द्या

वयास

वयास आलों आहें· पण मला वाटतें किं, शुष्क खुशाली पेक्षां तु-
त्यांस आणखी कांहीं असावें,नाहीं बरें ?

गण० – पण बाबा, तें तुझे हातांत काय आहे ?

संभा० – आहे तें तुला शोभणार नाहींसें मला वाटतें· ही तर-
वार आहे पाहा·

गण० – काय ! ही मज करितां आणिली आहेस ? देतर, देतर, ल-
वकर देतर माझ्या बाबा, आज पासून तूं पाहा किं मी चांगला चा-
लेन·

संभा० – पण तूं जाणतोस ? तरवार मुलाचे योग्य नाहीं· ती
मोठ्या पुरुषानेंच बाळगावी· इचे बाळगणारानें, मोटे चोकशीनें
आणि थोरपणानें असलें पाहिजे· सारांश तरवारीचे योगानें म-
नुष्यास शोभा असू नये; मनुष्याचे योगानें तरवारीस शोभा
असावी·

गण० – तूं त्याची कांहीं काळजी करूं नको बाबा, मी भाष देतों, घे
ही, किं, माझीसे मी शोभवीन· मग मी त्यां हलक्ये लोकांशीं बो-
लणार नाहीं·

संभा० – आं,आं, तूं हलके लोक कोणास ह्मणत्तो आहेस ?

गण० – मी हलके लोक त्यास ह्मणतो. ज्यानां आपल्ये सारिखा त

रवार

## तरवार

रवार बाळगायाचा अधिकार नाहीं.

संभा० – माझे मतेंतर, जे अचिंत्य चिंतितात; जे अकार्य करितात; जे आई बापांची अवज्ञा करितात; लोकांशी विनयानें, थोरपणानें, चालत नाहींत; ते हलके लोक होत. तर असले हलके मनुष्य श्रीमंत लोकामध्येंहि फार दृष्टीस पडतात, आणि जांत हे दुर्गुण नाहींत असले थोर मनुष्य गरिबामध्येंहि बहूत आडकळतात;

गण० – तर माझेंहि मत तसेंच बाबा.

संभा० – तर तुकताच तूं काय बोलत होतास. रेअसल्या फिरा-न्यांत थोरपणाचें लक्षण आहे असें तुला वाटतें ?

गण० – नाहीं नाहीं बाबा, तुह्मी सांगतां तेंच खरें. पण मी तरवार बाळगिली असतां मला दूषण तर नाहीं ?

संभा० – नाहीं; मी इतकेंच ह्मणतों कि, तूं चांगले गुण करून तरवार धरणारास योग्य असावेंस. आतां घे ही, पण आठवण धरहो.

गण० – होय बाबा; होय बाबा; तूं पाहा बरें. ( तो तरवार पडदळांत घालून गळ्यांत अडकावितो ) .

संभा० – तर मी आतां येतों. बोललों आहे त्याची आठवण धर बरें. येतो तुला कुशल असो. ( तो जाऊन मागें फिरतो ) मी विसरून

सरून गेलों. आज तुह्मीं खेळायास मी तुकतेंच तुझे सवंगडयां-नां बोलावणें धाडिलें आहे; त्यां संगतीं तूं नीट चाल हो.

गण० — होय, बाबा; चालेन.

---

## प्रवेश २

### गणपतराव.

( इकडून तिकडे, जातो येतो; मागें तरवार लटकलेली आहे किंनाहीं ती वरचेवर पाहातो ) वः, हें खासें काम आहे! ही घात-ल्यापासून मजवर मोठेपणा दिसतो खरा! कोणांहि गांवकऱ्यां-स ह्मणावें, आतां तुह्मी माझे समोर या पाहूं. जर त्यांजकडे त-रवार नसेल तर, ते मशीं सलगी करायास अतःपर योग्य नाहींत, हें मी त्यांस परिछिन्न सांगेन; आणि जर त्यांणीं गडबड केली तर, हूं, भोसकून टाकीन. पण थांब, इचें पान कसें आहे तें पाहूं! ( तरवार म्यानांतून उपसतो, आणि डोळे वटारून रागानें पाहातो ) काय? तूं बनियां माझी अमर्यादा करितोस? ( तरवारीचे झटके मारितो ) एक! दोन! तीन! तुह्मी मज समोर उभे राहाणार, होय?

नरवार ·

मरा शिनळ्याच्यानों आतां; पडा दांत वासून ·

---

## प्रवेश ४

रेवाबाई गणपतराव ·

रेवा० — ( हे शेवटचे शब्द ऐकोन किंकाळी फोडितच येत्ये ) काय गणपतराव, हें तूं काय चालतो आहेस? तुला चळ तर लागला नाहीं ?

गण० — कोण ? ताई, तूं आहेस काय ?

रेवा० — होय, पाहाशील तर मीच आहें · ( तरवारीकडे बोट करून ) पण हें शस्त्र घेउन तूं पुढें काय करणार ?

गण० — काय करणार ? थोर मनुष्यें करीत असतील तें·

रेवा० — ज्यांस तूं मरा असें ह्मणून नुकतेंच परलोकास पाठविलेस, असे ते दैववान् कोण होते बरें ?

गण० — अं:, तेंउगीच; पण ताई, मी तुला खरेंच सांगतों, जो या

माझे

माझे भिंती आंत येईल, त्याचें हो —— मी कंदन काढीन·

रेवा ० – तर आज पुष्कळांचे प्राण संकटांत आहेत मला वाटतें; पहिल्ये तडाक्यास तर मीच सांपडल्यें आहें·

गण ० – तूं ? तसें होणार नाहीं. पण मी आतां समशेर बाहादर आलों, समजलीस ? बापानें मला ही तरवार तुकतीच बक्षीस केली आहे·

रेवा ० – लोकांस मारायाला वाटतें ?

गण ० – काय ? मी आतां बाहादर नाहीं झालों ? आतां लोकानीं माझी अदब ठेवावी; नाहीं तर, पाहातांच प्रथम फाडकन तोंडात मारीन. त्यावर जर त्याणी उत्तर केलें, तर मग यां तरवारीचा फटका पाहिलास हा ? (तो तरवार बाहेर काढायास लागतो)

रेवा ० – भाऊ, माझें ऐकशील तर ती एकीकडे ठेव. आणि मजपाशीं सांगून ठेव किं तुझी अदब ती कशी ठेवावी. न जाणों एकादे वेळेस चुकून तशी गोष्ट व्हायाची; म्हणून समजून घेतलें असावें·

गण ० – तें तुला आतां लवकरच समजेल. बाबानें माझे संवगड्यांस बलावू पाठविलें आहे. जर ते पोरें अदबेनें मशीं वर्तलीं तर बरें, नाहीं तर मग पाहा मी कसें करीन तें ?

## तरवार

रेवा ० — बरें पण, तुझी मर्यादा कशी राखावी तें तर सांगशील ?

गण ० — प्रथम तर मला नमावें. फार लवून नमावें.

रेवा ० — (त्यावर मोठ्यानें लवून नमत्ये) समशेर बाहादर महाराज बडेजाव, मी तुमची दासी आहें. मजवर नजर रखें. कां ? हें ठीक उतरलें ना ?

गण ० — रेवा, मस्करी नको करूं, नाहींतर ——

रेवा ० — मस्करी नव्हे, हें वास्तवीक पुसत्यें. कां कीं, थोर मनुष्यांशीं कसें वागावें हें समजलें पाहिजे. आणि तुझे बाळमित्र येतील त्यांसहि पूर्वींच स्वचविलें असतां बरें पडेल.

गण ० — मी त्यां पोरांचा अंमळ तमाशा करणार आहे. एकाला ओढीन, एकाला चिमकुरे घेईन. एकाला टपलेबाजी करीन, अशा अशा त्यांचा मस्कऱ्या करीन.

रेवा ० — असल्या गोष्टी कराव्या ही समशेर बाहादर लोकांची रीत आहे वाटतें ? पण त्या पोरांस तो तमाशा आवडला नाहीं आणि त्यांणीं समशेर बाहादरांची उलटी पूजा केली तर ?

गण ० — काय ! त्या मुकुंदाला ! नीचानो ! अरे जारे. त्या गरीबांना काय करायाचें होतें ? त्यांना छाती आणि तरवार दोन्हीही नाहींत.

रेवा ० – खरेंच, बाबानें तुला आज मोटे उपयोगी वस्तूची भेट दि- ली. त्याला वाटलें कि लेंकाचा रूपानें आपल्य पोटीं कोणी हा महावीर जन्मला आहे; याचे गुण प्रगट व्हावयास यास एक त- रवार मात्र उणी आहे.

गण ० – आइक ताई, आज माझा जन्म दिवस; कांहीं कर्मणूक तर केली पाहिजे. असो; तूं यातलें कांहीं बाबा पाशीं बोलूं न- काहो.

रेवा ० – कां नको ? तुजपासोन असलें पराक्रम व्हावे ह्मणोनच त्याणें तुला तरवार बकशीस केली असेल. आणि असा तु- ला त्याचा उपदेशही असेल.

गण ० – यांत काय संशय — तो मला सर्वदा असेंच सांगत अ- सतो.

रेवा ० – कसें सांगत असतो ?

गण ० – कोण जाणे, मला आतां चांगलें स्मरत नाहीं. मला वाटतें कि हें असावें "तरवारीला आपण शोभवावें, तरवारीनें आपणाला शोभवूं नये".

रेवा ० – याचा अर्थहि तूं चांगलाच समजला असशील कि; त- रवारीस शोभवावें ह्मणजे तिचा उपयोग करायास जाणावें,

तो

तो तूं नीट जाणतोस.

गणा ० – तुला सगळी मस्करीच वाटत्ये. पण बाईसाहेब, तुम्ही जाणा किं ——

रेवा ० – ओहो! तूं सांगणार तें मला अर्थाच्य ठाऊक आहे. पण तुझ्या या तरवारीस मुख्य भूषण तें आजून पाहिजेच,हें तूं जाणतोस?

गणा ० – तें काय? (तरवार पडदळांतून काढून निरखून पाहातो) यांत कांहिं उणें आहेसें मला दिसत नाहीं.

रेवा ० – खरेंच! तर तूं मोठा शाहाणा तरवार धरणारा आहेस. हिला आतां एक गोंडा नको? तो असल्यावर मग किती छानदार दिसेल.

गणा ० – खरी कल्पना काढलीस. ऐकल्येस, तर गड्या, तुझे पेटींत कलाबतूं व रेशीम पुष्कळ आहे त्यांतलें ——

रेवा ० – तेंच मी लक्षांत आणिल्यें आहे. पण जर तूं मजपुढें आपली कवाईत करून दाखविणार नाहींस, आणि तरवारीचें पान माझे अंगावर ठेवून उपकार फेडणार नाहींस तर.

गणा ० – वेड सगळें! ह्या घे हातावर हात; झालें. आतां तुला कांहीं भय नाहीं. पण लवकर, एक छानदार गोंडा! जरीचा!

माझी

माझी मंडळी येईल तिणें मला माझे सगळे वैभवांत पाहावा, त्यांत चमत्कार आहे.

रेवा० - तर तरवार मजकडे दे.

गण० - ( निजकडे ती देतो ) ही घे; जलदी कर. काम झालें ह्मणजे हळूच या सतरंजीवर आणून ठेव, किं ह्मटले तेव्हां मला सांपडेल.

रेवा० - त्याविशीं तूं काळजी करूं नको.

---

## प्रवेश ५

गणपतराव, रेवाबाइ, केरोजी.

केरो० - आपले मित्र दोघे सावंत, व दोघे पोंवार, खालीं आले आहेत.

गण० - मग ? त्यांचानें वर येवत नाहीं काय ? त्याना आणायास खालपर्यंत म्या आलें पाहिजे ?

केरो० आपण खालीं येऊन त्यांस मान द्यावा, असें आईसाहेबानीं आपणास सांगीतलें आहे.

गण० - नाहीं, नाहीं ; मी त्यांची वाट एथें पाहीन तें चांगलें.

रेवा० - खरें पण, आईसाहेब सांगतात त्या अर्थी तुह्मी खालीं

जावें

आवें. यांत ——

गण० — हें खरें ? त्यांस इतका सत्कार योग्य आहे ? बरें तर मी हात्च आलों. रेवा, अगे चल लवकर, तिकडे काय करित्येस? अशानें तरवारीचा गोंडा होईल काय ? चाल धावत; खबरदार गोंडा चांगला झाला आणि तरवार चांगली दिसली तर बरें आहे; नाहीं तर दारवबीन कसें तें. तरवार माझे खोलींत आणून ठेव. (बाहेर निघून) ऐकिलेंस ?

---

## प्रवेश ६
## रेवाबाई.

(आपल्याशीं) पोर अमर्याद! पाहा तो मला कसा बोलिला! बरें झालें कि तरवार मजपाशीं आहे. असलें हातेर आणि भांडखोराचे हातांत मग काय! (मोठ्यानें, गणपतरावास) होय होय, थांब माझें होई पर्यंत. मी तुला ओळखिल्यें तसा, बाबा तुला ओळखित नाहीं. हे तुझे गुण त्याला सांगीतले पाहिजेत—ठीक झालें. हा बाबा आला.

---

## प्रवेश ७

### संभाजीराव रेवाबाई·

**रेवा०—** बाबा, तूं बरा आलास. मी तुजकडेसच येत होत्यें·

**संभा०—** असें नाजूक काम काय आहे? — तूं आपल्ये भावाची तरवार काय केलीस?

**रेवा०—** मी ती गोंडा लावायाकरितां ह्मणून त्यापासोन घेतली आहे. पण त्याकडून तें घातक हातेर काढून घ्यायासाठीं मी तें उगीच मिस केलें. आतां कांहीं कर पण त्याला ती देऊं नको बाबा·

**संभा०—** त्याला मी भेट केली ती फिरून कशी घेऊं?

**रेवा०—** तो चांगला निवळेपर्यंत ती तूं आपणापाशीं ठेव. मी तुकताच त्याला पाहिला, तो एकटाच धाररावासारिखा तरवार परजित होता, आणि त्याचे सवंगडी येणार, त्यासमोर फेरफटका करण्याच्या गोष्टी सांगत होता·

**संभा०—** असें काय? कज्जेदलालपोर! तो प्रथमच असें करील तर त्यांत त्याला आबरु मिळणार नाहीं; खरेंच सांगतों. दे मजकडे ती पाहूं·

**रेवा०—** (त्याकडे तरवार देत्ये) ही घ्या बाबा. आतां तो तुकता-

च

च्या शिडीपाशीं तडत होता.

संभा० – जा आणि लवकर गोंडा करून मजपाशीं आण

(तो बाहेर जातो).

---

## प्रवेश ८

### गणपतराव, वडीलसांवत, धाकटासांवत, वडीलपोंवार, धाकटापोंवार.

(गणपतराव जोडे पायांत असतां त्यांपुढें चालतो. ते मागून जोडे काढून येतात).

वडी० सां० (वडील पोंवाराकडे वळून हळूच) आज आपणास हा मोठा विनय युक्त सत्कार झाला.

वडी० पों० (वडील सांवताकडे वळून हळूच) आलीकडे सत्काराची हा अशीच नवी रीत निघाली असेल, किं घरामध्यें जोडे घालून पुढें चालावें.

गण० – काय रे, तुह्मी तिकडे कशी कुरकुर लाविली आहे? —— आं?

वडी० सां० नाहीं, कांहीं नाहीं रावजी.

गण० – मी ऐकूं नये असें कांहीं आहे काय?

तसेंच

वडी० पो० तसेंच कांहीं असावें.

गण० – बरें तर, तुह्मी तें याक्षणीं मला सांगा. सांगितलेंच पाहिजे.

वडी० पों० इतका अधिकार तुजकडे येईल तेव्हां तसें करितां येईल.

वडी० सा० (दासूस हळूच) परके घरीं येऊन असें हें योग्य नव्हे.

वडी० पों० तर त्याणें आपल्ये घरीं इतकें दांडगें व्हावें हें तरी योग्य आहे?

गण० – (गर्वानें) दांडगा, मी दांडगा! मी तुह्मा पुढें जोडा घालून चाललों ह्मणून?

वडी० पों० होय ह्मणूनच. तूं अथवा दुसरा कोणी आमचे घरीं आला असतां आह्मी असें करायाचे नाहीं.

गण० – तुह्मी व्हाबें तसें करावें. पण अरे, तुह्मी कायरे मला रीत शिकविणार?

वडी० पों० तर काय, तूं आह्मास शिकविणार?

गण० – पण तुह्मी राव आहां काय?

वडी० पों० (दोघा सांवतांस आणि आपल्ये भावास) तुह्मी माझें ऐकाल तर, चला आपण एथून जाऊं, आपल्ये रावपणाळा घेऊन याला खुशाल बसोंद्या.

## नरबार.

वडी०सां०— छी, गणपतराव! आह्मी तुझे संगतीस योग्य नव्हतों तर आह्मास पहिल्यानें त्वां बलावूं नये होतें. आह्मी तुझे गळीं पडलों नव्हतों.

गण०— तुह्मास मी नाहीं बलाविलें; माझे बापानें बलाविलें.

वडी०पों०— असें काय? तर आह्मी तुझे बाबाकडे जातों, आणि त्यांस सांगतों कि, आपण बलाविलें तेणेकरून आह्मी मोठे उपकारी झालों, परंतु आमच्या सत्कार करण्यांत तुमचे लेकास भूषण दिसत नाहीं ह्मणून आह्मी जातों. चलारे तिकडे.

गण०— (त्यांस थांबविलो) दामू, मस्करीवर राग केला पाहिजे? तुह्मी आलेत तेणेकरून मला मोठें समाधान झालें. आज माझा वाढदिवस आहे; मला तुह्मी संतोष द्यावा ह्मणून बाबानें तुह्मास बलाविलें आहे, तर कृपाकरून मज संगती असा.

वडी०पों०— असें ह्मटल्यावर ती गोष्ट वेगळी —— पण अतःपर त्वां अंमळ नम्र असावेंस. जरी मजपाशीं रावपणा नाहीं तरि मी कोणाचा अवमान सोसणार नाहीं.

वडी०सां०— पुरे दामू! आतां आपण पुनः गडी करूं.

धाक० सां० – गणपतराय, आज तुझा वाढदिवस आहे काय ?

वडी० सां० – मी इच्छितों कीं तुला सर्व स्फरवें होऊत.

वडी० पों० – मीहि तसेंच इच्छितों. आणिखी तुला सर्व संप- त्ती प्राप्त होऊत —— (एकीकडे) पण तुझे आंगीं अंमळ अधीक नम्रता येऊ.

धाक० पों० – आज तुला चांगल्या चांगल्या भेटी पुष्कळ आ- ल्या असतील ?

गण० – होय खरेंच.

धाक० सां० – पुष्कळ मिठाई, खडेसाकर, बदामें, आली अ- सावी, यांत संशय नाहीं ?

गण० – मला मिठाई ? मग खासेंकास ! अरे मी तर मी नि- त्य खातों.

धाक० पों० – तर मी पैंज मारतों पैसे असतील. दोनतीन मोहरा ! अं ?

गण० – (गर्वानें) त्याहून अधीक चांगली कांहीं वस्तु आ- हे. आणि खरेंच सांगतों, आपल्या मध्यें सर्व आहों यांमध्यें ती मलाच योग्य आहे.

(वडील पोंवार आणि सांवत एकीकडे बोलतात.)

नवूवार.

धाक॰पों॰— तुझे सारिखें मला मिळालें असतें तर इतका गर्व होताना.

गण॰—(त्यांकडे अवगणनेनें पाहातो) गरीबा बिचाऱ्या! (दांधा वडलानां) कायरे? तिकडे आतां फिरोन कायरे फुसफुसतां आतां? तुह्मी जवळ राहून मला रमवावें तहें आज तुमचें काम नव्हे?

वडी॰सां॰— तुला रमवायास आह्मास प्रयोजन कायतें सखाव?

वडी॰पों॰— जो मित्रास बळाधितो, त्याणें त्यांस रमवावयाची चिंता वाहावी; रीती तर अशी आहे ———

गण॰— राबू, तूं बोललास त्याचा कायरे अर्थ?

वडी॰पों॰— त्याचा अर्थ उघडा आहे

---

प्रवेश ९.

वडील पोंवार, धाकदा पोंवार, वडील सांवत, धाकदा सांवत, गणपतराव, रेवाबाई.

रेवा॰— (तबक भरून बरफी तुर्दे आणिल्ये) गृहस्थहो, तुह्मास

कुशल पाहून मी समाधान पावलें.

पो० — (नमून) बाई मी तुमचा सेवक आहें.

सो० — तुम्हाला येथें पाहून आम्हास बहूत आनंद झा-
ला बाई.

० — तुम्ही बहूत योग्य आहां—— (गणपतरावास)
भाऊ, आईनें हें तुझे मिष्टांकरितां पाठवून दिलें आहे; दूध
तयार होतें आहे तें, मागून केशेजी घेऊन येईल; तें तूं आणि
मी याना बाहू ——

बाई० पों० — बाई, ना तुम्ही आम्हास मोठा मान देतां आहां.

० — तूं जा आतां तुझें येथें कांहीं काम नाहीं! माझे त-
रवारीचा गोंडा कोठें आहे?

रेखा० — तुझी तरवार गोंड्यासकट तुला तुझे खोलींत दृष्टी-
स पडेल. (एहस्थानीं, मी पुनः येई पर्यंत तुम्हास कुशल अ-
सो (ती न्याय्य नमस्ते आणि जाते)

बाई० पों० — तुम्ही लवकरच कृपा करून यालना बाई?

रेखा० — मी हीच आईची आज्ञा घेऊन येते.

## दरबार.

### प्रवेश १०

### वडील पोंवार, धाकटा पोंवार, वडील सांवत, धाकटा सांवत, गणपतराव.

गण० — ( आपण आधीं रडून मग आंतों ह्मणतो ) या लोकां- शीं वरा ( ते एकमेकांकडे पाहतात, आणि न बोलतां असतात. गणपतराव धाकट्यास पुष्कळ अरफी वाहिली, आणि आपणास घेता. दोघा वडिलांनी काहीं ठोविन नाहीं; त्यास ह्मणतो ) थांबा अमळ, दुसरी येईल मग मी देईन.

वडी० पों० — नको; त्याची आम्हास इच्छा नाहीं.

गण० — बरें तर, नको तर नको.

वडी० सां० — याव लोकांचा सत्कार रीति अशीच आहे वाटतें —

गण० — तुह्मां तरीकांस एवढि प्रतिष्ठा कशास पाहिजे ? मी तुह्मास आधींच सांगीतलें नाहीं कि, दुसरी येत आहे तो थांबा ह्मणोन ? ती आली ह्मणजे पाहिजे तर घ्या, नाहीं तर नका घेऊं. समजलेत ?

वडी० पों० — होय, बोलल्यास ते स्पष्ट आहे. असेंच आह्मी आज कोणाच्या संगतीस बसलों आहों हेंहि आह्मास स्पष्ट समजलें.

मनलें.

वडी०भां० – अरे तुमच्ये मनांत पुनः कज्या करायाचा आहे काय ? गणपतराव, दासू, कीं गड्यानो ! ( गणपतराव उठतो दुसरे हि उठतात )

गण० – ( वडील भांवारा जवळ जातो ) गांवदेकराचे पोरा-तू कोणाचे बरोबर आहेस, याचा कांहीं समार ठेवितोस ?

वडी०पो० – आह्मी, दांडगा आणि निर्लज्ज अशा एका राचाचे समागमें आहों; जो आपल्ये ठायीं नसता थोरपणा आणितो आहे, आणि जो एकमेकांतें आगत स्वागत कसें करावें या विषयीं मूर्ख आहे.

वडी०भां० – खरेंच, तूं ह्मणतोस असेंच आह्मां सर्वांचें बोलणें.

गण० – कायरे ! दांडगा ! मी निर्लज्ज ! मला रावाला आणि तुह्मी असें ह्मणावें ?

वडी०पो० – होय, खरेंच, फेर ह्मणतों कीं तूं मोठा दांडगा, मोठा निर्लज्ज आहेस. तूं मोठा थोरला प्रधान असतास किंवा राजा असतास तरी मी तुला असेंच ह्मटलें असतें.

गण० – असें नाहीं ? तर तूं कोणाशीं बोलतो आहेस तें मी तुला आतां दाखवितो ! ( त्यावर हात टाकितो ) वडील पोंवार

त्याला धरतो. तो, निसटून खोलींत पळतो, आणि दार लावून घेतो.)

---

## प्रवेश ११

### वडील पोंवार, धाकटा पोंवार, वडील सावत, धाकटा सावत

**वडी० सां०** — धाकू, हा तूं काय अनर्थ केलास? आतां तो आपल्या बापाकडे जाईल, आणि त्यास नानाप्रकारचें समजावील.

**वडी० पों०** — त्याचा बाप थोर मनुष्य आहे. तो रुसला गेला तरी मी त्याकडे जाणार, आणि पुसणार कि लेकाकडून आमचा असा पाण उतारा करायासाठीं तुम्हीं आह्मांला एथें बलावून आणलें काय?

**धाक० पों०** — खरेंच, थोर भाऊ या काहीं अन्याय नाहीं; हें सर्व वर्तमान आमचे बाबास सांगीतलें असतां, तो ठीक केलें ल पुन सारखेल; आमच्या लोकांची अप्रतिष्ठा करावी हें त्यास साहाणार नाहीं.

वडी० पों० — चला मज संगाती. आपण सगळे जाऊं आणि संभाजीरावास हें सर्व सांगूं.

---

## प्रवेश १२

### वडील पोंवार, धाकटा पोंवार, वडील सांवत धाकटा सांवत, गणपतराव.

( गणपतराव तरवार घेउन बाहेर येतो. दोघे धाकटे त्यास पाहून एक, एका कोंपऱ्यास आणि दुसरा, खांबाआड होतो, वडील पोंवार आणि वडील सांवत तेथेंच अवसान धरून उभे राहातात )

गण० — ( वडील पोंवाराचे आंगावर जातो ) आतां मी तुला शिकवितों, दांडग्या पोरा ( तरवार उपसतो तों तरवारीचे पानाचे ठिकाणीं लांब मोराचें पीस पाहून ओशाळा होऊन थबकतो. धाकटीं मुलें मोठ्यानें हांसतात आणि त्याजवळ येतात.

वडी० पों० — चल ये आमचे आंगावर, तुझे तरवारीचें पाणी कसें आहे तें पाहूं तर खरें !

वडी० सां० — तो लाजला आहे त्याला आणखी लाजवूं नको.

धाक॰पों॰— आश्चर्य! तुजला त्यायास अधिकार आहे ती हीच-का जिनस?

धाक॰सां॰— या भयंकर शस्त्रानें याचानें कोणास उपद्रव करवणार नाहीं, इतकें बरें आहे.

वडी॰पों॰— काय सांगों, तुझे दांड गाईस मी याक्षणीं पारिपत्य केलें असतें; पण अशा समयीं तुजवर पराक्रम करायास मला लाज वाटत्ये.

वडी॰सां॰— अतःपर हा आपल्ये सोबतीस योग्य नाहीं. चला आपण निघोन जाऊं.

धाक॰पों॰— मोरचीस परजणारे फांकडे शिपाई बाबा, रामराम, रामराम रावसाहेब. आम्हीं आतां येतों.

धाक॰सां॰— तुमचे हातून तें हत्यार कोणी काढून घेईपर्यंत आम्ही एथें येणार नाही; कां कि तुम्ही आम्हास फार भयंकर दिसता.

(ते जाताहेत तों वडील पोंवार त्यांस थांबवितो.)

वडी॰पों॰— आपण याचे बापास सर्व निवेदन करूं. नाहींतर अन्याय आपल्येकडे दिसेल.

वडी॰सां॰— तूं खरें ह्मणतोस. आपण त्यांस न पुसतां निघून गेलों तर ते आपणास काय ह्मणतील?

---

## बाळमित्र.

### प्रवेश १३

### संभाजीराव, गणपतराव, वडील पोंवार धाकटा पोंवार, वडील सांवत, धाकटा सांवत.

( संभाजीराव आले पाहून सर्व मर्यादेनें उभे राहातात. गणपतरावाची फजीती झाली आहे ह्मणोन तो एकीकडे जाऊन रडतो )

संभा०.- ( गणपतरावाकडे क्रोधयुक्त पाहून ) तुझें यांचे कारणें होतहोतें रावजी ( गणपतराव फुंदतो त्याच्यानें एक शब्द बोलवत नाहीं )

वडी० पों०.- रावसाहेब, कलह झाला याविशीं आह्मावर राग नकरावा. आह्मी कांहीं केलें नाहीं. आले घटकेपासून गणपतरावानें आमचा छळ जो मांडिला होता तो काय सांगावा.

संभा०.- स्वस्थ असा माझा मित्रानो, मी सर्व जाणतों. मी खोलींतून त्याचें सगळें चरित्र पाहात होतों. सर्व अन्याय त्याचा आहे. त्यांतही तो मशी कबूल झाला होता किं मी

त्याचा

चागला चालेन ह्मणोन तो विशेष अन्यायी. हा दांडगा हें मला फार दिवस ठाउक होतें; पण तेंच दांडगेपण कोणाचे परिणामास जातें हें मला पाहायाचें होतें, तें लक्षांत येतांच, मी तरवारीचें पात्त काढवून त्याचे ठिकाणीं पीस घालविलें; जें कोणाचे आंगावर पडलें असतां रक्त निघायाचें अगदी भय नाहीं. (चौघें मुलें मोठ्यानी हांसतात) .

वर्डी० पों०— पण आह्मा आगळीक करून त्याशीं अंमळ असर्यादेनें बोलिलो. त्याचें कांहीं आपल्ये मनांत येऊं नये ही आमची प्रार्थना आहे.

संभा०— त्या विषयीं तर मजवर तुमचे उपकार झाले. तुह्मी चांगलीं मुलें आहां, ह्मणोन हें तरवारीचें भूषण तुह्मास साजे. दाभू. माझी आठवण राहावी याकरितां मी ही तरवार पात्त घालवून तुला बक्षीस करितों. हिचा त्वां अंगिकार करावा. तुझे सारिख्यास ही योग्य आहे.

वर्डी० पों०— रायसाहेब. आपला थोरपणा पाहून आह्मी आनंद पावलों. आज्ञा द्याल तर आतां एथून जातों. आमचे एथें असणें गणपतरावजीस आज साहाणार नाहीं.

संभा०— नाहीं नाहीं, माझे जिवलगानो तुह्मी एथें असावें.

मी

## तरवार.

मी जवळ असतां माझा मुलगा तुमचें संतोषांत विक्षेप करूं पावणार नाहीं. तुह्मी सर्व एथें खेळा. माझी मुलगी तुह्मांकडे येऊन तुह्मास जें व्हावें तें पुरवील. चला मज संगतीं दुसरे दिवाणखान्यांत. (गणपतरावाकडे पाहून ह्मणती.) पोरा, तूं जर येथून हाललास तर खबरदार; एथें एकला राहून आपला वाढदिवस हावा तसा कर, तूं ह्मातारा झालास तरी तुझे आंगीं योग्यता येई पर्यंत, तुला तरवार मिळायाची नाहीं.

**( सर्व निघोन जातात. )**

# आवडी आणि मोरु.

काशीबाई ह्मणोन एक विधवा स्त्री होती; तिचीं दोन लेकरें, आवडी आणि मोरु; दोघेंही तिचे ममतेस योग्य होतीं; परंतु तिची प्रीत मोरुवर फार. आईस मोरु अधीक आवडतो हे लक्षांत येउन आवडीस दुःख होई, पण तिणें तें बाहेर दाखविलें नाहीं. ती रूपानें साधारण पण गुणानीं फारच उत्कृष्ट होती. पण तिचा भाऊ मदनासारिखा स्वरूप, त्यावर आईची रुची पडोन ती त्याचेंच लाड फार करी. प्रीतीनें त्याचे मुके वारंवार घेई. त्यावर कुळंबिणीहि धणिणीचा मर्जी पाहून त्याचा संतोष राखित. आईचे अप्रीतीमुळें, आवडीस कोणी गणीत नसत. तिला हावा तो पदार्थ मिळूं नये. अन्न वस्त्रादिक जें जरूर त्याचेहि तिला हाल पडत, ती एकांतीं जाऊन धायें धायें रडे; परंतु बाहेर कधीं आपल्ये दुःखाचें एक अक्षर बोलली नाहीं, किं तिणें असंतोषाचें चिन्ह दाखविलें नाहीं. आपण सुंदर नाहीं ह्मणून जो आपणावर आईचा अनादर आहे, तो तिचे मनांतून जावा ह्मणून आवडीनें नाना उपाय केले; वर्तावें तसें वर्तली; संतपणा-

नें

तें चालली; आज्ञेस जपली; परंतु व्यर्थ. जे डोळे बाह्य रंगास भुलले, त्यांची दृष्टी तिचे आंतले गुणाकडे पोहोंचेना. त्यागी तलें काम आवडी जीव तोडून करी. पण काशीबाईचे लक्षांत तें येऊंच नये. आवडी जन्मोन लागलाच काशीबाईचा भ्र्तार वारला, तेव्हांपासोन तिला तिचा वीटच आला. तिणें तिला नित्य गांजावें, आणि जे सुण मोठे बायकांतहि विरळा ते तीस नाहींत म्हणोन तीस शब्द लावावा.

अशी ती वाईट आई, एके समयीं दुखण्या पडली, तिची व्यथा पाहून मोरु फार विव्हळ झाला. तिची दीनवाणी सुखचर्या, काकुळतवाणी दृष्टी पाहून आवडीस वाटलें किं तिचा खाष्टी स्वभावांत अंतर पडलें. तें लक्षून तिणें भावा पेक्षां शतगुणित अधिक तिची सेवा आरंभिली. तीस जें जें व्हावें तें मागायास, तिला बोलायाचे श्रम पडतील, म्हणून आवडीनें आपल्या शाहाणपणानें शोधून काढावें, आणि त्याची तर्तुद ठेवावी. दुखणें भारी होतें तों तिणें तिची खाट सोडिली नाहीं. आईनें तिची विनवणी करावी, शेवटीं धाक दाखवूनहि सांगावें, तरी तिणें एक क्षणभर निद्रा घेऊं नये. शेवटीं काशीबाई बरी झाली, तेसमयीं आवडी स्वस्थ झाली. असें असतांहि आईनें पूर्व

प्रमाणें

## आवडी आणि मोरु.

प्रमाणें तिजसंगती कठोरपणा आरंभिला; तो पाहून आवडीस पुनः नवी चिंता उत्पन्न झाली.

एके दिवशीं काशीबाई मुलांसंगतीं आपल्या दुःखण्याच्या गोष्टी करीत बसली होती आणि ह्मणाली मुलांनो तुह्मी माझा फार समाचार घेतलात, मी तुमची उपकारी झाल्यें आहें: यासाठीं तुह्मांस आवडेल ती वस्तु माझें सामर्थ्य पाहून मागा मी देईन. तिणें मोरूस पहिल्यानें पुसलें "मोरु तुला काय पाहिजे" मोरु झणाला "एक काठी आणि चौकडा" ती ह्मणाली "तुला मी तें उद्यां सकाळीं देईन." "आणि आवडे तुला गो"? आवडी कांपत कांपत उत्तर करिती "काय! मला? मला? तूं मजवर प्रीत करिशील तर मला आणिखी कांहीं नको." आई ह्मणाली हें उत्तर नव्हे! मी तुला कांहीं बकशीस देणार तुला काय पाहिजे तें बोल लवकर?

आवडीस नित्य आईचें कठोर भाषण ऐकायाची सवय होती तथापि, ते समयीं, त्या शब्दानीं तिला फारच दुःख झालें. तिणें आईचे पाय घट्ट धरून ओंसबानीं न्हाणिलें. मग पाणी भरलेल्या डोळ्यानीं आईचे तोंडाकडे पाहून लागलेंच तिणें दोहों हातीं आपलें तोंड झांकलें, आणि

हळूच

हळूच हे शब्द बोलली " मला दोन मुके मात्र दे, जसे तूं प्रीतीनें मोरूस देतोस "

ते शब्द ऐकून आईचें कठोर हृदय लागलेंच विवळलें. मग तिला वेग देऊन उराशीं धरून तिणें मुक्यांच्या सुकाळ केला. आवडीला तो पहिल्यानेंच लाभ. तिणें ते समयीं आनंदांत निमग्न होऊन आईचे तोंडाचे, गालाचे, डोळ्यांचे उराचे हाताचे, पुष्कळपणें मुके घेतले.

तें पाहून मोरूसहि फार आनंद झाला. तोहि तिचे मुके घेऊं लागला. ते दिवशीं आईस असें झालें किं मी आज स्वर्ग सुखच भोगिलें आहे काय! अमृत पानच करिलें आहें काय! मुलांस असें वाटलें किं आई नव्हे, हा आमचा कोणी कल्पवृक्ष आहे. तीं जी जी इच्छा करीत ती ती आई तत्काळ पुरवी. याप्रमाणें तें कुटुंब त्या दिवसापासोन फार सुखी झालें. काशीबाईनें आवडीपासून फार दिवस प्रेमा आटोपून ठेविला होता तो तिला सव्याज दिला. आवडीनेंहि आईचे ठायीं नित्य नवा प्रेमा करून तिला संतुष्ट केलें. मोरूस हि त्या गोष्टीचा लवमात्र हेवदुःखा झाला नाहीं. बहीण सुखी झाली पाहून तो आनंद पावला. आईनें पूर्वी त्याचे अतिशय

यच

## आवडी आणि मोरु

पण लाड केले त्याणें त्याच्या मुळीच्या चांगला स्वभाव अंमळ बिगडला, आणि तो पुढें कांहीं वाईट गुण करूं लागला, त्यामुळें दोन चार वेळ आईची माया त्यावरून अगदीं उतरायाचा प्रसंग आला होता; पण आवडीनें त्याविषीं रदबदली करून त्यास सांभाळून घेतलें. तिणें त्यास वारंवार शाहाणपणाची बुद्धी शिकविली असावी. तेणेंकरून तो मुलगा मग चांगला झाला. आणि त्यां सिवांचेंहि अनुभवास पक्कें आलें किं भावां बहिणींची, माय लेकरांची, परस्पर ममता असल्यावांचून कुटुंबामध्यें वास्तविक सौख्य वसत नाहीं.

---

## कोकरूं

एका गरीब गांवढेकराची मुलगी लाडी, एके सकाळीं रस्त्याचे बाजूस बसली होती; तिचे हातीं दुधाचें भांडें होतें, व त्याबरोबर न्याहारीस कांहीं भाकर होती. तितक्यांत तिकडून एक धनगर गाडें भरून कोकरें विकायास नेत होता; तीं कोकरें

पाय

पाय बांधून एकावर एक रचिलीं होतीं; कितिकांचीं डोकीं खा-लीं लोंबत होतीं. तीं कोकरें त्या व्यथेनें ओरडत, तेणेंकरून तो सर्व प्रदेश गाजे. तें ऐकुन लाडीचें हृदय भेदलें. पण धणगराचे चित्तास कांहीं दया आली नाहीं. त्याणें आपल्ये खांद्यावरहि एक कोकरुं चालविलें होतें.

तो लाडीचे ओगाजवळ आला तितक्यांत त्यास खां-द्यावरील कोकरुं मेलेंसें वाटून त्याणें तें तिजकडे उडिवलें आणि ह्मणाला " मुली येहें तुला मी न्याहारीस दिलें. या रांडेच्यानें मरू-न मला दोन रुपायांचा चट्टा दिला." असें ह्मणून तो पुढें चालता झाला

लाडी आपली दुध भाकर सोडून देउन तत्काळ त्या कोकरास उचलून उराशीं धेऊन दयार्द्र दृष्टीनें त्याकडे निरखित्ये आणि ह्मणत्ये "रे कोकरा, मला तुझी दया कां येत्ये बरें ! आज ना-हीतर उद्यां तरी ते तुझा गळ्यांत सुरी भोसकलेच. तें भय तुला आतां राहिलें नाहीं" असें ती ह्मणत्ये आहे. इतक्यांत तिचे ओं-गाची उब लागून कोकरानें अंमळ डोळे उघडिले. आणि हात पाय हालवून बें असा हलूच शब्द केला. जसें कोणी ह्मणेल तें आईसच बलाविलें आहे. ते समयीं जो लाडीस आनंद झा-

ला

# कोकरूं

ला. तो कोण वर्णील ? ती त्या कोकरास परकरांत झांकित्ये; त्यावर आंगची चोळी काढून घालित्ये. त्याला अधीक ऊब यावयास मान मोडा पर्यंत लववित्ये. मोठ्या बळानें त्याचे नाका कानांत फुंका मारित्ये. नंतर तें हळु हळु हालूं लागलें. तेव्हां त्याचे प्रति हालण्यास ईच्छातुर आनंदानें भरून येई. मग तिणें भाकर मोडून दुधांत टाकिली; त्यांतील एक तुकडा घेऊन कोकराचें तोंड उघडून मोठे प्रयत्नानें आंत घातला. कोकरूं उपासानेंच मरावयास टेकलें होतें. त्यास तें अन्न पाहचतांच. अमळ शक्ती आली. मग तें पाय मोकळे करूं लागलें. घटकेभरें लागलेंच त्याला आपल्ये पायीं उभें राहायाची शक्ती आली. मग तें आपल्ये आपण लाडीचे दुधाचे भांड्याकडे गेलें. आणि त्याणें त्यांतली सगळी दुधभाकर खाल्ली, तें पाहून लाडी कौतुकानें हसली. दुसरी एक घटका गेली नाहीं तों तें लाडीपुढें नानाप्रकारीं नाचूं बागडूं लागलें

लाडीस आनंद होउन तिणें त्यास कवळून धरिलें आणि धांवत घरीं जाऊन आईस दाखविलें. त्यावेळेपासून त्याचें नाव बाबा ठेवून तिणें सर्वप्रकारें त्या कोकराचें ममतेनें पाळण केलें. तिला भाकर मिळे त्यांतली ती त्यास घालीत जाई; पाणी पिववी; कुरवाळी. आपले खाटेवर निजवी. ती ह्मणे

याचें

याचे बदल मला कोणी हजार मोहरें दिलीं तरी नको. तें बाबाहि लाडीचे उपकार जाणून तिजवांचून पाउल टाकीत नसे. त्याणें यावें आणि तीस चाटावें; तिचे हातावरून खावें. तिचे भोंवतें बागडावें. कधीं तिला त्यास न नेतां बाहेर जायाचें पडे, तेव्हां त्याणें ती येई तों करुणा येई असें ओरडत असावें.

याप्रमाणें लाडीनें त्या अनाथ कोकराचें दयाळूपणें पोषण केलें. त्याचें फळ तिला ईश्वरें लवकरच दिलें. बाबा मोठी मेंढी झाली, तेव्हां तिणें लाडीस पुष्कळ जाउपें दिलीं. त्याचाहि आणिखी विस्तार होत गेला; सारांश थोडक्याच वर्षांत लाडीचे सर्व कुटुंबास पिया पुरतें दूध, आणि नेसायास लोंकरीचीं पांघुरणें, हीं त्या बाबाचे संततीपासून भरपूर प्राप्त होत गेलीं.

# द्राक्षीखुंट

अवरंगाबादेमध्यें शिवराव ह्मणोन कोणी एक गृहस्थ होते. ते एके दिवशीं आपला मुलगा अनंत त्यास घेऊन बागेंत फिरत होते. तेथें अनेक प्रकारचे वृक्ष फुलले आहेत, कित्येकांस तुकतीच पालवी फुटली आहे, कित्येक हिरवेचार दिसताहेत. कित्येकांस पांढरा, कित्येकांस तांबडा, मोहोर आला आहे, असें त्यांणीं पाहिलें.

ते असेच पुढें चालत चालत बागेंतील बंगल्यापाशीं येऊन पाहों लागले. तेथें बंगल्याच्या समोर एक द्राक्षीचा खुंट होता. त्यास वेडे वांकडे पील पडले आहेत; त्यावर पान नांवास नाहीं; त्याचे वेडके फाटे अव्यवस्थितपणें इकडे तिकडे चाललें आहेत. तें पाहून अनंत बापास ह्मणतो "बाबा, पाहा हें भिकारी झाड! याचा एथें कायबरें उपयोग? तूं रामजीला सांगून याला तोडवून याचीं फांटीं कां करवीसना?"

असें ह्मणून तो त्या झाडास हिसके मारूं लागला; पण त्याचीं मुळें आंत गेलेलीं, तें त्याचे देवास उपडतें? त्यास शिवराव ह्मणतात "मुला तूं त्यास दुखवूं नको, मला तें तसेंच ठेविलें पाहिजे

पाहिजे; वेळ येईल तेव्हां मी तुला त्याचें कारण सांगेन.

**अनंत** — पण बाबा, त्याजवळ दुसरीं झाडें आहेत तीं पाहा कशीं फळ पुष्पानीं युक्त आहेत, हें तसें असतें तर मग ठेवावें हें नीट होतें. या दुसऱ्या शोभिवंत झाडांत हें फार ओंगळ दिसतें मी राम्यास सांगून तें उपडून टाकवितों परतें?

**शिवराय** — नको माझ्या लाडक्या, मीं तुला सांगतो किं, हें असेंच असोंदे; आणिखी तीन महिनेपर्यंत तरी असोंदे. पाहिजे तर मग उपडून टाक.

अनंत आग्रह करी किं तें उपडून टाकावें, बाप त्यास दुसऱ्या गोष्टीचा नाद लावी, असें होतां होतां अनंतास विसर पडून ती गोष्ट ते दिवसीं तशीच राहिली. एके दिवसीं शिवरावास कांहीं कामामुळें दूर गावीं जायाचें पडलें, तो चैत्रमास पर्यंत घरीं आला नाहीं. नंतर आला तेव्हां प्रथम तो मुलास समागमें घेऊन बागांत गेला.

ते दिवसीं उकाडा फार होत होता ह्मणून ते दोघे बंगल्याचे छायेस जाऊन बसले. ते समयीं अनंत ह्मणतो "आहा बाबा! काय ही छाया थंड आहे! काय हीं झाडें शोभा देतात! बरी आठवण झाली: आपण तो ते दिवसचा खुंट आज

उपडून

## द्राक्षीखुंट

उपडून टाकूंया; आणि त्या ठिकाणीं हें सुंदर झाड दिसतें आहे हें लावूं. याचीं फळें काय रम्य दिसतात ! कांहीं जांवळीं, कांहीं अगदीं काळीं. इतक्या सगळ्या बागांत या सारिखें देखणें झाड मला दुसरें दिसत नाहीं. दुसरे झाडांवर आतां फळें दिसत नाहींत पण हें पाहा कसें सर्वांगीं झांकलेलें आहे. त्या पानांमागें घुड कसा चांगला दिसतो आहे ! याचीं फळें सुंदर दिसताहेत, तशींच गोड आहेत किं नाहीं, हें मला पाहायाचें आहे.

शिवरावानीं त्यास त्यांतून एक द्राक्ष तोडून दिलें. तें चाखून त्यास अधिकच आनंद झाला; मग जेव्हां त्याचे बापानें त्यास सांगीतलें किं ते दिवशीं तूं उपडून काढायास उभा राहिला होतास त्या ओंगळ खुंटाचीं हीं फळें, यांस द्राक्षें म्हणतात. तेव्हां त्यास बहुतच आश्चर्य झालें. त्यास बाप म्हणाला, "मुला आतां तुझी इच्छा असली तर मी माळ्यास बलाऊन याचीं जाळायास फांटीं करवितों".

अनं०— नाहीं बाबा नाहीं, असें करूं नको. हावीतर त्याणें दुसरीं सगळीं झाडें तोडावीं. पण हीं द्राक्षें मला फारच आवडतात.

शिव०— तर आतां पाहा, किं तूं सांगत होतास तें मी ऐकिलें नाहीं ह्मणून चांगलें झालें. तुला तें झाड पाहून जसें वाटलें असेंच लोकांस वाटत असतें.

कोणी मुलगा वस्त्रहीन, बाहेरून दिसण्यांत ओंगळ, असा आपण पाहिला, ह्मणजे त्याची आपण अवगणना करितों. आणि त्याचे अवस्थेशीं आपली अवस्था लावून आपण मोटे मनुष्य असें मानून गर्वानें फुगतों. कोणे वेळेस आपण त्यास कठोर वचनेंहि बोलायास सोडीत नाहीं. तर मुला असें जेथें दृष्टी पडेल तेथें उतावळी होऊन एकाएकीं निश्चय करूं नको; कोणजाणे तें ओंगळ शरीर थोरा जीवाचें बिराड असूं शके, किं जो जीव आपल्ये सदाचरणानें, पुरुषार्थानें, एकादे दिवशीं विश्वास आश्चर्य करायास लावील, किंवा आपल्ये ज्ञानानें लोकांचें अज्ञान दूर करील. तो सांप्रत वांकडा खुंट आहे पण पुढें उत्तम फळांनीं फळूं शकेल.

*

# खोत.

एके दिवशीं प्रातःकाळीं दौलतराव आपल्ये खोलींत मोठे कामांत होते तों, चाकर सांगत आला किं माहादजी खोत बाहेर दरवाजाशीं आला आहे, तो भेटायास इछितो. दौलतरावानीं सांगितलें कि त्यास प्रार्थून अमक्या दिवाणखान्यात बशीव; पत्र पुरतें करून मी हा येतों. चाकरानें खोतास दिवाणखान्यांत आणिला; ते वेळेस रामराव, कृष्णराव, व सावित्रीबाई, दौलतरावाच्ची मुलें तेथें होतीं. तो आंत जातांच त्याणें त्यांस पृथक् पृथक् रामराम केला, परंतु कुळंब्याचे नमणें म्हणजे आडाणी; त्यास उभें कसें राहावें, कोणत्ये रीतीनें हात वर करावा; कि मस्तक कसा खालवावा, हे संभावितपणें ठाऊक नाहीं. ते तीघे मुलगे त्याची थट्टा करून एकमेकांकडे पाहून हातानें तोंड झांकून हसूं लागले. ते त्याजवळ आले त्याचा पोशाग नीट निहाळून पाहूं लागले. नंतर एकमेकांचे कानाशीं लागून मोठ्यानीं हंसले. कुळंब्यास तीं मोठी लाज झाली. शेवटीं रामरावानें चेष्टेची पराकाष्ठा एथवर केली कि तो माहादजीचे सभोंवताला फिरला, आणि नाक धरून आपल्ये

ल्ये भावास विचारिलें. कृष्णराव, "एथें खताची घाण येते असें तुला वाटत नाहीं ?" मग त्याणें निखारे वाळून धुपाटणें आणिलें, त्यावर ऊद टाकून ती घाण घालवायास दिवाणखानाभर फिरला. नंतर पोऱ्यास हाक मारून सांगितलें किं तो मनुष्य आला आहे त्याचे पायांची धूळ सतरंजीस लागली आहे ती झाडून काढ. ती भावाची चेष्टा पाहून इकडे कृष्णराव कुशीस वळून खदखदा हसला.

सावित्रीबाई त्यांची बहिण अंगीच होती; तीस तें रुचलें नाहीं. तिणें भावास शब्द लाविला, आणि खोतास राग येऊं नये ह्मणून ती त्याची समजाविशी करूं लागली. तिणें त्याला खालीं बसविलें, आपल्ये हातीं पान सुपारी दिली. चांगल्या मिरचीं तंबाखू पुढें ठेविली. त्याची काठी बाहेर ठेविली होती ती आपण स्वतः आणून त्याचे जवळ ठेविली. इतक्यांत दौलतराव आंतून आले त्यांणीं त्यापाशीं येऊन मित्राप्रमाणें त्याला हातीं धरून आपल्ये जवळ लोडाशीं बसविला. त्याचे मुलां माणसांचा समाचार पुसून येण्याचें कारण विचारिलें. त्याणें उत्तर केलें " मी माझा सामाजी हला भरायासाठीं आलों आहें " तेथेंच त्याणें मोहरांनी भरले-

ला

## खोत.

ला कमरेचा कसा काढिला आणि दौलतरावासमोर रिकामा केला आणि ह्मणाला मुदतीवर चार दिवस अधीक गेले ह्मणोन रावजीस विषाद येऊं नये. परवां पाऊस मोठा पडला त्यामुळें ओढ्याङ् चारदिवस उतार नव्हता, त्याकरितां दाणा बाजारास ओपून टाकायास माझानें नेववला नाहीं.

दौलतराव ह्मणाले "खोतजी, तुह्मविषयीं माझें मनांत कधीं वांकडें यावयाचें नाहीं; तुह्मी प्रमाणिक मनुष्य आहां, मी जाणतों, मुदत भरली ह्मणून तुह्माकडे शिपाई पाठवायाचें काम नाहीं." दौलतराव त्या मोहरा गादीवर मोजिताहेत त्यांची चकचकी पाहून रतनभवसांतलीचे तोंडाकडे पाहिलें, आणि मनांत आणितो हा कोण मोठा मनुष्य आहे.

मोहरा मोजून झाल्यावर खोतजीनें मुलाकरितां खाऊ ह्मणून कांबळींतून पुडी काढिली, तींत कांहीं ककड्या, फणसपोळी, आंबेपोळी, व सुकविलेले अंजीर, असें होतें. तीं दौलतरावाचे पुढें ठेवून ह्मणूं लागला "रावजी, माझी एक इच्छा आहे, ती कृपा करून पुरवावी, कीं एके दिवशीं आपण मुलां सहवर्तमान माझे गांवा येऊन मला आनंद करावा. माझी बैलांची गाडी घेऊन मी स्वतां तुह्मास न्यावयास येईन"

दौलतरावानीं बरें ह्मटलें आणि त्यास जेवायास राहाण्याविषयीं फार आग्रह केला. खोत ह्मणाला क्षमा करा. मला शहरांत लोकांशीं पुष्कळ सादीं मारायाचीं आहेत; आणि घरीं लवकर गेलें पाहिजे. दौलतरावानीं खोतजीचे मुलांकरितां मनुका, बदामें, खडेसाकर, याचा पुडा करून दिला. नंतर खोतजीस सत्कार पूर्वक दरवाज्यापर्यंत पोहोंचवून त्याचा निरोप घेऊन मागें परतले.

खोतजी गेल्यानंतर सावित्रीबाईनें, भावांचे तोंडावर त्यांणी खोताचा अपमान केला तो बापास सांगीतला. दौलतरावानीं तें ऐकून त्यांवर फार राग केला. आणि सावित्रीस शाबासकी दिली. तिला उचलून तिचा मुका घेऊन ह्मणाले, "भले माणसाशीं कसें चालावें हें माझ्या बेटा तूं चांगलें जाणत्येस".

नंतर खोतानें दिलेली पुडी त्याणें उघडिली. त्यांतले कांहीं अंजीर व सुकेळीं मुलगी व आपण मिळून खाल्लीं; रामराव कृष्णराव जवळ होते पण त्यांस दिलीं नाहीं. ते पदार्थ पाहून त्यांचे जिभेस पाणी सुटलें, ते मिटक्या मारूं लागले; पण तें दौलतरावानीं लक्षांत आणिलेंच नाहीं. त्याणें

पुनः

पुनः सावित्रीची प्रशंसा केली. आणि तिला उपदेश केला किं चाईट वस्त्रावरून कोणास हंसावें हें हलक्येमनुष्याचें काम. जर आपण उंच वस्त्रावरून कोणास मोठा मनुष्य मानिला तर तो वस्त्रास मान दिला असें होतें. स्यात त्याचे धारकास काहीं नाहीं. जे साधीं चिरगुटें घेतात, ते प्रायशः प्रमाणिक पुरुष असतात; त्यास दृष्टांत त्या खोतजीचाच. तो मेहनतकरून आपल्ये बायको लेकरांच्यें पोट भरितो; वेळचेवेळेस करारामाणें हप्ता भरायास कधीं चुकत नाहीं; असें मी आज सतत पांच वर्षें पाहातों. मुली, हा जर असा प्रमाणिक नसता तर तुझा आणि तुझे भावांच्या खर्च माझानें चालवताना; कां किं याचापासून जो पैसा येतो त्याणें तुमचें अन्न वस्त्र आणि शिकणें होतें"

असें भाषण करून राहिलेला खाउ दौलतरावानीं फडताळांत कुलुप लावून ठेविला; रामराव आणि कृष्णराव त्याचे मागून मागून आशे भरलेले गेले, त्यांस बाप ह्मणाला "तुह्मी समजत असाल किं बरें आतां नाहीं तर संध्याकाळीं तरी यांतलें कांहीं आह्मास मिळेल तर मी निक्षुण सांगतों तुह्मी याची आशा अगदीं सोडा. तुमचे भलेपणाविष-

यीं

या खोतजीची खात्री झाली ह्मणजे तोच तुह्मास कांहीं पाठवून देईल".

राम० — पण बाबा, त्याचे आंगास घाण येत असली तर त्यांत काय माझा अन्याय ?

दौल० — त्याचे आंगास कसची घाण येत होती ?

राम० — शेणाचे उकिरड्याची. इशरे ती सोसवेना मला.

दौल० — त्याणें ही घाण कोठून आणिली असावी बरें ?

राम० — मला वाटतें किं तो शेण भरीत असतो.

दौल० — असें काय ? तर शेण भरल्यावांचून त्याणें कसें करावें ?

राम० — त्याणें– त्याणें— त्याणें——

दौल० — मला वाटतें किं त्याणें भुईस खत अगदींच घालूं नये.

राम० — तोच एक उपाय दिसतो.

दौल० — जर खत नाहीं घातलें तर पीक चांगलें कसें येईल ? पीक वाईट आलें तर त्याचानें मला खामिस कसें देववेल.

रामराव पुढें कांहीं बोलता पण बापानें जे डोळे केले त्यांत त्यास बापाचा राग स्पष्ट दिसोन आला ह्मणून तो उगीच राहिला. त्यावर आठ दिवस गेले, माहादजी खोत पुनः आला,

आणें

त्याणें दौलतरावास मोठी भीड घातली कीं आज आपल्ये पाय माझे घरीं लागावे.

दौलतरावानें त्याचे आवडीकरितां बलात्कारें घेतलें. तेव्हेळीं रामराव कृष्णरावानी आपली मोठी काकलुत केली कीं आह्मास बरोबर न्यावें; आह्मी तेथें मोठे विनयानें चालुं. मग दौलतराव त्यांची प्रार्थना ऐकून त्यासहवर्तमान खोतजीचे गाडींत बसला. खोतजीनें गाडी हाकलून हां हां ह्मणतां आपल्ये घरीं नेलें हें त्यांस समजलें देखील नाहीं. गाडीच्या शब्द ऐकून खोताची बायको सोनुबाई लवकर बाहेर आली आणि तिणें आंगण्याच्या दरवाजा उघडिला. त्यावेळेस तिला आनंद झाला आहे तो कोण वर्णील! तिणें मुलास गाडीतून खालीं घेतलें एकेकास आलिंगन दिलें, मुके घेतले, आणि त्यांस घरांत घेऊन गेली, तेथें तिची मुलेंहि शृंगारून यांची वाट पाहात बसलीं होतीं. त्याणीं मोठे प्रीतीनें मोठे नम्रतेनें त्यांचें आगत स्वागत केलें. मग खोतजीनें दौलतरावास माडीवर नेलें, तेथें द्राक्षें, लिंबें, चकोत्रे, अननास, डाळिंबें, केळीं, अंजीर, पेरू, अशीं नाना प्रकारचीं फळें, व गुलाब, मोगरा, जाई, कुंद, शेवंती, चांपा, अशीं फुलें,

आधींच आणून ठेविलीं होतीं. पाणी स्फटिकासारिखें निर्मळ, अमृतासारिखें गोड, खडीसाकर, बदाम, पिस्ते, निंबाचें सरबत, होतें. दौलतरावांनीं अंमळ स्वस्थ होऊन मुलांसहवर्तमान त्यांतलें कांहीं खाल्लें, आणि समाधान पावले. खोतजाचीं भांडीं सोन्यारुप्याचीं नव्हतीं, तांब्यापितळेचींच होतीं, पण स्वच्छ लकलकीत होतीं. ज्यावर पदार्थ वाढले होते तीं ताटें नव्हतीं, केळीच्या आगोथल्या होत्या; तें पाहोन रामराव कुशीस होऊन कृष्णरावाकडे पाहून गालीं गालीं हंसतो; कृष्णरावही त्याकडे पाहून हळूच हंसतो, तें खोतजीच्या लक्षांत येऊन तो ह्मणाला, रावजी, तुह्मी आंपल्ये घरीं रुप्याच्या ताटांत पदार्थ भक्षितां तसें एथें नाहीं खरें, पण आह्मीं गरीबांनीं भक्तीनें तुह्मास अर्पण केलें आहे, तें गोड करून घ्यावें.

मग फळाहार झाल्यावर अंमळ वाडींत इकडे तिकडे फिरले. तों जेवणाची वेळा झाली. जेवणही साधें, स्वच्छ आणि मिष्ट होतें. तें पदार्थ भक्षून मुलांस वाटलें किं आह्मी असे रुचीनें कधींच जेवलों नव्हतों. दिवस उष्णकाळचे होते; वायू मंद सुगंध शीतल वाहात होता; त्याच्या योगानें दौलतरावास डुलकी आली; मग अंमळ वामकुक्षी

करून

करून ते खोतजी आणि आपण वाड्या शेतें डोंगर सर्व ठिकाणीं फिरायास गेले, तेथें बहुत आनंद पावून पुनः बिऱ्हाडीं आले. इकडे सोनाबाईनें जेवणानंतर आपल्या, व दौलतरावांचे मुलांस संगातीं घेऊन त्यांस सर्व घर दाखविलें, गुरांचा वाडा, घोड्यांची शाळा, बकरीं, मेंढरें, ढरणें, अशीं दाखवून एक चिमणें कोकरूं त्यांस खेळायास दिलें; पुढें खबूतरें दाखविलीं. त्यांचे पिलांस त्यांच्या आया चारा घालीत, तीं चाऱ्याकरितां किलबिल [illegible] करीत. पुढें नेऊन दाहावीस मधीचीं पोळें दाखविलीं; त्यांतल्या माश्या बाहेर जाऊन मध घेऊन येऊन त्यांत ठेवितात, असा उद्योग चालला होता तो सर्व तिणें त्यांचे दृष्टीस पाडिला. तें दाखविल्यावर आणिखीहि दुसरे गांवचे पदार्थ तिणें त्यांस पुष्कळ दाखविले.

त्यांतले बहुतेक चमत्कार दौलतरावांचे मुलांनीं पूर्वीं कधीं पाहिले नव्हते, म्हणून त्यांस फार आनंद वाटला. तीं म्हणों लागलीं कीं फिरोन एकवेळ फेरा करून येऊं. इतक्यांत घरांतून निरोप आला कीं मुलांचें जेवण सिद्ध झालें आहे, तो येतांच सोनाबाईनें त्यांस नेऊन पुनः यथेष्ट जेऊं घातलें.

नंतर खोतजीनें आणि त्यांचे वडील मुलानें. विष्णु सारं-

गी

शी लावून अंमळ गायन केलें. धाकट्यांनींहि कांहीं पदें ह्मटलीं. तें ऐकून दौलतराव फार प्रसन्न झाले.

खोतजी वाद्यें गवसणींत घालित आहेत तों दौलतराव आपल्या मुलांस ह्मणतात; रामराव कृष्णराव अमळ तुह्मीहि गावें. असें ह्मणतांच ते गोंधळले, तें पाहून सर्व हंसूं लागलीं.

नंतर दौलतरावांनीं गाडी तयार करावयास सांगीतलें. खोतजीनें ती रात्र राहाण्याविषयीं दौलतरावांस फारच आग्रह केला, त्यांणीं क्षमा करा माझानें राहावत नाहीं असें ह्मणोन जायाचाच निश्चय केला. नंतर गाडींत बसून चालले आहेत तों मार्गांत दौलतराव पुसतो, का रामराव ? आज तुह्मास कसें वाटलें ?

राम० — फार बरें बाबा. तीं माणसें फार भलीं आहेत. त्यांणीं आह्मांस फार आनंद केला.

दौल० — तुह्मास आनंद वाटला यांतच मी समाधान पावलों. पण जर खोतजीनें आपले सत्कारास इतका श्रम नसता घेतला, फार त्याणें तुह्मांस अगदींच कांहीं खावयास नसतें दिलें, तर तुह्मास असा आनंद होता ?

## खोत

राम० – नाहीं होता, यात काय संशय.

दोल० – मग तो मनुष्य तुला कसा वाटला असता ?

राम० – वाईट; गव्हार वाटला असता.

दोल० – असें ? तर तो मनुष्य ते दिवशीं आपल्ये घरीं आला होता, ते वेळेस तूं त्याला खावयास कांहीं दिलें नाहींस, तें नाहीं तर नाहीं, पण उलटा त्याचा खेळ केलास, तर आतां सजन कोण तूं किं तो ?

राम० – (लज्जित [illegible]) आपला सत्कार करावा हा त्याचा धर्म होय कांकिं त्यास आपल्ये जमीनीपासून मिळतें.

दोल० – मिळतें कसें ?

राम० – आपल्ये जमीनीत दाणा, कडबा, फळ फळावळ, उत्पन्न होतें तें सगळें [illegible]

दोल० – खरें सांगतोस. खोतास या सर्वांचा उपयोग होतो. पण तो सगळ्ये दाण्याचें काय करितो ?

राम० – त्याणें तो आपल्ये आपल्ये बायकोचें आणि मुलांचें पोट भरितो.

दोल० – आणि कडब्याचें.

राम० – तो तो आपल्ये बैलांस खावयास घालतो.

दोल०

दौल०– आणि बैलांचा तो काय उपयोग करितो

राम०– त्यांस तो नांगरास लावितो .

दौल०– बरें तर हें इतकें उत्पन्न जमीनीचें जमीनीकडेस लागलें; पण तुला खरें वाटतें कि बाकीचें राहिलें तितकें सगळें त्याचे कुटुंबास आणि बैलांस लागतें ?

राम०– त्यांतला विभाग कांहीं गाई म्हैशीसही मिळतो.

कृष्णा०– कांहीं मेंढ्यांसहि .

दौल०– तें खरें, पण जितकें उत्पन्न होतें तितकें सगळें तीं खातात काय ?

राम०– नाहीं. त्यांतील कांहीं भाग विकून पैका करितों असें तो म्हणत होता

दौल०– आणि त्या पैक्याचें तो काय करितो ?

राम०– मी थोडक्ये दिवसावर पाहिलें कि त्याणें एक पिशवी भरून पैका आणून तुला दिला .

दौल०– यावरून पाहा कि माझे जमीनीचे उत्पन्नांतून मला ? पीक मिळतें कि खोतास: कडबी बैलांकडे जात्ये हें खरें, पण तो खर्च गुरें जमीन खेडून पुनः परत करितात, गाई, म्हैशी, मेंढरें, यांचे शेणाचें खत होतें, तेणेंकरून पीक अधीक होतें.

त्या पो

# खोत

त्याची बायकापोरें जें खातात तितकें शेतांत कामकरून ती फेडि तात, तीं बेणतात, पेरतात, कापनात, झोडतात, व मळणी काढितात.

आणि ही सगळी मजूरी माझेच नफ्यास पडल्ये ? बा- कीं राहिलें तें तो मला पैसे द्यायाकरितां बाजारांत नेउन विकतो. आतां त्यास कांहीं त्यांतून राहात असेल असें ह्मटलें तर, तो इतकी मेहनत करितो त्यास कांहीं नको ? यासाठीं एकवेळ आ- णिखी तूं मला सांगकिं, आह्मा दोघांमधून अधीक उसन्न कोणा- स भोगतें ?

**राम०** – आतां मी उघड समजलों: तुला अधीक भोगतें.

**दौल०** – तर हा खोत नसता तर [illegible] नफा होता ?

**राम०** – का ? हा [illegible] खोत गावांत आहे काय ?

**दौल०** – खरें [illegible]. पुष्कळ आहेत. पण यासारि- खे भले नाहीत. मागें मी दुसऱ्या एकास खोती दिली होती. त्याणें जमीन खराब्यास आणिली. झाडें तोडिलीं. घर बं- ला पडोयास झालें. सामाशी हसा त्यापासून मला पोहोंचू नये. त्याविशीं त्यास बोललों तर तो चोरव हिशेब दाखवी किं त्याची सर्व आवनें विकलीं तरी माझा फडशा होउं नये.

**राम०** – तो लुच्चा असें करीना ?

दौल० – तर हाही मनुष्य त्याच प्रकारचा असता तर मग म ला नफा होता ?

राम० – नाहीं.

दौल० – यासाठीं मला जें मिळतें तेणेंकरून मी उपकारी कोणाचा होतों ?

राम० – या भल्य खोताचा

दौल० – तर असाजो मनुष्य आपल्ये उपयोगास पडतो, त्याचा आदरसत्कार आपण चांगलपणें करावा हें आपल्यास योग्य नव्हे ?

राम० – बाबा, तूं माझी चूक मला स्पष्ट दाखविलीस. इतकें ह्मणून कांहीं पळें ते उगेच होते. नंतर दौलतरावानीं पुनः बोलणें आदरिलें. ते ह्मणाले, रामजी तुजला तेथें सारंगी कां वाजिवली नाहीं.

राम० – ती मला वाजवायास येत नाहीं.

दौल० – तर खोताचे मुलांस असें कांहीं येतें आहे किं जें तुह्मा स येत नाहीं.

राम० – तें खरेंच. पण मला संस्कृत येतें तें त्यास कोठें येतें ?

रवोत.

**दोल०** - आणि तुला शेत नागरायास कोठें येतें ? तुला दाणा पेरतां येतो ? झाडाचीं कलमें करितां येतात ?

**राम०** - तें शिकायाचें मला काम नाहीं. मला कांहीं कुळंबावा करायाचा नाहीं.

**दोल०** - जर पृथ्वीवर सगळीं मनुष्यें संस्कृत शिकलीं तर पुढें कसें होईल ?

**राम०** - वाईट. मग आम्हांल्याला दाणा शाख भाजीहि मिळणार नाहीं.

**दोल०** - कोणी एक संस्कृत शिकलें नाहीं तर त्यावांचून चालेल कि नाहीं ?

**राम०** - मला वाटतें चालेल.

**दोल०** - तर आतां जो आपला संवाद झाला याची जन्मवर आठवण ठेव. किं हा रवोत ज्याचा पोशाग जाडा आहे आणि जानें तुला अनाडी रीतीनें नमन केलें, हा तुझेपेक्षां अधीक चांगला: तुझेपेक्षां अधीक जाणता; आणि मातब्यानें अधीक उपयोगी गोष्टींचा जाणता. यावरून तूं पाहा कि जाडे चिरगुटांवरून किंवा साधे भोळे रीतीवरून कोणाची अवगणना करणें हा किती अन्याय आहे.

# बापांची समजी.

नाटक.

एक अंकी

## पात्रें.

नारायणराव.

| | |
|---|---|
| चिंतोबा. | त्याचा मुलगा. |
| भागीरथी. | त्याची मुलगी. |
| शिवराम. | गांवचे वाण्याचा मुलगा. |
| गहिना. | त्याची विहीण. |

## स्थळ.

नारायणरावाची वाडी.

## प्रवेश १

नारायणराव. भागीरथी. चिंतोबा.

भागी०— काय बाबा, काय आज्ञा ?

## बापांचीसमजी.

नारा० — मी तुला फिरून एकवेळ सांगतोंकिं, तुह्मी कोणी आजपासून त्या बाण्याचे मुलांशीं संबंध ठेविलात तर मी फार रागे भरेन.

भागी० — विठ्ठलशेटीवर इतका तुमचा राग कां बरें ?

नारा० — तें तुला विचारायास अधिकार नाहीं.

चिंतो० — नाहीं खरेंच. तें तुला आह्मी विचारूं नये. ( भागीरथीस ) अग माझा बाबा तुला आज्ञा करील ती निमुटपणें ऐक; त्यास कां ह्मणून उलटून पुसूं नको.

नारा० — हाच माझा अभिप्राय, कीं विठ्ठलशेट मोठा दांडगा, अनुपकारी, कृतघ्न आहे. त्या या गांवचे धन्यानें त्याजपाशीं एक गोष्ट मागीतली असतां त्यानें नाहीं ह्मणावी ! जो आज माझे गांवीं राहून श्रवी झाला आहे त्याणें !

चिंतो० — हें मोठें वाईट बाबा, तर असल्यांचे मुलांशीं आह्मी आजपर्यंत मैत्रिक केली हें ठीक नाहीं केलें; खरेंच. शिवरामासारिखा संवगडी दुसरा एकच मुलगा जरि मला या गांवांत असता, तर मी शिवरामाशीं एक शब्द बोलिलों नसतों.

भागी० — तूं एकितोसना भाउ काय ह्मणती तें —— शिवराम आणि गहिना फार चांगली मुलें आहेत. आहा ! त्यां सारिखी

आह्मी

आह्मी असतों तर काय पाहिजे होतें !

नारा० — तीं बरीं असोत किंवा वाईट असोत त्याचें मला काय ? मी तुह्मांला आणिखी एकवेळ सांगतोंकिं त्याशीं तुह्मी चकारशब्द बोलूं नका. बोललींत तर तुह्मास घरांत अडकवून ठेवीन.

चिंतो० — शिवरामास या वाडीचे दरवाजावरि येउंदे ! मग मी त्याला सांगेन काय आहे ते !

नारा० — तूं त्याला काय करशील ? त्याचा अपमान करूं नकोहो त्यास वाईट बोलूं नकोहो.

चिंतो० — (अंमळ गोंधळला) माझा तसाच अभिप्राय. पण मी त्यास आपल्ये वाडीचे आसपास शंभर हातांत येउं देणार नाहीं.

भागी० — बाबा, विठ्ठलशेट असा मनुष्य असतां तूं त्याशीं इतकी मैत्री बाळगीत होतास ! तूं त्यास प्रमाणिक, जाणता, भला ह्मणून मानित होतास, त्वां पंतोजी ठेविल्याचे आगोदर कुंकटावारी त्याणें भाऊस मोडीचें शिकविलें, हें तुला स्मरत असेलच. आणि पला मूळाक्षरांपासून त्याची शिक्षा.

नारा० — तें सर्व असेल, पण आतां या प्रकरणीं तूं त्यासंबंधी एक शब्द काढूं नको. मी त्याशीं बोलणें वर्ज केलें, तसें तुह्मी त्याचें सुलांशीं करावें. काय. तुला रडें आलें. आंसवें पूस पाहुं ती

भा॰ ग्री

## बापाची समजी

माझें सांगीतलें करायास तुला इतकें अवघड पडतें नाहीं ?

भागी० – तसें नाहीं बाबा. त्याचा माझा फार दिवसांचा स्नेह ह्मणोन अवघड वाटलें, त्याची तूं मला क्षमा कर. येन्हवीं तुझी आज्ञा ऐकण्यात मी भाउस हारीं जाणार नाहीं.

चिंतो० – पाहुं या आतां कोण हटतें तें.

भागी० – बाबा, तूं ह्मणशील मी त्याचा द्वेष करावा तर तें माझे हातीं नाहीं; माझे मनांत तसें येणारच नाहीं.

नारा० – त्याचा द्वेष करूं नको, आणि त्यास उपद्रवहि करूं नको. माझी आज्ञा इतकीच कि त्याशीं संबंध तोडून टाका.

भागी० – तुझे मर्जीप्रमाणें मी करीन. पण मला एक गोष्ट सांगायाची आहे.

नारा० – काय ती ?

भागी० – कि तुझी आज्ञा मला त्यास सांगीतली पाहिजे यासाठीं, त्याशीं एक वेळ बोलायाचें पडेल तें मला वाटतें.

चिंतो० – कशास ? आतां त्याशीं आपल्यास काय करायाचें आहे ?

नारा० – खरें ह्मणालीस, तूं त्यांना वर हेंहि सांग कि जर त्यांचे बापानें तीहीं दिवसां आंत पैसे दिले नाहीत, तर तो मग पस्तावेल.

भागी०

भागी० — विठ्ठलशेटीनें तुझें कांहीं देणें आहे ?

नारा० — तुला वाटतें कि देणें नसतें तर मी असें बोलतों ? प-
ण तें तुला मनास आणायाचें कांहीं प्रयोजन नाहीं. सांगीत-
ली आहे ती आज्ञा ऐक. (तो बाहेर जातो)

---

## प्रवेश २

### भागीरथी चिंतोबा

भागी० — भाउ, शिवरामाशीं आणि गहिनेशीं तुझी मैत्री अशी-
च ना ?

चिंतो० — ताई, तूं बावाची आज्ञा अशीच पाळत्येस ना ?

भागी० — तूं आज्ञा पाळणाराचा डौल मात्र घातला आहेस; आंत
तुझें सगळें कृत्रिम आहे. तूं आर्जव संपादून बाबापासून कां-
हीं पैसे काढायास पाहातो आहेस. पैशावांचून तुला दुसरें का-
हीं आवडत नाहीं.

चिंतो० — मी कधीमधीं बाबाची आज्ञा मोडित असतों, म्ह-
णून काय इतकी निक्षुण मनाई झाली असतांहि, मी त्यां पोरा-
कडे जावें, अशी तुझी इच्छा आहे ?

# बापांची समजी

भागी०— त्यांची मैत्री तोडायास तुला कांहींच अवघड वाटत नाहीं तर तीस तूं योग्यच नव्हेस. दुसऱ्यापासून तुला कांहीं मिळाया-ची आशा सरली ह्मणजे तुझी ममता लागलीच उडत्ये.

चिंतो०— आतां, तसल्ये भिकारी पोरांनी मला फार द्यायावें होतें; खरेंच.

भागी०— तर तुकते आठ दिवस झाले गहिनीपासून तूं मोतशिं-पाची डबी कशास घेतलीस ? आणि शिवरामापासून कालचे-दिवसींच तूं मोठे सुरेखें सरी कातर कशास काढिलीस ? शेंकडो वेळ तुला त्यांपासून खजूर खारीक खाउ मिळाला असेल आ-णि आतां——

चिंतो०— आणि आतां मी बापाची आज्ञा ऐकणार. पण खरेंच गड्या बाप्याचीं मुलें सोबतीस चांगलीं होतीं !

भागी०— समजलें बाबा, लांब कशाला, आजच संध्याकाळ झाला नाहीं तंव तुझें कोणे गावचे हेंड्रे मुलांशीं जुगलें ह्मण.

चिंतो०— खरेंच, त्यांची मैत्री तुटली ह्मणून त्यांत माझा काय तो-टा व्हायाचा होता ?

भागी०— त्यांत त्याचा तरी काय तोटा व्हायाचा होता.

चिंतो०— जोरे मी त्याची परवा करीत नाहीं. पण हा शिव

राम येतो आहेसें वाटतें. त्यास तूं सांग किं माझे जवळ येऊं नको.

भागी०- तूं त्याला पाहायास इछित नसलास तर एथोन जासना-का?

चिंतो०- मी त्यास पाहूंहि इछित नाहीं. आणि मी एथून जाणार-हि नाहीं.

---

## प्रवेश ३

### भागीरथी, चिंतोबा, शिवराम.

(हातांत एक निळा रंगलेला झांकलेला पिंजरा घेऊन)

शिव०- (भागीरथीस) आहा! काय आनंद झाला आहे मला तुला पाहून.

चिंतो०- गड्या शिवरामा, त्या लाहानग्येंं पिंजऱ्यांत काय रे आहेतें.

शिव०- तें मला भिंवजीनें काल नजर केलें.

चिंतो०- आणि तूं तें मला नजर करायास आणिलें आहेस वाटतें?

भागी०- (ऐकीकडे) भंगल भावार्थी!

शिव०- मी तें भागीरथीसाठीं आणिलें आहे.

भागी०

## बापांची समजी.

भागी० — मला! नकोनको, मला नको. तुला नजर केलें आहे तें मी घेणार नाहीं. पण तें आहे काय ?

चिंतो० — (धट्टाईनें) आण इकडे काय आहे तें मी पाहातों. (शिवरामाचे हातांतून ओढितो, तो गच्च धरून ठेवितो) एखादा ओंगळवाणा पक्षी असावा.

शिव० — तुझानें सांगवलें नाहीं. तूं जिंक भारथी. पण मी तुह्मास भ्रांतींत ठेवित नाहीं, यांत चंडोल आहे. आहा! काय खासा पक्षी! (तो पडदा उघडोन तीस दाखवितो आणि पिंजरा तिचे हातांत देतो)

चिंतो० — (वाईट वाटून) ईश्वरे! काय भेट आणिली आहे! त्याचे आंगास खंडीभर तर घाण येते आहे.

भागी० — आहा! काय चांगला पक्षी! कसा सुंदर दिसतो!

शिव० — दुसरा मिळाला तर तो मी तुला देईन चिंतोबा, भागीरथी, तुझी त्याला सवई लागली ह्मणजे तो नानाप्रकारच्या चेष्टा करील आणि तुला हंसवील.

भागी० — ह्मणूनच मी तो तुजपासून घेणार नाहीं. (चंडोलास) रे लबाडा जा तूं आपल्ये धन्याकडे. शिवरामा, हा तुझा तूं परत घे. (ती त्यास देऊं लागल्ये, तो घेत नाहीं; मग ती पिंजरा तेथें एकी

कडे

कडे ठेविल्य )

चिंतो०– कायरे, तूं ऐकत नाहींस ? नाहीं, तुला तो परत नेलाच पाहिजे.

शिव०– तो आतां माझा नव्हे, भागीरथी तू मला विरस करूं नको. आणि तूं करणार नाहींस ही माझी खात्री आहे.

(तो असें ह्मणून शें पन्नास पावलें दूर जातो )

चिंतो०– (भागीरथीस ) तूं त्याला हात तर लाव मग पहा बाबा तुझी काय अवस्था करील ती.

भागी०– तूं मला एवढें भय दाखवितोस, तर मी तो घेणारच. माझे बाबानें मी चंडोल घेउं नये ह्मणून मला मनाई केली नाहीं. मला इतकीच खंत वाटत्येकिं, या वेळेस याचेबदल शिवरामास द्यायास मजपाशीं कांहीं नाहीं. "तूं अतःपर मजकडे येऊं नको" या दुःखाचे शब्दां वाचून ———

चिंतो०– तर तें काम मला कां सांगसना. मी त्याची आणि त्याचे चंडोलाचीहि बिदाई करतों.

भागी०– नको, नको तूं एवढा श्रम घेउं : (ती शिवरामास मागें बलाविल्ये; तो येतो; ती त्यास ह्मणत्ये ) माझ्या मित्रा माझानें ही तुझी नजर घेववत नाहीं. तुला कांहीं वर्तमान सांगायाचें आहे

तें

तूं असें वाईट आहे किं ————

चिंतो० — खरेंच, खरेंच, शिवरामा. तूं जर इतःपर आमचे वाडीचे आसपास आलास किंवा आमचे घराकडे पाहिलेंस तर ————

शिव० — काय? मला मनाई करावा तुझे ठाई इतका निष्ठुरपणा आहे? मला वाटलें होतें किं तूं माझा जिवलग मित्र आहेस.

चिंतो० — तर मी सांगतो किं तुमची आमची मैत्री आजपासून तुटली. तुला याचें वाईट वाटूं नये ————

भागी० — नाहींरे शिवरामा, त्याला बोलतां येत नाहीं, म्हणून तूं मनांत वांकडें आणूं नको —— तुला ठाउक असेलच किं तूझे आणि आमचे बापाशीं कज्या झाला आहे.

शिव० — मला ठाउक आहे. आणि मी त्यासाठीं मोठा चिंतेत आहे. पण आपली मैत्री तुटावी इतके पल्यास गोष्ट आली आहे असें मला वाटलें नव्हतें. त्यांतूनहि चिंतोबाकडून इतका निष्ठुरपणा होईल हें माझे स्वप्नींहि नव्हतें.

चिंतो० — नाईं, तूं यास लावून देतोस किं मी बाबाला जाऊन सांगूं?

शिव०

शिव० — भागीरथी, तुह्मास मजकरिता कांहीं उपद्रव होईल असें असल्यास ———

भागी० — भिऊं नको माझे मित्रा, तूं अमळ असलास तरि माझे बाबास वांकडें वाटणार नाहीं.

चिंतो० — मी त्यास जाऊन सांगतों, मग कसें आहे तें समजेल. (तो बाहेर जातो, पण कांहीं वेळानें मागें येऊन नकळत पिंजऱ्याचा दरवाज़ा उघडून चंडोलास उडवितो.)

---

## प्रवेश ४

### भागीरथी शिवराम.

शिव० — देवासाठीं भागीरथी, सांग बरें, मी तुझे भावाचा काय अन्याय केला आहे तो?

भागी० — तूं चंडोल मला दिलास तो एक त्याला जळ आला आहे; दुसरें, त्याला वाटतें कि असें केलें ह्मणजे आपण बाबाचा आवडता होईन. आमचे बाबास तुमचे बाबावर फार राग आला आहे मला समजत नाहीं कां तो.

शिव० — मलाहि समजलें नाहीं. माझा बाबा एकदा इकडुन

तिकडे

तिकडे फिरत होता तेव्हां त्यास मी आपणाशीं इतकें बोलताना ऐकिलें, किं" नारायणराव मशीं असें करील हें मला वाटलें नव्हतें." मग तो माझे आईकडे गेला, तेथें माझी बहीण होती, तिला कायतें समजलें असावें.

भागी० — तें कांहीं असो, पण याचें कसें करावें —— माझे बाबानें आम्हांस तुमचें दर्शन घ्यायाची किंवा तुमशीं बोलायाची मनाई केली आहे.

शिव० — काय! तुशीं माझी ही शेवटची भेट? तुम्ही आम्हाशीं अतःपर बोलूं नये? हा! आतां तुला माझानें कसें सोडवेल! माझी ताई, जीस तुजवाचून क्षणभर करवास पडत नाहीं, ती आतां कसें करील! हरे भगवान्, मग आमची गत कशी होईल!

भागी० — अवसान सोडूं नको माझे जिवलगा गड्या; असें झालें आहे तरी आपल्ये मैत्रीस धोका नाहीं. आपण एकमेकास प्रत्यक्ष भेटलों नाहीं तरी एकमेकाची आठवण करायास आपल्यास कोणाचानें मना करवत नाहीं. अशीकिं, तूं मला चंडोल दिला आहेस, त्याला मी तुझे नावानें क्षणक्षणा हाक मारीन. आहा! तो मला मग किती आवडेल!

शिव० — तूं मला हें सांगून किती आनंद करित्ये आहेस! आ-

तां

तां मी दुःख करावें असें मला वाटत नाहीं. ओहो! ठीक झा-लें, ही माझी ताई आली —— मला ती सखेद दिसत्ये आहे.

## प्रवेश ५

भागीरथी, शिवराम, गहिना.

भागी० — (गहिनास भेटायास धांवत्ये) माझे गडये गहिना!

गहि० — माझे जिवलगे भागीरथीबाई! (चिंतू बापास घेऊन आला आहे; ते आडराहून हळूच ऐकताहेत)

शिव० — (गहिनेस) तूं आतां एथें कांहीं चांगले वर्तमान ऐकशील ताई.

गहि० — मीहि कांहीं बरें आणिलें नाहीं. आपला बाबा आणि आई अशा चिंतेत पडली आहेत कि ——

शिव० — (भागीरथीस) पाहा! मी तुला सांगत नोहतों?

(गहिनेस) बरें काय आहे तें सांग?

गहि० — (भागीरथीस) तुमचा बाबा आमचे बाबावर रागें भरला आहे; पण मला वाटतें कि तुमचे बापाचें मागणें अगळ गैरवाजवी आहे.

## बापांची समजी

भागी० — गैरवाजवी ! असें होणार नाहीं. जर अशी गोष्ट आहे तर मी त्यास चार गोष्टी सांगून वळवीन. बरें, काय आहे तें मला सांगतर खरें.

गहि० — त्या डोंगराजवळची आमची राई तुला ठाऊकच आहे.

भागी० — होय. वसंत ऋतूंत आपण तिकडे कोकिळांचें गायन ऐकायास जात असतों. काय रम्य जागा आहे ती !

गहि० — ती राई आमचे बाबास विश्वासरावांनीं दिली आहे.

भागी० — बरें.

गहि० — ती तुझे बाबाचे मनांत घ्यायाची आहे.

भागी० — काय ! माझे बाबाचे मनांत घ्यायाची आहे !

शिव० — काय ! आपली राई तो घेणार !

गहि० — माझे बाबानें त्यास सांगीतलें किं " तुमचे पासून मजवर आणि माझे कुटुंबावर फार उपकार झाले आहेत; ते स्मरून मी या गोष्टींत तुमचा संतोष करायास अनमान करितोंना. परंतु ज्याणें मला राई दिली आहे त्याणें प्राण जातेवेळेस माझें वचन घेतलें आहे किं मी ती विकूं नये. तिचा उपभोग घ्यावा, किं जेणेंकरून मला त्याचें स्मरण राही.

भागी० — येव्हवां माझा बाबा मला सर्व गोष्टींनीं पूज्य आहे पण

अशी

अशी गोष्ट जर आहे तर तो अन्याय करितो हें ह्मणणें मला प्राप्त आहे. पण मला वाटतें किं तो फुकट मागत नसेल. तो असें कधीं मनांत आणणार देखील नाहीं.

गहि० — नाहीं नाहीं. तसें नाहीं. तो माझे बाबास किंमत देणार; नी तीस घेटे त्याजपेक्षां अधीकही द्यावयास सिद्ध आहे.

शिव० — तो राई घेऊन काय करणार ? तोहि कांहीं योजून माग-त असेल.

गहि० — तो ती घेऊन त्यांतली सगळी झाडें कापून टाकणार.

भागी० आ-}
णि शिव०-} कापून टाकणार ?

गहि० — राई तोडिली ह्मणजे मैदान होईल आणि मागचा डोंगर चांगला दिसेल.

भागी० — होयरे होय. आतां माझे लक्षांत आलें. त्याणें परवां शहरांतून मेस्त्री बलाविला होता. तो त्याशीं मोडतोडीच्या गो-गोष्टी बोलत होता खरा. माझे बाबास असला छंद फार. त्या-चे हातीं एक नकाशा नेहमीं असतो. तो दिवसांतून शंभरवेळा मोडतोडीचा गोष्टी करित असतो, मशीं देखील; तें ऐकून मलाहि बरें वाटतें; पण आतां मी तिकडे चित्त देणार नाहीं. तुझे

बाबानें

## बापाचीसमजी

बाबानें आपली राई कदापि देऊ नये, हें माझें मत.

शिव० — सगळीं झाडें तोडून टाकल्यावर ते बिचारे पक्षी त्यांवर बसून सुंदर गायन करित असतात, त्यांणीं कोठे जावें ? कोठें कोठें करावीं ? आणि मग आपण दाणा तेथें कोणास घेऊन जावा ?

गहि० — मग उन्हाळ्यामध्यें आपण उष्ण्यापासून थंड कोठें व्हावें ?

भागी० — आपण तेथें गातों तेव्हां डोंगराकडून प्रतिशब्द येतो तो मग कोण ऐकेल ?

गहि० — मला वाटतें किं पल्लवयुक्त झाडें डोंगरापेक्षां सुंदर दिसतात.

भागी० — असें असतां मैदान करून माझे बाबास काय नफा वाटतो तो कोण जाणे. दुसरी चोंहोकडे मैदानें आहेत तीं थोडीं आहेत ?

शिव० — झाडें तोडिली वर प्रत्येक कुऱ्हाडीचे घायानें माझा कोणी हात पाय तोडून नेतो आहे असें मला होईल.

भागी० — नाहीं नाहीं. तुझे बापाकडून ही राई घ्यायास कोणी शकत नाहीं.

गहि०

गहि० — कोणी शकत नाहीं ! पण आतां त्याचानें ती ठेव-वत नाहीं.

भागी० — कां ? माझे बाबाचानें मला वाटतें किं त्यावर जुलुम करवणार नाहीं. इतकी सत्ता त्याजकडे नाहीं.

शिव० — पण जर तो आह्मासीं असाच राग ठेविल, आणि तुह्मी आह्मास भेटूं बोलूं नये असें करील, तर जळो गेली ती राई. तसेल्या दाहा राया खायाचा पडल्यातरी मी देईन.

गहि० — आणि मलाहि तसेंच वाटतें. भागीरथी, तुजवांचून मी काय करावें बरें ? तुला बरोबर घेतल्यावांचून त्या राईत जायाची मला कल्पनादेखील होणार नाहीं.

भागी० — गडये गहिना. आपण त्या राईत काय काय मौजा केल्या आहेत ! नाहीं बरें ! संध्याकाळीं आपण तेथें गेलों ह्मणजे सगळ्ये दिवसाचें वर्तमान एकमेकांस सांगावें आणि फार दुःखाच्या गोष्टी कराव्या.

गहि० — आणि तेथें आपण जाऊन कामहि करावें. तूं शिवावेंस, मी कशीदा काढावा. शिवरामानें फुलें आणिलीं ह्मणजे काम सोडून आपण हार गुंफायास लागावें. माझे हार मी तुला द्यावे. तुझे तूं मला द्यावेस. असे असे नाना

प्रकार

बापांचा सवाई

प्रकार आपण तेच करावे.

शिव० — होच्चे! आता मनी लागले हिणें! तसा दिवस पुनः यावा तर!

भागी० — खरेंच, तसे आनंदाचे दिवस कधी यावयाचे नाहींत पण तसेच जिव्हांनी मला दुखवणें पडेल, मग माझा त्यांत सर्व तो होईल. मग मी त्यांस सांगेन कीं मी तोंनावर अशी बुद्धी इथा असली तर माझे मैंचानां माझेपाशीं सर्वे (भागी निघे एकमेकांस आलिंगितात आणि डोळ्यांतून आंसवे टाकितात.)

गोहि० — पण येथ पर्यंत गाई चरत आहेत.

भागी० — कां?

गोहि० — हाय हाय! या तुला मनच्या कथा सांगितल्या नाहीं. अर्धे राहा झाली, पुढे बाबांना आहा बापाना होय व बापाने कर्ज दिले होते; उद्दाम सावकारास. ते अजून माझे बुआने फेडिले नाहीत.

भागी० — (रडून) माझा बाप, पैसे देणें, पैसे देणें, म्हणत होता नेहेमीं.

शिव० — म्हणून, जर आम्ही गाई विकी नाहीं, तर तुझा बापा आता सावकार रुपये पाच्चहरी ठाकून घेतो. तें आज आम्हाला

कोणी

कोणी देईल असें नाहीं. तुझ्या बापाशिवाय आम्हांस दुसरा कोणी थोर स्थळ नाहीं. आणि तोच पैसा मागणार यावर का-य!

भागी० — इतकेंच जर आहे तर तें माझे हातीं आहे.

माहि० — तुझे हातीं आहे? तें कसें?

शिव० — काय हें म्हणतेस, भागीरथी!

भागी० — आजपासून हुशार करून तुम्ही वचन द्याल कीं को-णापाशीं सांगणार नाहीं?

माहि० — तुझी शपथ आणि कांहीं.

शिव० — तुझे मनांत आम्हाविषयीं संशय.

भागी० — बरें तर ऐका. पण त्या गोष्टीचें स्मरण झालें म्हण-जे मला अजून उमाळे येतात. काय माझी आईची मजवर मम-ता होती! अहाहा! माझी आई शेवटीं दुखण्यांत पडली होती त्या वे-ळीं एके दिवशीं, खोलींत एकटी पाहून, तिनें मला पलंगाजवळ बोलाविलें, आणि डोळ्यांतून आसवें काढून माझा मुका घेतला आणि उशाखालून एक मोहरांची पिशवी काढून मजपाशीं दि-ली. आणि म्हणाली, "माझे लाडके मुली, ह्या पैशांची गोष्ट कोणास सांगूं नको. हे पैसे तुला काम पडेल तेव्हां खर्च. तुझा मन

दयाळू

बापांची समर्त्री

"दयाळू आहे. तूं ब्राह्मणी आहेस. (असें आई म्हणाली.) तूंच
"हे पैसे चांगल्या कारणीं खर्चशील. तुझा बाप मनाचा थोर
"आहे, पण अंमळ हट्टी आणि हव्वा आहे. आपला स्वदेश सोडा
"आहे; त्यांत कित्येक गरीब गुरीब कुळें जास पोटं आलीं आहेत,
"आणि जास तुझा बापातर दमडी सोडीत नाहीं असें म्हणतात,
"तेथें तूं गरीबास, आधार सहाय होऊन, त्यांचें काम कर. तुजवर
"कोणी उपकार करील त्यासही तूं थोरून देत जा; बापापाशीं मागूं
"नको. आज रोजपर्यंत मी रडेतूं होऊन असलीं कामें घेतलीं आ
"हेत; त्यावरून मी कोणत्या प्रकारें माणसांवर दया करीत अ
"सें, तें तुझ्या लक्षांत असेलच. सारांश, पण मी तुजवर विश्वा-
"स ठेवितें: तूं भले मनुष्य संकटांत पडले आहे पाहून, त्यास त्यांतून
"काढ. तूं जें करिशील तें मी समजेन कीं मींच केलें, आणि तु-
"लाही माझें वारंवार स्मरण होईल." इतकें बोलली मी, तुझें तिला
नें बोलवेना, पण हें तिचें संभाषण माझे हृदयांत लिहिलें आहे,
तें मी कधीं विसरणार नाहीं.

गांहि० — (डोळे पुसत्ये) भागीरथी, तूं धन्य आहेस; आणि तु
झी आईहि धन्य!

शिग्र० — माझे बापास आणि माझे आईस जेव्हां गोष्टी तिची

आठवण

आठवण होतसे, तेव्हां तेव्हां त्याचे डोळ्यांतून पाणी आल्याशिवाय राहात नाहीं.

भागी० — माझी आई पण तुमचे आई बापांवर फार ममता ठेवित असे. मरतेवेळेस तिणें मला सांगितलें कीं विठ्ठलदादीस तूं आपला मित्र ह्मणून मान; आणि त्याचा उपदेश ऐकत जा. तुमचे उपकार मजवर पुष्कळ आहेत. तर या गोष्टींत मी किती धन्य होईन तें पाहा— एकतर माझे आईची इच्छा पुरवीन. दुसरें तुमचे बाबांच्या उतराई होईन. माझे बाबास अन्याय करण्यापासून संरक्षीन, त्यास मागून पश्चात्ताप होईल तो होऊं देणार नाहीं. सगळ्यांचा बचाव होईल. आपली सुंदर राई कापली जाणार नाहीं. तुमची आमची मैत्री राहील. पुनः आपण एकमेकांस भेटूं, बोलूं, आणि आनंद करूं दुर्वेवर.

गाहि० — (तिचे गळ्यांत हात घालितो.) अगे माझे गडये भागीरथी!

शिव० — (तिचा हात धरून.) माझा बाबा तुला मनापासून आशीर्वाद देईल; पण तुझे पैसे घेणार नाहीं.

भागी० — कां? मी त्याची विनंती करीन. त्याविषयीं निर्भय असा. यांतले कोणास कांहीं समजणार नाहीं. यात्रा एथें अस-

बापाची समजी

ऊ मी हीच पैसे घेऊन आलें

शिव०- मी ते आपल्यापाशीं घेणार नाहीं.

भागी०- नाहिंतर तूं तोर तेव्हढे घे. आणि शिवरामा, जर तूं लिला वनाई करशील तर समजून मी तुझा पैसा घेणार नाहीं. मग मी आपल्या बाबाची आज्ञा निष्कपणपणें मानीन. तुझाकडे फिरून पाहाणार नाहीं. यानंतर कधीं मी तुमचे घरीं येणार नाहीं कि तुमच्या राईस जाणार नाहीं

राहि०- तूं असें ह्मणाल्येस पण मग———

भागी०- ( तोंडाशीं बोट नेऊन लिला दबाविल्य ) चुप. तुला थोडाशास समजत नाहीं. मी तुझें अगदीं ऐकणार नाहीं. थांब एक अनक, मी येई तों. मला लवकर फावलीतर तुमचे धापास मी दोन ओळी लिहीन. माझाने लवकर येववलें नाहीं. तर मी पिशवी आणून या बंगल्याचे कोंपऱ्यास देईन. त्यो धोंड्यारखालीं. त्या बागेंतील रत्न आतांच चांगलीं धरून ठेव. ऐकल्येस ?

राहि०- माझी खात्री आहे, माझा बाबा तुझे पायसे परत देऊन मला पाठवील

भागी०- त्याच्या त्यापेक्षां इतर विचार करावा. तसें केलें असतां मग मी तुह्मास भेटायाला कोठची ? मग तुमची माझी ही शेवटची भे

टे

र. इतःपुढें तु मशीं बोलायास मला बाबाची आज्ञा नाहीं. त्यास रुपये न पोहोंचलेअसत्तां असें देवी आलेच.

वाहि० — काय कठोर शब्द काढतोस हे!

आशी० — मला बाबांची आज्ञा मान्य करणें प्राप्त आहे. पण आपण शेजारी आहों त्याअर्थी एकामेकाकडे पाहायास कांहीं चिंता नाहीं. लोकांची दृष्टि चुकवून समयीं————

वाहि० — मी तर माझे डोळे तुझे डोळ्यांकडे लाऊन ठेवीन. आणि त्यांना सांगेन कीं तुह्मी मला मनापासून आवडतां. मी तुह्मास मरें पर्यंत विसरणार नाहीं.

शिव० — तूं बाहेर फिरायास जाशील तेव्हां आह्मी रस्त्यावर उभें राहून तुजकडे पाहिलें तर आह्मास मना कोण करणार होतें? आणि मग————

आशी० — तूं खरें ह्मणालास — मग एकादें स्मित, एकादें चोरट्ये दृष्टीनें पाहाणें झालें तरतें कोणाचे लक्षांत येणार नाहीं, तर धीर सोडूं नका. काही चिंता नाही, सर्व नीट चालेल. पण आपला चंडोल कोंठें आहे तो? मी माझे खोलीत जात्ये. मी त्याला घेऊन आईन.

शिव० — थांब अमळ. मी त्याचा पिंजरा आणितो आणि तुझे खोलीच्या दरवाजापर्यंत घेऊन येतो. (तो पिंजरा ठेविला होता तिकडे

## बापाची समजी

डे जाती )

भागी० - येथें पाहिना.

नाहि० - हें येणें असलें नसावें.

शिव० - ( भयभीत होऊन पिंजरा रिकामा घेऊन येतो ) असा काय करूं ! पक्षीच आंत नाहीं.

भागी० - काय ! माझा पक्षी गेला? माझ्या जिवलगा शिवरामा !

शिव० - कोणी याचें दार उघडून त्यास पळविला. मला पुरती आठवण आहे मी दार लावलें होतें.

भागी० - हें माझे भाच्यावाचून दुसऱ्याचें काम नाहीं. तूं तो मला दिलास तेव्हांपासून त्याला वाईट वाटलें होतें, आणि आपण मध्यें बोलत असतां आपली दृष्टी चुकवून त्याणें हें कृत्य केलें.

शिव० - त्याणें अंमळ खेळायास नेला असेल तरी बरें.

भागी० - मी त्यास तुझेपेक्षां चांगला ओळखितें. त्याणें त्याला उडविला असावा.

शिव० - परंतु, थांब तो इतक्यांत लांब गेला नसेल. जर कोठें झाडावर असला तर त्यास दाणा दाखविला म्हणजे लागलाच खालीं येईल. मी सगळें रान त्यासाठीं फिरेन.

भागी० - (शिवरामास) तुला एक येऊ माझ्या मित्रा, ( गडीनेस )

बिचारा

भिकारा शिपाई ! मला त्याची फारकळून धत्ते ! त्यानें काय होसे-
नें मला तो दिला होता !

गाहि० – खरेंच, तुला तो देई पर्यंत त्यास चेन पडलें नाहीं.

भागी० – बरें तर, मी जात्यें गहिना. मी अशी मागचे दारेंनें जात्यें,
आणि तूं तशी वरईकडून हळूच माझे खिडकीखाली ये. हागाजे
मी वरून पिशवी आणि पत्र टाकीन. माझा बाबा मध्यें कोठें नस
लातर मी तुला तें स्वतां खालीं येऊन देईन.

गाहि० – आहागे माझे भैविणा ! काय दयाळूपणा, काय उदारपणा हा !
तुझी उतराई आम्ही कशीं होऊं ! (तीं दोघें दोहों वाटानीं जातात.)

## प्रवेश ६

नारायणराव, चिंतोबा.

चिंतो० – कां बाबा, मी खोटें सांगीतलें; तूं पाहिलेंस ना? तुझे आज्ञेप्र-
माणें चालायास तुला काय अवघड पडलें आहे तें?

नारा० – खरेंही चंडोलाची गोष्ट कायरे आहे?

चिंतो० – आपण लहान होतों, ह्मणून मी तुला तें सांगीतलें नाहीं; कं-
किं तीं ऐकतील: ती गोष्ट अशी आहे, किं शिवलगमित्र शिवराम,

यांणीं

यांणीं जिवलग मैत्रीण भागीरथीबाई यांस चंडोल भेट केला; जिवलग मैत्रीण भागीरथीबाई, तें हिडवें पाखरूं घेऊन, अती खुशाल-ली, कीं त्यांणीं त्यास आपल्ये जिवलगमित्र शिवरामाचें नाव ठेविलें. पण मी असें केलें आहे कीं, तीचें त्या पश्यान्नीं अन्योन्य खेळणें होईना.

नारा०- तें कसें ?

चिंतो० - त्याणीं चंडोलाच्या पिंजरा त्यॉ तिकडे ठेविला होता. तेथें मी नकळत जाऊन, दार उघडून परसें त्यास उडविलें. तो उडतांच, झाडाचे खांदीवर जाऊन बसला; नंतर तो या डाहाळीवरून त्या डाहाळीवर, त्या डाहाळीवरून त्या डाहाळीवर, असा उडत होता. तीं आतां त्यास जर धरतील तर, मी पक्कीं ह्मणून समजेन; पण तें काय होतें ?

नारा०- तर तूं हें मोठें लुच्चाईचें काम केलेंस. विठ्ठलरावांचे मुलांस, दुखऊं नको ह्मणोन तुला माझी आज्ञा होती, नव्हे ? या गोष्टींत तुझे बहिणीसहि किती दुःख लागलें असेल बरें ?

चिंतो०- तिणें तुझी आज्ञा मोडिली त्याचें तिला पारिपत्य नको ?

नारा०- तिचें पारिपत्य करायाचा तुजकडे अधिकार नाहीं. धांव लवकर, माळ्याला किंवा दुसऱ्ये कोणा माणसानां जाऊन सां

ग

ग, किं चंडोल धरा, आणि तसाच मजपाशीं आणा.

चिंतो० - पण बाबा, तूं ताईस मनाई केली होतीस, किं विठ्ठलशेटी चे मुलांशीं अगदीं बोलूं चालूं नये; असें असतां, त्यांणा जे दे ली, ती तूं तिला घेऊं देशील ?

नारा० - शिवरामानें, चंडोल आणिला ते वेळेस, त्याला माझी आज्ञा ठाउक होती ?

चिंतो० - त्याला नाहीं, पण ताईस तर ठाऊक होती; असें असतां तिणें तुझी अवज्ञा कशी करावी ?

नारा० - त्याचा विचार मी केला असता, तुला गरज नव्हती. तिणें तुला तो चंडोल दाखविला असता; आणि मला तसेंच दिसतें तर मी तो परत करविला असता. म्हणून मी तुला आणिखी एकदां सांगतों किं, धाव लवकर, आणि चंडोल सांपडे असें कर; नाहीं तर तुला, काय आहे तें कळेल.

चिंतो० - पण बाबा, ती बोलली तें तूं स्पष्ट ऐकिलें नाहींस ? तिजपाशीं, तुला नकळून, असे कांहीं पैसे आहेत; आणि ती ते विठ्ठलशेटीस देणार, तुझें देणें वारायाकरितां. होरेहो ! भली गोष्ट सुचली! बाबा, मी गाडीचे पाठेवर टपत बसतों; आणि ती पैसे नेत असतां तिला पकडून तुझे जवळ आणितों.

नारा

नारा०- करून तर पाहा तसें. मी तुला आतां काय सांगीतलें ? त्याप्रमाणें करतोस कीं नाहीं ?

दिनो०- (कुरकुरतो) मी तीस पकडतों तर भली मौज होती!——

(तो बाहेर जातो)

---

## प्रवेश ७

नारायणराव, (आपणाशीं विचार करितो)

पाहा मी जाणता असून इतका घसरलों; आणि ही मुलें होत्सातां यांणीं इतकी मैत्री, कृतज्ञता, आणि उदारपणा, दाखविला ! मी भागीरथीस मना केले होतें खरें; पण मी तें नीट केलें काय ? जे सद्गुण मी तिला शिकविले, तीच मी, ते शिकेठायीं निंदुं काय ? या संसारअरण्यांत जें एकच सुख, जें मनुष्याची एकच विश्रांति, अशीं जी गुणी आणि समवयी मित्रांची संगती, त्याचें सुख मी तीजपासून कसें हिरून घेऊं ? जाच्या तोटा, माझी सगळी संपत्ति खर्च झाली असतां भरून देऊं शकणार नाहीं. हे इतकें मी का करितों असें पाहिलें असतां, माझे मनामध्यें गोष्ट भरली ती झाली पाहिजे, इतकेंच याचें कारण. माझे लाडक्येमुली, माझे सगळे बाग, सगळे बंगले; व दुसरे मजकडील सगळे चांगले चांगले पदार्थ जे आहेत

तितके

तितके सर्वहि तुला प्राप्त झाले असते, तरि ते तुला राईची आठवण विसरविते ना; जा राईत तुला, तुझे मित्रांची गांठ पडून आनंद होतो आहे. आहा! भली मला ही शिक्षा लागली! तूं नसतीस तर आज मलाहि विठ्ठलशेटीसारिखा अमोलिक इष्ट अंतरता; तें स्मरव तूं माझें राखिलेंस. तूं मला अन्याय कर्मापासून आणि पश्चात्ता पापासून काढिलेंस. तुझें उदार चरित पाहून तुझे भावाच्या नीच पणा माझे हृदयास फार व्यथा करितो. हाड पोज्या! किती नीचपणा तुझे ठाई आहे रे हा! असो, आतां मला पाहिलें पाहिजे किं विठ्ठशेट आपल्ये मुलांप्रमाणें चित्ताच्या थोर आहे किं नाहीं. या प्रसंगीं तो वर्तेल त्यावर माझे पुढील मित्र स्मरणाची आशा आहे — एकतर आज असें होईल किं मी अयोग्य मित्रापासून सुटेन; अथवा मला योग्य मित्राच्या लाभ होईल. (तिकडून भागीरथी हळूच चालली आहे तिला पाहून तो बलावितो; ह्मणतो) भागीरथी! (ती ऐकिलें न ऐकिलें करून तशीच जात्ये आहे, तिला तो दुसऱ्यानें बोलावितो) भागीरथी, इकडे ये.

---

## बापांची समजी.

### प्रवेश ८

### नारायणराव, भागीरथी.

नारा०- तूं कोठें चालली होतीस ? तूं मला चुकवित कां होतीस ?

भागी०- (अंमळ गोंधळली) यासाठीं- किं तुला उपद्रव करूं नये.

नारा०- मला वाटतें किं तुला शिवरामानें चंडोल भेट दिला होता, त्याचे शोधास आल्ये आहेस ?

भागी०- होय, बाबा. त्याणें मला एक दिला खरा. मला वाटतें चिंतूनें तुला सांगीतलें असावें ?

नारा०- मग, तूं तो घेतला नसशील ?

भागी०- मी ! नाहीं नाहीं. हा घेतला तो आतां नाहीं करावणं ? भला बिचारा शिवराम! त्याला तो मला देतानां किती आनंद झाला आहे !

नारा०- तो तुला परत दिला पाहिजे.

भागी०- होय बाबा; मजकडे असता तर; पण तो पळाला.

नारा०- हें खरें ?

भागी०- होय बाबा. मी खरेंच सांगत्यें. पाहिजे असलें तर मी तुला त्याचा रिकामा पिंजरा दाखविलें.

नारा०- त्याला बाहेर कोणीं सोडिलें असेल बरें ? हें चिंतूचें कृत्य असावें

असावें.

भागी०— नाहीं बाबा, तूं भाऊला असें ह्मणूं नको. पिंजऱ्याचें दार चांगलें लागलें नसेल, ह्मणोन बंदीवान पळाला. शिवराम त्याचे शोधास गेला आहे. त्यास सांपडला असतां तो मजकडे आणील.

नारा०— एकुण तूं त्याशीं दुसऱ्यानें बोलणार? बरें, तूं त्यास काय ह्मणशील? तूं त्यास माझी आज्ञा अजून सांगितली आहेस किं नाहीं? आणि त्यापासून शेवटला निरोप घेतलास किं नाहीं?

भागी०— नाहीं बाबा, तें मला मोठें अवघड पडलें आहे. तसें एकवेळ झालें ह्मणजे मग मला काळ कंठणें फार कठिण आहे ———

नारा०— माझी आज्ञा मानायास तुला कोठी अडचण पडते तर?

भागी०— ह्मणून नव्हे; असें तूं मनांत आणूं नको बाबा; पण मी अशी निष्ठुरता केली असतां मला वाटतें किं तूं मजवर ममता करणार नाहींस. तूं मला आपलें लेंकरूं ह्मणणार नाहींस. आतां बरें मला कांहीं खेद झाल्याशिवाय मी अकस्मात त्याची गडी तोडिली तर, तूं मला आपल्ये मनांत काय ह्मणशील? माझीं मित्रें मला काय ह्मणतील?

नारा०— पण त्याचे बापानें माझा अन्याय केला असला तर तुझानें

थंड

## बापांची समजी.

थंड राहावेल ? तुला माझा अभिमान पडणार नाहीं ?

भागी० - असें कसें होईल ? मला अभिमान पडेल. आणि तुझें समाधान होण्याबद्दल मी सर्वस्व देईन.

नारा० - मी त्याशीं काय मागतों, आणि तो मला काय देत नाहीं, तें तूं जाणत्येस ?

भागी० - मी जाणत्यें होय मी जाणत्यें. हें बाबा तूं मला कां पुसतोस?

नारा० - यासाठीं, किं मला समजलें पाहिजे कीं विठ्ठलशेटीच्या मुलांस तें ठाउक आहे किं नाहीं, आणि त्यांणीं तें तुला सांगीतलें आहे किं नाहीं ?

भागी० - होय, त्यांणीं मला सांगीतलें. त्यांणीं सगळें मला सांगीतलें. तुला राग नको येउं देऊं बाबा !

नारा० - बरें तुला कसें वाटतें ? मी कांहीं गैरवाजवी चाललों किं नाव? विठ्ठलशेटावर माझे इतके उपकार असतां त्यांणीं माझी लाहानशी गोष्ट ऐकूं नये ? आणि जें मी मागतों, त्याचें मजपासून त्यास शत गुणित मोल प्राप्त होणार, असें असतां ?

भागी० - बाबा मी लाहान मूल, तुमचे मोठ्यांचे खटल्यांत काय समजें.

नारा० - तूं आपल्ये मनांत विचार कर. आणि तें काय म्हणतें तें

मला

मला सांग.

भागी० - बाबा मला क्षमा असावी. माझें हृदय कांहीं एकादी अशी गोष्ट सांगेल, किं ती तुला आवडणार नाहीं.

नारा० - मी समजलों. मी अन्याय करितों असें तें ह्मणेल, यांत भ्रांत नाहीं.

भागी० - मला वाटतें किं तुला आतां राग येईल.

नारा० - नाहीं, भिउं नको, बोल तूं.

भागी० - कांहीं होउ, तुला वाईट वाटे असें मी कधीं बोलणार नाहीं.

नारा० - त्याची कांहीं चिंता नाहीं. तुला काय दिसतें तें साफ बोल; माझी आज्ञा आहे.

भागी० - बरें तर, मला वाटतें किं तुझा अन्याय नाहीं, आणि विठ्ठल शेटीचाही नाहीं.

नारा० - अगे रघुशा मल्येपोरी ! आह्मी दोघेहि खरे ? असें कसें होईल ? आह्मांतून एक खरा आणि एक खोटा असावा.

भागी० - बाबा मला क्षमा कर. मला दिसलें तसें मी बोलिल्यें - तुझे विठ्ठल शेटीवर फार उपकार, ह्मणोन तुं मागतोस तें त्यानें द्यावें, हें खरें; आणि, विठ्ठलशेटीस न देण्याचें कारण आहे ह्मणे ऐसें ह्मणतो तेंहि खरें.

नारा०

## बापाची समजी

नारा० - तेंकसेंहि असो. पण तो ह्मणतो तें तुला नीट दिसतें ना ?

भागी० - तें मी काय सांगूं ? मला वाटतें कीं त्याणें तुझे उपकार जाणून आपली गाई तुला द्यावी हा त्याचा धर्म होय, नसेल, जाणें त्यास ती गाई दिली, त्याचा करार जाणून, तुला ती देऊं नये. हाही त्याचा धर्म होय. मैदान करावें ह्मणून तू ती कापणार; आणि आपले तुलांस विश्रांतीस्थळ म्हणी तो ती राखणार. तूं गांवचा धणी, तुझे हातांत सत्ता आहे, ह्मणून तू ती कापूं सकशील, तुझी प्रार्थना करून, तुज कडे मुलें माणसें घेऊन येऊन रडून, तो ती राखूंहि सकेल; अशी गोष्ट आहे.

नारा० - पुरे आतां, तुझी बुद्धी ऐकेल तो फसेल. बरेंतर, आतां त्याणें माझे पांचशें रुपये द्यावे, आणि आपली गाई ठेवावी.

भागी० - तरहा तुजकडोन बलात्कार त्यावर———

नारा० - त्यांत मग समजेल, खरा कोण आणि खोटा कोण तो, आं ———

भागी० - नाहीं बाबा, रागें भरूं नको, मला तसें वाटलें म्हणून काय ह्मणावें तें कळेना ह्मणून आलें तोंडास तें बोलिलें. पण बाबा. पांचशें रुपये त्याणें आज कोठून आणावे ?

नारा० - कोठून आणावे, हें जर तुला ठाऊक नाहीं, तर मलाहि ठाऊक नाहीं. पण जर तो तुजपाशीं मागूं लागला तर मग ?

भागी

भागी० - (बापास [illegible] मारत्ये) बाबा, मी आतां हें दुःख कसें कि-कधूं? तूं मला मारलें तरी पुरवलें, [illegible] मी तसेंच केलें आहे————

नारा० - सोड, सोड, मुली मला जाऊंदे! पण हें कोणतें मी समजलों नाहीं?

---

प्रवेश १

नारायणराव, भागीरथी.

चिंतोबा, (गहिनीस ओढित आणितो आहे)

चिंतो० - बाबा, ही मुली सांपडली! इजपाशीं [illegible] आहे. मला वाटतें कि तो भागीरथीचे नाकाचा असावा. चल गो, काढ तो लवकर. नाहीतर मी तुझे सर्वांगाचा झाडा घेईन. बाबा, ही वईकडून पळत होती तेव्हां, इचे हातांत मी तो प्रत्यक्ष पाहिला.

नारा० - चिंतू बळात्कार करूं नको. (गहिनीस) मुली तुला एथें कोणाशीं काम आहे?

गहि० - (गोंधळली) नाहीं——होय, मी —— यास पाहात होत्यें.

नारा० - तूं भिऊं नको मुली. तूं कोणास पाहात्येस?

गहि० - भागीरथीस————

चिंतो

## बापांची समजूत

चिंतो० - पण गहिने, आम्ही तुम्हाशीं बोलूं नये म्हणून बाबानें मनाई केली आहे, तें तुला ठाऊक आहेना ?

नारा० - ( चिंतूस ) मी तुला विनंती करितों, उगा ऐस. ( गहिनेस ) मुली, या लाखोट्याची गोष्ट काय आहे ती मला सांग.

गहि० - तें कांहीं नाहीं. ( सचिंत भागीरथीकडे पाहात्ये ) भागीरथी, आतां कसें करावें ?

भागी० - माझे गहिणी, आपल्यास आतां बाबापासून कांहीं लिकवा-याचें नाहीं.

चिंतो० - ( नारायणरावास ) पाहा बाबा, ती तुझे समक्ष एकामेकाशीं कशी निर्भिडपणें बोलताहेत. हें तुझे आज्ञेचें उल्लंघन नव्हे ?

नारा० - तूं उगाच राहा. गहिना, काय तें मला कळियशील ?

गहि० - बरें तर; तुम्हास कळवायाचेंच त्या अर्थी ऐकावें. माझे बाबानें भागीरथीस लाखोटा दिला आहे. ( भागीरथीचे हातांत लाखोटा देऊं लागली तंव, चिंतूनें तो मधें हातून ओढिला )

चिंतो० - पाहिलेंस बाबा! यांत पयसे भरले आहेत; ( भागीरथीस )
थांब पोरी, आतां बाबा तुझी चांगली पूजा करील.

( तो लाखोटा बापाचे स्वाधीन करितो )

## नारायणराव

### ( लखोटा उघडतो आणि वाचितो )

"परम थोर मुली" "त्वां आपल्या बापाची नकलस मला जें सां-
"गून दिलें, ते मी घेऊन तुझे बापास भरावे; आणि कदाचित् गोष्ट उघ-
"डी झाली असतां, तुला ठपक्यांत आणावें, हें मला योग्य नाहीं. अ-
"सें माझे हातून घडलें असतां, तूंच आपल्या मनांत मला काय
"ह्मणशील ? तर मी तसें करणार नाहीं; मी कर्जकरी आहें तसाच
"राहीन, जेंव्हांपर्यंत मीं तें आपल्या स्वकष्टार्जित द्रव्यानें फेडीं. तुझे
"बापाचे मर्जीप्रमाणें माझ्या हातून होत नाहीं ह्मणोन मला वाईट
"वाटतें, पण काय करूं ? माझा उपाय नाहीं. नारायणरावांनीं स-
"त्तेचे बळानें इच्छेस येईल तें, मला नकलस केलें असतें, तर मी कोठें
"बोलायास आलों होतों ? तसें झालें असतें तर मला माझे मनांत,
"इतकें आणायास तर जागा होती किं. मी माझे मित्रांशीं बोली
"केली होती ती, मी मोडिली नाहीं. मला या लोकीं तुमचे बाबांची व
"तुमची मैत्री अमोल आहे. तूं जशी मजशीं आणि माझे मुलांशीं
"आजपर्यंत उदारभावानें चाललीस तसेंच पुढें चालावेंस, ही माझी
"प्रार्थना आहे".

सही विठ्ठलशेट

नारा॰

# बापांची समजी

( नारायणराव भागीरथीकडे पाहातो )

भागी० — (त्याकडे जाऊन) आतां बाबा, हे पैसे मजपाशीं कसे [illegible] मी तुला सांगत्यें. आजपर्यंत सांगितलें नाहीं त्याची मला क्षमा कर.

नारा० — (तिचा मुका घेतो) तें मी जाणतों मुली; तुमचें भाषण होत होतें तेंसी आडून सर्व ऐकिलें. तुमचा थोरपणा पाहून मला परम आनंद झाला. मी लाज सोडून ह्मणतों कीं, तूं नसतीस तर मी आज असें अकर्म केलें होतें कि, तें माझे मनास जन्मभर खातें, आणि मी अपकरवा होतों. हे तूं आपले पैसे घे. आणि तुझे भाईनें जसें सांगितलें आहे तसें, याचें सार्थक कर. हे धर्म करितां वेचतील ह्मणून भिऊं नको. माझा लेंकुरानों, तुमची आवडती राई अक्षयी राहु, आणि तुमची मैत्री उत्तरोत्तर वाढून दृढ होउ.

भागी० — (त्याचा एक हात धरिल्ये) बाबा, आज तूं मला नवा जन्म दिलासें वाटतें!

रा. हि० — (त्याचा दुसरा हात धरिल्ये) रावसाहेब, काय भलेपणा हा! माझा आबा——— (तिचा कंठ दाटतो बोलवत नाहीं)

नारा० — (राहिनेस) गुणाचे मुली, आल्ये वाजास हें पत्र घर

त दे, आणि सांग किं, यांत कांहीं आणिखी ल्याहावयाचें आहे, ते माझी भेट झाली ह्मणजे बोलेन.

चिंतो० — हें काय बाबा! तूं आणि————

नारा० — चिप बोलूं नको, आटोप तुझी ती हाडजाभ. आजच दिवशीं तूं मला आपल्ये दुष्टपणाची ओळख दिलीस.

चिंतो० — कशी? मी तर तुझी आज्ञा पाळिली. मुलांनीं आपल्ये आईबापांची आज्ञा पाळूं नये तर, याप्रमाणें?

नारा० — त्याणीं पाळावी. पण आईबाप जर अन्याय करूं सांगतात, तर मुलांनीं आपल्यास उचित आणि जेंत ईश्वर राजी, तेंच करावें. मी स्वार्थपर होऊन अन्याय केला हें तुझे अंतरीं जर समजलें नाहीं, तर मला तुझे सद्गुणाची पुढें आशा दिसत नाहीं. पाहा भागीरथी कशी चालली ती.

चिंतो० — पण बयेनें मजकडे तसे पयसे दिले नव्हते.

नारा० — त्याचें कारण किं तिणें तुझी पूर्वींच परीक्षा केली. पैसे नाहींत तर गोड शब्द नव्हते काय? जेणेंकरून तूं आपल्ये मित्रांचें, आणि ज्यानें तुला प्रथम विद्याभ्यास करविला त्या गुरूचें, समाधान केलें असतेंस? पण चंडोलाचें काय झालें? तूं त्याचा शोध करविलास किं नाहीं?

चिंतो

चिंतो० – बागांत मला कोणी भेटलें नाहीं ·

---

## प्रवेश १०

नारायणराव, चिंतोबा, भागीरथी, राहिना, शिवराम ·

(शिवराम धांवत आला आणि श्वासोश्वास टाकितो आहे. एके हातीं त्याणें चंडोल धरिला आहे; दुसऱ्या हातास रक्त निघालें आहे ह्मणून रूडक्यानें गुंडाळिला आहे)

शिव० – भागीरथी! भागीरथी! येलवकर, भली झाली गड्या! हा बग, तुझा चंडोल आणिला! अरे लबाडा, पळाला होतासना?

(नारायणरावाला पाहून तो अमळ अडखळतो)

भागी० – (त्याजकडे धांव घेत्ये) माझे गड्या शिवरामा! (त्याचे हातून चंडोल घेत्ये आणि ह्मणत्ये) अरे ठका, सांपडलासना? आतां तूं मजपासून जाऊं पावणार नाहींस. जा आतां आपल्ये पिंजऱ्यांत (ती त्यास आंत घालून दार लाविते)

नारा० – माझे प्रियकरा शिवरामा, तुझे हातास तें काय झालें? तुझे रूडक्यास तें रक्त कसचें लागलें आहे?

शिव० – (साश्चर्य आणि रु.नद) माझे प्रियकरा शिवरामा! भागीरथी ऐकत्येसना?

भागी

**भागी०** — होय शिवरामा, सर्व गोष्टी सोईच्या झाल्या आहेत.

**गहि०** — आतां आपल्ये मैत्रीस बिघड नाहीं. (शिवराम आनंदानें नाचतो. नारायणरावास मोठ्ये विनयानें [illegible]. [illegible]ना त्याचा हात धरून कष्टी होत्ये.) तुला फार दुःख झालें भाउ! मला हात तरि पाहुंदे.

**भागी०** — अरेरे! मजकरितां तूं इतकें दुःख पा[illegible]ना?

**शिव०** — अं; तें कांहीं नाहीं. चंडोलामागें झाडावरून धांवतांना हातास अमळ लागलें आहे. माझा हात सोडून पडला असता तरीभी चंडोलास घेतल्याशिवाय तुजपाशीं येतोंना.

**भागी०** — आहा! माझेठायीं याची काय ममता आहे! बाबा आतां लवकर याला कांहीं उपाय केला पाहिजे. सखाउपाशीं चांगलें औषध आहे.

**नारा०** — तिला सांगून तो उपाय आधीं करिव. आतां चला मजबरोबर; मुलांनो आज आनंदाचा दिवस; तुह्मास मी मेजवानी केली आहे. तुमचे आईबापांसही बलाविलें आहे. आज तुह्मी मला गुरु झालीस. आणि तुमचें चरित्र पाहून मला वाटलें किं, तुह्मासारिखे गुणी मुलांपासून आईबापांनींहि शिक्षा घ्यावयास योग्य आहे.

(सर्व निघून जातात)

## धाकटी मुलगी कुळवीणीनें ठकविली.

—✻—

### बाळाबाई, दुर्गा.

—*—

दुर्गा – बये, आज साउ.वी मी हरीकडे जाऊन येऊं ?

बाळा० – नाहीं, मी आज्ञा देणार नाहीं.

दुर्गा – कांबये, असें कां बरें ह्मणत्येस ?

बाळा० – तुला त्यांतलें कारण सांगायास मला प्रयोजन नाहीं; मुलांनीं वडील सांगतील तें निमुट ऐकावें; त्यांस उलटा प्रश्न करूं नये. अस्तु, तुला समजावें किं, मी जें सांगत्यें त्यास कांहीं चांगलें कारण असतें, ह्मणोन या वेळेस तुला त्याचें कारण ऐकवित्यें किं, हरी मुलगा चांगल्ये गुणाचा नाहीं; तो तुला एकादी वाईट गोष्ट करूं सांगेल; आणि जर तूं त्याकडे नित्य गेलीस, तर तुला त्याचे दुर्गुण लागतील.

दुर्गा – पण बये————

बाळा० – उत्तर ऐकायाचें नाहीं; मी सांगेन तसें चालिलें पाहिजे—

तें ऐकून दुर्गीचे डोळ्यांत आसवें आलीं; तीं आईस कळूं नयेत ह्मणून ती अंमळ एकीकडे गेली. मग आई बाहेर गेल्यानंतर

नंतर, ती एका कोंपऱ्यांत बसून पुष्कळपणें रडत्ये आहे, तितक्यांत नानी कुळवीण, तुकतीच्या बाळाबाईकडे चाकरीस राहिली होती ती, घरांत आली. ती तीस ह्मणत्ये "दुर्गा, तं कां रडत्येस? तुला काय झालें? तुला काय दुःख आहे तें मला सांगशील"?

दुर्गा— नानी, तूं एथून जा. तुझानें माझें दुःख दूर होत नाहीं.

नानी— नाहीं; कां नाहीं? मी मागें चाकरीस होत्यें तेथें भाग्य होती; तिला दुःख होई, तेव्हां ती मजकडे येई, आणि ह्मणे; "माझे गडये नानी, पाहा मला काय संकट पडलें आहे! आतां मी कोणत्ता उपाय करूं?" ती असें मला बोले, आणि मी तिला बरी बुद्धी देत असें—

दुर्गा— मला तुझी बुधी नको. मी तुला सांगत्यें, मजविषयीं तुझ्यानें कांहीं व्हायाचें नाहीं.

नानी— मला इतकीतरी आज्ञा दे; किं मी तुझे आईकडे जाईन! ती तरि तुझें दुःख दूर करूं शकेल; कां किं तुझे सारिखी चांगली मुलगी कधीं पाहून मला बरें वाटत नाहीं.

दुर्गा— आहा! बयेना? खरेंच; तीच तर माझे दुःखास कारण आहे.

## धाकटी मुलगी कुळबिणीनें ठकविली

नानी – तर तुला काय बयेपासून दुःख झालें ? मी असें कधीं मानणार नाहीं.

दुर्गा – तर कोणापासून झालें तें तुला ठाउक आहे ?

नानी ०– खरेंचना ! हें मला आगोधर खरें वाटलें नाहीं. तूं शाहाणी मुलगी आईस ह्मणून, तुझें ह्मटलेलें बये सदा ऐकत असेल, असें मी समजत्यें होत्यें. आहा ! तुझे सारिखी गुणाची मुलगी मला असती, तर मी तिला तिचे मर्जीस येतें तें करूं देत्यें. पण तुझे आईस तुजवर सत्ता करावीसी वाटत्ये. तिला लहर आली ह्मणजे तुझी चांगलीहि गोष्ट ऐकत नाहीं. तुझे सारिख्या मुलीशीं तिला असें करवतें तरि कसें ! तुला पाहून मला किती दुःख होतें तें सांगवत नाहीं !

दुर्गा – (फिरून रडूं लागत्ये) माझें हृदय शतधा फुटतें. माझा प्राण घाबरा होतो.

नानी ०– खरेंच; कसा घाबरा होणार नाहीं ! तुझे डोळे तांबडे आणि सुजलेले दिसतात ! आह्मास तुझी काकळूत येत्ये; तूं आपलें दुःख मला न सांगोन आपल्ये जीवास उगीच क्लेश मात्र करित्येस. भागूस जर, तुला झालें याचें अर्धें दुःख होतें, तर ती मला सांगीतल्यावांचून राहातीचना.

दुर्गा - तें तुला सांगायास मला धीर होत नाहीं.

नानी - मी तें जाणायास इच्छितही नाहीं. पण मला वाटतें किं तुझी आई, बाहेर हिंडायास जात्ये, आणि तुला घरांत [illegible]त ठेवित्ये हें कांहीं असावें?

दुर्गा - तें नाहीं.

नानी - तर दुसरें काय असावें? हें पाहा तुझ्या [illegible]कडे कोसळलें: मी हरीस तरी बलावून आणूं? कदाचित् त्याशीं खेळून तुझें दुःख दूर होईल.

दुर्गा - (श्वास टाकित्ये) त्याशीं खेळायाचें सुख मला आतां कोठचें?

नानी - तें तुला मिळायास कांहीं कठीण नाहीं. तुझे सारिख्ये धाकटये मुलीस खेळायास सोबती पाहिजे.

दुर्गा - त्यास भेटायाविशीं मला आईची आज्ञा नाहीं.

नानी - त्यास भेटूं नये! तुझे वयेची कायसमजूत आहे, ती मला कळत नाहीं! भागूची आई अशीच होती. ती तिला सोनूंच्या मैत्री करूं देईना; पण आह्मी तिला कसा धूर दिला आहे!

दुर्गा - तें तुह्मी कसें केलेंत?

नानी

## धाकटी मुलगी कुळविणीनें ठकविली.

**नानी** - ती बाहेर बसायास जाई, तेव्हां आह्मी जपूं; मग भागू सोनूक-डे जाई, अथवा सोनू भागूकडे येई.

**दुर्गा** - आणि तिचे बयेस तें कळलें नाहीं?

**नानी** - तें मी सांभाळीं.

**दुर्गा** - तशी मी जर हरीकडे गेल्यें, आणि बयेनें तुला पुसलें, किं दुर्गा कोठें आहे तर?

**नानी** - मी तिला सांगेन किं, तूं वाड्यांत गेली आहेस; किंवा बाहेरून ये-उन माझे खोलींत निजली आहेस. अशीं अनेक निमित्तें सांगेन.

**दुर्गा** - अये! पण मी कसें समजावें किं, माझी लबाडी बयेस कळली नाहीं?

**नानी** - तेबद्दलविशीं तूं मजवर विश्वास ठेव; तिला शंकादेखील येऊं देणार नाहीं. तूं माझें सांगीतलें ऐकशील तर, आजच हरीकडे जा; आणि रात्रीं हवेलीतर राहा. पुढची काळजी कांहीं करूं नको.

**दुर्गा** - एकवेळ तसें करावें अशी माझीहि इच्छा होत्ये; पण तूं मला वचन दे. किं बयेस सांभाळीन.

**नानी** - जा, भिउं नको.

मग खेळायाचे लोभानें, दुर्गा सांजची हरीकडे गे-ली. तिची आई बाहेरून आली, तिणें नानीस पुसलें, दुर्गा कोठें

आहे

आहे.? नानीनें सांगीतलें, ती सगळा दिवस बसून बसून कंटाळली; मग जेऊन निजायास गेली, ती माझे खोलींत निजली आहे.

याप्रमाणें दुर्गीनें आपल्ये भोळ्ये आईस पुष्कळवेळ ठकविलें. वास्तविक पाहातां, तिणें तें आईस ठकविलें नाहीं; आपल्यास ठकविलें. आगोधर तो दुर्गीस संतोष असे; आईचें जवळ येऊन तिला समाधान वाटे; आई बाहेरून आली असतां आनंदानें जाऊन ती तिचे गळ्यांत मिठी घाली; ती सगळी स्वस्थोत्पत्ती तिला मग नाहींशी झाली. रात्र दिवस ती आपल्ये मनांत चांके आणि ह्मणे. "आगाई, मी हरीकडेस जाल्यें हें माझे आईस समजलें तर कसें होईल." आईचा शब्द ऐकून तिला कांप सुटावा; किं कोण जाणें तिचे तोंडांतून काय अक्षरें निघतील. ती जेव्हां जेव्हां आईची मुद्रा रागीट किंवा व्यग्र पाही, तेव्हां तेव्हां तिला वाटे किं, मी अवज्ञा केली हें हिला समजलें तर असावें ? दुर्गीची चिंता इतक्यांतच सरली नाहीं — नानी तिला सदा सांगे. किं भाग्य मशीं फार उदारपणानें वागे; ह्मणे किं बहुतवेळ तिणें मला खडेसाखर, बदामें, दूध, असें दिलें. फडताळ

पेट्या

पेदया, यांच्या आच्या तिणें मजवर विश्वासाच्या." तें ऐकून दुर्गानेंही मनांत आलें किं, औदार्याविषयीं आणि विश्वास ठेवण्याविशीं, नानीनें आपणास भागूपेक्षां अधीक चांगलें ह्मणावें. मग तिणें खडेसाकर, बदामें, व आणखी खायाच्या वस्ता, नानीकरितां चोराव्या; किंत्यांच्या घोंस आईचे नकळत घेऊन निजपाशीं आणून द्यावा. असें करी, पण तिचें मन तिला खाई. ती मनांत ह्मणे किं मी अन्याय कर्म करितें आहें, हें कधींतरी उघडें पडेल; आणि बयेचे ममतेस मी मुकेन" एकेदिवशीं निश्चय करून तिणें नानीस सांगीतलें किं, आजपासून मी तुला कांहीं देणार नाहीं. नानी ह्मणाली "बरें मुली, तुझी मर्जी; पण पाहा पस्तावशील! थांबतर, तुझे आईस बाहेरून येऊंदे, आणि तूं तिची आज्ञा कशी ऐकत असत्येस तें मी तिला सर्व सांगत्यें" दुर्गा घाबरी झाली, आणि भिऊन, नानीनें सांगीतलें तसें तिणें ऐकिलें. पूर्वीं, दुर्गाची आज्ञा नानी ऐकत असे; आतां, नानीच्या हुकुम दुर्गा ऐकत्ये. नानीनें तीस शिव्या गाळी द्याव्या; धमकवावें; हेळणा करावी; दुर्गानें तें सगळें सोसून चूप राहावें. तिची फिर्याद सांगतां येईना. ती द्वाड कुळंबीण, एकेदिव-

शीं

शी दुर्गापाशीं आली, आणि तीस ह्मणत्ये," दुर्गा, तुझे आईनें जिलब्या करून कुलपांत ठेवल्या आहेत, त्यांतल्या कांहीं मला पाहिजेत; आणून दे; दुसरें; चार मांडे आणि वाटीभर दूधही आण; तूं जा; आणि लवकर किल्यांचा शोध कर."

**दुर्गा** - पण गड्ये नानी ———

**नानी** - गड्ये नानीचें एथें कांहीं काम नाहीं: सांगीतलें तें आणत्येस किं नाहीं ?

**दुर्गा** - असें कां वरें ह्मणत्येस. बयेस कळेल तर मग कसें होईल ? आणि बयेस नाहीं कळलें तर ईश्वर तर पाहातो आहे.

**नानी** - तू इतके दिवस हरीचे घरीं जात्येस तें ईश्वरास ठाऊक नाहींकाय ? त्याचें त्याणें तुला काय पारिपत्य केलें ? दुर्गास आईने भक्तिमार्ग चांगला शिकविला होता; तेणेंकरून तिची पक्की समजून पडली होती किं ईश्वराची दृष्टी सर्वत्र आहे. तो आपल्ये बरे वाईट कर्मांचें फळ देतो. त्याणें आपल्यास वाईट कर्म करूं नयें ह्मणोन सांगीतलें आहे: कांकिं. आपल्यास दुःखदायक आहे ह्मणून. ती अविचारानें एकवेळ आईची आज्ञा मोडून हरीकडे गेली; मग एक अन्याय केला तो छपवायास तिला दुसरा करायाचा पडला: दुसरा छपवायास

तिसरा

## धाकटी मुलगी कुळंबिणीनें ठकविली.

तिसरा करायाचा पडला, त्याप्रमाणें मनुष्य घसरत जातें. तिला भय, कीं नानी आपली गोष्ट उघडी पाडील, ह्मणून नानी सांगे तेंतें तिला ऐकणें प्राप्त होई.

यावरून पाहा कीं दुर्गास किती त्रास झाला असेल! एके दिवशीं ती आपल्या खोलींत गेली, आणि कडी लाऊन पुष्कळपणें रडली. ती ह्मणाली " ओ आई बापांची आज्ञा मोडिली तो कितीतरी हीनभाग्य ह्मणावा! मजसारिखें दुःखी कोणी नसेल. पाहा मी माझे दासीची दासी झाल्येआहें! आतां मला सन्मार्गानें चालवत नाहीं. ती द्वाड, जी आज्ञा करील ती मानणें प्राप्त होतें. मी लबाड, चोर, आणि ठक झालें! भगवान्, मजवर दया कर." असें ह्मणून तिणें दोनी हात तोंडावर दिले, आणि उच्चारून पुष्कळपणें रडून देवास करुणा भाकिली. मग विचार करूं लागली कि, पुढें कशी गत करावी. तो अकस्मात् उठली आणि ह्मणाली" मी आतां निश्चय केला. बरोबर मला एक महिनापर्यंत नानी अवश्य बोलावलें नाहीं; जरी तिणें माझा प्राण घेतला — पण नाहीं; ती असें करणार नाहीं, ती मजवर कृपाळू होईल. ती मला एकवेळ, माझे दुर्गा, असें ह्मणेल. तिचें हृदय सदय आहे' आहा! पण हे आतां मला

किती

किती अघट घड पडलें आहे तें पाहा! ती रागानें मजकडे पाहील. आणि मला शिव्या देईल तें मला कसें साहवेल? असो, कांहीं चिंता नाहीं. मी तिजपाशीं माझे सगळे अन्याय सांगेन; सांगेनच. मी असें दर या रोडे दुर्बिणीचें जाच सोसणार नाहीं. हा मी त्रिवार निश्चय केला" मग ती खालच्या खोलींतून निघाली, आणि आईस एकटी माजघरीं गांठून, तिचे गळ्यास मिठी मारून, तिनें तीन आसवांनीं स्नान केलें. तिला दुःखाचें भरतें आलें; काय बोलावें तें सुचेना, तेणेंकरून तिची जिव्हा बंद झाली.

बाळा० - माझे लाडक्ये मुली, तुला काय झालें?

दुर्गा - आये, काय सांगूं?

बाळा० - हे अश्रुपात कां इतके मुली! माझे गुणाचे मुली!

दुर्गा - माझे जिवलगे आये!

बाळा० - बोल! बोल बेटा माझे! तुझेवर असें तें काय अड पडलें आहे?

दुर्गा - होय! तूं जर क्षमा करशील तर सांगत्यें.

बाळा० - तुझा खरा पश्चात्ताप पाहून मी क्षमा केली; बोल, तूं आतां मोकळेपणें.

धाकटी मुलगी कुळंबिणीनें ठकविली

दुर्गा — माझे बये, मजपासून तुझी अवस्था झाली. मी पुष्कळवेळ दुसरीकडे गेल्यें, तूं मनाई केली असता

बाळा० — माझे लाडक्ये दुर्ग्ये ! तुजपासून अशी गोष्ट झाली ? जी तूं, मला किंचित् राग येईल म्हणून, इतकी भीत अससे !

दुर्गा — जर तुला सगळें समजेल, तर मग मी लाडकी दुर्गी कोणाची ?

बाळा० — दुर्ग्ये, तूं मला धास्ती घालित्येस. चिंता नाहीं, यत्किंचित् सगळें मजपाशीं सांग. तुला कोणीतरी ठकविली असावी. तूं कधीं आजपर्यंत असें केलें नाहींस ?

दुर्गा — होय बये, मला ठकविलें, नानीनें; नानीनें मला ठकविलें.

बाळा० — कायल्या रांडे कुळंबिणीनें !

दुर्गा — होय बये. आणि तें तिचें तुला कळूं नये म्हणून, मी तिला तुझे पेट्यांच्या किल्ल्या पुष्कळवेळ दिल्या. तिजकरितां खडेसाखर, बदाम, आणि दुसऱ्या वस्तू, मी कोणजाणें किती चोरल्या असतील.

बाळा० — केवढी पातकी मी ! हें काय मी माझे लेंकीचें अकर्म ऐकत्यें ! हाडे

पोरी, सोड मला आतां. तोंड काळें कर येथून. तुझे या-पाशीं मला विचार केला पाहिजे कीं, अतःपर तुझी आह्मीं कसें वर्त्तावें.

दुर्गा — नाहीं बये, मी तुला सोडणार नाहीं. तूं अगोधर माझें पारिपत्य कर; पण वचन दे कीं पुढें मी मागच्याप्रमाणें तुझी ममता करीन.

बाळा० — हतभाग्ये मुली! तुझें पारिपत्य चांगलें होईल.

बाळाबाई असें बोलून दुर्गीस टाकून गेली. मग दुर्गीच्या बाप आणि आई उभयतां येऊन त्यांणीं नोकरीस बलावून आणिलें; आणि तिला पुष्कळ शिक्षा देऊन, लागलीच घरांतून हांकून दिली. तिणें फार फार काकळूत केली कीं, माझे पाठीवर मारा पण पोटावर मारूं नका, मी असें अतःपर करणार नाहीं, पण त्यांणीं तें ऐकिलें नाहीं. दुर्गीचे बापाच्या तर मोठा निग्रह पडला. तो तिला ह्मणाला "नागी, मी तुझीं कसा चांगले पणानें वागलों! तुझे किती अन्याय क्षमा केले आहेत! मला वाटलें होतें कीं मी तुजवर कृपा ठेवितों, तेणेंकरून तूं माझे मुलीस बरे गुणाची शिक्षा लावशील; त्याच ती तिजकरवून अवला आणि चोरी करविली. तूं मनुष्य नव्हेस

राक्षसी

## धाकटी मुलगी कुळंबिणीनें ठकविली

राक्षसी आहेस यावरून ! माझे जवळून नीघ लवकर; आणि तुझी इच्छा असेल किं यमाचे यातनेंत पडूं नये, तर पुढें चांगले गुण धर".

मग दुर्गावर पाळी आली——— ती दीनबापड्यासारिखी हात जोडून बापासमोर उभी राहिली ; रडून रडून तिचे डोळे सूजले ; तिचें तोंड उतरलें; तिचे गाल पांढरे झाले; आणि तिचें सर्वांग उडूं लागलें ; कोणी म्हणेल किं तिला प्राणांताची व्यथा होत्ये आहे. तोंडावाटे एकशब्द फुटेना. ती उगीच खालचे मानेनें वाट पाहात होती किं, बाप काय पारिपत्य बोलतो तें ऐकावें; तों तो तिला कठोरवाणीनें बोलतो———

पोरी, तूं आपल्ये आईबापांस ठकविलेंस; तूं त्यांच्या महत अन्याय केलास. जी तुला जीवापलीकडे लेखत्ये, आणि तूं सुखी असावेंस असें जी निरंतर इच्छित्ये; अशा आईचें ऐकूं नये आणि त्या दुष्टकुळंबिणीचें ऐकावें, अशी तुझी वासना कशी झाली ! आतां तुला योग्य तसें जर तुझें पारिपत्य केलें ; त्या कुळंबिणीसारिखी तुलाहि माझे दृष्टीवेगळी केली, तर माझा अन्याय कोण काढील ?

दुर्गा — तूं मजविषयीं कधीं वांकडें करणार नाहींस बाबा; आ-

तां

तों मला योग्य तसें माझें पारिपत्य कर; मी तें सगळें सा-हीन; पण पुनः एकवेळ माझा अंगिकार कर, एकवेळ मला आपली ह्मण.

बाप—. मी इतक्यांत तुझा अंगीकार करणार नाहीं. तूं अन्याय कबूल झालीस ह्मणून तुझें पारिपत्यमात्र करीत नाहीं; पण तुझा फार दिवस पश्चात्ताप पाहिल्याशिवाय मी तुला, माझे दुर्गे, असें ह्मणणार नाहीं. तूं अतःपर नीट अवून चाल. अन्यायामागें पारिपत्य चालून येतेंच; ह्मणोन मी तुझें वेगळें पारिपत्य करीत नाहीं; तुझी तूंच आपलें पारिपत्य करशील.

ह्या बापाचे शेवटचे शब्दांचा अर्थ दुर्गीस चांगला समजला नाहीं. तिला आपण बापापासून अशी सुटेंन अशी आशा नव्हती. मग ती बयेचें आणि बापाचे पायांपाशीं नाक घांसून त्यास ह्मणाली; मी अतःपर तुमचे आज्ञेचे तिळप्राय वांकडी जाणार नाहीं. पुढें ती तशीच चालली; पण बापानें सांगीतलें होतें त्याप्रमाणें तिचें पारिपत्य होणें चुकलें नाहीं. त्या द्वाड नानीनें, जिकडेतिकडे तिजविषयीं वांकड्या गोष्टी सांगीतल्या. तिचा आणि

आपल्या

## धाकटी मुलगी कुळबिणीनें ठकविली.

आपल्या ज्याज्या गोष्टी झाल्या, तितक्या तिणें लोकांकडे सांगून आंगच्या आणिखी लबाड्या लाविल्या. ती ह्मणाली दुर्गानें फारदिवस माझी काकळूत करून करून, मला नानाप्रकारच्या वस्त्रा चोरून आणून देऊन, शेवटीं माझी बुद्धी फिरविली; आणि मी लांच घेऊन हरीची तिची भेट केली. नंतर तो रोज सांजच्या येई, आणि तीं दोघें रात्रीचीं फारवेळ एकांतांत असत. असें सांगीतल्यावरून लोकांचे मनांत दुर्गाविषयीं वांकडी कल्पना आली. तेंऐकून दुर्गास रात्र दिवस हृद्रोग लागला. ती आपल्ये बरोबरच्ये मुलींचे मंडळींत जाई तेव्हां, पाही तों जिकडे तिकडे त्या ऐकीमेकीचे कानास लागत, आणि फुसफुसत; आणि तिजकडे तिरस्कारानें पाहात, आणि लाऊन बोलून हंसत. 'जर ती अंमळ अधीक बसली तर त्या ह्मणत" ती एथें बसून संकेताचे वेळेची वाट पाहात्ये आहे" ती नवें वस्त्र किंवा लेणें आंगावर ल्याली, तर त्यांणीं ह्मणावें "जिला आईच्या किल्या मिळतात, तिला चोंगल्या वस्त्रांच्या काय तोटा?" कोणाशीं तिशीं अंमळ बोलाचाली झालीतर त्यांणीं ह्मणावें "दुर्गा, तुझें चित्त हरीकडे गेलें वाटतें, ह्मणो-

न

न तूं चावळत बोलत्येस" असें प्रत्येक तुकें तिचे काळजांत बाण जसे लागत. जेव्हां तिला दुःखाच्या वेग साहावेनासा होई, तेव्हां ती आईचे गळ्यांस मिठीमारून रडे. आई तिला ह्मणे. "मुली, हें तूं आपल्येहातीं आपणावर आणिलेंस, तर धीरकरून सोस. भगवंतापाशीं आपल्ये अपराधांची क्षमा माग; तें तुला पुढें जन्मभर उपयोगीं पडेल, आणि तुझें हित करील. ईश्वराची मुलांस आज्ञा आहे किं, "मुलांनो, तुह्मी आपल्ये आईबापांस माना, आणि तीं सांगतील तसें वर्त्ता" असी आज्ञा आहे ती, देवानें त्यांस सुख व्हावें ह्मणूनच केली आहे. बापडयांनो, तुह्मास अजून या विषयांत कसें वागावें, हें ठाऊक नाहीं. तुह्मी एकादें करतां त्यापासून पुढें काय उत्पन्न होईल हें तुमचे लक्षांत येत नाहीं. ईश्वरें तुह्मास आईबापांचे स्वाधीन केलीं आहेत. जीं आईबापें तुह्मास आपल्ये जीवाप्रमाणें लेखितात; तुमचें संरक्षण करण्याविषयीं त्यांचें ज्ञान तुह्मापेक्षां अधीक आहे. हें तुह्मास पहिल्यानें खरें वाटलें नाहीं, पण आत्तां अनुभव आला किं नाहीं तो पाहा. मुली! तुजवर संकट पडलें आहे यापासून तूं गुण घे किं दुसऱ्या जितक्या ईश्वराच्या आ

ज्ञा

## धाकटी मुलगी कुळाबिणीनें ठकविली.

ज्या आहेत त्या अशाच आहेत. त्यांत जांत आपलें हित होईल, तेंच सांगितलें आहे; जांत आपलें अनहित, तेंच निषेधिलें आहे. म्हणोन जें निषेधिलें आहे, तें आपण केलें असतां आपण आपल्याहातीं आपल्यास उपद्रव करून घेतों असें होतें. सदाचरणानें हितच होईल, असा प्रथम निश्चय होत नाहीं; भ्रम पडोन उलटें सुलटें दिसतें; परंतु शेवटीं [illegible] फिरतें. जसें तुलाच आतां झालें पाहा तूं, कीं एके अपराधानें तूं किती संकटांत आलीस. तर याचा दाखला घेऊन, अतःपर जपून चाल, आणि इतकी एक गोष्ट मनांत दृढ धर, कीं जें कर्म सदाचरणास वांकडें तें तुझें करावयास वांकडें.

दुर्गा आपल्या आईचे उपदेशाप्रमाणें वागत गेली, जंव जंव तिची निंदा लोकांनीं करावी, तंव तंव तिणें ती सहन करून सदाचरणानें वागावें. असें होतां होतां, कांहीं कां दिवसानीं तिच विषयीं लोकांचे तोंडची निंदा सहज बंद झाली; मग, निर्दोष दुर्गाबाई असें विशेषणयुक्त नांव तिला सर्वांचे मुखानें प्राप्त झालें.

## म्हातारा भिकारी.

आन्याबा (चाकरास)

या म्हाताऱ्यास तूं आंत कां येऊं दिलें नाहींस ?

म्हाता० - महाराज, त्यांणें मला बोलाविलें परंतु मीच आलों नाहीं.

आन्या० - कांबरें ?

म्हाता० - मला सांगतां लाज वाटते. मी कधीं केलें नाहीं तें कर्म करितों आहें. मी भिक मागायास आलों आहें.

आन्या० - तूं मला सद्गुण्य दिसतो आहेस; गरीब झालास म्हणून तुला लाज कां वाटते ? कितीक माझेही मित्र गरीब आहेत, त्यांमध्यें मी तुला लेखीन. ये बैस मजपाशीं.

म्हाता० - क्षमा करा महाराज, मला आतां वेळ नाहीं.

आन्या० - असें निकडीचें तुला तें काय काम आहे ?

म्हाता० - या स्थळीं जें मुख्य काम करायाचें, त्याचे तजविजींत मी आहें. आपण एथें एकटेच आहां, मी तुम्हास खरेंच सांगतों कीं, माझे आयुष्याचे आठ दिवस बाकी आहेत.

आन्या० - हें तुला कसें समजलें ?

# म्हातारा भिकारी.

म्हाता० — मला कसें समजलें तें माझ्यानें तुम्हास सांगवत नाहीं, पण मी जाणतों; कां कि असें मला वाटतें; आणि तसें घडोन येईलच. खरें आहे कि, माझें मरण तें कोणास तोटा होणार नाहीं. माझें जांवयानें आणि मुलीनें मला आज वीस वर्षें पाळिलें.

आन्या० — तो त्यांचा स्वधर्म आहे; त्यांत त्यांणीं नवल काय केलें.

म्हाता० — आजपर्यंत मजकडे पैका होता तेणेंकरून मी कोणाचे आंगावर पडेन असें नव्हतें: तो मी एके ग्रहस्थाकडे ठेविला होता. त्याणें तो म्यालीस्युगारीत उडवील, आपल्यास, आणि मलाही, नाश केलें. महाराज, क्षमा करावी, आपणाहि ग्रहस्थच आहां; परंतु मी खरें आहे तें बोललों.

आन्या० — ही गोष्ट, माझी प्रत्यक्ष असतां, तरी मी संतोषानें ऐकतों, मला राग येताना.

म्हाता० — मला अंतपर्यंत काम करवतें तर चांगलें होतें। पण आतां मी अगदीं खंगलों, आणि निस्तेज झालों. मला वाटतें कि मी आतां वांचलेंचून कदाचें संपन्न ईश्वरें

माझे

माझे हातपाय निर्बळ केले. मी कधीं काम केल्यावांचून राहिलों नाहीं महाराज. मी ज्वान होतों तेव्हां काम करीं तेणेंकरून माझें शरीर दृढ राहिलें होतें; मला कधीं वैद्य लागला नाहीं. पण जें काम ज्वानपणास बळकटी आणीत होतें, तेंच म्हातारपणास श्रम देऊं लागलें. मग माझानें काम होत नाहींसें झालें तितक्यांत जवळ वित्त होतें तेंही गेलें. मला काम करायाची मनापासून आवड; पण काय करूं? हातपाय राहिले. हें आठवून माझे डोळ्यांत अश्रु येतात, याची क्षमा असावी. मी आपल्यास दुर्बळ पाहून फार कष्टी होतों.

आन्या० — तुझीं मुलें तुला पोशीत नाहींत?

म्हाता० — मला एक कन्याच आहे; तिच्या भ्रतारानें माझा तुजाहून अधीक समाचार घेतला. त्यांणीं मला असल्ये पदार्थांत कांहीं वाण केली नाहीं. ईश्वर त्यांचें कल्याण करो.

आन्या० — तर कां अतां तुझा आतां समाचार घेत नाहींत?

म्हाता० — तीं गरीब झालीं तर माझा समाचार काय घेतात? नदीस रेळ आली आणि त्यांचें घर वाहवलें; त्यांचें सर्वस्व धुवून गेलें; गुरें ढोरें मेलीं. आतां मला पोसायाकरि-

तां

# ह्मातारा भिकारी.

तो कर्ज काढिलें आहे; इतकी एकच गोष्ट त्यांणीं माझे आ-
लोचून केली; तें मला फार वाईट वाटलें. आतां माझे
उत्तर क्रियेच्यातरी त्यांजवर भार पडों नये, ह्मणून मी भीक
मागतों आहें. मी जुना मनुष्य नव्हे, नवा भिकारी आहें
महाराज.

आन्या ०– आणि तूं राहातोस कोठें?

ह्मातारा ०– तिलके मी सांगत नाहीं. माझे किंवा माझे मुलां-
चें बिराड, तुह्मीहि पुसों नये.

आन्या ०– तुझा कराल्याचा नाहीं. मी सहज पुसलें.

ह्मातारा ०– होय; मीहि जाणतों. आतां दिवसानीं तुह्मी स्वर्गा-
कडे पाहा. तेथें माझें घर आकलें राहाणार नाहीं.

आन्या ०– (त्यास मूठभरून रुपये देतो) ह्मातार्‍या, हे घे. ई-
श्वर तुला फार दिवस वांचवू.

ह्मातारा ०– इतके सगळे? नाहीं इतके मी इच्छिलें नव्हतें. म-
ला पांच मात्र पाहिजेत. त्याहून अधीक माझे उपयोगी
नाहीं. स्वर्गीं कोणत्येही गोष्टीची वाण नाहीं.

आन्या ०– तूं बाकीचे आपल्ये मुलांस दे.

ह्मातारा ०– त्यांस काम करायाचें सामर्थ्य आहे; त्यांस धर्माचें

कष्टास

कशाला पाहिजे ?

आन्धा० — जा माझे मुले स्नानाला ? जा आणि स्वस्थ हो.

स्नाता० — (पांच ठेऊन एकाने रुपये परत काढतो) महाराज, हे आपले आपण घ्यावे.

आन्धा० — माझे मित्रा, तूं मला लाजविलीस.

स्नाता० — मला ही लाज वाटते. परंतु कसेंतरी मला घ्यायाला संकट वाटते. तर हे आपणच ठेवावे; आणखी सारे भिकारी येतील त्यांस द्यायास उपयोगी पडतील.

आन्धा० — तुझा अवस्था पाहून मला दया येते.

स्नाता० — आतां ईश्वरास माझी दया यावी. आणि तुमचे ओठांपासून फळ त्याचीं सुखाने शतगुणित व्हावे.

आन्धा० — तें कोठें भेटेल ?

स्नाता० — मी सकाळीं एकाकून चाकर पडलो आहे.

आन्धा० — तर कांहीं अंगावरतरी पैसा द्या.

स्नाता० — नाहीं महाराज, मी ईश्वराचा आधार नाहीं. तुमची आवड च आहे तर एका रुपायाचें खात घ्या, आणि इपलो तंबाखू

आन्धा० — तुला दादा निरक्षी रुपायांचे, पैसे आणि

तंबाखू

स्नाता [illegible]

संवाद चालू [illegible], आणि [illegible]

स्नाता ० – [illegible] मला [illegible] पुरे, [illegible] नाहीं.

( आन्या आपली [illegible] तो [illegible] करून

म्हणतो ) हे भगवान, या [illegible] कल्याण कर ! ( [illegible]

[illegible] )

आन्या ० – [illegible], आज [illegible] आनंदाचा [illegible],

तु[illegible] [illegible] पाहिजे [illegible] असे तुझे मनात असल्यास, मी तुला

[illegible] [illegible] देईन.

स्नाता ० – [illegible], [illegible] नाहीं. [illegible] माझ्या [illegible]

[illegible] [illegible] [illegible].

आन्या ० – मला [illegible] काही सेवा [illegible].

स्नाता ० – तुमचे आग्रही [illegible] मी [illegible] [illegible] [illegible]

[illegible] [illegible] राहिली नाही. एक [illegible] तुकडा

[illegible] [illegible] [illegible] [illegible] [illegible]. ( [illegible]

कडे पाहतो ), [illegible] हात माझा [illegible] [illegible] आहे.

आन्या ० – ( दोन तुकडे देतो ) घ्या, दोन्ही [illegible] दोन [illegible]

[illegible].

स्नाता ० – दुसरा [illegible] ठेवा, मला एक पुरे. माझा उजवा हात

[illegible]

बरा आहे. तो उघला उदितां येईल. आणामात्र शक्तीहीन झाला आहे. हा उपकार मी तुमचा विसरणार नाहीं.

आन्द्रा० – आणि माझे मित्र, मी पण तुला विसरणार नाहीं. माझे मस्तकीं तुझा पुण्यवान हात एकवेळ ठेव बरें.

झुला० – भगवान् तुला सरखी सरखी, आणि स्वर्गसुख देऊ.

(तो जातो)

---

## समागमरूरख.

माधवसुलभा प्रकृतीनं स्तब्ध होता. सगळा दिवस त्याणें विचारांत असावें; कोणाशीं फारसें बोलूं नये. तो आपल्यें चुलत्यासंगती बाहेर जाई तेव्हां वाटेंत जेंजें पाही तेंतें घरीं आला म्हणजे एकांतीं मनांत घोळी. त्याचे चुलत्याचीं मुलें होतीं, त्यांस ती त्याची प्रकृत अगदीं आवडत नसे. एके दिवशीं त्यांणीं माधवाची, आपल्ये बापापाशीं फिर्याद केली; म्हणालीं बाबा, हा आमचे मंडळींत असला म्हणजे यामुळे आमचा उत्साहभंग होतो. पुढें तीं बापास म्हणणार होतीं कि, याला आपल्ये घरांतून लावून दे,

इतक्यात

इतक्यांत त्यांस दुसरी रीत्युक्ति सांचली, कीं तो जसें क-
रितो, असेंच त्यांशीं आपणहि कांहीं दिवस करावें.

मग दुसरे दिवशीं, त्यांतील एकजण किल्ला पाहायास
गेला, एकजण बंदूकरखाना; एकजण गाडी, व धुराचें यंत्र,
व तारवें; एकजण कुलाब्याची दीपमाळ, व एकजण घारा-
पुरीचें पांडवलेणें. तीं सर्व संध्याकाळीं घरीं आलीं; तेव्हां
रोज शौर्यानता सांगत, तसें ते दिवशीं त्यांणीं माधवास कांहीं-
च सांगितलें नाहीं. तीं नित्य एकामेकाशीं थट्टा मस्करी गोष्टी
करून आनंदात काळ घालवीत; ते दिवशीं जिकडे तिकडे स्तब्ध,
उदासीन, विरस झालें. माधवास तें लागोन मोठा पश्चात्ताप
झाला, त्याला वाटलें कीं आपला स्वभाव रंजक नव्हे, तें पाहून
हीं मुलें आपणाशीं तशींच वर्तणूक करूं लागलीं. मग ते दि-
वसापासून त्याणें ती प्रकृती सोडून त्यांशीं मन मोकळें करून
बोलूं लागला. तेव्हांपासून त्यांचें त्याचें मन मिळून तीं पर-
स्पर आनंद पावलीं. नंतर तो मैत्रीचें सुख अनुभवूं लाग-
ला. त्यास समजलें तें तो त्यास सांगे; त्यांचें तोंडून आपण
ऐके; तेणेंकरून तो सर्वांस आवडों लागला.

# थोरांचें हृदय.

## नाटक एक अंकी

### पात्रें

पांडुरंगराव

अंबा . . . . . . . . . . . त्याची मुलगी

आत्माराम . . . . . . . . . . त्याचा भाचा

सावित्री . . . . . . . . . . . त्याची भार्या

चाकर . . . . . . . . . . . :

गणोजी . . . . . . . . . . . गाडीवान

स्थळ, पांडुरंगरावाचें घर

---

### प्रवेश १

(पांडुरंगराव)

दुसऱ्याचीं मुलें आपल्ये घरीं आणून असें होतें. हाच आत्माराम, यावर माझा किती लोभ ! तो माझे मुलांपेक्षां मला अधीक आवडत होता; आणि तोच आतां किती द्वाड निपजला तो पाहा ! मला आश्चर्य वाटतें, लाहानपणीं त्याची

चर्या

चर्या चांगली दिसत होती, तें सगळें उलटें कसें झालें ? त्याची भलाई किती ! त्याचें धैर्य किती ! संतोषवृत्ती काय ! ह्याचा सिंहासारिखा पराक्रम ! मेंढरासारिखं गरीबी ! हे गुणपाहून त्याजवर कोणाचा लोभच जडणार नाहीं ? असो, आतां त्याणें माझे दृष्टीसमोर येऊं नये, मी त्याचें नाव ऐकायासही राजी नाहीं. अरे, कोण आहे तेथें ? सावित्रीस बोलाऊन आणा.

---

## प्रवेश २

### पांडुरंगराव, सावित्री

सावि० — मामा, तूं मला बोलाविलेंस ? काय आज्ञा आहे ?

पांडु० — तुझा सोयाभावाचें तुला कांहीं शुभवर्तमान सांगायाचें आहे.

सावि० — (फिकी पडते) कोणाचें, आत्मारामाचें ?

पांडु० — हें घे; हें वासुदेवाचें पत्र आलें आहे, हें वाच; नाहींतर मीतरी तुला वाचून दाखवितों (तो वाचतो)

(वासुदेव पांडुरंगरायाचा लेक, व आत्माराम त्याचा भाचा. या उभयतांस उमरगाधीं पदायास ठेविलें होतें; तेथीन वासुदेव

बाळमित्र.

(महादेव आपल्ये बापास पत्र लिहितो.)

"माझे परमप्रिया बाबा"

"तुला एकादें अनिष्ट वर्तमान लिहावयास मला
"खेद वाटतो, परंतु लिहिल्यावांचून परिणाम नाहीं; नें तूं दुस
"ऱ्यापासून ऐकशील त्याजपेक्षां मजपासून ऐकिलेंस तें चां
"गलें. मला आपल्ये आत्मारामाचे ढंग चांगले दिसत ना-
"हींत. त्याणें आपलें घडियाळ विकिलें; व पोथ्या पटाच्या
"ह्याहि बहुतकरून विकिल्या. मी तुला सांगतों मला कसें स-
"मजलें तें. माझी हितोपदेशाची पोथी वोळुन जर्जर झाली, ह्म
"णोन मी पोथीविक्याकडे एक नवी घ्यायास गेलों होतों; त्याणें
"मला एक दाखविली, ती मी आत्मारामाची ह्मणून तात्काळ व-
"ळखिली. ती त्याचीच असी माझी खात्री कशावरून झा-
"ली; किं त्याचें नाव तिजवर लिहिलें होतें. मग मी ती चार
"रुपयांस विकत घेतली; आणि कोणापाशीं बोललों नाहीं;
"कांकिं शाळेंतील मुलें त्याचा तिरस्कार करतील ह्मणून, गु-
"रुजीस मात्र एकांतीं वर्तमान सांगितलें; त्याणीं पोथीवि
"क्यास बोलावून आणून चौकशी केली, तों तो कबूल झाला
"किं, मी आत्मारामापासून विकत घेतली खरी. नंतर त्या-

णीं

## थोराचेंहृदय-

"णीं आत्मारामास विचारिलें. तोहि कबूल झालाकिं मला
"पयइयाची गरज लागली ह्मणोन मी विकली, आणि मला
"दुसरी घ्यायास पैसे मिळत तोंपर्यंत मी माझे मित्राजवळ दोन
"होत्या त्यांतून एक उसणी घेतली आहे. असें काय केलेंस
"ह्मणोन गुरुजीनें पुशिलें; तेव्हां त्याणें त्यावर कांहीं निमित्त सां-
"गीतलें; पण मला तें सगळें तर्कट दिसलें. मग मला घडियाळाचा
"संशय आला, ह्मणोन मी त्यास विंचारिलें किं किती घटिका दिवस
"आला आहे? तो अमळ गोंधळून ह्मणाला, मी तें नीट करयास
"घडियाळचीकडे दिलें आहे. मी त्या घडियाळचीचे दुकानीं ला-
"गलाच गेलों आणि विचारिलें तों, सगळा तोतया, मग मी त्यास
"आपला भाउ आणून फजीत केला. त्याणें मला उत्तर केलें किं.
"तुला माझे कारभारांत पडायाचें कांहीं काम नाहीं. मला घ-
"डियाळाची गरज नाहीं ह्मणोन विकिलें"

पांडु० - सावित्री ऐकिलेंसना? आतां तूं काय ह्मणत्येस?

सावि० - मामा, तुला वाईट वाटलें असेंच हें ऐकून मलाहि वा-
ईट वाटलें जऱ्हि तऱ्हि

पांडु० - धीरधर अमळ; इतक्यांत झालें नाहीं. याहून चांग-
ल्यागोष्टी त्या अजून पुढेंच आहेत-

(तो वाचतो)

( तो वाचतो ) नंतर त्याणें काय केलें तें ऐक. परवांचे दि
"वशीं तिसरे प्रहरीं गुरुजीस न पुसतां तो बाहेर गेला, तो संध्या-
"काळ झाला तरी घरीं आला नाहीं; जेवणाच्या वेळ झाला तरी
"दिसला नाहीं; सगळी रात्र बाहेर होता. तो सकाळीं आला.
"मग त्याची फजीती झाली आहे ती काय सांगूं ? त्यास पुसलें
"किं तूं कोठें होतास ? तेव्हां त्याणें पूर्वींच गोष्ट रचून ठेविली हो-
"ती ती सांगीतली. आणि ती जरी खरी असली तरि, आज सं
"ध्याकाळीं त्याचा न्याय गुरुजी समक्ष होणार आहे; तो नीट
"झाला असतां मला वाटतें किं. त्याची अप्रतिष्ठा करून त्याला
"एथून हांकून देतील; घरींतरीं परत पाठवितील. तूं इतका लो-
"भ करीत असतां, त्याची कृतघ्नता पाहून, व आपला दुर्लौकिक,
"व आसल्ये गुणानें त्याचें अकल्याण पाहून. मला बहुत खेद
"होतो. रात्रीस जेथें होता तें ठिकाण त्याणें मला सांगीतलें प-
"ण तें मला अगदीं खरें दिसलें नाहीं. त्या ठिकाणाचें नाव तु-
"ला लिहित नाहीं, कारण किं तूं त्यावर अधीक रागें भरशील.
"तो आतां मला धाक दाखवितो किं मी पळोन घरीं जाईन".

पांडु० — त्याला येऊं तरदे; त्याला माझे उंबऱ्यांत पाय तर घा-
लूं दे; मग समजेल. तो रात्रीं जेथें जात असेल तेथेंच राहो.

सावित्री

सावित्री, तूं मला त्याविशीं एक शब्द बोलूं नको. शुरूनें त्यास अडकवून ठेविला; किंवा फजीती करून होऊं न दिला; तरि तें मला सारिखेंच. मी त्याची चिंता अतःपर वाहाणार नाहीं. त्याला हावें असलें तर त्याणें देशांतरीं जावें; पाहिजे तर कोणाची गुलामगिरी करावी. मी फार दिवस त्याला आपल्या मुलाप्रमाणें वागविला.

साविः – खरें मामा, आमच्या बापाहून अधीक प्रतिपाळ केला

पांडु० – मी तो आपल्या संतोषानें केला. मी देशांतरीं असतां तुमचे आईनें माझीं मुलें संभाळिलीं होतीं तसा मी तुमचा संभाळ केला त्यांत नवल नाहीं. पण

सावि० – आत्माराम अंमळ हूड आहे ह्मणून त्यापासून एकादा अन्याय झाला असेल. एऱ्हवीं तो हाडीं कसा आहे तें तुझे लक्षांत असेलच. त्याकडून एकादा अन्याय झाला असला तर त्यास त्याचें चोपर खंती होत असत्ये.

पांडु० – मी हित्याला पुष्कळ अन्याय क्षमा केले असतील. त्याणें दारू जाळताना केंस भाजून घेतले, तें; आपल्ये दिवाणखान्यांतला आरसा फोडिला तें; किनखाबाच्या आंगरखा

विरचलांत

चिरवलांत स्वराब केला तें; गाडी मोडिली तें; हे सर्व अपराध मी त्याला क्षमा नाहीं केले? मी ह्मटलें असो, पोरपणा आहे. यांत कांहीं दुर्गुण नाहीं. पण घडियाळ विकणें! पोथ्या विकणें; शाळासेंडून न विचारिता बाहेर जाणें! रात्रीस बाहेर निजणें! गुरूपासून पळून जाईन ह्मणून ह्मणणें! आणि मजकडे येऊनें हें सगळें साजरें करून दाखवीन ह्मणून मनांत आणणें! ह्या गोष्टी फार वाईट आहेत.

सावि० — माझा मामा, तूं प्रथम तो आपली अंगरखका कशी करितो तें ऐक, मग तुला करणें असेल तें कर.

पांडु० — आतां मी त्याचें ऐकूं? भगवान् करो आणि अतःपर त्याचें दर्शन मला न होऊ. मी माझे सर्व कुळांस, व घरांतील माणसांस सांगून ठेविलों किं तो गावाआंत आला असतां काढ्यानीं झोडा.

सावि० — आहा मामा, असें करूं नको! — तूं इतका कठोर त्यावर होऊं नको. मी तुझी भाची. मी तुला माझे बापासारिखा मानित्यें; एकवेळ माझी प्रार्थना ऐक.

पांडु० — बरें पाहावें, मी तसें करितो किं नाही तें.

सावि० — तर तां तसें केलें असतां मला असें वाटेल किं, तू माझे

वयेस

वयेस विसरलास; आणि तुझा लोभ मजवरून उणा झाला.

पांडु — काय तुजवरून? तुजकडे काय अन्याय आहे? तुझ्या भावा-चे अन्यायाकरितां माझी तुजवर अनावड कधीं होणार नाहीं. पण तूं मला अतःपर भावाविषयीं भीड घालूं नको. माझी प्रीति संपादून तूं स्वस्थ एस.

सावि० — माझे भावावर तुझी अवकृपा पाहोन मला स्वस्थ कसें होईल?

पांडु० — त्याला तें साजे. त्याणें पयशाचें काय केलें? व रात्रीस बाहेर कोठे गेलो होतों तें त्याणें कां सांगितलें नाहीं?

सावि० — पत्रावरून मला असें दिसलें, किं तो तीं दोन्ही कबूल झाला; वासुदेवासमात्र तें खरें वाटलें नाहीं. (ती पांडुरंगरावाकडे डोळ्यांत आसवें आणून पाहात्ये) माझे मामा, तूं कठोर होऊं नको.

पांडु० — (अमळ थंड झाला) बरें तर पाहूं या; त्याचा गुरु काय ह्मणतो तोंपर्यंत मी त्यास अवकाश देतों.

---

## प्रवेश ३

पांडुरंगराव, सावित्री, चाकर.

पांडु० — तुला काय पाहिजे?

चाक० – खालीं कोणी माणूस आला आहे, तो तुह्माशीं भेटायास इ-
छितो.

पांडु० – तो काय घेऊन आला आहे ?

चाक० – शाळेंतून पत्र आणिलें आहे, हें घ्यावें.

पांडु० – (लखोट्यावरील नावाकडे पाहातो) ठीक! मी याचीच वाट
पाहात होतों. हें गुरुचे हातचें खरें. मी त्याचें अक्षर ओळखितों.
मनुष्य कोठें आहे ? त्याला ह्मणावें थांब; मी उत्तर देतों.

चाक० – त्यास वरती बलाऊं ?

पांडु० – मीच खालीं जातों. मी त्याचे तोंडून सर्व वर्तमान ऐकणार.
(तो खालीं जातो. साविती त्यामागून जाते. चाकर तीस ह्मणून क-
रून खोळंबवितो.)

---

## प्रवेश ४

चाकर, सावित्री.

चाक० – सावित्रीबाई, इकडे या!

सावि० – कां काय ह्मणतोस ?

चाक० – आत्माराम एथें आला आहे.

सावि० – काय, माझा भाउ ?

चाक० – जरि येऊन पोहोंचला नसला तरी आत्तां येऊन पोहोंचेल. गावांजवळ आला आहे.

सावि० – तुला हें कोणी सांगीतलें ?

चाक० – माणुस आला आहे त्याणेंच सांगीतलें —— त्यास तो वाटेत भेटला. आहा बये ! त्याणें काय बरें असें केलें ?

सावि० – त्याणें कांहीं अनुचित केलें नसावें. तो तसें कधीं करणार नाहीं, हें तूं खरें मान.

चाक० – तो असें करील असें मलाहि कधीं वाटलें नव्हतें. आह्मां सर्वांस तो आवडतो, हें देवास ठाऊक असेल, आह्मी त्यासाठीं प्राण देऊं. त्याची इतली चाकरी केली तर त्याणें तो उपकार कधीं ठेविला नाहीं. तुमच्या मामानें जेव्हां जेव्हां आह्मावर रागें भरावें, तेव्हां तेव्हां त्याणें आमची रदबदली करावी. शेजारीपाजारी, गरीब लोक आहेत, तितके त्यास बरें मागतात. मला आश्चर्य वाटतें गुरूजींनीं त्यावर कसा राग केला ? त्याणें कांहीं खोड केली असेल, ह्मणोन ते त्यास शिक्षा लावायास गेले असावे; तो अंमळ मानी आहे; तें पाहून त्यास वाटलें किं आपली अप्रतिष्टा होऊ नये, ह्मणोन तेथोन निघाला असेल.

सावि० – माणसाची त्याची गांठ कोठें पडली ?

चाक० - एथून एके मजलेवर. तो नदीकाठीं एक्ये झाडाखालीं निज ला होता.

सावि० - आहा! गरीब बापुडा!

चाक० - तो उठे तों माणूस तेथें खोळंबला होता. त्यास पाहून तो किती चमकला असेल तें पाहा! त्याला वाटलें किं हा मनुष्य आपणास परत न्याधाकरितां पाठविला आहे, ह्मणोन त्याणें माणसास सांगीतलें किं, माझे तुकडे तुकडे केलेस तरीं मी तुझे बरोबर येणार नाहीं.

सावि० - खरेंच, मी त्याच्या धीट स्वभाव जाणत्यें.

चाक० - तेव्हां माणसानें त्यास सांगीतलें किं, तु मला इतका आवडतोस किं, मला मार जरी बसला, किंवा माझी चाकरी जरी गेली, तरी तुला दुःख होईल तें मी कधीं करणार नाहीं.

सावि० - तर आत्मारामानें आतां काय करायाचें योजिले आहे?

चाक० - तो थकला होता तरी हळूहळू माणसाबरोबर चालला. ते दोघे शिवेपर्यंत बरोबर आले. तेथें तो आमराईत लपून आहे. त्याणें माणसास सांगीतलें किं मामा पत्र वाचून काय ह्मणता तें परत येऊन मला कळीव.

सावि० - आहा! मजशीं त्याशीं भाषण होतें तर बरें होतें!

चाक० — तो हि हेंच इछित असेल.

सावि० — आमचा मामा आमराईकडून नित्य फिरायास जात असतो. तो रागीट आहे; आणि पहिल्यानेंच तेथें पावी त्याची गांठ पडली तर अनर्थ होईल ! कृपाकरून तूं धांवत जा, आणि त्यास सांगकिं आपल्ये कोठारावर ये; आणि त्यामागें लिकून राहा; किंवा कोंडें पेंट्यांत लपून बेस. मामा बाहेर गेला ह्मणजे मी तुला भेटल्यें —

चाक० — भिउं नका बाईसाहेब. मी स्वतां त्याला तेथें आणितों, आणि लिकवितों (तो जातो)

---

## प्रवेश ५

### सावित्री, (एकली)

हा भाउ मला कितीतरी श्रम देतो ! तरी मला त्याचर लोभ केल्यावांचून राहावत नाहीं.

---

## प्रवेश ६

### सावित्री, अंबा.

सावि० — ताई ! मी तुशीं बोलायाकरितां वाट पाहात होत्यें ! बोलून तुला कांहीं वाईट वर्तमान सांगावें हें माझे देवीं आलें आहे.

अंबा.– मला तें सगळें आधींच समजलें. तुकतेंच बाबानें माझे भाऊचें पत्र मजकडून वाचिवलें; त्यावर गुरूचें पत्र आलें, त्याणें तर त्याचा राग दुणावला.

सावि० – आतां माझे भावाचा मी कसा परिहार करावा, तें मला सूचत नाहीं.

अंबा. मी पैज मारितें कि तो निर्दोष आहे. तुला या सुचें कृत्रिम ठाउक नाहीं? तो अन्याय करितो आणि ते लोकांवर घालितो. तुझे भावाविषयीं माझे बापाचे मनांत त्याणें आजच बांकडें आणिलें असें नाहीं; या मागें दाहावीस वेळ त्याणें त्यास बाहेर घालवून द्यावयाचें केलें होतें; पण शोध करून पाहातां शेवटीं सगळा अन्याय वासूचा. मला त्याचे वर्तावरूनच दिसतें कि कांहीं त्याचेंच कंबटाळ आहे: आत्मारामानें कांहीं मूर्खपणमात्र केला असावा.

सावि० – आहा! काय तूं मला धीर दिलास! माझा भाउ रीतीनें चांगला, मनानें मोकळा, आचरणानें स्वच्छ, स्वभावानें उदार, प्रकृतीनें निःशंक आहे; पण तसा अंमळ उतावळा, धट्ट, आणि आग्रही आहे: त्याणें एकवेळ निश्चय केला तो कदापि सोडूं नये; आणि त्याचे सदल्याप्रमाणें चालत नाहींत त्यांशीं तो मर्यादा ठेवीत नाहीं.

# थोराचेंहृदय.

अंबा — आणि माझा भाउ, मत्सरी, कृत्रिमी, दंभी, पोटांत शिरोन गळ घेणारा, असा आहे. असें भाऊर, प्रथम मखमालीसारिखीं मउ फ..ें करून आंगावर ठेविलें, नंतर आपल्यास भरवशांत घालून तिरव्यासारिख्यानखानीं फाडिलें. तुझा भावास आणि यास किती अंतर! माझा भाऊ घेऊन तुझे भावासारिखा भाउ मला कोणी देईल तर तत्क्षणी देईन. यावेळेस गोष्ट वाईट इतकीच आहे किं आत्माराम एथें नाहीं.

सावि ० — आणि जर तो एथें असला तर ?

अंबा ० — आ! कोठें आहे तर तो; सांग किं मीही त्यापाशीं धांवल्ये. मला तो केव्हां दृष्टीस पडेल असें आतां झालें आहे.

सावि ० — तो आपल्ये कोंदाराशीं आहे, पण धुपधुप! माझा मामा एकटाच आपल्याशीं कांहीं बोलतो आहे असें माझे कानीं पडतें.

अंबा — बरें, तूं आत्मारामाची बहीण, म्हणोन तां त्यास प्रथम भेटावें हें नीट आहे. मी माझे बाबाजवळ एथें असल्ये, आणि तो अंमळ थंड होईल तर पाहाल्यें. तूं धांव त्यापाशीं, आणि त्याला धीर दे.

सावि ० — होय, आणि चांगली शिक्षाहि करीन. त्याला घेरें हें सगळें.

( ती बाहेर आल्ये )

---

# बाळमित्र.

## प्रवेश ७

### पांडुरंगराव. अंबा

पांडु० – या पोरानें माझें चित्त असें तापविलें आहे किं, खालीं [illegible] पांहालों आहे त्याबरोबर पत्राचें उत्तर द्यायास माझ्यानें एक अक्षर लिहवत नाहीं. असो तो उद्यां जाईल. मला अंमळ स्वस्थ होउंदे.

अंबा – असें कां बाबा. तूं काय अजून त्या बिचाऱ्या मुलावर रागांतच आहेस? त्याचा अन्याय काय इतका मोठा आहे?

पांडु० – खरेंच, तुह्मा पोरींनां तो मोठा दिसत नाहीं. कांकिं तुह्मीहि तशाच आहां, मला वाटतें किं त्याजपेक्षांहि वाईट, तुह्मापुढें गुणी मुलगा शिक्षा घ्यावयास असतांहि.

अंबा – बाबा, कोणतो?

पांडु० – माझा गुणाचा वासुदेव.

अंबा – आहा! होय. वासु आपला फार प्रमाणिक खरा! बहुत थोर! शिक्षा घ्यावयास योग्य.

पांडु० – मी जाणतों, सावित्रीला आणि तुला तो आवडत नाहीं. तुमचे उपदेशणिकेवरून त्याविषयीं माझे मनांतही आणि कशी गोष्ट आली होती; पण गुरूनें त्याची आज मोठी तारीफ लिहिली, त्यावरून माझा निःसंशय झाला.

अंबा — त्या सगळे गुरूंनीं उपगुरूंनीं त्यास वानुन वानुन तुला कंटाळा आणला नाहीं पुरे. ते त्याचे बापाची नालबरी जाणतात. धूर्त आहेत, ते त्याजकडून पैका काढायाचा असला ह्मणजे, त्याचे लोकांचे गुण वर्णन काढित असतात.

पांडु० — लोक तसें करितात हें मीहि जाणतों, पण वासुची मला अजून एक वाईट चेष्टा आढळली नाहीं; आणि आत्मारामानें नाहींतरी सहस्त्रावधी केल्या असतील.

अंबा — त्याच्या चेष्टांपासून कोणाला उपद्रव झाला नसेल, त्याचा त्यास त्रास झाला असेल.

पांडु० — तुह्मी एकाद्याला वेडें कराल. त्याणें माझा रथ मोडला त्यांत काय माझा तोटा झाला नाहीं? रथ, सोनेरी रंगाचा, नुकता नवा केलेला, ज्याचे दोन हजार रुपये मला पडले!

अंबा — ती गोष्ट आकस्मिक झाली, अज्ञानपणानें झाली: तो, त्याचें वय पाहून त्याकडे दोष ह्मणून लावितां येत नाहीं. गणोजी गाडी जोडून परीक्षा पाहात होता, तो आत्माराम त्याचे पाठीस लागून त्याजवळ बसला; तितक्यांत हातचा चाबूक खालीं पडला ह्मणून दोऱ्या आत्मारामाचे हातीं देऊन गणोजी खालीं उतरला; घोड्यानीं दोऱ्या नवख्या हातांत पाहून मस्ती केली, आणि पळाले. बरें झालें कीं हर-

नीस तुटोन घोडे निघोन गेले, त्याणें,दुसरें कोणी फार दुखवलें नाहीं; गाडीमात्र मोडिली.

पांडु० – होय, हें कांहीं फार नाहीं झालें ! यांत माझे शिष्य व दुसरे को-णाचा तोटा झाला नाहीं.

अंबा –. कां ? आत्मारामाचें डोक्यास खोंक नाहीं पडली ? तें असो, पण बिचाऱ्या गणोजीची चाकरी गेली, तें मला फार वाईट वाटतें.

पांडु० – तें आठवलें ह्मणजे अजून माझे पोटचे जाळ मस्तकी जा-तात. त्या कृत्यानें माझा आठशें रुपयांचा नाश झाला !

अंबा – आहाबाबा! त्यावेळेस आत्माराम आपल्ये मनांत किती ओ-शाळला ! गणोजीची आपल्येकरितां बेआबरू झाली, तें त्याला वारंवार मनांत खाई.

पांडु० – ते दोघे हिलबाडबेरे. दोघांस एकदांच हाकून द्यावे घटत होतें. मला हें आश्चर्य वाटतें किं तुला केंवार घ्यावास वाईट माण-सेंच कशीं मिळतात. तूं मुलगा झाली असतीस तर, आत्मारामा-स सोबती चांगली साजतीस; मग तुह्मी दोघे मोठमोठाले चम-त्कार करितां.

अंबा – नाहीं पण——

पांडु० – चूप बोलूं नको ! तूं मला कंटाळा ! आणिलास. मला

बाहेर

थोरांचेंहृदय.

बाहेर फिरायास जायाचें आहे. जा,आणि सावित्री कोठें आहे ति-ला घेऊन ये. ( तो पागोटें न घालतांच बाहेर जातो )

---

प्रवेश ८
अंबा.

(आपणाशीं ) याला दळवाला फार कष्ट लागतील. असो,आ-शा सोडूं नये. त्याचें तोंडमात्र फटकळ आहे.

---

प्रवेश ९
अंबा.सावित्री

सावि० – ( किंचित् दाराची फळी उघडून डोकावित्ये ) चूपचुप!

अंबा – कां ?

सावि० – मामा बाहेर गेला ?

अंबा – तुकताच गेला. आत्माराम कोठें आहे ?

सावि० – तो,मागील दाराचे निसणीशीं आहे.

अंबा – त्याला हळूच वर आपल्ये खोलींत आण.

सावि० – नाहीं तें ठीक नाहीं! जानकी तेथें आहे.

अंबा – त्यास एथेंच आणायास काय चिंता आहे ? बाबा बाहेर गे-

ला

ला सगळे एथें कोणी येत नाहीं.

सावि० – खरें म्हटलेंस. आणि समयीं एथून त्यास झुकालाहि चोरलें; तूं एथें ऐस, मी त्याला आणित्यें.

---

## प्रवेश १०

अंबा

त्यापासून कधीं मी सगळें पुरून घेईनसें मला झालें आहे! त्याचे भेटीनें मला मोठा आनंद होईल. मला त्यास पाहून एक सगळें वर्ष लोटलें. ओहो, हातो आला वाटतें. (त्यास भेटायारा सामोरी जात्ये)

---

## प्रवेश ११

अंबा, सावित्री, आत्माराम

अंबा – (त्यास आलिंगित्ये) आहारे माझा भाऊ!

सावि० – आपल्यास याणें इतकें संकटांत पाडिलें आहे, त्याअर्थी यास मोठा सत्कार उचित आहे.

थोराचेंहृदय.

अंबा – मी त्याला पाहून सगळें विसरल्यें.

आत्मा० – अंबाताई, तुझी ममता अजून मजवर तशीच आहे. सावित्रीताई सारिखी तूं मजवर कठोर दिसत नाहींस.

सावि० – असं काय ? मी तुझे मामासारिखी असोंद्यायाची होत्यें, मग————

आत्मा० – मला पहिल्यानें सांगा कीं तो काय ह्मणतो ? तो मजवर रागावला आहे हें खरेंच काय ?

सावि० – तुला आह्मी एथें आणून लपविला, हें जर त्याचे कानीं आलें, तर मग आह्मास हें घर सोडून देशांतरीं जायाचें पडेल.

अंबा – होय गे बाई खरेंच ! त्याचे समोर जायाचें अजून अंमळ नाव घेऊं नका. या वेळेस तो एकादा अनर्थ करील.

आत्मा० – आमचे गुरूनें काय बरें त्याला लिहिलें असावें ?

सावि० – त्याणें तुझे पराक्रमाचें फार वर्णन केलें आहे.

अंबा – काल पत्र आलें त्यांत वासूनें कांहीं तुझें वांकडें लिहिलें आहे.

आत्मा० – काय ! वासूनें लिहिलें ? तर आतां मला दुसरा परिहार नको. त्याला सगळी गोष्ट ठाऊक आहे, आणि मी त्याला यत्किंचित् सांगीतलें आहे.

अंबा – त्याचें पत्र वाचलें असतां तुजकडे कांहीं मात्र अन्याय दिसत नाहीं.

आत्मा० – पांत जर माझा तिळप्राय अन्याय आहे तर दुसऱ्याचे ... तेमाझे होत.

सावि० – असो तें बोलून फळ नाहीं. तूं दोहोंतून एक कोणी तरी असावास भला किंवा लबाड.

आत्मा० – तुला मी अन्यायी वाटतों? माझा अन्याय काय? पडियाळ विकलें होतां?

सावि० – आणिखी कांहीं नाहीं? तूं शेला पागोटें विकलें नसशील ह्मणून कोणी ह्मणावें?

आत्मा० – खरेंच. मला, आणिखी पैशांची गरज लागती तर सगळें विकलें असतें.

सावि० – आहा, काय चांगलें उत्तर! आणि नित्य रात्रीस बाहेर निजावें!

आत्मा० – एक रात्र मात्र बाहेर होतों गे ताई.

सावि० – आणि त्यासाठीं गुरू योग्य शिक्षा करितील ह्मणून पळावें!

आत्मा० – योग्य शिक्षा नव्हे, जुलुम करतील असें कां ह्मणत नाहीं?

थोराचें हृदय.

मी अन्याय करीन तर शिक्षा कराची, उगीच शिक्षा ह्मणजे. जर मी ती शिक्षा घेतली असती तर मग मी आपल्यावर कालिमा आणिली होती. आणि त्याशी मला अप्रतिष्ठा करून शाळेंतून काढून दिला असता, तर मग मला एथें तुह्माजवळ यावयास तोंड नव्हतें.

अंबा — पण भाऊ; तूं याचा परिहार कसा करितोस तें सांग; आह्माला कळलें पाहिजे, आह्मी बापापाशीं तुझी सफाई करूं.

आत्मा० — तर वास्तवीक गोष्ट अशी आहे. काहीं दिवस झाले, जवळचे गावीं यात्रा भरणार ह्मणोन आमचे शाळेंत बोलूं लागले. तेव्हां आह्मी मौज पाहावी आणि होस पुरवावी, ह्मणून गुरूनें आह्मां कितेकांस [illegible] जावयास आज्ञा दिली.

सावि० — असें काय? तर मला वाटतें घडियाळाचे आणि हितोपदेशाचे रुपये आले तितके सगळे डाळिंबे, बेरें, बरफी, पेढे, घ्यावयास खर्च झाले असतील; कांहीं दर्वेसाचें आस्वल माकडांचा तमाशा पाहायासहि खर्चले असतील.

आत्मा० — (अंबास) मला वाटतें माझे ताईला असल्या वस्ता फार प्रीय आहेत, त्यां करितां कोणी जें मागेल तें ती देईल. मी तसें नाहीं केलें ऐक, मला ताहान लागून माझे आंगाचा दाह झाला

ह्मणून

म्हणून एका गुजराथी ब्राह्मणाचें भांगीचें दुकान होतें तेथें गेलों, निर्मळसें पाणी प्यावें म्हणून ·

सावि० – हें तर त्याहून रद्द. कसें असो पण तें भांगड्यांचें दुकान तरखरें

आत्मा० – ताई तुझा स्वभाव फार कठिण गडये. माझें सगळें ऐकून तर घेशील. तेथें आह्मी बसलों असतां ———

अंबा – (दाराकडे कान देऊन ऐकत्ये) घात झाला. माझे बापाचे शब्द ऐकूं येतात !

सावि० – पळ ! पळ ! पळलवकर !

आत्मा० – नाहीं. मी मामापुढें जाऊन त्याचे पायां पडेन, आणि त्याचें सांत्वन करीन ·

अंबा – आये ! नको भाऊ, तसें करूं नको. तो यावेळेस तुझें ऐकणार नाहीं. माझेसाठीं, इतकें तूं करूं नको ·

आत्मा० – तर तुझें ऐकूं ?

अंबा – होहो ! तें सगळें तुझे वारचें मी करीन. (ती त्याला खांद्यांशीं मागल्ये दाराकडे लोटित्ये, आणि बाहेर जाऊन देऊन दिवाणखान्याचें दार दांपित्ये)

———

प्रवेश ११

## प्रवेश १२

पांडुरंगराव,अंबा,सावित्री

अंबा – आहा बाबा; मला वाटतें तूं फिरून आलास,बाहेरून

पांडु० – माझें पागोटें कोठें आहे तें पाहातों; जळो तें: कोठें ठेविलें तें स्मरत नाहीं

सावि० – (चोहींकडे पाहात्ये) हें आहे.

पांडु० – तें मजकडे आणायाचें तुला सूचत नाहीं ?

सावि० – खरेंच,मला सूचलें नाहीं

अंबा – सर्वदा चित्ताची स्वस्थता राखणारे असे विरळा

पांडु० – खरेंच,तुह्माला कामें पुष्कळ ह्मणोन तुमचें चित्त व्यग्र

अंबा – माझे मनांत तुकतीच आत्मारामाची गोष्ट आली होती

पांडु० – मी काय निरंतर त्याचे नावाचा गिणगिणाट माझे कानाद्रीं ऐकावा

अंबा – बरें बाबा,आतां त्याची आह्मी गोष्ट बोलणार नाहीं. तूं फिरून येतोस ना लवकर ?

पांडु० – मी आतां फिरून आज,बाहेर जायाचा नाहीं (सावित्री आणि अंबा एकीमेकीचे तोंडाकडे पाहून मान हालवून खुण करितात किं मसलत फसल्ये) आणि आतां उशीर हि झाला आहे

आहे, आणि मला कोणी सांगीतलेंकिं माझा जुना गाडीवान खालीं आला आहे, तो मशीं बोलायास इछितो आहे.

अंबा व सावि० — काय, गणोजी!

पांडु० — मला जें नुकसान व्हायाचें तें होऊन चुकलें आणि त्याचें त्याला पारिपत्यहि पुष्कळ झालें. आतां तो काय ह्मणतो तें मला ऐकिलें पाहिजे.

अंबा० — तूं फिरून येसतों तो हावा असला तर थांबेल.

पांडु० — नाहीं नाहीं, मी त्याचें ऐकून त्याला लवकर निरोप देणार. (त्या दोघी एकीमेकीचे कानाशीं लागतात) (तो अंबास ह्मणतो) तुझा बाबा (सावित्रीस) आणि तुझा मामा, तुला ह्मणतो तें निमुटपणें तुं ऐकावेंस (सावित्री हळूच जायास लागत्ये) पोरी तूं कोठे चाललीस?

सावि० — (गोंधळून) मला खालीं कांहीं काम आहे.

पांडु० — बरें तर. गणोजीला सांगकिं वर ये (सावित्री जात्ये)

---

प्रवेश १३

पांडुरंगराव, अंबा

पांडु० — मला त्या गरीबाची काकळूत येत्ये. असा चांगला गाडीवान

वान मला मिळाला नव्हता. माझे घोडे असे त्याणें तुळतुळीत ठेविले होते किं, त्यांचे पाठीवर, रूप पाहावें. तो, त्यांचे दाणे चोरून कधीं दारू प्यावयास गेला नाहीं ·

अंबा – तूं त्याला क्षमा केली असतीसतर आत्मारामास इतका खेद होताना ·

पांडु ० – फिरून फिरून याची गोष्ट काढिली ! गणोजीस काढाया-स आणि मला इतकी गाडीवानावांचून इतकी अडचण भोगाया-स तो कारण. तो काढल्यानंतर मला कोणीच आवडला नाहीं. त्याची जागा चालवायास मला दुसरा कोणी तसा मिळायाचा ना-हीं ·

---

## प्रवेश १४

### पांडुरंगराव, अंबा, सावित्री, गणोजी ·

साव ० – मामा, हा गणोजी आला ·

गणो ० – माहाराज, मी क्षमा मागतों. मला वाटतेंकिं आतां मजवरून आपला राग गेला असेल. प्रार्थना करितो किं मी आपणापाशीं धढाईनें आलों, आणि रुस्कत मागतों ह्मणोन

आपल्ये

आपले मनांत वांकडें येऊं नये.

पांडु० – मी तुला तेव्हांच रुस्कत दिली नाहीं काय ?

गणो० – आपण ह्मटलें किं "हा घे तुझा रोजमुरा. माझें घरून या क्षणीं जा; आणि पुनः माझा उंबरा चढूं नको" तुह्मी मला सभ्यपणानें बोलायास किंवा रुस्कत मागायास अवकाशच दिला नाहीं.

पांडु० – तूं माझी गाडी मोडली असतां तुझीं मी आणीकरीतीनें चालावें असें कांहीं राहिलें नाहीं. त्यावेळेस त्या आल्यापोराची मान मोडली असती तर भलें काम होतें.

गणो० – त्यावेळेस मग मी अबधा कलों; कांहीं बोलल्लों नाहीं; आणि आमचें गाडीवानांचें ज्ञान चाबकापर्यंत, पण तोच माहाराज माझा हातून पडला तेव्हां तशी गोष्ट झाली. पण अतःपर मी फार जपून चालेन.

पांडु० – बरें; तें आतां सगळें गतलें. तूं हल्लीं काय करीत असतोस ?

गणो० – माहाराज, मी तुह्मास सोडल्यापासून विपत्तीच भोगतों आहें. तुमची चाकरी सोडल्यावर मी खंडेराव शिरक्यापाशीं राहिलों. आहा काय धणी तो ! त्याणें कांहीं उगारल्या

वांचून चाकरांशीं बोलूंच नये. तो बिचारा स्वर्गीं स्वस्थ असो!

पांडु० – तो आतां मेलातर?

गणो० – त्याचे मरणानें त्याचे हाताखालचे लोकांस आनंद झाला. त्यापासून पोटभरदाणेहि मिळूंनयेत, आणि सदां माराशीं गांठ.

अंबा – गणोजी; अशाधण्यापाशीं तूं कां राहिलासबरें?.

गणो० – तरकोठें जाऊंबये? माझे बायकोस जवळच चाकरी लागली होती, म्हणून मला त्याकडे राहाणें प्राप्त झालें. ती मेल्यावी तितक्यांत पोरांचा कांहीं चरितार्थ चाले. खंडेरायांसमोर सर्व कांपत असत. त्याला मृत्युनें मात्र कांपिवला. सांप्रत मला चाकरी नाहीं, आणि काय करावें तें सुचत नाहीं.

पांडु० – पण तूं जाणतोस, किं मी कोणास विपत्ती इच्छित नाहीं. आंणि जुने चाकरासतर सर्वथा नाहीं.

गणो० – खरेंच, मलाहि तें ठाउक आहे. पण ते भयंकर शब्द किं "पुनः माझा उंबरा चढूं नको" आजून माझे कानांत गोंगताहेत. खंडेरावांनीं मजवर दाहावेळ काठी उगारिली असती, तरी इतकें भय मला वाटलें नसतें.

अंबा – तर तेव्हांपासून तुला चाकरी नाहीं?

गणो० - हें पुणेंशहर नव्हे. असेलें गांवढ्यांत पोटाची पंचाईत, तेथें गाड्या घोड्या कोण ठेवितो. मी शेतावर खपें, माझी बायको हेल मजूरी करी; माझीं पोरें भीक मागत; इतकेंहि करून आम्हास पोट भरणें कठीण पडे. आम्ही भुईचें आंथरुण करूं; आणि आकाशाचें पांघरुण. माझी बायको तर दुःखानें मेली.

( तो डोळे पुसतो )

पांडु० - तुला हें सगळें घडे, तूं मजपाशीं कां आला नाहींस?

अंबा - ( सावित्रीस हळूच ) आतां बाबा निवळलासा दिसतो. आतां आत्ता रामाविषीं कांहीं शुभलक्षण वाटतें.

गणो० - आहा! महाराज काय बायको होती! अशी चांगली बायको झाली नसेल. जेव्हां जेव्हां मी शिणेंहातीं घरीं येइं, आणि उपाशीं निजायास जाइं, तेव्हां तेव्हां तिणे आपल्ये भाकरींतून मला अरधी भाकर द्यावी. जेव्हां मला राग यावा, तेव्हां तिणें मला कोमळ वचनानीं थंड पाडावें. हाय! आतां ती मेली, ती मला जीवंत करवत नाही! ती मेली तेव्हांपासून माझे विपत्तीस आरंभ झाला; आतां शेवट कोठें होईल तो ईश्वर जाणे.

सावि० - आहा, गरीबा बिचाऱ्या! तुझी मला दया येत्ये.

गणो० - बायको मेल्यानंतर मला कोठें चाकरी मिळायाची आशा

राहिली नाहीं. तेव्हां, थोडे दिवसांवर मी, माझा मुलगा मुलगी हातीं घेऊन रात्रीच्या गांव सोडला; तों मध्यरात्रपर्यंत चालत होतों; मग एका झाडाखालीं निजलों. दुसरे दिवशीं प्रातःकाळीं एक गांव आमच्या दृष्टीस पडला. प्रारब्धयोगानें त्या दिवशीं तेथली यात्रा होती, तेथें हेलपाटून मी कांहीं पोटास मिळविलें; तों तेथें मला आत्माराम भेटला; तो केवळ ईश्वराचा अवतार साक्षात्! खरें सांगतों, तो तसाच आहे!

पांडु० — काय तो आत्म्या पोऱ्या! ईश्वराचा अवतार! तें चांडाळ पोर!

अंबा आणि सावि० — (पुढें होऊन गणोजीकडे आनंदानें पाहतात) काय? आत्माराम! आमचा आत्माराम!

गणो० — महाराज, मला पाहिजे ती शिक्षा करा, पण त्यास वाईट म्हणूं नका. मला पायांखालीं तुडवून मारावयाचें असलें तर.

सावि० — गणोजी, चालूं द्या तुमची गोष्ट.

गणो० — माझी धाकटी चांपी, एकदां भांगवाल्याचे दुकानीं भिक्षा मागायास गेली होती; तेथें वासुदेव आणि आत्माराम दोघे बसले होते.

पांडु० — वाहवा! चांगला धंदा! भांगवाल्याचे दुकानीं!

सावि० – नाहीं मामा, तें ब्राह्मणाचें दुकान असावें; एऱ्हवीं माझा भाऊ तेथें जाणार नाहीं.

पांडु० – पण त्यागावीं जायाचें त्याचें काम काय होतें?

अंबा – त्यांना गुरूनें जावयास रजा दिली असली तर? आपल्या गुणाचा वासुदेवहि तेथें होता, ऐकिलेंस कीं नाहीं?

गणो० – त्याणें लागलेंच माझे मुलीस वळखिलें; आणि वासूनें त्यास पुष्कळ वारिलें तें न ऐकोन, तो तेथून उठला, आणि त्याणें पहिल्यानें माझे मुलीस कांहीं मिठाई आणून खावयास दिली; नंतर तिला हातीं धरून चालला, आणि तिजपासून सर्व वर्तमान ऐकून घेतलें. मग तो तिला घेऊन मजपाशीं आला; मी सगळे दिवसाचे मजूरीनें शोषून तेथें एकीकडे ओंजळीनें पाणी पीत होतों, तो त्याला पाहून मी हर्षानें वेडा झालों. माझे अंगावर चिंध्या होत्या, जिकडेतिकडे मळ लागला होता, तसाच मी त्याला उराशीं धरिलों, आणि कवळून कडकडां भेटलों, इतका कीं जवळ लोक होते त्यांस वाटलें कीं मी त्या कोंवळ्ये मुलास मी चिरडून टाकतों आहें काय. तोहि मला पाहून मोठा आनंदयुक्त झाला. मग तेथें लोकांची दाटी होती ह्मणून त्याणें माझा हात धरून मला एकीकडे नेलें.

अंबा — बाबा; मी आतां ह्वी असलीतर पैज मारीन कि ——

पांडु० — उगीऐसपोरी ! बरें, मग गणोजी ?

गणो० — मग आपणास सांगीतलें असें त्याजशी माझें सविस्तर वर्तमान सांगीतलें. तें ऐकून त्याला रडें कोसळलें, तें कांहीं केल्या आटोपेना. तो मला ह्मणाला, गणोजी, मला क्षमा करा. या सर्व विपत्ती तुह्मास मजमुळें भोगायाच्या पडल्या; तर आतां मी प्रतिज्ञा करितों कि, तुमचें दुःख दूर करीन तरच निद्रा घेईन. मग तो खिसा चांपून त्यांतून लाहानशी पिशवी काढून, मला ह्मणाला, हे घ्या कांहीं पैसे, मजपाशीं सध्या इतकेच आहेत. मी ते घेत नाहीं हादलें ह्मणून त्याला मोठा राग आला; तेव्हां मी त्याला ह्मटलें, रावजी, तुह्माला हे खाउसाठीं दिले असतील, ते मी कसे घ्यावे ? मला कष्ट करायाची सवें आहे; कसेंहि करून मी पोट भरितोंच आहें. असें ह्मणतांच त्याला मोटा क्रोध येऊन त्याणें हातपाय आपटले, आणि मला वाटतें किं, मी पैसे घेतोंना तर, तो मला त्यावेळेस मारता.

पांडु० — पिशवींत किती पैसे होते ?

गणो० — सरासरी चार रुपयांचा ऐवज. त्याणें त्यांतील दोन

आण्याचा

आपल्या वा खुद्दा मात्र ठेविला. तो ह्मणाला, तुह्मी माझे मामाचे जुने आणि प्रमाणिक चाकर; तुह्मी कांहीं चोरी लबाडी केली नाहीं; असें असतां मुलांसहवर्तमान या वयांत तुह्मी भीक मागावी; तुह्मारा राहावयास ठिकाण नसावें; तुह्मी क्षुधे तृषेनें तळतळावें, आणि तें आह्मी पाहावें; धिक आमचें जिणें! तर तुह्मी आतां असेंकराकिं, कोठे लाहानशी खोली घ्या. तिहिंदिवसांआंत मी आपल्ये मामास लिहून उत्तर आणवितों; आणि तुमची कांहीं सोय कादितों. मामास आपण दोघांनीहि रागें भरविला खरा, पण तो दयाळू आहे, तो उदार आहे, तो तुमची विपत्ती ऐकून कळवळेल, आणि वळेलच.

पांडु० — तो असें बोलला? वास्तवीक?

गणो० — महाराज, मी शपथ करितों ह्यावीतर.

अंबा — नको नको; तूं खोटें बोलणार नाहींस, आमची खात्री आहे. सांगपुढें सगळी गोष्ट.

गणो० — नंतर त्याणें माझें बेंडूस आपल्ये मांडीवर बसविलें; आणि मला पुसतो, तुमचीं मुलें काय करीत असतात? मी ह्मटलें काय करतील? कोठें झाडाखालीं जाऊन फुलें जमाकरून आणितात, आणि त्यांचे तुरेकरून विकितात; नाहीं त्यावेळेस

काढव्या

काटक्या जमा करितात; तेंहि नाहीं त्यावेळेस भीक मागतात. तो ह्मणाला छीछीछी; तें ठीक नाहीं. अशांत कांहीं जीव नाही. यांत तीं आळशी आणि स्वछंद मात्र होतील. तुह्मी मुलास कांहीं तरी एकादा धंदा शिकवावा; आणि मुलीस कोठें चाकरीस ठेवावी.

अंबा — बाबा; आत्मारामानें याला तें नीट सांगितलें नव्हे ?

गणो० — मी ह्मटलें, खरेंच, पण त्या असल्या चिंध्या आंगावर असतां यांस मी कोणापाशीं नेउं ? माझे जवळ एक पन्नास रुपये असतेतर मी यांस सोईस लावलीं असतीं. एथे जवळच एक स्त्री आहे, ती पोरें चाकरीस ठेवित असतो; त्यास मी वीस रुपये नजर दिले असतां तो वेंडूस घेईल, व एक रंगारीण आहे ती माझे चांपीस ठेवील, तिला अंमळ चिरगुट पांघुरणें करून सजिवली असतां. मग माझें एकट्याचेंच राहिलें; त्याचा भार नाहीं, मी कोठेंहि कोणाची चाकरी करून पोट भरीन, असा रिकामटवळ्या सारिखा इकडे तिकडे फिरणार नाहीं.

पांडु० — आणि यावर आत्मारामानें काय ह्मटलें ?

गणो० — त्याणें तें ऐकून मात्र घेतलें, आणि गेला, तो चौथे दिवशीं आला. आणि मला ह्मणाला, तो स्त्री कोठें राहातो ? त्या

कडे

कडे मला न्या. मी त्यास त्याकडे नेला; तेते एकांती काय बोलले तें मला त्याणें सांगीतलें नाहीं; मग मला ह्मणाला किं रंगारिणीकडे चल. मी तिजकडे त्यास नेला; तेथें त्याणें मला दरवाजाशीं ठेऊन तो आंत गेला, आणि तिला कांहीं बोलला; तेंहि मला त्याणें सांगीतलें नाहीं. मग आह्मी दोघे परत आलों. पांच पन्नास पावलें चालून तो उभा राहिला; आणि माझा हात धरून ह्मणाला; माझ्या मित्रा, आतां तूं मुलांची कांहीं काळजी करूं नको, मी त्यांची सोय केली. पुढें त्याणें मला एक दुकान दाखविलें, त्या दुकानदारास त्याणें आगोदरच पैसे देऊन ठेविले होते; तेथून त्याणें मला हा आंगरखा, पागोटें, आणि सखलाद, अशीं देवविलीं; तींहीं आतां माझे आंगावर प्रत्यक्ष आहेत; त्याणीं मी मोठा मनुष्य दिसतों नाहींबरें ?

अंबा — (गहिंवरून); आगा माझा गुणाचा, माझ्या भल्या आत्मारामा!

पांडु० — (डोळे पुसतो) आतां मी समजलों घड्याळ कोठें गेलें तें.

गणो० — इतकेंच नाहीं महाराज. तो माझे खिशांत, माझे नकळत, पैसे घालीत होता, तो मी धरिला; आणि ह्मणालों तुझे अपका-

र मजकूर पर्यंत इतके झाले आहेत, आतां मला आणिकी पैसे नकोत. मग त्यास जो राग आला आहे, असा कधीं आला नसेल. तो मला ह्मणाला, माझे मामानें तुजकरितां पयसे धाडले ते तूं घेऊं नाहीं. हें मामास कळलें तर तो काय ह्मणेल? मग मी ते घेऊन तुह्माकडे येऊं लागलों, तें पाहून तो मला ह्मणाला; मामाची आज्ञा अशी आहे किं यांतलें तूं कांहीं कोणाला सांगूं नयेस; या साठीं हें तूं मामापाशीं जरी बोललास तरी तो फार रागावेल: मी मग आपल्ये मनांत ह्मटलें; आहाहा! पांडुरंगराव असे धर्मिष्ठ आहेत नाहीं! तर यावरून मला दिसतें किं मी त्यांकडे गेलों असतां, ते मला माझे अपराध क्षमा करून पुनः चाकरीस ठेवितील. असें मी मनांत आणिलें; पण तुह्मापाशीं येऊं नये याविशीं त्याणें माझे पोटांत भय घातलें.

पांडु० - आहारे माझा आत्मारामा! माझा जिवलगा आत्मारामा! तुझा ठायीं लाहानपणापासून थोरपणा, आणि उदार चित्तता, मी पाहात आलों ती अजून तशीच आहे!

अंबा - तर शेवटीं तूं काय योजून एथें आलास.

गणो० - मी आलों एवढ्यासाठीं: एथल्ये लोकांचें मला एक पत्र पाहिजे, किं मी या गांवचा खरा; आणि बेंडू हा माझा खुल-

ग. रेंवरा; असें पत्र दाखविल्या वांचून तो खत्री ह्मणतो किं मी तुझे मुलास आपल्ये स्वाधीन घेणार नाहीं; ह्मणोन मला एथें येणें पडलें. गांवांत शिरलों तों मला कोणी सांगीतलें किं, यशवंतरावास एक गाडीवान पाहिजे; तें ऐकून मला असें वाटलें किं, आत्मारामाचे योगानें मला आतां प्रारब्धही अनुकूळ आहे; तो तसाच मी यशवंतरावाकडे गेलों, तों त्यांणी सांगीतलें किं, तूं जरी कोणाजवळ होतास, त्यांचे हातचें आबरूपत्र आणिलेंस तर तुला ठेवीन. पाहिलें तों खंडेरावबरोबर परलोकीं गेले, तेथें माझा नें जाववत नाहीं; ह्मणोन भीत भीत तुह्मापाशीं आलों. मनांत कीं कदाचित् तुह्मी मला आबरुपत्र दिलें नाहीं तरि, तुह्मी आत्मारामाचे हातानें जे मजवर उपकार केले त्याविषयीं तुह्मास बरें मागावें, आणि परत जावें.

पांडु० — नाहीं माझ्या भल्या गणोजी, तसें होणार नाहीं; आत्मारामानें जे तुजवर उपकार केले, त्यांत माझा अगदी संबंध नाहीं. त्याणें आपल्यास उघडें करून तुला झांकलें; त्याणें आपण उपाशीं राहून तुला तृप्त केलें. त्याणें पुण्यकर्म केलें; त्याचा वांटा मी कसा घेऊं? तुझे योगानें तोहि माझा कृपेस पात्र झाला; हा त्यावर तुझाहि मोठा उपकार झाला.

त्यास

त्यास तूं आज केवढे संकटांतून काढिलास ! हेंच, आज जर, तूं नसतास, तर मी त्याला अक्षयी माझ्या दृष्टीवेगळा केला होता.

गणो० — महाराज, आपण असें ह्मणतां ! तर माझे सारिख्या भाग्यवान् आज या सृष्टींत कोणी नाहीं ! काय? आत्मारामास मी संकटांतून बाहेर काढला ? आह्मी परस्पर परस्परांस असे कामास आलों ? आहा ! काय आनंदाचा दिवस आज !

पांडु० — त्या घातक्या बाह्मानें, माझें अंतःकरण त्याविशीं क्षोभविलें होतें. त्या लुच्चानें मला असें फारवेळ ठकविलें; अतःपर मी त्याचा विश्वास कसा धरूं? धरणार नाहीं. पण भला ह्याळा गुरूचें नवल वाटतें.

अंबा — कां बाबा ? त्यालाहि त्याणें असेंच ठकविलें नसेल कशावरून ?

पांडु० — पण तो मला लिहितो कि आत्माराम पळाला. आयाये ! त्याणें निराश होऊन आपल्या जीवास एकादें कांहिं केलें, किंवा तो एकाद्या संकटांत पडला तर कसें होईल ! ~

गणो० — एक घोडा ! एक घोडा ! एक घोडा मात्र द्यावा; मी त्या-

स

स परत आणितों, तो द्विपांतरीं गेला असला तरी तेथून आणीन.

सावि० — (मामाचा हात धरित्ये) माझे मामा, तूं त्याला क्षमा करिशील? तूं त्याला एकवेळ आपल्ये पोटाशीं धरिशील?

पांडु० — जरि त्याणें आपलें सगळें विकलें असलें तरी, जरी तो जन्मला तसा नागवा मजपाशीं आला तरी, मी त्यास आतां अंतर देणार नाहीं. (सावित्री अंबास रखुण करित्ये, आणि आपण धांवत बाहेर जात्ये).

अंबा — बाबा, जर तो एथेंच कोठें असला तर?

पांडु० — काय एथें? त्याला कोणी पाहिला? कोठें आहे तो? कोठें आहे तो?

गणो० — आहा! एथें जर तो आहे! एथें जर तो आहे, तर मग काय? मग मी आनंदानें उडेन.

अंबा — बरें बाबा, तर तो तुझे दृष्टीस पडेल.

## प्रवेश १५

### पांडुरंगराव, आत्माराम, अंबा, सावित्री, गणोजी.

(आत्माराम दिवाणखान्यांत प्रवेश करून मामास साष्टांग नमस्कार घालितो. गणोजीचे पोटांत आनंद मावत नाहीं. सावित्री आणि अंबा आनंदाश्रू टाकितात.)

आत्मा० — (हात जोडून उभा राहून.) आहा मामा! माझ्या पूज्य मामा! तूं माझे अपराध क्षमा करिशील?

पांडु० — क्षमा करीन? तूं मला आतां सहस्रवांट्यानी अधीक आवडलोस. तुला क्षमा योग्य आहे. तूं मला अतःपर सोडून जाऊं नको.

आत्मा० — नाहीं मामा! कधीं जाणार नाहीं. (वळून गणोजीस पहातो, आणि त्याचा हात धरितो.) आहा! जर मामा तूं या गरिबाचे आणि याचे मुलांचे हाल पाहिले असतेस! जर ते सगळे तुजमुळें झाले असते! जसे मजमुळें झालें, तर तुला किती खेद होता!

गणो०

गणो० - नाहीं आत्मारामा, माझे हालांस मीच कारण. मी तुला गाडीवर कां घ्यावें ? मी तुझे हातांत तापर घोड्यांच्या दोऱ्या कां द्याव्या ? पण तुझेसारिखे मुलास नाहीं कोण ह्मणेल ? जरी गाडी माझे अंगावरून आरपार जाती, तरी माझ्यानें तुला नाहीं नाहीं ह्मणवतेंना. तर आत्मारामा, आतां याची खुण धर; आणि आजपासून मजकडे नाहींती आळ घेऊं नको. तूं घेतलीसतर मी तुला नाहीं ह्मणणार नाहीं, पण मग मी आपला प्राण ठेवणार नाहीं.

पांडु० - आत्मारामा, त्वां आपलें घडियाळें, पुस्तकें, आणि मला वाटतें कि चिरगुटेंहि, जीं विकलींस, तें मला कां लिहिलें नाहींस ? तुला या वस्तांच्या उपयोग समजत नाहीं, इतकाहा तुजमधें वेडेपणा नव्हे ?

आत्मा० - होयमामा, तें खरें; पण गणोजीचे कुटुंबास एक क्षणभरहि मी कष्टांत पाहवें तें मला महा पातक दिसलें. आणिखीहि तूं रागाऊन गणोजीस हाकून दिला होतास, ह्मणून मला ऐसें वाटलें कि, त्यास साहाय होण्याविशीं तूं मला मना करिशील; आणि मग जरमी तुझी आज्ञा मोडितो, तर मोठा टपक्यांत येतों.

पांडु० - काय ? तर तूं माझी आज्ञा मोडिली असतीस ?

आत्मा० – होय मामा; पण इतक्याविशींच मात्र.

पांडु० – माझे शूरा मुला; मला तुझा मुका घेऊं दे! असो; पण मला पत्र आलें आहे, त्यांतील एक गोष्टीविशीं मला अजून संशय आहे, तितका माझा फेड. तूं रात्रीस बाहेर होतास तो कोठे होतास?

आत्मा० – मी गणोजीकरितां पयसे घेऊन गेलों होतों. आमचा गुरू त्यारात्रीस कोठें बाहेर गेला होता, ह्मणोन लवकरच दरवाजा लागेल, हें मला ठाउक होतें, त्यासाठी मी लवकर घरीं यावयास निघालों, तो आंधारांत वाट चुकलों.

सावि० – आहारे भाउ. तरमग तुझी अवस्था काय झाली; आणि तूं कोठे निजलास?

आत्मा० – मला वाटेंत एक खोपट आढळलें. तेथें वरी एक फळ्याचा तुकडा होता, त्यावर निजलों; तरी निद्रा मला कधीं आली नव्हती. गणोजीस स्मरणकरून माझे जीवास कोठें समाधान झालें होतें.

अंबा – आये! कायदुष्टबाळकतरी! त्याला हें सगळें ठाउक; पण त्याणें आह्मास कळीवलें नाहीं.

पांडु० – या क्षणापासून मी त्यास पाणी सोडिलें; आतां तूं माझा-

आत्मा० - नाहीं भामा, असें करूं नको; दुसऱ्यास दुःखांत पाडून मी सुखी कसा होईन ? आणि सातव्यान तुझे पोटचे मुलास.

सावि० - (त्याचा हात धरिल्ये) असल्ये भावास मी किती न-मू ? किती जीवाशीं धरूं ?

पांडु० - बरें तर; तो शाळेंत असेल; आणि तूं मजपाशीं एस. मी तुला माझे हृदयांत सतत ठेवीन. तुला शिकवायास गुरू पाहिजेत, ते शंभर कोसांवरून आणवायाचे झालेतरी आणीन.

गणो० - (नमतो) माझे चांगल्ये धण्या. तुझी वृत्ती मी सदा सुखी पाहिली.

पांडु० - (त्याची पाठ थापटतो) गणोजी, तूं यशवंतरावापाशीं वचनानें गुंतला आहेस काय ?

गणो० - मी कसा गुंतों. मला तुह्मांपासोन रुख्सत कोठे मिळाली आहे अजून ?

पांडु० - तुला रुख्सत मिळणार नाहीं. माझी इच्छा आहे कीं त्या आणि आत्मारामानें एका ठिकाणीं असावें, आणि एकमेकास सुखी करावें. पण त्यास पुनः गाडीवर येऊंदेऊं नको हो ? मी तुझे मुलांचाही सांभाळ करीन.

## थोराचें हृदय.

गणो० — (आनंदाचा उमड येऊन डोळ्यांतून आंसवें वाहत आहे) माझे धण्या ! तूं खरेंच ह्मणतोस ? मी हें स्वप्नतर पाहात नाहीं ? आहा ! तर प्रथम मला घोडशाळेंत जाऊन माझे जुने मैत्रांस भेटूं दे

## जुना चाकर.

### मुकुंदशेट, विठु.

विठु — बाबा, तूं रामजीला काढशील, तेव्हां त्याचे जागेवर ठेवायाला मी एक चांगला चाकर पाहिला आहे.

मुकुं० — तुला ही कामगिरी कोणी सांगितली बरें ? मी त्यास काढणार हें कशावरून ?

विठु — तर काय तूं सदां त्या ह्मातारड्यासच ठेवणार ? त्यापेक्षां मला वाटतें किं तरणा चाकर मोठा उपयोगी पडेल.

मुकुं० — चांगल्या चाकरास काढावें ही गोष्ट फार अनुचित ! तूं त्यास ह्मातारडा ह्मणतो तुझे चित्तांत खालें कसें नाहीं ! तो माझे चाकरींत ह्मातारा झाला. तुला त्याणें लाहानाचा मो-

ठा

दा केला. तुला दुखणें येई तेव्हां तो तुझी फार काळजी वाही; तेणेंकरूनच तो लवकर ह्मातारा झाला नाहीं असें कशावरून? यावरून तूं पाहा किं तो त्याचे ह्मातारपणाची थट्टा करावी ही किती कृतघ्नता! आणिखी, हा तरी तुझा खचित निश्चय होतो किं, तरणा चाकर त्यापेक्षां अधीक उपयोगीं पडेल? तर याविषयीं एकादा निश्चय करायास अजून तूं फार लाहान आहेस; हें तुझाहून जाणत्यांचें काम आहे. एकादे दिवशीं मी तुझे अनुभवास आणून देईन किं, आस्था पूर्वक चाकरी करण्याविशीं, धन्याचें हित पाहाण्याविशीं, तरण्यापेक्षां, ह्मातारे चाकर फार उपयोगी आहेत.

विठु — तूं ह्मणतोस त्या अर्थी मीतें खरेंच मानितों. पण त्याचे केंस झडले आहेत; त्याला पाहिलें ह्मणजे मला चिळस वाटतें, आणि हसू येतें.

मुकुं० — हें तुझें हासणें कांहीं प्रतिष्ठित लक्षण नव्हे मुला! मला वाटलें नव्हतें, किं तूं असा अधम आहेस. तुला ठाऊक नाहीं, त्याला फार दिवस दुखणें लागून त्याचे केंस गेले हे? त्याची थट्टा करणें तो ईश्वराची थट्टा, ज्याणें तो रोग मुद्दां उत्पन्न केला.

विठु — पण तो नित्य कुरकुरतो, आणि दुर्मुखलेला, दुसरे चाकरां सारिखा मौजी नव्हे.

## जुनाचाकर

मुकुं० — वयामुळें त्याचे ठायीं ती प्रौढता आहे. पण तो कुरकुरेल क-
ग्रास ? तो अठरा वीस वर्षांचे पोऱ्यासारिखा चपळ नाहीं ह्मणून
काय तो तुला आवडूं नये ? अगा मुला ! असें मनांत आणता-
ना तुझे आंगास शाहारा यावा ! ईश्वरें मला फार दिवस आयु-
ष्य दिलें असतां, याप्रमाणें तूं माझाहि कंटाळा करिशील नव्हे ?

विठु — काय तुझा ! नाहीं बाबा. मी असा द्वाड नाहीं.

मुकुं० — तर रामजीचा कंटाळा करावा हा द्वाडपणा नव्हे ? कांकिं
तो ह्मातारपणामुळें भागल्यासारिखा चपळ नाहीं ह्मणून ?

विठु — बाबा मी चुकलों मला क्षमा कर; मला आतां फार खेद झाला
किं मी ——

मुकुं० — तूं उगीच कां राहिलास. तुला खेद कां झाला तें सांग ?

विठु — तो माझा अन्याय जर मी तुला सांगीनला, तर तूं मजवर
फार रागें ??शील, आणि मला मारशील.

मुकुं० — तुला, तूं जाणतोस, मला मारण्याची हौस नाहीं; मी तो उ-
पाय तसेंच कारण पाहून एकादेवेळेस करितों. अन्याय झाला अ-
सतां मोठे समजतें, आणि चांगला उपदेश करून, मी तुला आणि तु-
झे बहिणीस मार्गास आणितों. तूं अन्याय काय केला आहेस तो
मला ठाउक नाहीं, ह्मणोन तुला मी पारिपत्य करणार नाहीं, हें मा-

झानें

ह्यानें निश्चुण कबूल करवत नाहीं. तूं काय असी बोली सोडवून कबूल होणार? छी हें चांगलें नव्हे तुजवर माझी ममता किति आहे, हें तुला ठाउकच आहे, तर तीवर विश्वास धरून, तूं मजपाशीं कबूल व्हावेंस.

विठु — बरें बाबा, तर मी कबूल होतों, किं मी रामजीस "चोरटे ह्याराम्या" असें ह्मटलें.

मुकुं० — काय? तुजपासून अशी गोष्ट झाली? त्या भल्ये मनुष्यासंगती कसें वागावें तें तूं इतकें विसरलास? आणि हे शब्द रामजीनें ऐकिले?

विठु — होय बाबा; ह्मणूनच मला पश्चात्ताप होतो.

मुकुं० — पश्चात्ताप व्हावा हें चांगलें मुला. पण तोंडावर कोणास वाईट ह्मटलें त्याचाच पश्चात्ताप व्हावा आणि पाठीमागें ह्मटलें त्याचा होऊं नये, असें तुला वाटत असलें तर, वास्तविक पाहातां दोन्ही अन्याय समान आहेत.

विठु — खरें बाबा, तोंडावर किंवा मागें मी रामजीस असें ह्मणूं नये; पण मी तोंडावर ह्मटलें ह्मणून मला फारच खंती होत्ये कां कि —

मुकुं० — तूं मजपुढें मन मोकळें करून कांहीं पुढें सांगायास इच्छितो आहेस, असें मला वाटतें, चालूं दे; गोष्ट संपीव.

विठु — हेंसबाबा, जेव्हां मी रामजीस बाईट ह्मटलें, तेव्हां त्याणें डो-
क्यांतून आसवें टाकिलीं; आणि ह्मणाला; मी एकतर ह्मातारप-
णाचे क्लेशानें पीडलों आहें, त्यावर आणिखी मला मुलांनीं ला-
स द्यावे, काय प्रारब्ध !

मुकुं० — गरीब बिचारा रामजी. मला वाटतें किं ती गोष्ट त्याचे
जिवारी लागली असावी. या वयांत त्याला पोरांनीं चाळवावें,
तें साहाणें फार कठिण आहे. पण ज्या मुलास त्याणें बाळपणा-
पासून ममतेनें वागिवला, असा किं ते त्याचे उपकार कधीं फेडि-
लों येणार नाहीं, त्या मुलानें त्यास असें दुखवावें हें त्यास अति
दुःसह झालें असेल.

विठु — आहाबाबा, मी किती निंद्य ह्मणावा. मी त्यापाशीं क्षमा
मागेन. आणिखी मी शपथ घेतों किं, माझे कुडींत प्राण आहे,
तोंपर्यंत मी त्यास पुनः कधीं दुखविणार नाहीं.

मुकुं० — बरें मुला, ह्मटल्याप्रमाणें वागलास तरच तुला आजचा
अपराध देव क्षमा करील; आणि मीहि क्षमा करीन. आपण सग-
ळे परस्वाधीन प्राणी आहों: कामक्रोधादिकांस वश होऊन एकादे वे-
ळेस अनुचित कर्म करितों; पण त्याचें वारें निघून गेल्यावर आप-
ल्यास पश्चात्ताप व्हावा, आणि गर्व सोडून झाल्ये अपराधाची आप-

ण

ण स्वच्छता करावी; आणि पुनः आपल्यापासून तसा न होऊं देण्याविशीं आग्रह धरावा. पण तूं मला सांग कीं तुला रामजीस असें ह्मणायास कारण काय झालें ? त्याणें तुझा कांहीं अन्याय केला होता ?

विठु — होय बाबा, त्याणें आपल्याकडून जरी नसला केला तरी मला तसें वाटलें. मी माझा तीरकमठा घेऊन खेळत होतों, तों त्याचे तोंडावर तीळ पाहून मी त्यावर नेम धरिला; त्यावरून त्याणें मला ह्मटलें " खबरदार विठू; नाहींतर मी तुझे बापास जाऊन सांगेन." त्याणें मला असें धमकाविलें त्यावरून मला फार राग आला; आणि मी त्याला शिवी दिली.

मुकुं० — तर तूं आपल्याकडून त्याला रागें भरून दुखविलेंस.

विठु — तें मी नाहीं कसें ह्मणूं ?

मुकुं० — तर तूं विशेष अपराधी. ह्मणूनच त्याने तुझ्यास ऐसें ह्मणणें आलें !

विठु — बरें तर बाबा, तूं आज्ञा देशील तर मी या क्षणीं त्याकडे जाऊन क्षमा मागतों. तो ती देईपर्यंत मला चैन पडणार नाहीं.

मुकुं० — होय मुला. असल्या कामास एक क्षण जाऊं देऊं नये; जा, जाऊन ये, मी एथें आहे (विठु जातो आणि समाधान पाऊन परत येतो)

येतो ) ·

विठु — बाबा, आतां माझें अंतःकरण मला स्वस्थता देतें. कांकिं राजीनें मला मनापासून क्षमा केली. आणि मला वाटतें किं मी अतःपर असा अन्याय करणार नाहीं ·

मुकुं० — ईश्वर तसें तुजकरून करवो; त्याचे कृपेवांचून तुझा कोणताहि निश्चय तार पाडणार नाहीं ·

विठु — त्याची कृपा व्हावयास काय उपाय करावा ?

मुकुं० — त्या विषयीं तूं त्यास भज, आणि त्याची सहायता माग: तो तुला ती नाहीं देत असें म्हणणार नाहीं ·

विठु — मी ती माझे मनापासून मागेन. पण बाबा, मी दुसरें एक तुझे आज्ञेवांचून काम केलें आहे; कदाचित् तुला त्याचा राग येईल ·

मुकुं० — काय तें मुला ?

विठु — तूं [illegible] कोरा रुपया भेट केला होतास, तो मी रामजीस दिला ·

मुकुं० — त्यासाठीं मी रागें कां भरेन ? तूं असलें काम स्वबुद्धीनें करावेंस; त्यांत मला समाधान आहे. तुला मी पैसे देतों, तितके तूं ठेवावें असलें तर स्वतः ते तुझे; ते तूं धर्ममार्गास खर्चलेस तर त्याहून दुसरें अधीक चांगलें कृत्य काय आहे ? सांगीतलें आहे किं, आपण

लाहान

लाहानपणापासून धर्मकृत्याचा अभ्यास ठेवावा; पण तें धर्मकृत्य आपलें सामर्थ्य पाहून, आणि व्यवस्थेनें करावें; नाहींतर धर्म तोच अधर्म होतो. पण रामजीचें आतां समाधान झालें ना ?

विठु — त्याचे डोळ्यांतून आनंदाश्रु आले, ते मी पाहिले.

मुकुं० — मी तुला त्याविषीं शाबासकी देतों माझे मुला. चांगल्ये अंतःकरणाचे आहेत ते कोणासहि व्यथा देत नाहींत. सर्वच सत्कर्मे आपल्ये अंतःकरणांत समाधान उत्पन्न करितात; पण परोपकार-करण्यांत फारच समाधान आहे.

विठु — आहा! जर ईश्वरें कधीं मला सामर्थ्य दिलें तर मी आपल्ये आसपासचे गरीबलोकांचे क्लेश दूर करीन.

मुकुं० — मी भगवंतापाशीं मागतों, किं तो, हा गुण तुजमध्यें दृढ करो; आणि तो आचरायास तुला सामर्थ्य देउ.

विठु — तरमग मी सदां आजचे सारिखाच समाधान पावेन ?

मुकुं० — हा इतका एकच आनंद कधीं विटत नाहीं. प्रथम तूं, हा, आपल्ये घरचे मनुष्यावर उपकार करून भोग. जर तुझे चाकर भले मनुष्य आहेत, तर तूं त्यांशी बरेपणानें वागून त्यांची ममता तुजकडे लाउन घे. त्यांस कधींमधीं देणगीहि दे; जर तूं त्यांस घटेवेळां आणि प्रसन्न चित्तानें ती देशील तर ते तुझे दृढ मैत्र होतील.

विठु

## जुना चाकर

विठु — पण बाबा, त्यांस रोजमुरा मिळतो नव्हे?

मुकुं० — तो त्यांचे चाकरीचा; त्यांस आपण कांहीं त्यांस अधीक केले असें नाहीं. पण त्याशिवाय त्यांस कांहीं इनाम दिलें असतां, त्यांची ममता आपल्यावर जडते, आणि ते अधीक कामावर पडतात.

विठु — हें कसें तें मी चांगल्यें समजलों नाहीं?

मुकुं० — ह्या रामजीचाच मी दृष्टांत देतों. याचे चाकरीचें मी यास अन्नवस्त्र रोजमुरा देतों. तें घेऊन, त्याणें बोली केली आहे तितकी चाकरी केली म्हणजे तें फिटलें नव्हे? आतां तूं पाहतोस कीं तो घरांतली सर्व वस्तांची खबरदारी ठेवितो; दुसरे चाकरांची देखरेख करितो, तेणेंकरून माझा फार नफा होतो; हें तो माझे ममतेनें सर्व करितो. कां कीं मी त्याला वेतनाशिवाय आणिखी देणगी देतों. तूं मोठा होशील तेव्हां तूं आणखी थोडे लोकांनी चाकरांची कागाळी ऐकशील, तर मी तुला खरेंच सांगतों कीं, हा अन्याय धणी लोकांचा आहे; ते त्यांस भय दाखऊन वागवूं पाहतात, प्रीतीनें वागवीत नाहींत.

विठु — आतां मी पक्कें समजलों. आणि माझे आंगावर पडेल तेव्हां, तूं सांगतोस तसेंच मी करीन, आणि तुझे उपदेशाप्रमाणें वागेन.

सुकुं० — तसें केलेंस तर तुला त्यांपासून संताप होणार नाहीं; माझे बापानें मला याविषयीं एक गोष्ट सांगीतली आहे, ती मी नित्य स्मरत असतों.

विठु — आहा बाबा, जर तुला श्रम होणार नाहीं, तर मी ती ऐकायास इछितों.

मुकुं० — तूं मजकडे आपला अन्याय कबूल झालास, आणि तूं रामजीविषयीं उदारपणा दाखविलास, हा तुझा भलेपणा पाहून मी संतोषानें ती गोष्ट तुला ऐकवितों." दमाजीराव ह्मणून कोणी सरदार होता. तो सरकार चाकरींत म्हातारा झाला, तेव्हां तो आपल्ये इनाम गांवावर येऊन राहिला. त्याची बायको मोठी पतिव्रता होती; व पांच मुलें, तीं आईबापाचे आज्ञेंत तत्पर होतीं. त्याच[illegible] धोरपणा; त्याचा मधुरस्वभाव, त्याचे घरांतील रीतभात पाहून, त्या गांवचे सर्व लोक, व त्याचे ओळखीदेखी त्यास भा[illegible]. असें तें एकत्र कुटुंब, जो पाही त्याचा आत्मा समाधान पावे. उमेदवार माणसें त्याचे चाकरींत राहायाची इछा करीत. त्याचा कोणी चा[illegible] मेला, किंवा गेला असतां, त्याचे जागेवर राहायास उड्या पडत. जसे चाकरांचे तोंडावर सर्वदा आनंदवृत्ती दिसावी, जसें कोणी ह्मणेल कीं त्याचीं लेकरें आहेत, चाकर नव्हेत. त्याणें आज्ञा कर

णे

ऐं त्या नितियुक्त, जशा ज्याचे शक्तीस योग्य, तशा कराव्या. तेणेंकरून कोणाच्या मनांत कधीं त्याची अवज्ञा करावी, अशी कल्पना आलीच नाहीं. त्याचे घरीं चाकरांत परस्पर भावाप्रमाणें गोडी होती. कधीं त्यांमध्यें बोलाचाली झाली, तर धन्याची चाकरी अधीक कोण बजावतो, आणि त्याचे हितास अधीक कोण जपतो, याविषयीं स्पर्धा व्हावी. “ माधवराव शिंदे दमाजींचे जुने मित्र, तेहि दमाजीसारिखे चाकरी सोडून आपल्ये इनामगावीं राहात होते; ते एके दिवशीं त्यांचे घरीं आले होते; तेव्हां गोष्टीवरून गोष्ट निघतां, माधवरावानीं गोष्ट काढिली किं, मी दुसरे सर्व गोष्टींत सुखी आहें, परंतु माझे चाकराविशीं बेजार आहें; मला त्यांविषयीं जपतांना पुरें झालें. जो चाकर पाहावा तो आळशी, बेअदबी, आणि चाकरीचोर आढळतो.” दमाजी त्यास ह्मणाला, तेव्हड्याविशीं मी सुखी आहें; आज ५०।६० वर्षें झालीं, मला असें स्मरत नाहीं किं, मला कोणी रंजीस केलें मी त्यांविषयीं समाधान पावतों; आणि तेहि मजविषयीं समाधान पावतात. माधवराव ह्मणाले असेल; पण असें विरळा आढळतें. त्यांस चांगले ठेवण्याविषयीं, किंवा चांगले करण्याविषयीं, तुह्मांस कांहीं युक्ती ठाऊक असावी. दमाजी ह्मणाले युक्ती सोहपी आहे; ही पाहा तुह्मास दाखवितों. असें ह्मणून त्याणीं एक पेटीक-

हे बोध केलें, त्यांस जाधवराव म्हणाले, मी समजलों नाहीं. त्यावर त्यांणीं कांहीं उत्तर न करितां पेटी उघडून दाखविली: त्यांत साहा खण होते. एकएकावर हें लिहिलें होतें.— अधिकोत्तर खर्च—माझा स्वातगत खर्च — माझे बायकोचा — माझे मुलांचा — चाकरांचा — "देणगीचा". दमाजी म्हणाले, मी माझे कुळांपासून एक वर्षाचे आगाउ रुपये वसूल करितों; त्यांचे साहा वांटे करितों. पहिल्ये खणांत वांटा घालतों तो, अरिष्ट खर्चास ठेवितों; त्यास तसें प्रयोजन पडतें तेव्हांच हात लावितों. दुसऱ्यांत जें घालितों तितक्यांत माझा खर्च ठेवितों. तिसऱ्यांत कुटुंबाचे पोटाचा खर्च, चवथ्यांत माझे मुलांचा, विद्याभ्यास इत्यादिक संपादितों. पांचव्यांत चाकरांचा मुशारा. साहाव्यांत त्यांस किंवा दुसरेकोणास देणगी, धर्मादाय इत्यादिक खर्च; या शेवटले खणामुळें मला चाकरांपासून [illegible] आहे. मुशाऱ्यांत ते बोली प्रमाणें चाकरी करितात; [illegible] बोली केली नाहीं, अशीं कामें आहेत तीं, ते देणगीचे लोभानें जीव लावून आणि माझे आज्ञेपेक्षांहि अधीक करितात.

## परशुराम, कृष्णी.

एके उन्हाळ्याचे दिवशीं, गोपाळराव यांणीं आपलीं दोघें मुलें, परशुराम आणि कृष्णी, यांस कबूल केलें होतें, कीं मी तुम्हांस आज संध्याकाळीं, आपल्ये बरोबर, एक चांगला बाग गावांबाहेर जवळच आहे तो, पाहावयास नेईन. मग संध्याकाळ झाला तेव्हां तो माडीवर पोशाग करायास गेला; मुलें खालीं होतीं. परशुरामास, आतां आपल्ये दृष्टीस मोठी मौज पडेल ह्मणोन, जो आनंद झाला, तो ब्रह्मांडीं नमाय. तो नाचूं उडूं लागला; इकडून तिकडे आणि तिकडून इकडे धूम खेपा घालितो आहे, आणि मोठे तयारीत आहे, इतक्यांत बापानें तेथें एक फुलझाडाची कोंडी आणून ठेविली होती, त्या झाडाचे फुलास, त्याचे शेल्याचा झपाटा लागून तें देंठापासून मोडून पडलें. तें हातांत घेऊन त्यास कृष्णी ह्मणाल्ये. अगा भाऊ! हें तूं काय केलेंस? तिचे हातांत फूल होतें, इतक्यांत गोपाळराव वरून खालीं आले, त्यांणीं रागें भरून कृष्णीस ह्मटलें, मुली, मी इतक्ये श्रमानें हें फूल राखून ठेविलें कीं, त्यापासून बीं आसवावें; तें त्वां असें तोडावें ना? ती कांपत कांपत ह्मणाली, आ[illegible]बाबा, कृपा करून तूं मजवर रागाऊं

नको

नको! गोपाळराव अंमळ थंड पडोन ह्मणाले, मुली, मी रागें नाहीं भरलों; पण आतां आपण दुसऱ्याचे बागांत जाणार, तेथेंहि तुला अशींच फुलें तोडायाची इच्छा होईल. ह्मणून मी तुला बाहेर नेत नाहीं; याविषयीं तुला वांकडें वाटूं नये.

कृष्णी अधोमुख पाहूं लागली, आणि स्तब्ध उभी राहिली.——तें पाहून परशरामाचानें उगीच राहवलें नाहीं. तो डोळ्यांत आंसवें आणून बापापाशीं गेला, आणि ह्मणतो, बाबा, तो माझे ताईचा अन्याय नव्हे, तें फूल मी तोडलें ह्मणून मला घरीं ठेव; आणि ताईस बरोबर ने.

त्यांस अशीं युक्तिवान् अवलोकून, आणि त्यांची परस्परांविषयीं ममता पाहून गोपाळरावास दया आली; त्याणें त्यांस पोटाशीं धरिलें, आणि ह्मणाला, तुह्मी दोघेंहि मांझीं आवडतीं; दोघेंहि मज बरोबर चला.

मग परशरामास आणि कृष्णीस जो आनंद झाला! तीं बापाबरोबर त्या बागांत गेलीं. त्यांत त्यांणीं नानाप्रकारचीं झाडें पाहिलीं. तेथें कृष्णी आणि परशराम आपआपलीं अंगुळें आवरून, बागांतून चालताहेत, तें पाहून गोपाळरावास समाधान वाटलें. त्याचें फूल त्याणीं नासलें, तें असतें तर त्यापासून

न

न त्याला संतोष झाला असता खरा, परंतु त्याप्रसंगीं, त्या ब्राह्मण भावंडांमध्यें परस्पर प्रीति, त्यांची निर्वैरता, ब्राह्मणपण, पाहून, त्यास त्याहून सहस्रगुणित आनंद झाला.

## हट्टीमुलगी.

अगा मुलांनो ! जर तुह्मा कोणास वाईट गुणाची खोड लागली असेल, त्या तुमचे सुखासाठीं मी, ही पुढची गोष्ट सांगतों; त्यांत तुमचे लक्षांत येईल किं, एकवेळ जर मनाचा दृढ निश्चय केला तर, भलती लागलेली खोड टाकायाचें अवघड पडत नाहीं.

चंद्रु ह्मणून एक मुलगी होती. ती सातवर्षेंपर्यंत आपल्ये आईबापांचा केवळ आनंद होती. त्या वयास आपल्या ज्ञानाचा उदय होऊं लागतो; आणि आपल्यास बरें वाईट समजूं लागतें; पण चंद्रुचेठायीं तें उलटें झालें. तिला जी एक हाड खोड लागली, त्यास दृष्टांत एक कुत्र्यावांचून दुसरा कोठला मला दिसत नाहीं. जसें एकादें पिसाळलें कुत्रें धुरधुरतें, आणि जाचेल्याचे आंगावर पडून त्याचेच तोडायास जातें.—— कोणी चुकतांना तिचे खेळण्यास हात लावला तर तिणें त्याकडे कुशास वळून

पाहावें

पाहावें, आणि एक घटिकापर्यंत दांत ओंठ खावे. एकादे अन्यायासाठीं तिला कोणी हळूच जरी धमकाविलें, तर तिनें लागलेंच उसळावें; हात पाय आपटावे; आणि रागानें आसपासचे पदार्थ भुईवर झोंकावे. तिचा बाप, तिची आई, व सगळीं घरचीं माणसें, तिला कंटाळलीं. कोणी आपल्यास जवळ उभें करित नाहीं; आईबापही आपला तिरस्कार करितात, ह्मणोन तिला एकादेवेळेस पश्चात्ताप होई, आणि ती डोळ्यांतून आंसवेंहि गाळी; पण संवई पडतां पडतां मग तिला तो खेद होईनासा झाला; आणि तिचा द्वाडस्वभाव दिवसानुदिवस दृढ होत गेला. एके दिवाळीचे दिवशीं, तिणें आपल्ये आईस, एक भरलेली टोपली पदराखालीं झांकून खोलींत नेतांनां पाहिलें; तेव्हां ती तिचे मागून खोलींत घुसूं लागली; तों तिचे आईनें तिला ढकलून मागें सारिली. ते समयीं तिला ओफरें येऊन जो तिणें अनर्थ केला, आणि रागानें दाराची कडीजी हापटली, तें सगळें घर दणदणलें. मग एक घटका जाउं देऊन तिचे आईनें तिला बलाऊन नेलें; ते समयीं खोलींत जाऊन तिला फार विस्मय झाला! जिकडे तिकडे दिवे उजळले आहेत; आणि नानाप्रकारचीं चांगलीं चांगलीं खेळणीं खोलीभर मांडून ठेविलीं आहेत. असें तिणें पाहून ती चकित झाली: आनंदानें

## हट्टीमुलगी.

चंद्नेनें तिच्चे तोंडावाटे एकशब्द निघेना. तिची आई तीस ह्मणाली. चंद्रु, इकडे ये, आणि या चिठीवर काय लिहिलें आहे हें वाच. त्या खेळण्यांत एक चिठी होती, ती चंद्रुनें हातीं घेऊन वाचली, तों त्यांत मोठमोठाल्या अक्षरांनीं हें लिहिलें होतें. "हीं खेळणीं जी मुलगी चांगले गुण करिल्ये तिजकरितां आहेत".

चंद्रु लाजून खालीं पाहूं लागली, एकशब्द बोलेना; तिला तिचे आईनें विचारलें, कां मुली, हीं कोणासाठीं आहेत बरें? ती डोळ्यांत आंसवें आणून ह्मणाली. "हीं माझेसाठीं नव्हत ह्मणे".

बरें तर, ही दुसरी चिठी आहे, पाहा त्यांत काहीं तुझे आहे का ?

चंद्रुनें ती हातीं घेऊन वाचिली. "हीं त्या हट्टेल्ये मुलीकरितां आहेत, जीचे बुद्धीस आपले दाइगुण आले आहेत, आणि जी दुसरी दिवाळी यइपर्यंत ते नीटकरायास इच्छिल्ये." ती वाचून चंद्रुस रडें कोसळलें; तिणें आईचे गळ्यास मिठी मारिली, आणि ह्मणतें; आहा बये, ही मी! ही मी! तेवेळीं आनंदीबाईचें हृदय गहिंवर आला, कांहीं मुलीचे दाडगुण स्मरून व कांहीं तिचा पश्चात्ताप पाहून. कांहीं पळें आवरून ती चंद्रुस ह्मणाल्ये, ये मुली, हा तूं, जो बरेगुण धरण्याविषयीं निश्चय केला, तो तुझा ईश्वर पार पाडो!

चंद्रु

चंदु ह्मणाली, नाही बये, याबेळेस ही सगळीं पहिल्यें चित्तीतल्यें मुलाची आहेत. तर आतांही असोंदे; जयपर्यंत मी नशी होईन; हें उत्तर ऐकून आनंदीबाईस बहुत समाधान वाटलें तिणें ती सगळी खेळणीं एका पेटींत घालून, तीस किल्ली करून, चंदूस ह्मणाली, मुली, पेटी किल्ली तुझे स्वाधीन, आणि तुला जेव्हां वाटेल किं आतां मी हीं घ्यावयास योग्य आहें, तेव्हां पेटी उघड

या गोष्टीस दोन महिने लोटले, तों पर्यंत चंदुस कधीं ओफरें आलें नाहीं. एके दिवशीं, तिणें आईचे गळ्यांत हात घालून पुसलें, बये, मी आतां ही पेटी उघडूं ? आनंदीबाईस प्रेमाश्रु येऊन ती तीस ह्मणाली, होय, माझे जिवा, उघड आतां. पण मला आधिं सांग कि, तूं आपला स्वभाव नीट करायास काय उपाय केलास बरें ? चंदु ह्मणाली, त्याविषयीं मला मोठे प्रयास पडले; मी नित्य आपल्ये मनांत ही गोष्ट घोकीं. पण सकाळ संध्याकाळीं देवाची प्रार्थना करीं, किं हे देवा, माझा निश्चय चळुं देऊं नको. तें ऐकून आनंदीबाईस किती आनंद झाला आहे, तो वर्णवत नाहीं. मग चंदु त्या सर्व खेळण्यांची धणी झाली; आणि आपल्ये आईचा प्रेमा तिणें आपल्येकडे संपुर्ण ओढून घेतला.

एके दिवशीं आनंदीबाईकडे एक मुलगी आली होती,

## हट्टी मुलगी.

ती अशीच हट्टी होती; तिचे समक्ष आनंदीबाईनें चंदुची गोष्ट सांगीतली. ती ऐकून त्या मुलीस जो पश्चात्ताप झाला, तेणेंकरून तिणेंहि चंदुप्रमाणें आपले वाइट गुण सोडायाचा, आणि तीप्रमाणें सर्वांस आवडती व्हावयाचा निश्चय केला; तिलाहि तसेंच फळ प्राप्त झालें, याप्रमाणें आपल्ये आचरणानें चंदूनें दुसऱ्यांस बरे गुण लावले, तेणेंकरून ती अधिक करवी झाला.

---

## आशाभंग.

एके आदितवारी प्रातःकाळीं, अमृतराव, बापाबरोबर माहिमास मौज मारायासाठी जाययास, सजून तयार झाला होता. तेथें जायाचें तें पूर्वीं पंधरा दिवस त्याचे मनांत सर्वदा घोळत होतें. तो लवकर निजून उठत नसे, तो त्या दिवशीं कोंबडें आरवणी उठला. घरचे सगळे माणसांस उठविलें; गाडीवानास ताकीद केली, आणि आपण न्हाऊन धुऊन सिद्ध होत आहे; इतक्यांत अकस्मात् आकाश काळें झालें; अभ्रें दाट झालीं; सोसाटा सुटला, त्याणें सर्व झाडें डोलूं लागलीं; आणि चोंहोकडे धुळीनें दिशा धुंद झाल्या. अमृतराव क्षणक्षणां आंगण्यांत जाऊन आकाशाकडे पाही;

फिरून

फिरून माडीवर जाई तो तीनतीन पायऱ्या उडे, आणि सोकाजी आपला बाप, त्यास आज्ञा देई कीं, बाबा, कांहीं चिंता नाहीं, हें आतां ढगळें जिकडे तिकडे जिरेल; आणि दिशा निर्मळ होतील. मला वाटतें कीं आपण निघालों तरी चिंता नाहीं.

सोकाजीनें मुलाचीं भविष्यें ऐकून तसें केलें नाहीं. तो म्हणाला, बाबा, अंमळ वाट पाहिली पाहिजे; इतकें म्हणतो आहे तों विजा कडकडूं लागल्या; आणि मोठा पाऊस कोसळला. तेव्हां अमृतरावाच्या चर्याचा जो झाला आहे, तो सांगतां येईना. तो म्हणाला, हा जळला आजच कशास लागला. संध्याकाळच्या प्रहर दिवसपर्यंत पाऊस पडून, मग जिकडे तिकडे निरभ्र झालें, आणि ऊन पडलें; झाडें पानें सगळीं टवटवीत दिसूं लागलीं. मग अमृतराव बहुत दिक होऊन राहिला होता; तो अंमळ हुशारींत आलासा पाहून, बापानें त्यास महालक्ष्मीपर्यंत बाहेर फिरायास नेलें. तेव्हां हवेची स्वच्छता पाहून, पक्ष्यांचे शब्द ऐकून, जिकडून तिकडून सुगंध येतो आहे तो घेऊन, त्याचा हृदयास समाधान झालें. त्यास सोकाजी म्हणतो; पाऊस पडल्यानें सर्वत्र काय फेरफार झाला तो तूं पाहिलास का? काल जिकडेतिकडे धुंद कसें दिसत होतें? उष्मा काय होत होता? सर्व व्याकुळ कसें झालें होतें? इतकी जिकडेतिकडे

टवटवी

## आज्ञाभंग.

छत्री दिसायास काय प्रयोजन बरें ?

अमृतराव ह्मणाला "आजचा पाऊस".

तो पाऊस भरून आला ह्मणून सकाळीं चडफडत होता, त्यास ते शब्द उच्चारतां बहुत जाचले: तो लज्जित झाला; तेवेळेस बापाचे लक्षांत आलेंकिं, यासही गोष्ट समजली कि, जीने बहुतांचें कल्याण, ती गोष्ट आपलें अकल्याण होऊनहि झाली, तरी चांगली. ती करायाची आपल्ये वांट्यास जरी आली, तरी मोठे होसेनें करावी, चडफडूं नये.

---

बाळमित्र.

# अंतिक.

## नाटक एक अंकी.

### पात्रें.

श्रीपतराय राजा . . . . . . . { विजयी होऊन आपल्ये राजधानीस आला आहे.

सगुणाबाई शिरकी

हरबाजी . . . . . . . . . नाईक गाडद्यांचा — तिचा वडील मुलगा.

रामराव . . . . . . . अंतिक — तिचा धाकटा मुलगा.

दलपतराव . . . . . . . . सरशिलेदार — तिचा भाऊ.

शाळागुरु

खिसमतगार

स्थळ, राजाचा वाडा.

---

### प्रवेश १

(राजा आपल्ये महालांत मंचकावर निजला आहे. त्याचे बाहेरचे खोलींत अंतिक एके बाकावर निजला आहे).

# अंतिक

राजा (पाहाटेस उठतो).

आहा! आज मला निद्राशी वाटली. इला स्वस्थपणाचें कारण ह्मणावें. एथें यांचे गोंघळीचा उपद्रव नाहीं. (तो घडियाळाकडे पाहातो) काय! वीस घटिकाच रात्र गेली? नाहीं, अधीक असावी, मला वाटतें किं मी बरा प्रहरावर निजलों. अंतिका! अरे अंतिका!

अंति० — (अरधा जागा उसळून उठतो, आणि पुनः पडतो) आं! कोण हांक मारतें? येतों.

राजा — तिकडे कोणी आहे किं नाहीं रे? काय, कोणी बोलत नाहीं?

अंति० — (कुशीस वळतो आणि जांभई देतो) आहा! काय झोंप लागली होती!

राजा — कोणी बोलताहेसें मी ऐकतों. कोण आहे तें? (तो दिवा फिरवितो आणि पुढें जाऊन अंतिकास पाहातो) काय! हें मूल एथें एकटेंच! पाणें, माझी चाकरी करावी किं मी, याची? या रिकाम गारांचें ज्ञातास काय ह्मणावें?

अंति० — (अरधा जागा उठतो आणि डोळे चोळतो) महाराज!

राजा — ऊठ ऊठ तुला तुझे घडियाळांत किती वाजले आहेत तें सांग; माझें बंद झालें.

अंति० – (बांकास धरून उभा राहातो. अरधा निजेंतच आहे) आं! काय महाराज?

राजा – (हंसतो) तूं अजून निजेंत आहेस? आहा! काय तोंड! असें नित्र काढलेंतर, चमत्कारिक दिसेल. मुला तुझे घडियाळांत किती वाजलेते सांगशील?

अंति० – (डोळे चोळतो) घडियाळ महाराज? मला क्षमा करावी; मजजवळ नाहीं.

राजा – तूं निजेंत बोलतोस, किं तुझे जवळ खरेंच घडियाळ नाहीं?

अंति० – माझे जवळ घडियाळ कधींहि नव्हतें.

राजा – नव्हतें? तुझे बापानें तुला एथें घडियाळावांचून पाठविला? तुझा सारिख्या जवळतर घडियाळ जरूर असावें.

अंति० – माझा बाबा! आहा! जर तो जीवंत असता———

राजा – तुला बाप नाहींतर?

अंति० – मी जन्मास आल्याचे आधींच तो मेला. मी त्यास पाहिला नाहीं.

राजा – बाप नाहींतर आणिखी कोणी तुला वडील असावें, म्हणों किंवा, तुझे आईनें तुला घडियाळ द्यावें.

अंतिक.

अंति० – माझी आई माहाराज ? आहा ! ती तुम्हास ठाउक नाहीं ! ती फार दरिद्रानें पीडली आहे; तिजजवळचें सगळें तिणें मजकरितां खर्च केलें; घडियाळ घ्यायास तिजकडे पैसे नाहींत

राजा – आणि दुसरी कोणी तुझे वडील आहे किं नाहीं ?

अंति० – माझा मामा आहे, माहाराज

राजा – (हंसतो) विश्वांत फार मामा आहेत, पण तुझे मामाचें नांव काय ?

अंति० – तो आपले हुजूर पागेवर असतो.

राजा – खरें मला स्मरला; त्याणेंच तुला माझ्यापाशीं आणिलें होतें. आतां माझे मुला, तूं ही मेणबत्ती घे, आणि समोरचे खोलींत जा; तेथें दोन घडियाळीं टांगिलीं आहेत, आरशाचे दोहों बाजूंस, त्यांतून उजवेकडचें आण. खबरदार हो, मेणबत्तीची ज्योत कपड्यास लाऊन घर पेटविशील नाहींतर.—जलदी कर !

अंति० – (जातो) होय महाराज

---

प्रवेश २

राजा.

काय चांगलें मुलगें आहे ! काय त्याची सरळता ! अशीं

एकादे

एकादे थोरमनुष्यांत असती, आणि तो मनुष्य जर माझा मित्र असता तर काय पाहिजे होतें ! पण हा लाहान फार; मला याचा उपयोग नाहीं; मी याला याचे आईपाशीं पाठवितों.

---

## प्रवेश ३

राजा, अंतिक.

अंति० - ( एके हातांत मेणबत्ती घेऊन आणि दुसऱ्ये हातांत घडियाळ ) महाराज, तीन घटिका रात्र आहे.

राजा - तर ! माझा तर्क खोटा नव्हे; आतां लवकरच उजाडेल. (अंतिकाकडून घडियाळ हातीं घेऊन ) पण, मी तुला आणायास सांगीतलें तें हें नव्हे; हेंच उजयेकडे होतें ?

अंति० - उजयेकडे हेंच होतें

राजा - बरें तर, हेंच जरीं होतें तरी, जर तुला आपलें हीत समजतें, तर दुसरें आणि तास; कां कीं हें हिरेजडित आहे, तुझे सारिख्ये मुलांस बाळगायास योग्य नाहीं; पण हें तूं लोभानें आणिलें असशील; अथवा जे अधिक आशा करून सगळेंच गमावितात, त्यांसारिखें करायास गेला असशील ? मला खरेंच सांग ?

अंतिक.

अंति० – महाराज काय बोलतात तें मी समजलों नाहीं.

राजा – तर तुला समजावितों. तुला डावें उजवें काय तें समजतें ?

अंति० – ( फिरफिरून एके हाताकडे पाहून दुसरे हाताकडे पाहातो) डावें आणि उजवें महाराज ?

राजा – ( त्याची पाठ थापटतो ) बरें मुला, तें असो. जा धांव पळि-ल्यानें, आपल्ये मामास एथें बलाऊन आण.

---

## प्रवेश ४

### राजा

काय भलें ! हें मनोहर मूल आहे हें ! हें हि मला दुसरें कारण होतें कीं, यास याचे कुटुंबांत पाठवावें; कां कीं राजदरबार हें कुशिक्षण व्हावयाची जागा, एथें राहून याणें बिगडूं नये. खरें च, मी यास याचे घरीं पाठवीन तें चांगलें; पण जर याची आई फार दुर्बळ आहे, याचें संरक्षण करावयास शकत नाहीं, तर याणें कोठे जावें ? मी प्रथम या गोष्टीचा शोध करितों बरें, दलपतराव मला सर्व सांगतील.

---

## प्रवेश ५

राजा, अंतिक.

अंति० - (येऊन सांगतो) माझा मामा येतो आहे माहाराजापाशीं.

राजा - तूं असा कां? तूं घुमसा दिसतोस? तुला काय झोंप येत्ये तुला?

अंति० - होय महाराज, येत्ये आहे खरी अंमळ.

राजा - तर जा मालक्यानें आपल्ये बांकावर [illegible]. मी तुझे सारिखा मुलगा होतो, ते वेळेस मला नीज फार गोड लागत होती. तें मला ठाउक आहे. जा स्वस्थ नीज, मी तुला आज्ञा देतों. (अंतिक जाऊन बांकावर निजतो).

---

## प्रवेश ६

राजा, दलपतराव, अंतिक, (निजला आहे)

दल० - महाराज, आपला सेवक.

राजा - आंत या दलपतराव, कां मी तुम्हांकडे आकडा बलावणेकरी पाठविला होता तो कसा आहे? तो माझे हुजुरे चाकरीस उपयोगी

आहेना

# अंतिक.

आहेना ?

दल० – (गाल खाजवितो) खरें माहाराज, तो अंमळ ल्हान खरा.

राजा – अथवा घोड्यावर स्वार होऊन माझे कामगिरीस जावयास ?

दल० – मग तो परत येईल कि कसा.

राजा – अथवा मजजवळ एथें रात्रीस चौकी करायास ?

दल० – (किंचित् हंसून) होय, जर माहाराज जागे असणार नाहींतर.

राजा – तर पाहा किं, मी या मुलानें काय करावें ? कांहींनाहीं; हें स्पष्ट दिसतें. तर अशा मुलास जो तुह्मी मजपाशीं आणिला, तो त्याणें माझी चाकरी करावी, या अर्थावर आणिला नाहीं; मी त्याचा भाग्योदय करावा, यासाठीं आणिला मला वाटतें. तुह्मी सांगितलें किं, याचे आईचानें यास पाळवत नाहीं; ती काय इतकी दरिद्रानें पीडली आहे; खरेंच सांगा ?

दल० – (छातीवर हात ठेऊन) होय महाराज; यांत असत्याचा लेश नाहीं.

राजा – कोणत्या कारणामुळें परें ?

दल

दल० - या मागचे लढाईमुळें. या लढाईंत कितीएक भाग्यवान झाले; कितीएक धुळीस मिळाले. याचे आईचें कायजें होतें, त्यांतलें कांहींच राहिलें नाहीं; वस्तुमात्र लुटून, जाळून, पोळून, फोडून, तोडून, गेली. त्यावर आणितिला पंचाइती भांडायाच्या लागल्या; कांकिं लढाई मागून त्या येतातच, जसी दुष्काळामागें जरीमरी; पण इतक्ये गोष्टीनें मात्र ती देववान् आहेकिं, तिची मुलें सोईस लागलीं आहेत. धाकटा हा, तुमच्या अंतिक आहे; व मोठ्याची गाड्यांत आसामी आहे. आतां ती आपले कसेहि दिवस काढील.

राजा - मग ही विपत्तीनें काढील यांत भ्रांत नाहीं.

दल० - खरें महाराज. (अंमळ उदासीनपणानें) ती एका गांवढ्यांत जाऊन राहिली आहे; तेथें एकटीच असत्ये. मी तिजकडे जात नाहीं. मी तिचा भाउ, तिची विपत्ती माझानें पाहावत नाहीं.

राजा - तुह्मी तिचे भाऊ प्रत्यक्ष ?

दल० - होय महाराज, भाऊपणा देवीं आला आहे खरा.

राजा - (त्यास धिक्कारून) देवीं आला आहे ? आणि तुह्मी तिला भेटायास जात नाहीं ? मी समजलों रावजी. तिची विपत्तीपाहून तुह्मास लाज वाटेल, आणि कदाचित् तुमचे मनास वाईट वाटलें तर, तुह्मावर कांहीं खर्च पडेल. (दलपतराव घाबरतात) तुमचे बहिणी

हिणीचें नाव काय ?

दल० - सगुणाबाई शिरकी महाराज ·

राजा - ( विचार करितो ) सगुणाबाई शिरकी. रणधीरराव शिरके आपल्या लस्करचे सरपाग्ये होते नव्हे ?

दल० - होय महाराज ·

राजा - ते पहिल्या लढाईंतच पडले नव्हे ?

दल० - खरें, ते या मुलाचे बाप महाराज. बहुत सचवटीचे मनुष्य; आणि मोठे शिपाई होते; ते हल्यास गेले, तेव्हां जसें कोणी म्हणेल किं, मेजवानीस जाताहेत. त्यांस सिंहाची छाती होती ·

राजा - मला त्यांचें स्मरण चांगलें आहे; आणि मी इछितों किं ——

दल० - (जवळ जातो) महाराज काय इछितात ?

राजा - त्याचे बायकोशीं बोलावें ·

दल० - जें आज्ञा झालीतर याक्षणीं करितां येईल. ती शहरांत आहे ·

राजा - ती एथें आहे ? आणवा तिला; लवकर तिला एथें येऊं द्या: मी तिशीं बोलून तिचें मुलगें तिचे स्वाधीन करणार————

दल० - महाराज ————

राजा - तुह्मी तें मला सांगू नका; जा लवकर. (तो बाहेर जातो)

---

प्रवेश

## प्रवेश ७

राजा, अंतिक, ( निजलेला )

राजा — काय ! तीची अशी दशा झाली ! केव्हडा अनर्थ हा ! या लढाई-मुळें किती लोक विपत्तींत पडले असतील ! इतकें बरें आहे किं, मी होऊन लढाई उद्भविली नाहीं. गत्यंतर नाहीं ह्मणोन मला तरवार धरणें प्राप्त झालें, ( तो उठतो आणि अंमळ इकडून तिकडे फिरून अंतिकाचे बांकाकडे उभा राहातो ) तीषकर मुलगें ! कसें स्वस्थ निजलें आहे ! जसें कोणी ह्मणेल निद्रेस समाधी लागली आहे. हा आपल्ये मनांत समजत असेल किं मी, आपल्ये आप्ताचे घरीं आहें; मला एथें कोणाची अडचण नाहीं. आहा ! केवळ सरळ भाव तो हा ! ( पुनः फिरतो ) याची आई ? ती जर, दलपतरा-यासारिखी असली तर मला तिचें कांहीं मनास आणण्यास कारण नाहीं. पण, प्रथम तिचें स्वरूप ओळखायास मी तिला आधीं कसून पाहीन; आणिखी मग — मग मला काय कर्तव्य तें करीन. ( तो बांकाशीं ओणवून मुलाकडे न्याहाळून पाहातो, तों त्याचे खिशांतून किंचित् बाहेर निघालेलें एक पत्र त्याचे दृ-ष्टीस पडतें ) पण हें काय आहे ? ( तो पत्र उघडितो आणि लि-

हिणाराचें

# अंतिक

हिणाराचें नांव वाचतो, तों सगुणाबाईची सही पाहून म्हणतो) हें याचे आईनें पाठविलें आहे. मी वाचूं हें? कां कीं मी तिचें स्वरूप जाणायास इच्छितों. ती आपल्ये लेंकराशीं कृत्रिम करणार नाही; बरें पाहुं या. (तो वाचितो)

"माझे परमप्रिया मुला".

"तुझे सारिख्ये मुलानें येव्हढीं पत्र लिहिणें अवघड. परंतु तूं मला
"लिहायास आळस केला नाहींस; आणि तेंहि चांगलें लांब लिहि-
"लें आहेस. ही तुझी मजविषयीं आस्थापाहून, माझे प्रत्ययास
"आलेंकिं, मजवर तुझी भक्ती आहे; ती पाहून मी तुझी उपकारी
"आहें. तूं मला लिहितोसकिं, तुझे मामानें तुला राजेसाहेबांकडे
"प्रविष्ट केला आहे: ते तुजवर लोभ करितात: ते बहुत थोर, बहु:
"तशांत आहेत; आणि तुझेंहि मन त्यांवर फार लोभवतें" (तो मुलाकडे
"पाहातो) काय, माझे गड्या, तूं असें आपल्ये आईस लिहिलें होतें-
"स? तर तूं मजवर लोभ करितोस; म्हणोन मी तुजवर करितों यां-
"त कांहीं मी विशेष करीत नाहीं. "माझे मुला, तूं त्यांची कृपा.
"संपादितोस, ही गोष्ट चांगली करितोस; कांकिं त्यांचे साहित्यावां-
"चून, तुला या लोकीं अन्यगती नाहीं. तुला बाप नाहीं, आणि ज-
"री आई आहे, तरि त्यासाठीं तुझी उपेक्षा कीच करावी असें नाहीं:

मी

"मी तुझें संगोपन करावें हें देवानें माझे हातीं ठेविलें नाहीं. तें मला
"रात्रदिवस बहुत व्यथा करितें; माझे सर्वां विपत्तीमध्यें ही माझी वि-
"पत्ती मोठी आहे. जेव्हां मी आपल्ये एकटीकडे पाहात्यें, तेव्हां म-
"ला फार संकट वाटत नाहीं; पण जेव्हां तूं, माझे मनांत येतोस, ते-
"व्हां माझें हृदय फुटतें, आणि आंसवें खळत नाहींत".

एथें बहुत कोमळता आणि बहुत चित्ताची आर्द्रता दिसत्ये; ही
चांगली आई आहे; अशीच जर चांगली बायको असली———
पण ती कोणत्यावी ? आहेच यांत मलासंशय नाहीं.

"माझ्या लाडक्या, कायकरूं; माझे इच्छेप्रमाणें, तुला मी, अभ्यास शि-
"कायाचे मार्गास लावायास शकत नाहीं. मी निरुपाय होऊन एथें
"एकांतवासीं पडिल्यें आहें. पण इतकें करीन कि, मी तुला ममते-
"नें, आणि माझे मनापासून, वारंवार चांगला उपदेश करायास चु-
"कणार नाहीं; आणि जंव माझे शब्द तुजकडे पोंहचतील, तंव ते
"तुला सन्मार्गच दाखवितील. तर तूं आजपर्यंत माझे मनाप्रमा-
"णें वागलास, याची खूण, तूं हें माझें पत्र आपल्ये बरोबर नित्य
"बाळगीत जा. दुसरें मी तुला काय देउं ?" (अंतिकाकडे पाहातो)
ह्या आईचें आर्जव वागतो हें, यावरून सिद्ध होतें.———"तूं मज-
कडून जाऊं लागलास, तेवेळेस, मी तुला माझे आंसवांनीं न्हाह्या-

गून

पून जो उपदेश केला आहे, त्यास, व तुझे स्वधर्मास, सांचुकावें ए-
सा जेथे प्रसंग तुजवर पडेल, तेव्हां तूं हें पत्र स्मर; हें उघड; हें वाच;
आणि मनांत आण किं, माझी आई आहे, तिणें माझे आशीर्वाद मा-
त्र, जीव धरिला आहे; आणि एकांतवासीं काळ काढिला आहे."
तिणें माझेवर मात्र; काय? याला दुसरा भाउ नाहीं? "आणि
"विचार कर किं मी कुमार्गी गेलों असतां ती दुःखानें प्राण सोडील:
"मग असें होईल किं, जें हृदय, इहलोकींचे सगळे पदार्थांपेक्षां मला
"अधिक चाहात होतें, त्यास मी करारीनें खोंचलें" ती खरें ह्मण-
ली, पून हाड निघालें ह्मणजे आईबापांस असेंच होतें——याणें
विघडावें असें हें स्थळ खरें; असें असतां तिणें यास एथें, कां पाठ-
वावें बरें? "तुज विषयीं मला, कोणत्येहि गोष्टीची शंका येऊन,
"किंवा तुजवर माझा अविश्वास होऊन, मी असें ह्मणत्यें, असें नाहीं.
"तुझें आचरण पाहून माझी खात्री होत्ये किं, तुजपासून वांकडी गो-
"ष्ट कदापि व्हायची नाहींच. पण तुझे भावाचे गुणानीं मला फार
"रडिवलें. मला वाटतें किं तूं माझी काकळून जाणून, तसा माझे दुः
"खास कारण होणार नाहींस." असें आहेना! याचा वडील
भाउ? गाडदी? त्याविषयीं मला आणिखी चांगलें समजून घे-
तलें पाहिजे "तूं सदां माझी मर्यादा ठेविलीस; तुझें चरित्र

पाहून

"पाहून मला आनंदाश्रु येतात; हें मी तुला खरेंच सांगत्यें. तरमु-
"ला, त्वां असेंच चालावें; भलें व्हावें, मग तुझी आई कशीहि दरिद्रां-
"त असो; कशीहि दुःखी असो; सर्व विपत्ती विसरेल."

"ही बायको थोर दिसत्ये. असें नसतें तर विपत्तींत हीची बुद्धी नीच
"व्हावी, ही उंचावली आहे; ही साध्वी आहे. "तुझे पत्राचे शेवटीं तूं मला लि-
"हितोस कीं, तुझे बरोबरच्यां सर्वांस घडियाळीं आहेत. यावरून मी
"जाणलें कीं, तुलाहि एक असावें. पण तूं तितकेंच लिहून उगा रा-
"हिलास; हा तुझा संकोच पाहून मी आनंद पावल्यें. मी दैवहीण,
"ह्मणून तुला एक पाठवायास शकत नाहीं; मी दरिद्री हें तुला सर्व
"ठाऊक आहे, ह्मणून मला क्षमा कर. कांहीं कामामुळें मला राज-
"धानीस जायाचें पडतें आहे; माझे जवळ थोडके पैसे आहेत ते वा-
"टखर्चीस पाहिजेत; तो खर्च अगत्याचा न करून रुहका नाहीं. प-
"ण माझें वचन घे कीं, माझें चाले पर्यंत मी तुझी इच्छा पुरवीन; आ-
"णि जर तुला जें व्हावें तें द्यावयास मी सकल्यें नाहीं, तरि मी तुला ब-
"री बुद्धी देण्यास कधीं अंतर करणार नाहीं. पुनः तूं लवकरच मा-
"झे दर्शनास पडावेंस, असी इच्छा करित्यें; हे आशीर्वाद."

या बायकोचें असें विपत्तींत असों नये. मी हें पत्र घेऊन माझे बाय-
कोस दाखविलों. पण नाहीं; हें यामुलाचें धन, मी कसें हरण करूं.

(तो

( तो पुनः तें पत्र त्याचे ओंगरख्याचे खिशांत घालितो ) काय स्व-स्थपणानें हा अजून निजला आहे ! ( मुलास हातीं धरितो ) मु-ला ! उठउठ, ( अंतिक उठतो आणि कांहींवेळ त्यांकडे पाहातो ) माझे जीवाची आशा; हा मुलगा मनोहर आहे ! चल माझे गड्या, आतां ऊठ, दारीं दिवस फार आला, ऊठ ·

अंति० – ( हळूच उठतो ) होय महाराज ·

राजा – तूं अजून निजेंतच आहेस ः चल; माझे खोलींत जा ( तो जातो ) आणि दिवे मालीव; आणि दरवाजा लाऊन घे ·——— झालें ? आतां जेथून पडियाळें आणिलेंस तेथें जा; इकडून; याबटेनें; लवकर; नीट जा. आणि तिकडून परत ये. कां आतां पुरता जागा झाला-सना ?

अंति० – होय महाराज ·

राजा – आतां सांग भला, किं तुला पत्र लिहितां येतें ?

अंति० – होय महाराज, त्याहायास बसलों असतां लिहितों. मी दोन लांब पत्रें लिहिलीं आहेत ·

राजा – आपल्या आईस लिहिलींस वाटतें ?

अंति० – ( संतोषानें ) होय महाराज. माझे आईस ·

राजा – ( तिची गोष्ट बोलतों, तेव्हां तुझे डोळ्यांत आनंदाची टवट-

वी

ची दिसत्येमला. (एकीकडे) दरिद्रदशेंत असतांहि, काय यां-
ची एकमेकांवर प्रीति! पण तुझी आई चांगली आहेरे?

अंति० - आहा! महाराज! जर तुह्मी तिला वळखत असतेत!

राजा - मी तिशीं ओळख करीन; पण ती तुला कशी वाटत्ये तें सांग.

अंति० - ती असी नली आहे, आणि असी माझी माया करित्ये --

राजा - तर तिचे मुलगेहि तिजसारिखे चांगले असावे. मी ऐ-
कतों किं तुझा वडीलभाउ चांगला नाहीं. पण तूं ———

अंति० - (मान हालवितो) माझा भाउ हर्बाजी?

राजा - होय, मी ऐकतों किं तो तुझे आईस फार कष्टी करितो; हें
खरें?

अंति० - आहा महाराज; मला तें बोलतां येत नाहीं. जर जमात रा-
संचे कानावर गोष्ट गेली तर, ते मोटे तिरवट आहेत.

राजा - मी तुला वचन देतों, त्याला यांतलें कांहीं समजूं देणार ना-
हीं. बोल तूं सर्व, काय आहे तें. तुझे भावानें काय केलें?

अंति० - त्याणें पुष्कळ वाईट चाळे केले. ते सगळे मला ठाउक ना-
हींत; पण माझी आई त्यावर फार रागावली होती, तें मला ठाउक
आहे; त्याची अबरू झांकावी ह्मणून ती फार खबरांत आली.
(तो राजाजवळ जातो, आणि हळूच बोलतो) ती ह्मणाली किं, ति-

तक्या

अंतिक.

तस्याकरितां नसतें, तर तो केव्हांच चाकरीतून हांकून दिला असता.

राजा - हांकून दिला असता ? कशाकरितां ?

अंति० - आहा, महाराज, माझ्यानें तें सांगवत नाहीं.

राजा - काय ? मला ?

अंति० - तिणें मला देखील समजूं दिलें नाहीं.

राजा - (हंसतो) तें तिणें नीट केलें. पण त्यां आपणाकरितां, कधीं घडियाळाविषयीं आईस लिहिलें होतें ?

अंति० - एकच वेळ.

राजा - तेव्हां ती तुजवर रागें भरली नव्हे ?

अंति० - नाहीं नाहीं महाराज. तिणें मला उलटें लिहिलें किं, मी कसें हि करून माझें सामर्थ्य चाले पर्यंत, तुजकरितां, एक विकत घेईन. तिला मी लिहिलें म्हणून त्याची मला खंती होत्ये आतां. कां किं, तिचें पोट भरायाची भ्रांत आहे. तिची अवस्था पाहून, मी फार दुःखी आहें.

राजा - तां दुःखी असावेंच. चांगल्या लेंकानें आईवर खर्च घालूं नये. त्याणें तिला साहित्य करावें; हा त्याचा स्वधर्म होय. घडियाळाचीच गोष्ट आहे तर, तुला तें कोणी हि देईल. (तो पैशांची पि

शावी बाहेर काढितो ) धर, घेत्या बारा मोहोरा. या मी तुला इनाम केल्या, तुझा हात कर पुढें.

अंति० – ( हात पुढें करितो, राजा त्यावर मोहरा मेजून घालितो ) महाराज, या काय मला ?

राजा – होय खरेंच; पण खरें सांग, तूं याचें काय करिशील ?

अंति० – इतक्यांचें घडियाळ येईल नव्हे ?

राजा –. येईल पण चांगलें. पण तुला घडियाळाचें अगत्यच नाहीं; एथें तीं पुष्कळ आहेत. ( अंतिक आशाभरित त्याकडे पाहातो ) मी तुझे जागीं असतों तर या पैशांचा मी कांहीं चांगला उपयोग करितों. असो तूं तुझे मर्जीस येईल तें कर. मी जातों नित्यकृत्यास. पण परत येई तों तूं एथेंच ऐस. ( राजा चालूं लागतो )

अंति० – ( त्यास बलावितो ) महाराज !

राजा – कां ? तुला काय पाहिजे ?

अंति० – माझी आई शहरांत आली असावी. ती आज सकाळीं येणार होती. मी तिला भेटून येऊं ? ( फुसलावितो ) महाराज मला रजा देतील ?

राजा – नाहीं तुला, कांहीं प्रयोजन नाहीं; तुझी आई तुजकडे येईल; तुला ती एथेंच भेटेल; अंमळ धीर धर ( तो जातो ) .

## प्रवेश ८

### अंतिक

ती एथें येईल ? ती मला एथेंच भेटेल ? याचें कारण काय बरें असेल ? असो कायअसेल तें; मला भेटीशीं कारण. एक, दोन, तीन, चार, ( मोहरा मोजतो ) बारा मोहरा ! घडियाळें घ्यावयास ! कायमी दैववान् ! मला वाटतें किं, तें यावेळेस माझे हातांत आहे; टुण टुण वाजलें तें मला ऐकूं येतें; मी त्यास किल्ली फिरविलों आहें. पण राजानें सांगीतलें किं, मी तुझे जागीं असतों तर या पैशांचा कांहीं चांगला उपयोग करितों. याचा कायबरें अर्थ असेल ? तो काय करता ? होय ! त्याकडे घडियाळांची वाण नाहीं; ह्मणोन त्याला त्याची नवाई वाटत नाहीं. बरें पण त्याणें मला आणखीहि सांगीतलें किं, चांगल्ये लेकानें आईस साहित्य करावें. निभ्रांत; त्याणेंहें आमचे प्रकरणींच ह्मटलें. इतक्या मोहरा माझे आईकडे असल्यातर, तिला फार उपयोगी पडतील नव्हे ? ( तो दोहों हातांत घेपून मोहरा उराशीं नेतो ) घडियाळें घेउं किं आईस देउं. नाहीं घडियाळेंच घ्यावें; तर आईकडेहि पाहावें ! आणि अशे ममताळू आईकडे तर,

अगस्त्यानें

अगत्याने ! तिणें काल मला पत्र पाठविलें त्यांत ती लिहित्येकिं, मोठे विपत्तीत आहें. तिला हे पैसे दिले असतां काय आनंद होईल! एकदांच तिचें संकट दूर होईल! तर कायमी हे, तिजकरितां आपल्यास नाहिंसे करूं? (निश्चय करितो) होय, त्वां करावेंच. पण ती आतां लवकर येईल तरबरें; नाहींतर माझी बुद्धी फिरेल एकादे. मला पडियालाचाहि ध्यास आहे! चुपचुप, कोणी येतें आहें.

---

## प्रवेश ९

### सगुणाबाई, दलपतराव, अंतिक

अंति० - (आईस भेटायास धांवतो) काय! !, माझेबये!

सगु० - (मुलाकडे लक्ष नदेतां संभ्रांत आसपास पाहात्ये) मला समजत नाहीं; पण मी मोठी चिंतेत आहें भाऊ; राजेसाहेबानीं मला कां बोलाविलें असेल बरें?

दल० - हा मुलगा पाहा; यास ते तुझे स्वाधीन करणार. (ती साश्चर्य सचिंत मुलाकडे पाहात्ये, तो आनंदानें तिचे गळ्यास झोंबतो) पाहातां थीं, याला एथें आणणें हा वेडेपणा; राजांनी यास काय

करावें

करावें ? दुसरीं मुलें वाढतील आणि रोजगारास चढतील; प- णहें, (अनादरानें) असें रवुजरयेंपोर आहे किं, कोण त्येहि उप- योगीं पडावें नलगे. हा तुझें दुःखाचें दूध प्याला आहे, ह्मणून अ- सा झाला मला वाटतें. हें झाड मुळासच रोगटलें; याला शक्ति याची नलगे; हा वाढावा नलगे.

सगु० - (खेद पाऊन) आहा! भाउ! दैव माझें!

दल० - तर, राजेसाहेबांकडे तूं याविषयीं प्रार्थना करूं नकोहो;- करून फळ नाहीं. वडिलाकरितां हा येतर, कांहीं बोल; तो कांहीं तरी मनुष्यसा दिसतो.

सगु० - वडिलाविषयीं?

दल० - होय, त्यालाहि बलाऊं पाठविला आहे.

सगु० - भाउ, तूं मला भय घालितोस. त्याचे गुण राजास स- मज ———

दल० - (अनास्थेनें) असतील, कां न समजावे. (नाक मुर- डतो, आणि उदासीनता दाखवितो) त्याणें लोकांची उ- न्यापत फार काढिली आहे; आणि त्यास कांहीं दिवसीं लडक- रोंतून पळून जावें लागेल, किंवा बंदीखान्यांत बसावें लागेल. हें राजास समजलें तर, कसें होईल? आणि हें सगळें येणार

मजवर

मजवर ——— ( ताडून ) तूं पाहा किं, माझा भलाईचा मला नडल्पें आहे; आणि मला वाटतें किं, त्याकरितां मला पाहाऱ्यांत जायाचें पडेल. मी तुझे पोरांचे खटल्यांत पडलों नसतों तर बरें होतें. असो, पण अतःपर पडणार नाहीं. ( तो चडफडत चडफडत पुढें जातो मागें येतो ) नाहीं; माझे कुडींत प्राण आहेपर्यंत मी अतःपर तुझे पोरांचें नाव घेणार नाहीं.

( तोजातो )

---

## प्रवेश १०

### सगुणाबाई, अंतिक.

**अंति०** — ( तिला चिंतेंत पाहून ) मामाचा सदा तापट स्वभाव. बोलूं दे त्याला बये; तूं कांहीं चिंता करूं नको.

**सगु०** — तूं उगीच ऐसमुला; तुला समजत नाहीं ———

**अंति०** — ओहो ! मला मामापेक्षां अधीक समजतें -- तो ह्मणतो त से सजे साहेब नाहींत; ते कोणास उपद्रव करायाचे नाहींत. याचा दाखला हा पाहा; पाहा लागलाच. ( हातांतल्या बारा मोहरा दाखवितो ) पाहा, ह्या सगळ्या त्याणीं मला दिल्या.

सगु०- (आश्चर्य पाऊन) असें होईल? राजेसाहेबांनीं?

अंति०- त्याणीं एका मोठ्या पिशवींतून काढिल्या. ती सग-ळी मोहरांनी भरली होती. आणि तूं यासाचे आगोदर तुकड्या-च मला दिल्या. आइ, जर यांची इछा झाली; जर त्यांची कृपादृष्ट झाली! तरमगकाय! ते मातबर आहेत! आपल्यास अभर करून सोडतील.

सगु०- पण हें कसें झालें? मला समजत नाहीं. त्याणीं कांहीं योजून दिल्या असतील.

अंति०- यांत भ्रांतकाय. त्यांचें घडियाळें बंद झालें होतें. ते काल सगळादिवस शिकारीस गेले होते, ते त्यास किली द्या-वयास विसरले; आणि आज प्रातःकाळीं (तो खोलीकडे जातो आणि दरवाजा उघडितो) ती बये, तीजागा; राजे-साहेबांची निजायाची, त्याणीं मला तेथें बलाविलें, आ-णि ह्मटले, मुला, तुझे घडियाळांत किती रात्र राहिली आहे तें पाहा? माझे जवळ घडियाळ नोहतें ———

सगु०- ह्मणून त्याणीं तुला हे पैसे दिले?

अंति०- होय; त्याणीं घडियाळें विकत घ्यावयास दिले. (फिरून मोहरा दाखवितो) त्या बगबारा मोहरा.

सगु० – मजकडे पाहातोस काय ? मी तुझें खरें मानणार नाहीं.

अंति० – कां ? पण मला घडियाळाची उतावीळ नाहीं; तें मी कधींहि घेतलें तरि कामास येईल. (आईचा हात घेतो) तूं घेत्याबसे, आपल्ये जवळ ठेव.

सगु० – (आंवढा येऊन) काय ! माझा जिवा, असें आहे.

अंति० – वये, तूं सदां रडत्येस, तें मला वाईट वाटतें. आहा ! मजपाशीं पुष्कळ पैसे असते तर बरें होतें ! मग मी तुला कधीं रडूं देतोंना. सगळे, होय, दमडीन दमडी मी तुझे स्वाधीन करितों.

सगु० – (त्याजवर झेंपत्ये) काय ! तूं तसें करितास ? खरेंच ?

अंति० – तुला संतोषांत पाहून, मला फार आनंद होतें.

सगु० – (त्याचा मुका घेत्ये) तुझी वासना पाहून तुला मी फार खुषी झाल्यें. राजेसाहेबांनीं, आपली सगळी दौलत जरी मला दिली, तरि या वेळचे आनंदाचें मोल होणार नाहीं. – मुला, तुला अनुभव नाहीं; मज सारिखी हीणभाग्याची आई आहे तिला, मुलाची, आपल्ये विषयीं, सदयहृदयता पाहून, किती समाधान होतें तें !

अंति० – (तो तिचा हात फिरून धरितो) तूं हे पैसे घे पण, मी तुझी विनंती करितों; नाहीं ह्मणूं नको. ———

सगु० – होय मुला. मी घेत्यें. आणि तूं एथें असतां, तुला गरज

आहे

अंतिक.

आहे स्वर्णोत, मी तुला याचें ———

अंति० – मला काय तूं याचें घडियाळ देणार ?

सगु० – तूं राजेसाहेबांपाशीं आहेस; तुजजवळ एक असावें.

अंति० – मला त्याची कांहीं गरज नाहीं. राजेसाहेबांचे प्रतिरचोलींत घडियाळीं आहेत. त्याणीं मला स्वतां सांगीतलें किं, घडियाळा वांचून तुझें कांहीं अडणार नाहीं.

सगु० – पण, त्याणीं तुला घडियाळा करितां पैसे दिले नव्हे ?

अंति० – असें ते बोलले, इतकेंच.

सगु० – मला दिसतें तर तूं मला ठकवितोस; तूं त्याचे ममतेमुळें एकादी लबाडी करीत असशील.

अंति० – लबाडी ? तर तुला माझें खरें वाटत नाहीं ? यावेळेस एथे राजेसाहेब असते, तर तुला समजलें असतें. आहा ! ते लवकर येतील तर बरें. ( मागें फिरून पाहातो ) हे, तेच स्वतां आले, आतां पाहा बरें. ———

---

## प्रवेश ११

### राजा, सगुणाबाई, अंतिक.

अंति० – ( राजा समोर जातो ) बरें हें खरें किं नाहीं महाराज ? तु-

म्ही

त्यांनी मला बारा मोहरा दिल्या ? पहिल्यानें घडियाळें घ्यायास ?

राजा – होय, माझे लाहान्ये माणसा ·

अंति० – आणि मग, तुला घडियाळाचा तोटा नाहीं, हेंहि तुह्मी नाहीं सांगितलें ?

राजा – तेंहि खरेंच ·

अंति० – (लागलाच आईकडे फिरून) पाहा बये, आतां कसें ?

सगु० – (घाबरी होऊन) महाराज, हें मुलगें अज्ञान, सरळ भावानें बोलतें; मर्यादा कशी ठेवावी तें यास समजत नाहीं; याची क्षमा असावी ·

राजा – क्षमा! बाई, मला सरळपणा फार आवडतो; असा सर्वांत असतां तर काय नोहतें. वास्तविक असेंच सर्व असावें. मुला. मला वाटतें तुझे आईस, तुझें खरें वाटलें नाहीं ?

अंति० – (अंमळ सचिंत) नाहीं महाराज. पहिल्यानें तिला खरें वाटलें नाहीं; मी तिला मोहरा देत असतां ती घेईना ·

राजा – तूं ती घेईना, हें काय ह्मटलेंस ? तर काय तुझे दृष्टीत माझें कशीस हलकें दिसलें, ह्मणोन तूं दुसऱ्यास देऊं लागलास ? असें होणार नाहीं ·

अंति० – (कांचापिनो) महाराज———

राजा

# अंतिक.

राजा – मला जर असें आधीं समजतें तर मी तुला देतोंना. खरे-च सांग, त्वां तसें केलेंकाय ?

अंति० – (आईकडे बोट करितो) आहा महाराज; माझी आई फार गरीब आहे !

राजा – (त्याची हनुवटी धरितो) भल्येबाळा ! तर त्वां आपल्ये गरीब आईची कीव जाणून घडियाळाची आशा सोडिलीस ? तिला साहित्यकरून घडियाळ गमावणें, हें तुला फार अवघड पडलें असेल नव्हे ? (तो आपलें घडियाळ बाहेर काढितो) हें घे. यावेळेस हें एकच जरि मजकडे असतें, तरि मी तुला दिलें असतें——

अंति० – (आनंदानें घेतो) आहा, महाराज ! पण हें चालतें आहे ना ?

राजा – भिऊ नको, चांगलें चालतें. (अंतिक आईकडे धांवतो तें दाखवायास) शाबास मुला. मी तुला दिलें होतें, त्याचें त्वां चांगलें सार्थक केलें. (त्यास मोहरांची पिशवी देतो)

ही घे; यांत शंभर मोहरा आहेत; त्या मी तुला बकक्षीस केल्या.

अंति० – (त्याकडे साश्चर्य पाहातो) महाराज, हें काय !

राजा – तूं अनमान करितोस ? घेत्या.

अंति० – काय! सगळी पिशवी! (परत द्यावयास करितो) महाराज, हें फार आहे.

राजा – होय; तुला फार खरेंच. पण मी यासाठीं देतों किं, तूं याचा चांगला उपयोग करावास. बरें, याचा बहूत उपयोग कोणास आहे?

अंति० – बहूत उपयोग कोणास आहे? (तो राजाकडे आणि आईकडे पाळीपाळीनें पाहातो) त्याचे आईतुला.

सरु० – (राजापुढें येत्ये) महाराजांचा मजवर फार——

राजा – उपकार मानायाचें कांहीं कारण नाहीं. हें मी थोडें दिलें. मला वाटतें किं इतक्यांत तुमचें संकट दूर होणार नाहीं. पण बाई (मुलाकडे हात करितो) हा मुलगा माझे चाकरीस फार लाहान आहे. माझे उपयोगीं नाहीं; ह्मणोन मी यास परत करितों; याचें तुह्माला वाईट वाटूं नये. कां? तुह्मी बोलत नाहीं?

सरु० – महाराजानीं क्षमा करावी——

राजा – काय?

सरु० – माझें दरिद्र पाहून मला लज्जा होत्ये. याला मी परत नेऊन काय करूं? मला याचें पोषण कसें होईल? मी याचर

आशा

आशा फार धरिली होती. आतां मी पुनः भवजाळांत पडल्यें. मी आतां प्राण धारण कसें करीन? (रडें आरंभल्ये) हा फार ल- हान; यास बाप नाहीं; पुढें याचा परिणाम कसा होईल? महाराज, मी अल्पबुद्धी; बोलल्यें याची क्षमा असावी.

अंति० - (रंजिस होऊन राजाचा हात धरितो) महाराज, बये रडल्ये.

राजा - तूं आपल्ये आईपाशीं राहातोस ना?

अंति० - (आर्जवानें) महाराज, तर आपण मला घरीं जाऊं न देतां?

राजा - तूं जायास राजी नाहींस? बरें तर बाई, असूंद्या याला म- जकडे. पण एथें राहून याचें कसें होईल? हा कदाचित् बिगडेल. असोपण, याचें मला भय वाटत नाहीं.

सगु० - हा बिगडेल! (मुलाकडे डोळे लाविल्ये) हा बिगडेल, आपण ह्मणतां महाराज?

राजा - नाहीं; हा बिगडणार नाहीं?

सगु० - (सभय) महाराज, मी आपला अभिप्राय चांगला समजल्यें नाहीं, ह्मणून माझे निर्भिडतेची क्षमा असावी.

राजा - माझा अभिप्राय असा किं, माझे दुसरे अंतिक आहेत, त्यां-

चे

चे गुण चांगले नाहींत; हा त्यांचे सोबतीनें बिगडूं शके. पण अनुभवून पाहूं या———

सगु० – (मुलाचा हात धरित्ये) नाहीं महाराज, हा तसा नाहीं.

राजा – पण पाहा; याचा दूरवर विचार करा ———

सगु० – त्याविशीं मला भ्रांतच नाहीं. याला कोठें हि असों द्या.

राजा – पण विद्याभ्यासावांचून याचें कसें होईल ?

सगु० – भगवान् काय करील तें खरें. त्याला शरण आहें. जर हा परिश्रम करून उदयास येणार नाहीं, तर मजुरी करील; दरिद्र भोगील; पण याणें दुराचरणीमात्र होऊं नये; इतकी माझी इच्छा आहे.

राजा – बाई, तुमचा थोरपणा पाहून मला संतोष झाला. तुम्हास सर्वगोष्टींचें साहित्य करावें, हें मला योग्य आहे. (मोठे आवडीनें) तुमची काय इच्छा आहे; कोणत्या गोष्टीनें मी तुमचें प्रिय करीन ? मोकळें मन करून बोला. मी तुमचा मित्र आहें; शंकूं नका ?

सगु० – (सद्गदित होऊन) मी तुमची कशी उतराई होईन !

राजा – तुमची अवस्था काय आहे ? तुमची मालमता काय आहे, तें

तें मला सर्व सांगा.

सगु० — माझी मालमत्ताउी आहे ती आतां माझी नव्हे.

राजा — तर मला वाटतें तुम्हांवर फार कर्ज आहे? सरकारांत तुमची कांही पंचाईत चालली आहे असें मी ऐकतों; त्याचें कसें काय आहे?

सगु० — महाराज, एक कर्ज माझे इनामगांवाचें आहे तें द्यांच चुकावा; पण मजकडे पैका नाहीं, मला कोणाचा आश्रय नाहीं, मी तो घरांत समजाचा स्वप्न आल्पें होत्यें, पण तसें होत नाहीं.

राजा — यानंतर तें कांहीं वाईट झालें नाहीं, तुमचा इनसाफ आतां वाजवी होईल; माझें वचन घ्या. आणि मी तुम्हांस एक हजार रुपयांचें स्वास्थ्य करून देतो. मला वाटतें कीं, मग तुमच्या सर्व अडचणी दूर होतील.

सगु० — (लोटांगण घालित्ये) हत भाग्यावर मजवर इतकी कृपा!

राजा — (तिला उठवितो) काय तुह्मी करितां हे बाई. मी तुम्हांस प्रार्थितों कीं उठा. तुमचे भ्रतारानें जी सरकारचाकरी बजावली आहे ती, पाहिली असतां मी हें करितों, हें फार थोडें आहे

आहे. सांगा मला आतां, तुम्ही मुलास परत न्याल कीं नाहीं?

सगु०- महाराज, हे उपकार जन्मोजन्मी विसरणार नाहीं.

राजा - आणि मुला, तूं आतां आईपाशीं जाशील किं नाहीं?

अति०- (घडियाळाशीं खेळतो) आईपाशीं? होय महाराज.

राजा - तूं मजकडे राहात नाहींस तर?

अति०- बरें तर, जशी महाराजांची मर्जी.

राजा - तर जर मी आता तुला आइकडे लावलें तर तूं मजपाशीं नाहीसा होशील नव्हे? आणि तुझी तर इच्छा आहे किं मज पाशीं असावें; आणि तुझे आईचीहि तशीच इच्छा आहे. असो मला कांहीं दुसरा प्रकार केला पाहिजे. बाई तुम्ही एथें असा; मी, हाच आलों.

---

## प्रवेश १२

### सगुणाबाई अतिक.

सगु०- (बांकावर बसत्ये) आहा! काय सुदिन हा! कांच अकल्पित सुख हें!

अति०- कां आई? कां? तूं आतां खुशालली सना?

सगुणा

# अंतिक

सगु० - ( त्यास जवळ घेत्ये ) अगा माझे जिवलगा, माझे परम प्रिया मुला !

अंति० - पण तुला फार हर्ष झाला असें मला दिसत नाहीं, तुला फार आनंद व्हावा असें न इच्छितों.

सगु० - बाळा, मला आतां मा[illegible] ज्ञा होत्ये, कांकि मी भगवंताचा शब्द लक्षित होत्यें. तूं झालास तसेंच तुझे बाबाचें वर्तमान आलें; तेव्हां मी तुला कदाळल्यें, आणि तूं कशासं जन्मलास ह्मणून तुला शब्द ठेविला; ( ती त्याला अलिंगिते आणि त्याच्या मुका घेत्ये ) आणि त्याच तुझे हातून मी आज सर्व संकटांतून मोकळी झाल्यें ! तूं आज माझी आसवें आटविलींस ! हे भगवान्, आतां मी आणिखी कसची वांछा करूं ? मी परिपूर्ण झाल्यें, मला कांहीं अपेक्षा राहिली नाहीं. पण एक तेवढें तुझे बाबाचें कल्पभाग्य मला उणें आहे मग माझें सर्व नीट झालें.

अंति० - माझें बाबाचें, कां ? त्याचें काय आहे ?

सगु० - जर राजेसाहेबांस त्याचे गुण समजले तर ——

अंति० - त्यांना समजले तरी त्याचें काय होणार आहे ? तूं पाहिलेंस नाहीं; ते काय कृपाळू, काय थोर आहेत ते ?

सगु० – खरेंपण, आपल्यावर कांकिं आपण त्यांचा कांहीं अपराध केला नाहीं.

अंति० – पण त्याणीं मला वचन दिलें आहे कीं मी कोणा पाशीं सांगणार नाहीं.

सगु० – ( भ्याली ) काय! त्याणीं तुला वचन दिलें आहे! कसें?

अंति० – होय खरेंच, म्हणून तूं भिऊं नको.

सगु० – मी धरकत्यें तूं त्यास सांगीतलेंसतर.

अंति० – नाहीं; सांगीतलें म्हणशील तर कांहीं सांगीतलें नाहीं. मला ठाऊक होतें तितकेंमात्र सांगीतलें. मग त्याणीं मला त्याचें आचरण पुसलें; ते मी कायउगीच खोटें सांगूं? तुला ठाऊक आहे किं तूं मला खोटें सांगायाची मना केली आहेस.

सगु० – पण, मुला हें काय केलेंस!

अंति० – कां बये, तूं चिंता कां करित्येस?

सगु० – अरे देवा चिंता कां करित्येस, म्हणून आणिखी पुसतोस! जर राजानीं आणिखी चौकशी केली; आणि जर त्यास लें समजलें, तर मग तुझे आईची आणि तुझे भाचाची धडगत नाहीं.

अंतिक.

अंति० – (तो रडूं लागतो) धडगत नाहीं !

सगु० – चूप कोणी येतें आहे. (ती त्याचें चुंबन करित्ये आणि त्यास अवसान देत्ये) एक शब्द बोलूं नको, तुझे डोळे पूस. तुला रडतां पाहिलें तर, एकादा घात होईल. चिंता करूं नको

## प्रवेश १३

### सगुणाबाई, अंतिक, राजा, दलपतराव, हरबाजीराव.

राजा – यो राव; आंत यावें. (हरबाजीरावांस) रणधीररावांचे पुत्र हरबाजी नाईकगाडदी ते आपणच काय ?

हर० – (फारलवून) होय महाराज.

राजा – योग्य. तुमचे तीर्थरूप बहुत सज्जन, आणि मोठे शूर होते. माझी खात्री आहे किं, तुह्मीहि त्यांची चाल धरिली असेल; आणि जेणेंकरून तुह्मी त्यांचे पुत्र साजा, असें करित असाल.

हर० – महाराज, तसें च्या करावें, हें मला योग्य आहे.

राजा – खरेंच; तुह्मी योग्य आहां त्यापेक्षां योग्य असेल तेंच कराल. ही पाहा तुमची आई; इचे गुण, आणि या मुलाचें शुभलक्षण पाहून, तुमचें

कुटुंब

कुटुंबच थोर आहे, असें माझे बुद्धीस आलें; आणि मला वाटलें कीं तुह्मां सर्वांस एकेठायीं पाहावें; ह्मणोन एथें पाचारून आणिलीं आहेत·

हर० – ( आणिखी लवतो अंमळ डोलानें ) महाराजानीं ही, आज मला मोठी आबरू दिली !

राजा – तुह्मास योग्य आहे, त्यापेक्षां मी कांहीं अधीक केलें नाहीं·

हर० – महाराज मला, आपलें कृपापात्र करितात·

राजा – खरेंच, तुह्मास भाग्यास चढवावें, असी माझी फार इछा आहे; परंतु तुमचें स्वरूप माझे बुद्धीस आलें आहे, तसेंच वास्तवीक आहे, असी माझी खात्री झाली पाहिजे; कां किं, तुमचे निस्पृहपणाचे बोलण्याचा, तुमचे प्रोढीचा, डौल पाहून ————

हर० – आहा ! महाराज, धन्य मी !

राजा – त्यावरून मला वाटतें किं, एकतर, तुह्मी बहूत थोर असाल, किंवा बहूत वाईट मनुष्य असाल; पण अशा आईबापांचा पोटीं आणि कसा पुत्र होणार नाहीं; नाहींच. बरें तर यासमयीं मी तुमची सेवा काय करावी ? तुह्मास, एक पायरीवर चढविले तर त्याणें तुमचा योग्यता फार वाढेल, असें कांहीं दिसत नाहीं ? बरें तुह्मास कसें वाटतें ?

## अंक ३.

हर० - ( अंमळ विचार करून ) खरेंच महाराज.

राजा - बरें एक पायरी टाकून दुसरे पायरीस चढविलें असतां तुह्मी जमादार मात्र व्हाल; शंभर मनुष्यांवर सर! त्यांतहि कांहीं विशेष नाहीं. पण प्रथम, ( दलपतरावांकडे फिरतो ) राव, तुमचे पुतण्याचे योग्यताविषयीं तुमचें काय मत आहे.

दल० - ( अंमळ गोंधळून ) माझें महाराज? माझें मत?

राजा - या भाषणावरून विपरीत असावेंसा भास होतो.

दल० - नाहीं महाराज, फार स्वपरीत आहे; मला वाटतें कि हा हिंमती आहे; आणि पुढें शूर निफजेल.

राजा - ( हरबाकडे तोषितासारिखा पाहातो ) कायहो? हें खरें?

दल० - आणिखी हा स्वरूपानेंहि फाकडा दिसतो.

राजा - होय, हा चांगला जवान आहे हें मला प्रत्यक्ष दिसतें पण याचें आचरण, याची रीति कशी? तुह्माला असेल्या हलक्या गोष्टी विचारायास मला लाज वाटत्ये. पण मुख्यत्वेंकरून हा कोणत्ये प्रकारचा मनुष्य आहे तें मला समजलें पाहिजे.

दल० - ( हंसून ) अंमळसा रंगीला; कोणे समयीं अंमळसा-अद्रहि पण महाराज हीं शिपायास दूषणें नव्हत.

राजा - खरेंच? मला हें आजपर्यंत समजलें नव्हतें. आतां बाई

मला तुमचा सत्यमात्र पाहिजे. तुह्मी याविषयीं काय ह्मणतां ? ( अंमळ विसांवून ) —— कांहींनाहीं मला वाटतें ?

सगु० – मी त्याविषयीं काय सांगावें महाराज ?

राजा – काय तुह्मास दिसत असेल तें, खरेंच सांगा.

सगु० – पण महाराज, मला तें सांगवेल ? जर, मला त्याची प्रशंसा कर्तव्य आहे, ती मी, त्यांचे समक्ष केलीतर, महाराजांस मानेल ? अथवा, जे त्यांचे आचरणाप्रमाणें त्यास फळ तत्काळ देउं शकतात, अशांजवळ मला त्याची वांकडी गोष्ट बोलवेल ?

राजा – ( हंसून ) बाई तुह्मी मोठी स्तुत्य आहां. या उत्तरांत, तुह्मी आईचा कणवाळूपणा राखून, बायकोंचा प्रौढपणा दाखविलात. तुमची प्रशंसा, मी कधीं न करूं. ( हरबाजीस अंमळ गंभीरवाणीनें ) रावजी, एकएकाची चाल निरनिराळी असते; तशी माझीहि आहे. कोणास वाढवावें, असें माझे मनांत आलें ह्मणजे मी पहिल्यानें त्यास पाहाऱ्यांत देतों. हें तुह्मास कसें दिसतें बरें ?

हर० – ( भिऊन आणि घाबरून ) महाराज ! हैंहँहैं ——

राजा – होय माझी चाल अशीच आहे. तुझी तरवार दलपतरावांचे स्वाधीन कर. तुझेठायीं मला अंमळ संकोच आढळला असता तर, इतकें होतेंना. पण अहंमान ! हा बोलण्यांत धीटपणा ! आपण

## अंतिक

दुर्गुणी आहे हें, आपल्या मनांत समजून हि जो अशीं भयंकर शोचनीय बोलणी बोलतो, त्या मनुष्यापासून कसची आशा धरावी ? ... ... ध्यानं मला राग आणिला असं कोणास वाटेल ? त्या मनुष्यानें आपल्या मह्राथोर आईस, दै. प्रमाण ... ... आणि ... मानीला ... के करू नहि पुन: ——— (रागानें) ... ... एक मनिना बंदीखान्यांत. बाई, खरंच सांगतो तुम्हाकरितां मीं यांपेक्षां काहीं अधिक मनास आणिलें नाहीं. पण जी गोष्ट माझेकडून आल्या आहेत, त्यावरून मला दिसोन येतें कि, हा महान् अपराध ... (रोषयुक्त आणि तीव्रतानें) दलपतराव, ... कडे आचरण आढळलें असतां, मला तत्काळ ... त ? त्याक्षणी. मी पुढें पाऊल घालण्यास ... (दलपतरावांकडे पाहून) दलपतराव तुम्ही अथवा (... नें) तुम्ही बाई, नज़रकैद यांसमधीं याची ... करू ... याला कोणत्येंहि मित्रास काहीं हकं नये. याला ... याणें आपल्ये रोजमऱ्यास ... (यानंतर ... आतां जायें राय आपल्ये ... दल ... आणि ... जातात).

## प्रवेश १४

### राजा, सगुणाबाई, अंतिक.

राजा — कां बाई, तुह्मी कष्टीशी दिसतां ?

सगु० — नहू राजा — [illegible]

राजा — पण तुह्मी इतर अज्ञान आईसारिख्या आई नव्हा, जा अ- मळ मुलाला दुःख होईल ह्मणून त्यास शिक्षा करीत नाहींत.

सगु० — [illegible] ममता करितात ती खोटी ममता. पण मला चिंता इत- [illegible] कीं, तो आतां जन्मवर महाराजांचे कृपेंतून गेला असें नव्हावें.

[illegible] पी तुह्मी काळजी करूं नका; माझें मनांत इतकें [illegible] जे पुढें उपकार करणार त्यांस त्यांचे योग्य व्हावें, [illegible] याकडेहि कांहीं पाहिलें पाहिजे; ह्मणोन मी त्याचे [illegible] अपराध क्षमा करीन; पण असें सदा करणार नाहीं. पाहू [illegible] कसें होतें न. [illegible]काचास पश्चात्ताप होऊन तो ठिकाणीं येतो, [illegible] कादा [illegible] अधीक बिघडतो. पण तें कसेंहि होऊ, तुह्मी स्व- [illegible] असावें. [illegible] आतां तुमचा मुलगा मार्गावर येईल, [illegible] ती ज [illegible] नसतसी मी त्यावर कृपा करीन.

[illegible] तुमचा मुला विषयी तुह्मी जाणतां मी काय [illegible] आहे तें ?

सगु०

अंतिक

सगु० – तें जें काहीं असेल तें, त्याचे कल्याणार्थच असेल महाराज. महाराज आपला थोरपणा ऐकून, आपलें कल्याण चिंतन केल्यावांचून, माझा एक दिवसहि रिकामा गेला नाहीं. पण आपलें गुण आज प्रत्यक्ष पाहून मला वाटलें कीं, मी आपलें स्वरूप कांहींच वर्णिलें नाहीं.

राजा – तुम्हास ठाउक आहे? मी इच्छितों कीं, याला माझे राज्याचा स्तंभ, माझा विश्वासू सेवक, आणि माझे मुलांचा मित्र करून ठेवावा; कीं जो एखादे दिवशीं प्रसंग पडला असतां, आपल्या बापाप्रमाणें राज्याचे कल्याणार्थ प्राण खर्च करील.

---

प्रवेश १५

राजा, सगुणाबाई, अंतिक, खिजमतगार.

सेवक – महाराज विनंती आहे, बाहेर राजद्वाळ्यागुरू आले आहेत.

राजा – त्यांस आंत घेऊन ये. बाई, माझे मनांत आहे तें मी आतां तुमचे समक्ष करितों, तुम्हाला तें रुचावें म्हणून.

---

# बालमित्र

## प्रवेश १६

राजा, लगुणाबाई, अंतिक, राजशाळा गुरु.

गुरु - (नमन करतो) महाराजाची आज्ञा ऐकायास सिद्ध आहें.

राजा - बहुत संतोष झाला. बलाविलें होतें इतक्या करितां कि, राजशाळे-
त थोरांची मुलें तुम्हास काय देत असतात.

गुरु - थोरांची मुलें महाराज? तें आईबापांचे थोरपणावर आहे.

राजा - असोंपण त्यांनी काय द्यावें तें सांगावें?

गुरु - माहवारी रु१० [illegible] महाराजाची आज्ञा झाल्यास.

राजा - बरें तर. हा मुलगा तुमचे स्वाधीन करायास मी इच्छितो. त्यास
बाप नाहीं, म्हणोन मी यास बापाचे जागीं झालों आहें, त्या अर्थी यास
जें पाहिजे तें सर्व मी पुरवीन. पण प्रथम मला सांगा कि, मुलांचे चौ-
कशीवर कोण असतो कां कि, तें मुख्य पाहिलें पाहिजे.

गुरु - वेगवेगळाले उपगुरु आहेत.

राजा - तें मला वाटतें कि, आपआपल्ये कामास योग्यच असतील; प-
ण मी त्यांस बळखत नाहीं. माझा सर्व भरंवसा तुम्हावर आहे.
तुम्ही माझे खात्रीस उतरले आहां, म्हणून कृपाकरून तुम्ही स्वतां या
मुलाचें सर्व पाहावें.

# अंतिक

गुरु — जशी आज्ञा.

राजा — मी आज्ञा म्हणून नाहीं सांगत; तुम्ही संतोषानें हें कबूल करावें तर.

गुरु — महाराजांच्या जांत संतोष तें म्या करावें. त्यांतच माझें कल्याण.

राजा — मी तुमचा उपकारी होईन. ( अंतिकास हातीं धरून ) माझे मुला ये. हे गुरु पाहिलेसना? हे बहूत शांत आणि सज्जन आहेत. तूं यांच संगाती जाऊन यांकडे राहा. आणि चांगला विद्याभ्यास कर.

अंति० — ( पळभर गुरुचे तोंडाकडे पाहून ) होय महाराज.

राजा — पण हे तुझे धणी, हे तुझे हितकर्ते, असें तूं यांस मान. यांचे वचना वेगळा चालूं नको. यांची मोठी मर्यादा ठेव. आणि जर का यांणीं तुझी फिर्याद केली ———

अंति० — त्याविशीं महाराजांनीं निश्चिंत असावें.

राजा — कांकिं आतांच तुझे दृष्टीस पडलें किं मी जसा गुणवानास चांगला, असाच दुर्गुण्यास वाईट आहें. तुझा इथला बोभाटा ऐकिला असतां —— हां.

अंति० — ( मोठे नम्रतेनें गुरूस नमतो ) गुरुजी तुम्ही भजकर रागावाल असें मी कधीं करणार नाहीं.

राजा — हें मुलगें तुम्हास कसें वाटतें?

गुरु — महाराज, आपला वरदहस्त जाचे माथीं त्यास काय पाहायाचें

आहें

आहे. मी याला आपल्या मुलाप्रमाणें वागवीन.

राजा – बरें तर; याला घेऊन जा. बाई यागोष्टीची तुह्मास कांहीं अडचण नाहीं मला वाटतें ?

सगु० – हे भगवान् ! अडचण महाराज ?

राजा – आतर माझें प्रियकरा. आणि कधीं सदाचरण, सच्चरी मार्ग सोडूं नको. तुला कोणत्येहि गोष्टीचें मी उणें पडों देणार नाही. पण तूं मला खिन्नसा दिसतोस ?

अंति० – (राजाचा हात धरितो) ईश्वर तुह्मास सर्व फळें देऊ.

राजा – (कोमलतेनें) आणि तुलाहि तशींच देऊ; आणि तुझें कल्याण करु माझे मित्रा. अहा ! त्याचें हृदय कितीं दाटलें आहे ! (गुरुस) आतां तुह्मी याला घेऊन जावें. आणि बाई तुह्मी यां बरोबर जावें, आणि तुमचा मुलगा राहाणार तें स्थळ पाहावें

सगु० – (साष्टांग नमस्कार घालित्ये) महाराजांचे उपकार ! मी काय ——— (तिचा गळा दाटला अश्रुचे लोट चालले बोलवत नाहीं)

राजा – तुह्मी काय करितां हें बाई. हें मला आवडत नाहीं.

सगु० – मला हे पाय ——— .

अंतिक

राजा – ( तिच्या प्रश्नात्कारानें उद्विग्नो ) माझे माते तू मला इतका थोरपणा देऊं नको. उठ उभी राहा.

सगु० – ( ती उठल्ये ) बरेंतर, मी आतां निरोप घेत्ये. ( प्रस्थान करित्ये ) मी हें असें नित्य देवाकडे करीत जाईन, आणि तुम्हांसारिखे उदार, दीनदयाळ, यांचें सदा कल्याण असो ह्मणोन, त्यापाशीं प्रार्थना करीन.

राजा – ( तिला चार पावलें पोहोंचवितो ) यावें बाई, तुमचें देव बरें करू.

( तीं सर्व निघून जातात )

SP 1/18

প্রথম ভাগ সমাপ্ত

کتاب کالج فورت ولیم
किताब कालिज फ़ोर्टविलियम
পুস্তক কালেজ ফোর্টউলিয়ম
IMPERIAL